# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

**बी. ए. भाग–३ राज्यशास्त्र**

सत्र ५ : पेपर–९ (DSE- E78)

# आंतरराष्ट्रीय राजकारण

**(International Politics)**

सत्र ६ : पेपर–१४ (DSE- E203)

# भारताचे परराष्ट्र धोरण

**(Foreign Policy of India)**

(शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२२
बी. ए. (राज्यशास्त्र) भाग-३ पेपर (९ व १४) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ४००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-86-4

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र


अध्यक्ष – **प्रा. डॉ. श्रीमती भारती पाटील**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **प्रा. डॉ. रविंद्र भणगे**
  राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. राजेंद्र कुरळपकर**
  के.आर.पी. कन्या महाविद्यालय, उरुण-इस्लामपूर,
  जि. सांगली
- **डॉ. एस. जी. कुंभार**
  राजा श्रीपतराव भगवंतराव कॉलेज, औंध,
  जि. सातारा
- **डॉ. आर. आर. कांबळे**
  कर्मवीर हिरे आर्टस, सायन्स, कॉमर्स अॅण्ड
  एज्युकेशन कॉलेज, गारगोटी, जि. कोल्हापूर
- **डॉ. अमिता संजिव कणेगांवकर**
  डी.डी. शिंदे सरकार कॉलेज, महालक्ष्मी मंदीर जवळ,
  कोल्हापूर
- **डॉ. शिवाजी सुबराव पाटील**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **प्राचार्य डॉ. शिरिषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा
- **प्रा. डॉ. श्रीमती उत्तरा सहस्त्रबुद्धे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **प्रा. डॉ. मृदुल निळे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **प्रा. डॉ. ए. एस. चौसाळकर**
  आर. के. नगर हौसिंग सोसायटी,
  एमएसईबी ऑफीस समोर, कोल्हापूर
- **श्री. वैभव नायकवडी**
  हुतात्मा किसन अहिर शुगर मिल, वाळवा,
  जि. सांगली
- **श्री. दशरथ विठोबा पारेकर**
  फ्लॅट नं. ५०८, एव्हरग्रीन होम्स, फेज-४,
  टॉवर डी, प्रभू हॉस्पिटल रोड, नागाळा पार्क, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूर शिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक बी. ए. भाग तीन च्या राज्यशास्त्र विषयाच्या पेपर क्रमांक ९ सत्र पाच साठी 'आंतरराष्ट्रीय राजकारण' आणि पेपर क्रमांक १४ सत्र सहा साठी 'भारताचे परराष्ट्र धोरण' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

सत्र ५ साठी पेपर क्रमांक ९ आंतरराष्ट्रीय राजकारण यामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारण : स्वरूप आणि व्याप्ती, राष्ट्रसत्ता, राजनय, नवीन जागतिक व्यवस्था तर सत्र ६ साठी पेपर क्रमांक १४ यामध्ये परराष्ट्र धोरण, भारत आणि जागतिक महासत्ता, भारत आणि भारताचे शेजारील संबंध, भारताच्या परराष्ट्र धोरणातील सातत्य आणि बदल याचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य, सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे आम्ही आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे दूरशिक्षण केंद्रातील सर्व सहकारी सहा. प्राध्यापक तसेच विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) रविंद्र भणगे**
विभागप्रमुख, राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. विजय जालिंदर देठे**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**सत्र–५ : पेपर–९ : आंतरराष्ट्रीय राजकारण**
**सत्र–६ : पेपर–१४ : भारताचे परराष्ट्र धोरण**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. एच. एस. कुचेकर**<br>तुकाराम कृष्णाजी कोलेकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय, नेसरी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | १ | – |
| **प्रा. एस. एम. पाटील**<br>श्री शिवशाहू महाविद्यालय, सरुड, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर | २ | – |
| **डॉ. सचिन दत्तात्रय भोसले**<br>दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३ | – |
| **डॉ. संजय सागरू संपकाळ**<br>श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी, जि. सांगली | ४ | – |
| **प्रा. ए. आर. पाटील**<br>नाईट कॉलेज ऑफ आर्टस अँण्ड कॉमर्स, इचलकरंजी | – | १ |
| **डॉ. शार्दूल सेलूकर**<br>विठ्ठलराव पाटील आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज, कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | – | २ |
| **प्रा. डॉ. आण्णासाहेब हारदारे**<br>शिवराज कॉलेज ऑफ आर्टस अँण्ड कॉमर्स कॉलेज, गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | – | ३ |
| **प्रा. प्रशांत प्रक्षाळे**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा, जि. सातारा | – | ४ |

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) रविंद्र भणगे**
विभागप्रमुख, राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. विजय जालिंदर देठे**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–९** | |
| | **आंतरराष्ट्रीय राजकारण** | |
| १. | आंतरराष्ट्रीय राजकारण : स्वरूप आणि व्याप्ती | १ |
| २. | राष्ट्रसत्ता | २९ |
| ३. | राजनय | ५२ |
| ४. | नवीन जागतिक व्यवस्था | ६६ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१४** | |
| | **भारताचे परराष्ट्र धोरण** | |
| १. | परराष्ट्र धोरण | ९७ |
| २. | भारत आणि जागतिक महासत्ता | १०९ |
| ३. | भारत आणि भारताचे शेजारील संबंध | १४३ |
| ४. | भारताच्या परराष्ट्र धोरणातील सातत्य आणि बदल | १७० |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

**घटक १**

# आंतरराष्ट्रीय राजकारण : स्वरूप आणि व्याप्ती

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

- १.२.१ आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अर्थ आणि व्याख्या
- १.२.२ आंतरराष्ट्रीय राजकारण स्वरूप
- १.२.३ आंतरराष्ट्रीय राजकारण व्याप्ती
- १.२.४ आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाचे दृष्टीकोन
  - १.२.४.१ आंतरराष्ट्रीय राजकारणातील आदर्शवादी दृष्टीकोन
  - १.२.४.१ आंतरराष्ट्रीय राजकारणातील वास्तववादी दृष्टीकोन

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

१.५ स्वयंअध्ययन प्रश्न आणि उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्टे :

ह्या घटकांच्या अभ्यासानंतर आपल्याला

१) आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अर्थ,स्वरूप आणि व्याप्ती समजावून घेता येईल.

२) आंतरराष्ट्रीय राजकारणातील आदर्शवादी सिद्धांत स्पष्ट करता येईल.

३) आंतरराष्ट्रीय राजकारणातील वास्तववादी सिद्धांत स्पष्ट करता येईल.

## १.१ **प्रस्तावना** (Introduction) **:**

आधुनिक काळात राष्ट्र-राज्याच्या कल्पनेमुळे संचार माध्यमांच्या तसेच विज्ञान क्षेत्राच्या क्रांतीमुळे पूर्वी अतिशय दुरची वाटणारी राष्ट्रे आता जवळची वाटू लागली आहेत. प्रत्येक राष्ट्राला विकासासाठी आणि अत्यावश्यक गरजांच्या पूर्ततेसाठी इतर राष्ट्रांशी संबंध ठेवावे लागतात. त्यामुळे त्यांच्यात सामाजिक,आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक असे विभिन्न प्रकारचे संबंध प्रस्थापित होवू लागले आहेत. राज्यांचे संबंध हे दोन प्रकारचे असू शकतात. उदा. मित्रत्वाचे आणि शत्रूत्वाचे संबंध.

**१. मित्रत्वाचे संबंध :** या संबंधात परस्पर सहकार्य व मदतीची भावना असते. या संबंधांना गैरराजकीय संबंध (Non- Political Relations) असे ही म्हणतात.

**२. शत्रूत्वाचे संबंध :** यात राज्यांचे संबंध अनेक वेळा बिघडतात त्यांच्यात संघर्ष, मतभेद किंवा युद्धस्थिती निर्माण होते.अशावेळी त्यांच्यातील शत्रूत्वाचे संबंध वाढले जातात,अशा संबंधांना शक्तीसंबंध (Power Relations) असे म्हणतात.

आंतरराष्ट्रीय संबंध ही प्रक्रिया गतिशील असल्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाच्या अभ्यासाला आज महत्व प्राप्त झाले आहे.आंतरराष्ट्रीय राजकारण समजून घेताना आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अर्थ,स्वरूप आणि व्याप्ती तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणाचा आदर्शवादी आणि वास्तववादी सिध्दांताचा अभ्यास जाणून घेणे आवश्यक आहे.

## १.२ **विषय-विवेचन (Presentation of Subject matter) :**

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय संबंध हा एक स्वतंत्र विषय म्हणून विकसित झाला आहे. कौटिल्य, प्लेटो आणि ॲरिस्टॉटल या विचारवंतांनी प्राचीन काळात एका राष्ट्राने दुस-या राष्ट्राशी कसे संबंध प्रस्थापित करावे याविषयी विपूल लिखाण केले आहे. मॅकियाव्हॅलीने धर्म, नीती आणि राजकारण यांना एक दुसऱ्यापासून अलग करून राजाने कसे वागावे या संबंधी उपदेश केलेला आहे. विसाव्याशतकाच्या प्रारंभी इ.स. १९०० मध्ये पॉल रिश यांनी आंतरराष्ट्रीय संबंध या विषयावर सर्वप्रथम एक पुस्तक लिहून जगाचे लक्ष या विषयाकडे वेधून घेतले. पॉल रिश यांनी त्यावेळी अमेरिकेतील विसकान्सिन विद्यापीठात या विषयावर पहिले भाषण दिले. तेव्हापासून या विषयाचा राज्यशास्त्रांतर्गत एक स्वतंत्र अभ्यास विषय म्हणून प्रारंभ झाला. पहिल्या महायुध्दानंतर या विषयाच्या अभ्यासाला खऱ्या अर्थाने अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. इ.स. १९१९ मध्ये वेल्स येथील विद्यापीठात आंतरराष्ट्रीय संबंध हा विषय शिकविण्यास प्रारंभ झाला. त्यानंतर अनेक विद्यापीठात प्रस्तुत विषय शिकविण्यास प्रारंभ झाल्यापासून या विषयाचे महत्त्व आणि उपयुक्तता जगाला समजली असली तरी आंतरराष्ट्रीय हा शब्दप्रयोग जेरेमी बेंथॅम यांनी १७८९ मध्ये सर्वप्रथम केला आहे. आज आंतरराष्ट्रीय संबंध केवळ राजकारणापुरते मर्यादित न राहता ते परस्परात आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक, राजकीय, लष्करीबाबत संबंधाचे जाळे विणले गेले आहे.

### १.२.१ आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अर्थ :

आंतरराष्ट्रीय राजकारण ही सतत बदलणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारण ही संकल्पना स्पष्ट करताना प्रथम राजकारण ही संज्ञा समजून घेणे महत्वाचे आहे. राजकारण म्हणजे राजनीती होय. संस्कृत भाषेत राजनीतीचा अर्थ राजाची नीती असा आहे. मात्र आधुनिक काळात राजनीतीचा अर्थ व्यापक दृष्टिकोणातून पाहिला जातो. आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी प्रभाव पाडण्याची, नियंत्रण ठेवण्याची कला, तसेच सतासंबंध प्रस्थापित करण्याची प्रक्रिया म्हणजे राजकारण होय. रॉबर्ट डाल्ह यांच्या मते, मानवी समुदायावर सता चालविण्यासाठी आणि नियंत्रण ठेवण्यासाठी जे कौशल्य (कला) लागते त्यास राजनीती किंवा राजकारण असे संबोधले जाते. मॅक्स वेबर यांच्या मते, राजनीती (राजकारण) म्हणजे सताप्राप्तीसाठी संघर्ष करावा लागतो. राजनीती आणि सत्ता यांचा संबंध घनिष्ठ असतो. राज्यातील समुदायामध्ये चालणारा संघर्ष आणि राज्याराज्यातील चालणारा संघर्ष या दोहोंचा संबंध राजनीतीमध्ये समाविष्ट असतो. सत्ताप्राप्तीसाठी, सत्ता टिकविण्यासाठी राष्ट्राराष्ट्रात संघर्ष चालू असतो. सत्ताप्राप्तीसाठी केला जाणारा संघर्ष म्हणजेच राजकारण होय. सत्ता राजकारणाचे अनिवार्य तत्व आहे. प्रत्येक राष्ट्र आपली सत्ता टिकविण्यासाठी अन्य राष्ट्रावर प्रभाव पाडीत असते. संघर्ष करीत असते. अशा संघर्षातून आंतरराष्ट्रीय राजकारण घडत असते.

आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे राष्ट्राराष्ट्रातील संबंधाचे राजकारण होय. राष्ट्रहित, संघर्ष आणि सत्ता या तीन महत्वपूर्ण घटकांशी आंतरराष्ट्रीय राजकारणाचा संबंध येत असतो. राष्ट्रहितासाठी राष्ट्रे परस्परांशी मतभेद, संघर्ष करीत असतात. त्यासाठी सत्तेचा वापर करीत असतात. राष्ट्राराष्ट्रात संघर्ष नसेल तर राष्ट्रहित आणि सत्ता यांना फारसे महत्व राहत नाही. तेव्हा संघर्ष हाच आंतरराष्ट्रीय राजकारणाचा आधार आहे. तरीपण केवळ संघर्षाला महत्व न देता काहीं राष्ट्रे परस्परांशी मैत्रीपुर्ण संबंध, सहकार्य याद्वारे राष्ट्रीय हित जोपासताना दिसतात.

**आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या व्याख्या :**

काहीं राजकीय विचारवंतानी आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या व्याख्या पुढील प्रमाणे केल्या आहेत.

१) हॅन्स जे मॉर्गेंथॉ यांच्या मते, ''राष्ट्रा राष्ट्रातील सत्तेसाठी चाललेला संघर्ष आणि सत्तेचा वापर म्हणजेच आंतरराष्ट्रीय राजकारण होय.''

२) चार्ल्स स्लायचर यांच्या मते, ''राष्ट्रा राष्ट्रातील सर्व प्रकारच्या संबंधाचा जो अभ्यास असतो त्यास आंतरराष्ट्रीय राजकारण असे म्हणतात.''

३) फेलिक्स ग्रॉस : ''आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास म्हणजे राष्ट्रांच्या विदेशनीतीचा अभ्यास होय.''

४) पामर आणि परकिन्स यांच्या मते, ''आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाचा संबंध मुख्यत्वेकरून राष्ट्रांच्या राज्यपद्धतीशी असतो.''

५) फेडल फोर्ड आणि लिंकन यांच्या मते, ''आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे राज्याच्या धोरणातील परिवर्तनशील सत्तासंबधांच्या पध्दतीमध्ये घडून येणाऱ्यात क्रिया आणि प्रतिक्रिया होत.

६) केनेथ डब्ल्यू थॉम्पसन यांच्या मते, ''राष्ट्रा राष्ट्रातील परस्पर संबंध बिघडविण्यास किंवा सुधारण्यास कारणीभूत ठरणारी परिस्थिती आणि संस्था यांचा अभ्यास म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारण होय.''

७) क्विन्सी राईट यांच्या मते, ''आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे आपल्या कुशल व्युहरचनेचा विचारपूर्वक उपयोग करून जगातील प्रमुख राष्ट्रावर किंवा राष्ट्रगटांवर प्रभाव निर्माण करून किंवा त्यांच्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित व्हावे म्हणून कोणाच्याही विरोधाची भीती न बाळगता आपले उद्दिष्ट साध्य करण्याची कला होय.''

अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या विविध व्याख्यांचा परामर्श घेतला असता असे आढळून येते की, आंतरराष्ट्रीय राजकारण ही एक ज्ञानाची अशी स्वतंत्र आंतरशाखा आहे की, जिच्यामुळे राष्ट्रा राष्ट्रातील सर्वप्रकारच्या संबंधाचा क्रिया-प्रतिक्रियांचा आणि त्यासंबंधीच्या निर्णयाचा व कृतींचा अभ्यास करता येतो.

**आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यासाचा विकास :**

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाची खरी सुरूवात विसाव्या शतकापासून झाली. केनेथ थॉम्पसन यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या विकासाचे चार कालखंड सांगितले आहेत.

**पहिला कालखंड (१९०० ते १९१८) :** पहिल्या महायुध्दाच्या पूर्वी आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययन पध्दतीवर इतिहास तज्ञांचा प्रभाव होता. या काळात या विषयाच्या अभ्यासामध्ये ऐतिहासिक घटना क्रमावर जास्त भर होता. तत्कालिन राष्ट्रीय घडामोडींचा फारसा विचार केला जात नसे. पॉल एस.रिश याने १९०० मध्ये आंतरराष्ट्रीय संबंध या विषयावर एक पुस्तक लिहीले. यामुळे पुढील अभ्यासाला गती मिळाली.

**दुसरा कालखंड (१९१९ ते १९४५) :** पहिल्या महायुध्दानंतर दुसरी अवस्था सुरू झाली. या अवस्थेमध्ये तत्कालिन राजकीय घडामोडींचा अभ्यास करण्यात येऊ लागला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी जागतिक शांतता प्रस्थापित करण्याच्या हेतूने चौदा कलमी योजना जाहिर केली. या कालखंडात लोकशाही मुल्यांचा प्रसार झाला. इ.स.१९१९ मध्ये वेल्स विद्यापीठात आंतरराष्ट्रीय धोरण आणि राजकारण या संबंधीचा नवीन विभाग सुरु करण्यात आला. प्रो.अल्फर्ड झिमर्न आणि प्रो.सी. के. वेब्सर अशा इतिहास तज्ज्ञांची या विभागात नेमणूक करण्यात आली. यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाला चालना मिळाली. परंतू पहिल्या महायुध्दाच्या भयानक विध्वंसकारी अनुभवानंतर जग आदर्शवादाकडे वळू लागले. यातुनच इ.स.१९२० मध्ये राष्ट्रसंघाची स्थापना झाली. परंतु काही कारणास्तव राष्ट्रसंघ शांतता टिकविण्यामध्ये १९३० नंतर अपयशी ठरला आणि दुसऱ्या महायुद्धाचा भडका उडाला. दरम्यान आर्थिक मंदीची लाट आल्यामुळे आंतरराष्ट्रीय शांतता, सामुहिक सुरक्षितता या गोष्टी फोल ठरल्या. जर्मनी, जपान, ऑस्ट्रिया, इटली इ. या राष्ट्रात अस्थिरता निर्माण झाली. त्यामुळे त्यांनी लोकशाहीचा मार्ग सोडून हुकुमशाही, आक्रमकवादाचे धोरण स्विकारले.

**तिसरा कालखंड (१९४५ ते १९९०) :** दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर अमेरिका व सोव्हिएट रशियामध्ये शीतयुद्धाच्या राजकारणाला सुरूवात झाली. दुसऱ्या महायुद्धात जीवित व वित्तहानी प्रचंड झाली. त्यामुळे जागतिक शांततेची गरज सर्वच राष्ट्रांना वाटू लागली. या काळात १९४५ साली युनोची स्थापना केली.

दरम्यान हँन्स जे मॉर्गेथॉ, केनेथ थॉम्पसन, रेनॉलड्स, जॉर्ज केन्नन, हेंरी किसिंजर या अभ्यासकांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाचा व संबंधाचा अभ्यास वास्तववादी दृष्टिकोणातून केला. त्यामुळे या अभ्यासाला चालना मिळाली. शीतयुद्धाच्या काळात विश्वबँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, नाटो, सीटो, सेंटो, वार्सा, सार्क अशा संघटना निर्माण झाल्या, दोन महासत्तामध्ये जागतिक नेतृत्वासंबंधी स्पर्धा सुरू झाली.

**चतुर्थ कालखंड (१९९१ ते २०१२) :** शीतयुद्धाच्या काळात आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप सत्तेच्या द्विध्रुवीकरणाचे होते. मात्र १९९१ नंतर यात आमुलाग्र परिवर्तन घडून आले. सोव्हिएट रशियाचे विघटन, पूर्व आणि पश्चिम जर्मणीचे एकीकरण, इराण-इराक युद्धाचा शेवट इ. घडामोडीमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील संघर्षाचे वातावरण निवळले. सोव्हिएट रशियाच्या विघटनामुळे जागतिक राजकारणात अमेरिका ही एकमेव महासत्ता शिल्लक राहिल्यामुळे एकधुवीय विश्वरचना निर्माण झाली. तेव्हा काहीं विचारवंत दुसरे सत्ताकेंद्र अस्तित्वात राहिले नाही असे मत मांडू लागले पण जर्मनी, जपान, चीन, फ्रान्स, युरोपियन महासंघ, आसियान अशा सत्ताकडून अमेरिकेच्या आर्थिक वर्चस्वाला आव्हान दिले गेले. त्यामुळे जागतिक राजकारणात बहुध्रुवीय विश्वरचना निर्माण झाली. चीन, जपान, फ्रान्स, जर्मनी, युरोपियन संघ इत्यादी राष्ट्रे आर्थिक व व्यापारी क्षेत्रात उतरलेली आहेत, त्यामुळे अमेरिकेच्या आर्थिक वर्चस्वाला शह बसू लागले. आंतरराष्ट्रीय राजकारणात भारत, चीन, जपान, जर्मनी, फ्रान्स, रशिया, युरोपियन महासंघ यांचे सामूहिक नेतृत्व (Collective Leadership) निर्माण झाले. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे व्यवस्थापन या सामूहिक शक्तीद्वारे (Collective Power) होऊ लागले आहे. तसेच युरोपियन महासंघ, आसियान, नाफ्टा, सार्क, ब्रिक्स इत्यादी संघटनांद्वारे अमेरिकेच्या वर्चस्वाला आव्हान दिले गेले आहे.अशा प्रकारे बहुध्रुवीय विश्वरचनेचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासात होऊ लागलेला आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १ :**

**पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) 'आंतरराष्ट्रीय' हा शब्द प्रयोग प्रथम कोणी केला?

२) 'आंतरराष्ट्रीय संबंध' या विषयावर पहिले पुस्तक कोणी लिहिले?

३) ''आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास म्हणजे राष्ट्रांच्या विदेशनीतीचा अभ्यास होय.'' ही व्याख्या कोणी केली ?

४) कोणत्या साली वेल्स येथील विद्यापीठात आंतरराष्ट्रीय संबंध हा विषय शिकविण्यास प्रारंभ झाला

५) आंतराराष्ट्रीय राजकारणात कशासाठी सतत संघर्ष असतो ?

६) आंतरराष्ट्रीय राजकारणाला आंतरराष्ट्रीय संबंधाचा गाभा कोणी मानले आहे.

७) ''राष्ट्रा राष्ट्रातील सर्व प्रकारच्या संबंधाचा जो अभ्यास असतो त्यास आंतरराष्ट्रीय राजकारण, असे म्हणतात,'' असे कोणी म्हटले आहे ?

### १.२.१ आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप (Nature of International Politics) :

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप व्यापक बनले आहे. पूर्वीच्या काळी आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप हे मुख्यत्वे करून कुटनीती आणि सैनिकी स्वरूपाचे होते. त्या काळी राज्ये स्वयंपूर्ण होती. राज्याराज्यातील अंतर ही एक समस्या होती. सार्वभौम सत्ता हा राज्याचा प्राण असल्यामुळे राज्यात सार्वभौम सत्तेचे अस्तित्व नाकारता येत नाही. आंतरराष्ट्रीय राजकारण हा आंतरराष्ट्रीय संबंधाचा एक अविभाज्य घटक म्हणून अभ्यासला जात आहे.आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाचे स्वरूप जाणून घेण्यासाठी पुढील मुद्यांचा उहापोह करणे अधिक उचित ठरेल.

**१. आंतरराष्ट्रीय राजकारण एक सामाजिक शास्त्र** (International Politics as a Social Science) **:**

आंतरराष्ट्रीय राजकारण हे सामाजिक शास्त्र आहे.कारण भौतिक शास्त्राप्रमाणे आंतरराष्ट्रीय राजकारणात निरीक्षण,परिक्षण आणि प्रयोग करून निश्चित स्वरूपाचे निष्कर्ष काढता येत नाहीत. त्याचा संबंध मानवी वर्तनाशी आणि व्यवहाराशी येतो. मानवी वर्तन हे अनिश्चित, चंचल, परिवर्तनशील सतत बदलत असते. त्यामुळे मानवी वर्तनाबद्दल अचूक सिध्दांत मांडणे कठीण असते. शास्त्र होण्यासाठी शास्त्रीय अभ्यास ही महत्त्वाची कसोटी आहे. शास्त्र म्हणजे एखाद्या विषयाची मांडणी करणे होय. आंतरराष्ट्रीय राजकारणात शास्त्रशुध्द पध्दतीने अचूक निष्कर्ष काढले जात नसले तरी निष्कर्ष आणि परिक्षण करून वास्तववादी स्वरूपाचे निष्कर्ष काढले जातात.

आंतरराष्ट्रीय राजकारणास शास्त्र म्हणता येईल काय? याबद्दल विचारवंतामध्ये एकमत नाही.कोणत्याही विषयाला शास्त्र म्हणून ओळखण्यासाठी निश्चित साधनसामग्री, शुध्द संशोधन पध्दती आणि सर्वमान्य सिध्दांत या तीन गोष्टींची आवश्यकता असते. के. डब्ल्यू थॉम्पसन, हॉफमन यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणास शास्त्र म्हणता येणार नाही असे म्हटले आहे. क्विन्सी राईट यांनी भविष्यकाळात आंतरराष्ट्रीय राजकारणाला शास्त्र म्हणून संबोधण्यात येईल असे म्हटले आहे. अलीकडील काळात आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाची अभ्यासपद्धती आणि साधनसामग्री वैज्ञानिक स्वरूपाची झाल्यामुळे काही सिद्धांत उदयाला आले. त्यामुळे या विषयाला शास्त्रीय स्वरूप येऊ लागले असे ग्रेसन कर्क यांचे मत आहे.

**२. आंतरराष्ट्रीय राजकारण एक स्वतंत्र अभ्यास विषय :**

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय राजकारण ही एक ज्ञान शाखा किंवा अभ्यासाचा एक स्वतंत्र विषय म्हणून ओळखला जातो. क्विन्सी राईट, कॉपर, सी.ए.डब्ल्यू. मेनिंग, मॉर्गेंथॉ या विचारवंतांनी आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाचा एक स्वतंत्र अभ्यास शाखा म्हणून उल्लेख केला आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करताना कार्यकारण संबंध स्पष्ट केले जातात. हॅन्स मॉर्गेंथॉ, स्नायडर, रिचर्ड सी, चार्ल्स मेकलेलँड, फ्रेड स्लायडरमन या विचारवंतानी आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाला स्वतंत्र दर्जा आणि महत्व देण्याचा प्रयत्न केला आहे.तसेच १९५४ साली युनेस्कोने प्रसिद्ध केलेल्या सी.ए.डब्ल्यू.मेनिंग यांच्याअहवालात आठ देशांच्या उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमात आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाला स्वतंत्र विषयाचा दर्जा दिलेला आढळतो.

**३. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे आंतरशास्त्रीय स्वरुप :**

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाचा अभ्यास आंतरशास्त्रीय झाला आहे. सध्या कोणत्याही सामाजिक शास्त्राचा अभ्यास स्वतंत्रपणे केला जाऊ शकत नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा संबंध अर्थशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, भूगोल, आंतरराष्ट्रीय कायदा, तत्वज्ञान अशा सामाजिक शास्त्रांशी येतो. आंतरराष्ट्रीय राजकारण हा विषय राज्यशास्त्राचाच एक भाग आहे असे सर्वच विद्यापीठाच्या अभ्यासक्रमावरून दिसून येते. वास्तविक आंतरराष्ट्रीय संबंधावरून आंतरराष्ट्रीय राजकारण घडत असते आणि आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास राज्यशास्त्रात समाविष्ट केला जातो. मॉर्गेंथॉ यांनी आपल्या 'झेश्रळींळली रोपस छरींळेपी' या ग्रंथात वास्तववादी सिद्धांत मांडून या दोन विषयांचे पृथक्करण करून आंतरराष्ट्रीय राजकारण हा विषय राज्यशास्त्र विषयाहून स्वतंत्र आहे हे स्पष्ट केले आहे.

**४.आंतरराष्ट्रीय राजकारण-एक कला आणि तत्वज्ञान आहे :**

क्विन्सी राईट यांच्या मते,प्रत्येक ज्ञान शाखा ही सुरुवातीस एक कौशल्य म्हणुन प्रकट होते. नंतर त्याचे रुपांतर तत्वज्ञानात होवून त्यांचे शास्त्र बनण्याचा प्रयत्न होत असतो. आंतरराष्ट्रीय राजकारणात ज्या कुशलतेने तह केले जातात किंवा राजनयाची आखणी केली जाते किंवा ज्या पद्धतीने राजकारणी वा मुत्सदी आपले म्हणणे मांडतात आणि ते पटवुन देतात त्यावरुन आंतरराष्ट्रीय राजकारण ही एक कला आहे असे लक्षात येते.राजकीय नेते आपल्या मुत्सद्देगिरीने,चातुर्याने उपलब्ध साधनसामग्रीचा वापर करून आपल्या राष्ट्राचे संरक्षण आणि संवर्धन करित असतात.

क्विन्सी राईट यांच्या मते, राजकीय नेते आपल्या राजनय कौशल्याद्वारे विशिष्ट तत्वज्ञानाची मांडणी करून एक तत्वज्ञान निर्माण करतात. सत्ताप्राप्तीसाठी हिटलरने जर्मणीत नाझीवादाचे, मुसोलिनीने इटलीत फॅसिस्टवादाचे, लेनिनने रशियात साम्यवादी तर माओने चीनमध्ये साम्यवादी तत्वज्ञान स्वीकारले होते.तसेच जागतिक स्तरावर शांतता, मानवतावाद, सहकार्य आणि सामाजिक न्यायासाठी उदारमतवादी लोकशाहीचे तत्वज्ञान निर्माण झालेले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारण ही एक कला असल्याने तिने आपले अस्तित्व तत्वज्ञानाच्या आधारे जोपासले असल्याचे दिसते आहे.

**५. संघर्ष आणि समन्वयाचे शास्त्र :**

आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयात जसा संघर्षाचा अभ्यास केला जातो तसा सहकार्याचाही अभ्यास केला जातो. आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्राराष्ट्रात मैत्रीचे किंवा शत्रूत्वाचे संबंध असू शकतात. मैत्रीपूर्ण संबंधात परस्पर सहकार्य देवाण-घेवाण, सामंजस्य इ. गोष्टी अभिप्रेत असतात.तर शत्रूत्वाच्या संबंधात मतभेद, संघर्ष, युद्ध, आक्रमण इ.गोष्टी अभिप्रेत असतात. उदा. भारत-चीन संबंध सुरुवातीला(१९६२ पर्यंत)मैत्रीचे होते. मात्र इ.स.१९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केल्यामुळे संबंध बिघडले. २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध राष्ट्रांना भेटी देऊन मैत्रीचे आणि सहकार्याचे संबंध वाढविण्यास सुरुवात केली आहे.

### १.२.२ आंतरराष्ट्रीय राजकारणाचे बदलते स्वरुप :

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या स्वरूपात वेगवेगळ्या कालखंडात नेहमी परिवर्तन झालेले आढळते. टी. व्ही. कॉलिजाव्हीं यांनी असे म्हटले आहे की, सध्यकालीन आंतरराष्ट्रीय संबंधात पुनर्रचना होत आहे. राष्ट्र-राज्याच्या जुन्या कल्पना जाऊन नवीन राजकीय धोरण पुढे येत आहे.साम्राज्यवाद, वसाहतवाद संपुष्टात येऊन वसाहतीला स्वातंत्र मिळत आहे. जागतिक स्तरावर नवनवीन प्रश्न व समस्या निर्माण होत आहेत, त्या सोडवण्यासाठी राज्यांचे परस्पर संबंध वेगवेगळ्या पद्धतीने पुनर्स्थापित होत आहेत.दुस-या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात ठळक स्वरूपात बदल झाले आहेत.

**आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या स्वरूपात पुढील विविध कारणामुळे बदल घडून येत आहेत.**

**१. नवीन सार्वभौम राज्यांचा उदय :**

दुसऱ्या महायुध्दानंतर जगात एका नव्या युगाची सुरुवात झाली. साम्राज्यवाद वसाहतवादाचा अंत झपाटयाने होऊ लागला. त्यामुळे जागतिक राजकारणाचे केंद्र म्हणून युरोपचे महत्त्व संपुष्टात येऊ लागले. इ.स. १९४५ साली संयुक्त राष्ट्र संघटनेची सदस्य संख्या ५१ होती. ती आता १९२ झाली आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासात दोन-चार निवडक राज्यांच्या हालचालींचे केंद्र असे त्याचे स्वरूप न राहता बहुराज्यीय हितसंबंधांना प्राधान्य देणारे केंद्र असे झाले. म्हणजेच नवीन राज्यांच्या उदयामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आहे.

**२.लोकतांत्रिक शासनाचा उदय :**

राजकीय प्रक्रियांचे लोकशाहीकरण झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तेचे द्विध्रुवीकरण झाले. परराष्ट्र धोरण ठरविताना लोकमताचा आदर होऊ लागला. पूर्वी परराष्ट्र धोरणात भाग घेणाऱ्या व्यक्तीची संख्या फारच थोडी होती. परंतु आज धोरण निश्चितीमध्ये जनतेचा सहभाग वाढल्यामुळे परराष्ट्र धोरणाचे लोकशाहीकरण झाले. नवोदित राज्यांच्या उदयामुळे सर्वसाधारण जनतेला परराष्ट्र धोरणात आपले स्थान प्राप्त करण्याची संधी मिळाली. प्रत्येक राष्ट्राला जनमताचा विचार करूनच निर्णय घ्यावा लागतो. १९६३ साली भारताने ''व्हाईस ऑफ अमेरिका''चे ट्रांसमीटर बसविण्याचे ठरविले होते. परंतू भारतीय जनतेच्या विरोधामुळे सरकारला हे धोरण बदलावे लागले.व्हिएतनाम, इराक, अफगाणिस्तान, कोरिया, क्युबा या राष्ट्रांच्या संदर्भात अमेरिकेला जागतिक लोकमताचा आदर करावा लागला. राष्ट्र कितीही शक्तिशाली असले तरी जनमताचा आदर राखावा लागतो. यावरून आज आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप लोकतंत्रात्मक झाल्याचे दिसून येते.

**३. वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगती :**

वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगतीमुळे अण्वस्त्रे, क्षेपणास्त्रे, दळणवळणाची अत्याधुनिक साधने यांच्यात वाढ झाली. शस्त्रास्त्र निर्मितीत राष्ट्रांची स्पर्धा सुरु झाल्यामुळे राष्ट्रे सामर्थ्यशाली बनली. त्यामुळे त्यांच्यात संघर्ष, युद्धे, महायुद्धे घडून आली. अचूक हल्ला करणाऱ्या पाणबुड्या, गतिमान जेट विमाने, आंतरखंडीय क्षेपणास्त्रे यांच्या निर्मितीमुळे ठराविक वेळी, ठराविक ठिकाणी याचा वापरकरता येतो. मानवाने चंद्र आणि मंगळ या ग्रहावर

केलेले पदार्पण हे मानव जातीला अभिमान वाटेल अशीच प्रगती आहे.पण या प्रगतीतच विनाश करण्याचेही सामर्थ्य आहे. अशा प्रकारे विज्ञान तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप बदलले आहे.

**४. विचार प्रणाली परिवर्तन :**

इ.स.१९१७ मध्ये रशियात क्रांती होवून साम्यवादी व्यवस्था स्थिर झाली. जर्मणीने नाझीझम,इटलीने फॅसिझम या सारख्या विचारप्रणालीला प्रोत्साहन दिले. दुस-या महायुद्धानंतर जागतिक राजकारणात अमेरिका आणि रशिया महासता म्हणून उदयास आले. त्यातून विचारप्रणालीच्या नवीन संघर्षास सुरुवात झाली.त्यामुळे लोकशाही विरूद्ध हकूमशाही असा संघर्ष सुरू झाला. या संघर्षामुळे जगाची विभागणी दोन गटात होवून जागतिक राजकारणात द्विध्रुवीकरण झाले.

**५. आंतरराष्ट्रीय संस्था,संघटनांचा उदय :**

पहिल्या महायुद्धानंतर सुरू झालेली शांतता स्थापण्याची चळवळ व दुसऱ्या महायुद्धानंतर त्यास मिळालेली गती यामुळे शांतता प्रस्थापित करणे हे प्रत्येक राष्ट्राच्या विदेश नीतीचे प्रमुख उद्दिष्ट बनले. राष्ट्रसंघ, संयुक्त राष्ट्रसंघ, आंतरराष्ट्रीय न्यायालय, विश्व बँक, जागतिक व्यापार संघटना, नाटो, सेंटो, वार्सा,युरोपियन कॉमन मार्केट, अमेरिकन कॉमन मार्केट इ.संघटनांनी आंतरराष्ट्रीय हितसंबंध जोपासण्यासाठी महत्वाची भुमिका पार पाडली आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाला नवी दिशा मिळाली.

**६. साम्यवादाची पिछेहाट :**

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणात अमेरिका आणि रशिया महासता म्हणुन उदयास आल्या. या दोन महासत्तामध्ये निर्माण झालेल्या शीतयुद्धाने आंतरराष्ट्रीय राजकारणाला विशिष्ट स्वरुप दिले. मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी रशियाला आर्थिक संकटातून वाचवण्यासाठी जाहीर केलेल्या ग्लासनोस्त आणि पेरेस्त्रोईका या धोरणाने सोव्हिएट रशियात आमुलाग्र बदल घडला.साम्यवादी सोव्हिएट रशियाचे डिसेंबर १९९१ रोजी विघटन होवून साम्यवादी संघराज्य संपुष्टात आले. या विघटनाचा परिणाम साम्यवादी राष्ट्रावर होऊन पूर्व युरोपीय साम्यवादी, एकाधिकारशाही संपुष्टात आली. पोलंड, रुमानिया, हंगेरी आदी साम्यवादी राष्ट्रांना लोकशाही पद्धतीचा पर्याय अधिक परिणामकारक वाटला. या सर्व घटनांचा प्रभाव आंतरराष्ट्रीय राजकारणावर पडला.

**७. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययन पद्धतीत बदल :**

सुरुवातीच्या काळात आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास ऐतिहासिक दृष्टीकोनातून होत होता. मात्र आधुनिक काळात वैज्ञानिक, वस्तुनिष्ठ पद्धतीने निरीक्षण, प्रयोग, प्रात्यक्षिक, परीक्षण, मूल्यमापन या पद्धतीने केला जात आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास वर्तनवादी, वास्तववादी, पर्यावरणवादी व्यवस्थात्मक, तौलनिक, रचनात्मक दृष्टीकोनातून केला जातो. तसेच वर्तनवाद्यांनी समाजशास्त्र, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र यांच्या आधारे अभ्यासाचे नवीन सिद्धांत शोधुन काढले उदा. व्यवस्थावादी, खेळ सिद्धांत, निर्णय-निर्धारण सिद्धांत, संचार सिद्धांत, पर्यावरणात्मक सिद्धांत इत्यादीमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययन पद्धतीचे स्वरूप बदलले आहे.

**८. तेलाच्या राजनयाचा परिणाम :**

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आंतरराष्ट्रीय राजकारणावर तेलाच्या राजनयाचा प्रभाव पडलेला दिसून येतो.तेल उत्पादक अरब राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील तेलाची गरज आणि महत्व ओळखून तेलाच्या किंमती वाढविल्या. दरम्यान इंग्लंड, अमेरिका, रशिया या राष्ट्रांनी तेल उत्पादक राष्ट्रांवर नियंत्रण ठेवून आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

१९६० साली तेल निर्यात करणा-या राष्ट्रांमध्ये ओपेक (Organisation of Petroleum Exporting Countries-OPEC) ही संघटना स्थापन केली. तेलाच्या किंमती ठरविण्याचे कार्य ओपेक (OPEC) कडून होऊ लागले. १९७३ साली सुरू झालेल्या अरब-इस्त्राईल युद्धापासून आंतरराष्ट्रीय राजकारणात तेलाचा अस्त्र म्हणून ख-या अर्थाने प्रारंभ झाला. गेल्या काही वर्षात इराणने अण्वस्त्रे निर्मितीसाठी युरेनियमचा वापर सुरू केला आहे. त्यामुळे अमेरिका आणि युरोपीय राष्ट्रांनी इराणवर आर्थिक निर्बंध घातले आहेत. त्याला प्रत्युत्तर म्हणून आम्ही होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारा तेलाचा व्यापार रोखून धरू अशी इराणने धमकी दिलेली आहे.

जगातील खनिज तेलाचा मोठा साठा असलेला देश म्हणून लिबीयाला ओळखले जाते. लिबीयाचे अध्यक्ष मोहम्मद गड्डाफीने तेल विहिरी आणि तेल धंद्याचे राष्ट्रीयीकरण करून पाश्चात्य तेल कंपन्याकडून होणारी लूट थांबविली होती. त्यामूळे गड्डाफी यांच्या विरोधात अमेरिका, फ्रान्स, ब्रिटन,आदींनी सरळ-सरळ युद्ध पुकारले होते.

**९. जागतिकीकरण :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात जागतिकीकरणाची प्रक्रिया १९९१ नंतर अस्तित्वात आली. यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात आर्थिक घटकास, व्यापारास महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. खाजगीकरण, उदारीकरण, नवी अर्थव्यवस्था, मुक्त अर्थव्यवस्था, मुक्त बाजारपेठ या भांडवलशाहीस पूरक संकल्पना स्विकारण्यासाठी भांडवलशाही देशांनी अविकसित देशांवर दबाव टाकायला सुरवात केली. यातून आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या स्वरूपात बदल घडून आले. एकध्रुवीय जग, बहुध्रुवीय जग या संकल्पना या काळात रुजल्या. त्यांनी जागतिक राजकारण प्रभावीत केले.

अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या स्वरूपात आजच्या काळात अनेक बदल झाले आहेत.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - २ :**

**रिकाम्या जागा भरा.**

१. पूर्वीच्या काळी आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप हे मुख्यत्वे करून ............. स्वरूपाचे होते.

२. इ.स. १९४५ साली संयुक्त राष्ट्र संघटनेची सदस्य संख्या............. होती.

३. भारत-चीन संबंध सुरुवातीला............. होते.

४. जगातील खनिज तेलाचा मोठा साठा असलेला देश म्हणून............. ओळखले जाते.

५. १९६३ साली............ ने ''व्हाईस ऑफ अमेरिका''चे ट्रांसमीटर बसविण्याचे ठरविले होते.

६. साम्यवादी सोव्हिएट रशियाचे............ रोजी विघटन होवून साम्यवादी संघराज्य संपुष्टात आले.

### १.२.३ आंतरराष्ट्रीय राजकारण व्याप्ती (Scope of International Politics) :

व्याप्ती म्हणजे अभ्यास क्षेत्र होय. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप गतिशील, बदलणारे असल्यामुळे या विषयाची व्याप्ती निश्चित झालेली नाही. आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयामध्ये मुख्यत: राष्ट्र-राज्य व्यवस्था आणि या राष्ट्रराज्यांतर्गत राजकीय संबंधाचा अभ्यास होतो. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव पाडणारे इतर घटक, गट आणि संघटना यांचा ही अभ्यास या विषयामध्ये होतो. आंतरराष्ट्रीय राजकारणाला जेव्हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय म्हणून मान्यता प्राप्त झाली. तेव्हा क्वाऊस नोर, ग्रेसन किर्क, व्हिन्सेंट बेकर, ई.एल.वुडवर्ड इ. विचारवंतांनी या विषयाचे स्वरुप आणि व्याप्ती याविषयी विचार व्यक्त केले.

ग्रेसन किर्क यांच्या मते, अमेरिकेतील एका परराष्ट्रसंबंधविषयक आयोगाने १९४७ साली आपल्या अहवालात पुढील पाच विषयांचा समावेश केला.

१) राज्य पध्दतीचे स्वरुप व कार्य.

२) राष्ट्रसत्तेवर प्रभाव टाकणारे घटक.

३) बडया राष्ट्रांचे स्थान आणि परराष्ट्र धोरण.

४) आंतरराष्ट्रीय संबंधाचा आधुनिक इतिहास.

५) स्थिर स्वरुपाच्या विश्वव्यवस्थेच्या निर्मिती संबंधाची प्रक्रिया.

१९५४ साली व्हिन्सेंट बेकर यांनी आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासात पुढील घटकांचा समावेश केलेला आढळतो.

१) आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप आणि त्यातील प्रमुख घटकांचा अभ्यास.

२) आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील राजकीय, आर्थिक व सामाजिक संघटनांचा अभ्यास.

३) राष्ट्रीय सत्तेचे प्रमुख घटक (साधने).

४) राष्ट्रीय सत्तेवरील मर्यादा (नियंत्रण).

५) प्रमुख राष्ट्रीय सत्तांचे परराष्ट्र धोरण.

६) ऐतिहासिक घटना तसेच वर्तमानकालीन घटनांचा अभ्यास.

याशिवाय चार्ल्स स्लायचर, पामर आणि परकिन्स, हॅन्स जे मॉर्गेंथॉ, रॉबर्ट स्ट्राऊस, मेनिंग, जॉर्ज केनन, लासवेल, हॉपमन इ. विचारवंताच्या मते आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाची व्याप्ती मोठी असून या विषयाला स्वतंत्र दर्जा व महत्त्व प्राप्त झाले आहे.

**आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाची व्याप्ती पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.**

**१) राष्ट्राराष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणांचा अभ्यास :**

आंतरराष्ट्रीय राजकारणाचा केंद्रबिंदू म्हणजे परराष्ट्र धोरण होय.राष्ट्रीय हित साध्य करण्याचे मुख्य साधन म्हणजे परराष्ट्र धोरण होय. राज्याची परराष्ट्र धोरणे हा आंतरराष्ट्रीय संबंध ठरविणारा महत्त्वाचा घटक आहे. देशाच्या मुत्सद्यांच्या, राजकीय विचारवंतांच्या प्रेरणातून परराष्ट्र धोरण आकाराला येत असते. आधुनिक काळात वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन या संसूचन साधनांचा प्रभाव परराष्ट्र धोरणावर होत असतो. देशाचा इतिहास, परंपरा, संस्कृती, मुल्ये या घटकांचा ही प्रभाव परराष्ट्र धोरणाच्या जडणघडणीत होत असतो. उदा. भारताचे पंचशील तत्त्वे आणि अलिप्ततावादी धोरण, याचा ही अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणात करावा लागतो.

**२) आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास :**

२० व्याशतकामध्ये जगातील सर्व राष्ट्रे स्वतंत्र व सार्वभौम झाली. अशा राष्ट्रांनी आपल्या सीमा उल्लंघन करुन बाहेरील राज्यांशी जे संबंध प्रस्थापित केलेले आहेत. त्यांचा ही या विषयात अभ्यास केला जातो. सार्वभौम राष्ट्रातील संबंध प्रामुख्याने दोन प्रकारचे असतात.

अ) सत्तेवर आधारित असलेले संघर्षपूर्ण संबंध- उदा. भारत- पाकिस्तान, अमेरिका-इराण,अरब-इस्त्राईल राष्ट्रे.

ब) सहकार्यात्मक संबंध- आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्यासाठी नि:शस्त्रीकरणाच्या हेतूने अमेरिका, रशिया या बडया राष्ट्रांना इतर राष्ट्रांनी दिलेले सहकार्य.

**३) आंतरराष्ट्रीय संघटनांचा अभ्यास :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात जागतिक पातळीवर आणि प्रादेशिक पातळीवर कार्यरत असलेल्या विविध संस्था आणि संघटनांचा देखील अभ्यास करावा लागते. या संघटनामध्ये राष्ट्रसंघ,संयुक्त राष्ट्रसंघ, युनेस्को, जागतिक बँक, कोलंबो योजना, जागतिक आरोग्य संघटना, नाटो, सिटो, सेंटो, वार्सा, सार्क, जी-७, जी-१५, ओपेक, जागतिक व्यापारी संघटना, ब्रिक्स इ. चा अभ्यास व्याप्तीत केला जातो. दोन पेक्षा अधिक राष्ट्रातील संबंध कायम करण्याची जबाबदारी या संघटनेवर असते. या संघटना जगाचे भवितव्य ठरविण्याचे काम करतात.

**४) विचारप्रणालींचा अभ्यास :**

विचारप्रणाली ही एक मुल्यव्यवस्था असते. राजकीय व्यवस्था, त्या व्यवस्थेचे प्रमुख ध्येय आणि उद्दिष्टे व ती प्रत्यक्षात कशा पध्दतीने आणता येतील या संबंधीची ही वैचारिक चौकट असते. साम्यवाद, भांडवलशाही, लोकशाही अशा विचारप्रणाली परस्पर विरोधी आहेत. साम्राज्यवाद, वसाहतवाद यांची समाप्ती झालेली असली तरी त्यांची जागा नववसाहतवादाने घेतली आहे. याचा ही अभ्यास या विषयात केला जातो.जागतिक पातळीवरील राजकारण, राष्ट्रीय हित या संकल्पनेभोवती फिरत असते. हॅन्स जे. मॉर्गेंथॉ यांच्या मते, ''राष्ट्रीय

हित हे जागतिक राजकारणाचे अंतिम आणि निर्णायक तत्त्व आहे.'' कोणत्याही राष्ट्राचे परराष्ट्रीय धोरण राष्ट्रीय हित डोळ्यासमोर ठेवूनच आखले जाते. जोसेफ फ्रँकेल म्हणतात, ''राष्ट्रीय हित ही परराष्ट्र धोरणातील मुलभूत धारणा होय.'' इ.चा अभ्यास यात केला जातो.

**५) आंतरराष्ट्रीय सत्तासंघर्ष :**

आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे सत्तेसाठी चाललेला सतासंघर्ष होय. प्रत्येक राष्ट्राला आपल्या शक्तीचा वापर करणे अपरिहार्य असते. त्यामुळे सत्ता ही प्रतिष्ठेने, आग्रहाने, प्रथेने, परंपरेने, भीती दाखवून आणि दहशतीने, आर्थिक दडपणाने किंवा प्रत्यक्ष बळाचा वापर करून मिळविली जाते. त्यातून एक प्रकारचा सत्तासंघर्ष निर्माण होतो. उदा.  अरब स्टेट संघर्ष, युक्रेन संघर्ष इ.या सर्व सत्तासंघर्षाचे परिणाम आंतरराष्ट्रीय राजकारणात अभ्यासले जातात.

**६) राजनयाचा अभ्यास :**

आपल्या राष्ट्राचे हित सुरक्षित ठेवण्याचे, त्यात वृद्धी करण्याचे महत्वाचे साधन म्हणून राजनयाकडे पाहिले जाते. विचारविनिमय, तडजोड, हितसंबंधाची देवाणघेवाण, सत्ता संतुलन सामुहिक सुरक्षा, नि:शस्त्रीकरण या मार्गाने संघर्ष टाळण्याचा प्रयत्न राजनयाचा असतो. त्याचबरोबर कोणत्याही राष्ट्राला शांततेच्या मार्गाने विदेशनितीची उद्दिष्टचे राजनयाद्वारे साध्य करून आंतरराष्ट्रीय संबंध अधिक विकसित करता येतात. युद्ध आणि परस्पर संघर्ष टाळण्यासाठी सुरुवातीपासूनच राजनयाचा वापर होत आला आहे.

**७) आंतरराष्ट्रीय नियम/ कायदे :**

आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाचे अस्तित्वच मुळी केंद्रीय सत्तेचा अभाव असलेला आंतरराष्ट्रीय समाज असल्यामूळे राष्ट्राराष्ट्रांनी परस्पर संबंधाबाबतच्या काही नियमांना मान्यता दिली आहे. यांनाच आंतरराष्ट्रीय कायदे म्हणतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय कायदे, आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे निर्णय इ.चा अभ्यास या विषयात अपेक्षित आहे.

**८) राष्ट्रीय राजकारण :**

प्रत्येक राष्ट्राच्या अंतर्गत राजकारणाचा प्रभाव त्या राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणावर होत असल्यामुळे प्रत्येक राष्ट्राच्या अंतर्गत राजकारणातील विभिन्न पैलूंचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. आंतरराष्ट्रीय संबंध हे राष्ट्रीय राजकारणावर अवलंबून असते. उदा. भारताचे पाकिस्तान बरोबर असलेले संबंध भारतीय जनता पक्ष सत्तेवर असताना कसे असणार याचा ही अभ्यास यात केला जातो.

**९) राष्ट्रीय सत्तेचे आवश्यक घटक :**

साधारणपणे आर्थिक साधनसामुग्री, तंत्रशास्त्राची कुशलता, बौद्धिक आणि शैक्षणिक संस्था,भौगोलिक स्थान, कुशल आणि आटोपशीर लोकसंख्या, योग्य संघटन असे राष्ट्रीय सत्तेचे प्रमुख घटक मानले जातात. परराष्ट्र विषयक राजकारणात सत्तेचा वापर नेहमीच दोन कारणासाठी केला जातो. एक म्हणजे राष्ट्राचे हित आणि

दुसरे म्हणजे राष्ट्राची सुरक्षितता पाहणे.सामर्थ्यशाली असलेले राष्ट्र आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रभावी ठरते. या ही घटकाचा अभ्यास यात केला जातो.

**१०) शस्त्रनियंत्रण आणि नि:शस्त्रीकरण :**

दुसऱ्या महायुध्दानंतर शीतयुध्दाच्या काळात शस्त्रास्त्रांची निर्मिती प्रचंड प्रमाणात झाली. शस्त्रास्त्र निर्मिती स्पर्धेमुळे युद्धाचा धोका निर्माण झाला.तो टाळण्यासाठी, आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षितता निर्माण करण्यासाठी नि:शस्त्रीकरणाची गरज वाटू लागली.त्याकरिता अणुशक्ती आयोगाची स्थापणा, अण्वस्त्र प्रसारबंदी करार, सागरी अण्वस्त्र प्रतिबंधक करार, जैविक व रासायनिक शस्त्रासंबंधी करार अशा प्रकारचे अनेक करार नि:शस्त्रीकरणासाठी केले गेले. म्हणून या विषयाचा तपशीलवार अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणात केला जातो.

**११) विविध सिद्धांताचा अभ्यास :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात विविध सिद्धांताचा अत्यंत बारकाईने अभ्यास केला जातो. या सिद्धांतावरच अनेक राष्ट्रांची विचारधारा नावारूपास येते. राष्ट्रवाद, साम्राज्यवाद, वसाहतवाद, नववसाहतवाद आणि आर्थिक साम्राज्यवाद अशा प्रकारच्या सिद्धांतातून आंतरराष्ट्रीय राजकारणाची ओळख होते.

**१२) आर्थिक संघटनांचा अभ्यास :**

काहीं आर्थिक संघटना आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्वाची भूमिका बजावतात. बड्या राष्ट्रांनी मागास व विकसनशील राज्यांना केलेली मदत व त्या मदतीचा परराष्ट्र धोरणावर होणारा परिणाम याचाही अभ्यास केला जातो. उदा. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, युरोपियन कॉमन मार्केट, अमेरिकन कॉमन मार्केट, आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटना इत्यादी आर्थिक संघटनांचा अभ्यास या विषयात केला जातो.

**१३) मानवी वर्तनाचा अभ्यास :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रीय नेते, राजकारणी निर्णय घेतात, त्या निर्णयाचाही दुरगामी परिणाम आंतरराष्ट्रीय राजकारणावर होवून त्यास वेग़ळी दिशा, मार्गदर्शन मिळते. उदा. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी पहिल्या महायुद्धात सहभागी होण्याचा घेतलेला निर्णय, राष्ट्राध्यक्ष रूझवेल्ट यांनी दुस-या महायुद्धात सोव्हिएट रशियाला जर्मनीच्या विरोधात उशिरा सहकार्य देण्याचा घेतलेला निर्णय, राष्ट्राध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी रशियासाठी घेतलेला ग्लासनोस्त आणि पेरेस्त्रोईका याचा निर्णय, पं. नेहरू यांनी पंचशील तत्वे आणि अलिप्ततावादी धोरण याविषयी घेतलेला निर्णय. इ. अभ्यास यात केला जातो. अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाची व्याप्ती विस्तृत आणि विश्वव्यापी झाली आहे. जगाला एका लहानशा खेड्याचे स्वरूप प्राप्त झाल्यामुळे या विषयाची व्याप्ती दिवसेंदिवस व्यापक होत आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३ :**

**पुढील प्रश्नांची एक–दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

१. राष्ट्रीय सत्तेचे घटक सांगा ?

२. परराष्ट्र धोरण म्हणजे काय ?

३. आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्राराष्ट्रात परस्पर संबंध कसे असतात ?

४. आंतरराष्ट्रीय कायदे म्हणजे काय ?

५. व्हिन्सेंट बेकर यांनी आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासात समावेश केलेले कोणतेही तीन घटक सांगा.

## १.२.४ आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाचे दृष्टीकोन :

आज एक अध्ययनाची स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे पाहिले जाते. मार्टिन व्हाईट, जेम्स रोझनौ, हॅन्स मॉर्गेंथॉ, स्टेनली हॅकमन, ट्रिस्के, नित्से, डेव्हिड ट्रमन, किर्क पैट्रीक, मार्टिन कॉम्लान, आदी विचारवंतांनी आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अध्ययनासाठी शास्त्रशुध्द दृष्टीकोन निर्माण करुन या विषयाच्या अध्ययनाला विकासाची जोड प्राप्त करुन दिली.आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनात विविध दृष्टीकोनांचा समावेश केला जात असल्यामुळे त्यांचे महत्त्व नाकारता येत नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनासाठी जे विविध दृष्टीकोन आहेत त्यांचे दोन प्रकार पडतात.

### अ) पारंपारिक दृष्टीकोन :

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनात पारंपारिक दृष्टीकोनाची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण राहिली आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात जे विविध प्रयोग केले जातात त्यांना ऐतिहासिक परंपरांचा आधार असतो. या ऐतिहासिक परंपराकडे वळून पाहिल्याशिवाय वर्तमानकाळातील निर्णय घेता येत नाहीत. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या या पारंपारिक अध्ययनामध्ये प्रामुख्याने ऐतिहासिक, तात्विक, आदर्शवादी, वैज्ञानिक इ. दृष्टीकोनांचा समावेश होतो.

### ब) आधुनिक दृष्टीकोन :

आधुनिक दृष्टीकोनाने आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अध्ययनास एक प्रकारची वास्तविकता प्राप्त करून दिली आहे. आधुनिक दृष्टीकोनाद्वारे आंतरराष्ट्रीय संबंध या विषयास शास्त्रीय रूप प्राप्त करून देण्याचे कार्य केले आहे. आधुनिक दृष्टीकोनात सत्तावादी, वर्तनवादी, व्यवस्थावादी आणि सत्तासमतोल दृष्टीकोन इ. चा समावेश केला जातो.

## १.२.४.१ आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अध्ययनाचा आदर्शवादी दृष्टीकोन :

आदर्शवादी दृष्टीकोनाला अतिप्राचीन इतिहास आहे. निसर्गवाद, व्यक्तिवाद आणि उपयुक्ततावाद यांची प्रतिक्रिया या नात्याने हा दृष्टीकोन मांडला गेला आहे. प्लेटो, ॲरिस्टॉटल, रुसो, कान्ट, हेगेल, ग्रीन,बोझांके, ब्रॅडले या विचारवंतांनी राज्याकडे आदर्शवादी दृष्टीकोनातून पाहिले. पहिल्या महायुध्दानंतर या दृष्टीकोनाला मोठे बळ प्राप्त झाले.आदर्शवादी दृष्टीकोनाला सामोरे ठेवूनच १० जानेवारी १९२०ला राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. पहिल्या महायुध्दानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी आदर्शवादावर विशेष भर देऊन १४ कलमी योजनेने आदर्शवादी विचारांना मूर्त रुप प्राप्त करुन दिले.

आदर्शवादाची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी पहिल्या महायुध्दाच्या अखेरीस यान स्मट्स, लॉर्ड रॉबर्ट सेसिल,

लिओ बुर्झ्वा आदि मुत्सद्यांनी पुढाकार घेऊन मित्र राष्ट्रांची एक संस्था असावी या कल्पनेचा पुरस्कार केला. आदर्शवादी सिध्दांताच्या पुरस्कर्त्यामध्ये वुड्रो विल्सन, बर्ट्राड रसेल, रिचर्ड कॉबेन, विल्यम लँड, ॲडलस हक्सल, जॉन केनेडी इ. विचारवंतांचा समावेश होतो.

पहिल्या महायुध्दाने संपूर्ण जगात एक प्रकारचा जीवघेणा संहार केला. अशी आपत्ती पुन्हा घडून येऊ नये म्हणून जगभरात शांततेसाठी प्रयत्न सुरु झाले. विड्रो विल्सन यांनी असे म्हटले होते की, जगातील लोकशाही सुरक्षित ठेवण्यासाठी आणि जगातून युध्द हद्दपार करण्यासाठी आम्ही हे युध्द लढत आहोत. संपूर्ण जागतिक राजकारणाची उभारणी मुलभूत अशा नैतिक मुल्यावर झाली पाहिजे असे आदर्शवाद मानतो. विशिष्ट नैतिक मुल्यांचा स्विकार करुन राष्ट्राराष्ट्रात शांतता, बंधुभाव या आधारावर नवी आंतरराष्ट्रीय व्यवस्था अस्तित्वात आणणे सोईचे होईल असे मानणारा आदर्शवादी दृष्टीकोन आहे. आदर्शवादी दृष्टीकोनात हिंसेचा आणि दहशतीचा आधार घेऊन शांतता निर्माण करण्याऐवजी माणसाच्या आत्मप्रेरणेला हाक देऊन आणि नैतिकतेला प्राधान्य देऊन शांतता प्रस्थापित करणे हे आदर्शवादाचे ध्येय आहे.

**आदर्शवादी दृष्टीकोनाची प्रमुख वैशिष्टये पुढील प्रमाणे :**

**१) आंतरराष्ट्रीय नैतिकता** (International Morality) **:**

आंतरराष्ट्रीय नैतिकता हा आदर्शवादी सिद्धांताचा आधार मानला जातो.आंतरराष्ट्रीय नैतिकता म्हणजे राष्ट्राराष्ट्रात मैत्रीचे,सहकार्याचे संबंध निर्माण झाले पाहिजे.यंत्र युगाच्या प्रगतीमुळे संपूर्ण जगाला एका खेडयाचे स्वरुप प्राप्त झाले आहे.एका राष्ट्राची समस्या आज संपूर्ण जगाची समस्या झाली आहे. त्यामुळे जगातील संपूर्ण मानव जातीचे रक्षण करणे ही सर्वांचीच नैतिक जबाबदारी आहे. मानव जातीने याच पध्दतीने परराष्ट्र संबंध आणि व्यवहार नैतिकतेचा आधार घेऊन केले तर संपूर्ण जगात शांतता आणि सुरक्षितता निर्माण होऊ शकते. आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रत्येक राष्ट्राने नैतिक मुल्यांचा आधार घेऊन आपली वाटचाल केली तर जगभर मित्रत्वाचे संबंध निर्माण होतील.

**२) उदारमतवाद :**

आदर्शवादी दृष्टीकोनाचा मुळ आधार उदारमतवादी विचारधारा आहे. ही उदारमतवादी विचारधारा पाश्चात्य राष्ट्रामध्ये विकास पावली. जास्तीत जास्त सुख हा सिध्दांत मांडणाऱ्या बेंथॅम व जे एस. मिल या सारख्या उपयुक्ततावाद्यांनी उदारमतवादाचे समर्थन केले. राजसत्ता व्यक्तीसाठी आहे. व्यक्ती राजसत्तेसाठी नाही या तत्त्वाचा त्यांनी स्वीकार केला. आंतरराष्ट्रीय पातळीवर समुहातील एका व्यक्तीच्या सुखाची एकूण बेरीज म्हणजे समुहाचे जास्तीत जास्त सुख असे सांगून बेंथॅमने व्यक्तीच्या सुखालाच प्राधान्य दिले.

**३) हिंसा आणि युध्दापासून अलिप्त :**

आदर्शवादी दृष्टीकोनात हिंसेला आणि युध्दाला स्थान नाही. हिंसेमुळे आणि युध्दामुळे जगाचे प्रश्न सुटत नाहीत ते उलट वाढतात. आतापर्यंतचा इतिहास पाहता युध्दामुळे प्रचंड विनाश घडून आला आहे. पहिल्या आणि दुसऱ्या  महायुध्दामुळे संपूर्ण जग प्रभावित झाले. युध्दाच्या झळा कमी अधिक प्रमाणात सर्वच राष्ट्रांना

भोगाव्या लागल्या. म्हणून हिंसा आणि युध्द थांबविण्यासाठी सामुहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे असे आदर्शवादी मानतात. शांततेचा मार्ग जगातील सर्वच राष्ट्रांनी अवलंबिला तर आंतरराष्ट्रीय हिंसा आणि युध्द टाळता येतील असा विचार आदर्शवादी विचारवंत मांडतात.

**४) मानवी आदर्श :**

आदर्शवादी दृष्टीकोन व्यक्तीच्या आदर्शावर विशेष भर देतो. मनुष्य हा निसर्गत: चांगला आहे. त्याच्या अंगी चांगले गुण आहेत. आजपर्यंत मानवाच्या आदर्शवत कार्यामुळेच मानवी संस्कृती टिकून आहे. मानवाने समाजाच्या व राष्ट्राच्या विकासासाठी आजपर्यंत नि:स्वार्थपणे कार्य केले आहे. त्यांचे हे योगदान विसरण्यासारखे नाही. याच पध्दतीचा विचार मानवाविषयी रुसो, जॉन लॉक या विचारवंतांनी मांडले आहेत. आदर्शवादी विचारवंत व्यक्तीच्या परस्पर सहकार्याच्या वागण्यावर विशेष भर देतात.

**आदर्शवादी सिध्दांताचे मुल्यमापन :**

आदर्शवादी दृष्टीकोनाचे/सिध्दांताचे दोष पुढीलप्रमाणे-

**१. आदर्शवादी दृष्टीकोन कालबाह्य ठरला :**

पहिल्या महायुध्दानंतर आदर्शवादी दृष्टीकोन उदयास आला. युध्दाने आणि हिंसेने जगाचे कल्याण होणार नाही. यासाठी आदर्शवाद हा मोठा पर्याय ठरु शकतो. हा विचार झपाटयाने वृध्दींगत झाला. अमेरिकन अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी १४ कलमी आदर्शाची योजना आखून शांतता, परस्पर सहकार्य आणि बंधुभाव निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. याचे फलित म्हणजे शांतता आणि सुरक्षितता अस्तित्वात आणण्यासाठी राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. पण वीस वर्षातच राष्ट्रसंघ संपुष्टात आला. आदर्शवादी तत्त्वांच्या आधारावर उदयास आलेला हा दृष्टीकोन दुसरे महायुध्द सुरू झाल्याबरोबर इतिहासजमा झाला.

**२. प्रश्नांचे निराकरण होत नाही :**

ज्या-ज्या राष्ट्रांनी शांततेचा आणि आदर्शवादाचा पुरस्कार केला त्या राष्ट्रांना नेहमीच अनेक समस्यांना सामोरे जावे लागले आहे. एक काळ असा होता की, इंग्लंडवर आक्रमण करण्याची सहजासहजी कोणी हिंमत करत नव्हते. भारताने शांततेचा आणि आदर्शवादाचा पुरस्कार करून देखील अनेक परकीय आक्रमणांना तोंड द्यावे लागले आहे म्हणूनच असे म्हटले जाते की, शांततेने आणि आदर्शवादाने जगाचे प्रश्न सुटत नाहीत. आज अमेरिकेसारख्या देशाकडे जगाचे नेतृत्व आले आहे ते केवळ आदर्शवादी विचाराने नव्हे तर अमेरिकेचे सामर्थ्य आणि दहशत त्याला कारणीभूत आहे. साम,दाम,दंड,भेद आणि नीती या तत्त्वांचा आधार घेऊन अमेरिका जगाचे प्रश्न आपल्या सोईनुसार सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे ही आदर्शवादी दृष्टीकोनाची पिछेहाट आहे.

**३. स्वप्नाळू जगाची निर्मिती :**

शांततेच्या मार्गाने आंतरराष्ट्रीय समुहासमोर चांगले आदर्श ठेवून राष्ट्रा-राष्ट्रात सलोखा निर्माण करणे आजपर्यंत शक्य झाले नाही. भारताने चीनसमोर पंचशील तत्त्वे ठेवून भारत-चीन भाई-भाई असा नारा दिला.

पण काही काळातच चीनने भारतावर आक्रमण करून हा आदर्श मोडीत काढला. या विचाराने स्वप्नाळू जगाची निर्मिती केली हे आजपर्यंतच्या इतिहासावरून सिध्द झाले आहे.

**४. नैतिक मुल्यांचा ऱ्हास :**

आदर्शवादाचा पुरस्कार करणाऱ्या विचारवंतांनी नैतिकता संपूर्ण जगासमोर ठेवण्याचा प्रयत्न केला. ज्या राष्ट्रांनी नैतिकतेचा आधार घेतला ती राष्ट्रे आंतरराष्ट्रीय राजकारणात अपयशी ठरली आणि ज्या राष्ट्रांनी नैतिकतेचा त्याग केला ती राष्ट्रे आज जगावर राज्य करीत आहेत. ज्या राष्ट्रांनी नैतिकतेची झालर पांघरली त्यांना नेहमीच अपयशाला तोंड द्यावे लागले. त्यामुळे आदर्शवादी दृष्टीकोनातील नैतिकतेची शिकवण जगाला रुचली नाही.

**आदर्शवादी दृष्टीकोनाचे गुण पुढीलप्रमाणे :**

**१. आदर्शवादी दृष्टीकोनाचे महत्त्व नाकारता येत नाही :**

आधुनिक युगात आदर्शवादी दृष्टीकोनात काही दोष निर्माण झाले असले तरी त्यांचे महत्त्व नाकारता येण्यासारखे नाही. मानवाला सुख आणि शांती ही आदर्शवादी विचारानेच प्राप्त होते. हे सत्य नाकारता येणार नाही. आज प्रत्येक आंतरराष्ट्रीय व्यवहार आदर्शवादी मूल्यांच्या नावाने चालतो. म्हणजेच आदर्शवादी दृष्टीकोनाचे अस्तित्व संपले असे म्हणने धाडसाचे होणार आहे. आजही आंतरराष्ट्रीय स्तरावर आदर्शवादाचे महत्त्व टिकून आहे.

**२. नैतिक मुल्यांवरच आंतरराष्ट्रीय व्यवस्था टिकून आहे :**

आधुनिक युगात मानवाने नवनवीन शोध लावले आहेत. त्यामुळे जग खूप लहान झाले आहे. एका राष्ट्राची समस्या संपूर्ण जगाची समस्या झाली आहे. मानवाने स्वत:च्या स्वार्थासाठी निसर्ग नियम पायदळी तुडविले आहेत. ही बाब मानवास परिचित आहे. यासाठी मानवाला नैतिक मुल्ये विसरुन चालणार नाही. नैतिक मुल्यांच्या आधारावरच आज आंतरराष्ट्रीय व्यवस्था टिकून आहे. आदर्शाचे पालन झालेच नसते तर तिसरे महायुध्द होवून जगाचा केव्हाच विनाश झाला असता.

**३. शांतता आणि सुरक्षितता :**

आंतरराष्ट्रीय पातळीवर आदर्शवादी दृष्टीकोनाच्या माध्यमातून शांतता आणि सुरक्षितता निर्माण करता येत नाही. कारण काही राष्ट्रांच्या स्वार्थी नितिमुळे आंतरराष्ट्रीय शांततेला, सुरक्षिततेला धोका निर्माण होतो. ज्या–ज्या वेळेस विनाश घडून आला त्या–त्या वेळेस आंतरराष्ट्रीय पातळीवर शांततेसाठी सामुहिक प्रयत्न झाले आहेत. त्या सामुहिक प्रयत्नांना वेळोवेळी यश देखील प्राप्त झाले आहे. हे आदर्शवादाचे यश आहे.

**४. आशावादावर जग सुरक्षित :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात आदर्शवादी दृष्टीकोनावर स्वप्नाळू आशावाद म्हणून नेहमीच टीका होत असते. जसा माणूस आशेवर जीवन जगत असतो. तेच तत्त्व जगाला देखील लागू पडते. संपूर्ण जगात शांतता आणि

सुरक्षितता निर्माण होईल हा आशावाद आदर्शवादी दृष्टीकोनामुळे विकसित होतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरक्षिततेची भावना वृध्दींगत होते.

**५. आदर्शवादाची आवश्यकता :**

आंतरराष्ट्रीय पातळीवर आज खरी आदर्शवादाची आवश्यकता निर्माण झाली आहे. मानवाच्या भौतिक प्रगतीने विनाशाची बीजे निसर्गात पेरली गेली आहेत हे सत्य नाकारता येत नाही. आज आंतरराष्ट्रीय पातळीवर सामुहिक समस्यांनी थैमान घातले आहे. नैसर्गिक आपत्ती केव्हा उद्‌भवेल याची शाश्वती नाही. मानवाने अशी काही शस्त्रास्त्रे निर्माण केली आहेत की ती संपूर्ण जगाचा विनाश घडवून आणू शकतात. ही भीती देखील मानव जातीस सतावत आहे. त्यामुळे जगाच्या संरक्षणासाठी आदर्शवादापेक्षा दुसरा कोणता मार्ग नाही हा विचार दिवसेंदिवस बळावत आहे. वरीलप्रमाणे आदर्शवादी दृष्टीकोनाचे मुल्यमापन होत असले तरी हा दृष्टीकोन जागतिक शांततेचा पुरस्कर्ता असल्यामुळे जगाला युध्दापासून वाचविण्यासाठी आदर्शवाद्यांनी पुढील उपाय सूचविले आहेत.

१. आजपर्यंतचा संघर्ष हा नेहमीच लोकशाही विरुध्द हुकूमशाही असा राहिला असल्यामुळे लोकशाहीला विरोधी अशी व्यवस्था समाप्त करावी.

२. नैतिकतेला महत्त्व देणाऱ्या राष्ट्रांनी परंपरागत सत्तेला महत्त्व न देता नैतिक सिध्दांताचे पालन करावे आणि परंपरागत सत्ता ही राजकारणापासून अलिप्त ठेवावी.

३. आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना करून तिच्या माध्यमातून सत्तेच्या नीतीच्या धोरणाचा अंत करावा.

अशा प्रकारे प्रत्येक राष्ट्रांनी परस्परांच्या हिताची काळजी घेऊन सामंजस्याचा दृष्टीकोन स्विकारल्यास युध्दाची शक्यताच जगात राहणार नाही.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ४ :**

**पुढील विधाने चूक की बरोबर ते लिहा.**

१. आदर्शवादी दृष्टीकोन आधुनिक आहे. (   )

२. १० जानेवारी १९२० ला राष्ट्रसंघाची स्थापना करण्यातआली. (   )

३. आदर्शवादी दृष्टीकोन हा पारंपारिक दृष्टीकोन आहे. (   )

४. राष्ट्रसंघ ही संघटना जगातील पहिली आंतरराष्ट्रीय संघटना आहे. (   )

५. आदर्शवाद हा स्वप्नाळू दृष्टीकोन नाही. (   )

## १.२.४.२ आंतरराष्ट्रीय राजकारणाचा वास्तववादी दृष्टीकोन :

(Realistic Theory of International Politics) :

आंतरराष्ट्रीय राजकारणात वास्तववादी दृष्टीकोनाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. वास्तववादी दृष्टीकोनाला सत्तावादी दृष्टीकोन असेही म्हणतात. कारण ह्या सिद्धांताने सत्ता या घटकाला अधिक महत्व दिले आहे.प्राचीन

चिनी विचारवंत सुन झुंच्या ''आर्ट ऑफ वॉर'' (Art of War) या ग्रंथात, कौटील्याच्या ''अर्थशास्त्र'. या ग्रंथात वास्तववादी दृष्टीकोनावर भाष्य केले आहे. थॉमस हॉब्जने ''लेव्हीएथन'' या ग्रंथात राज्याच्या सत्तेला महत्वाचे स्थान दिलेले आहे. मॅकियाव्हेलीचे लिखान ही या दृष्टीकोनावर भरपूर आहे, ते म्हणतात, - ''मनुष्य, शस्त्र, धन आणि भाकरी ही युध्दाची शक्ती आहे. परंतु या चारमध्ये सुरुवातीची दोन सूत्रे अधिक महत्त्वपूर्ण आहेत. कारण मनुष्य आणि शस्त्र, धन आणि भाकरी प्राप्त करू शकतात, परंतु भाकरी आणि धन, मनुष्य आणि शस्त्र प्राप्त करू शकत नाहीत.''

आधुनिक काळात वास्तववादी दृष्टीकोनाची सुत्रबध्द मांडणी हॅन्स मॉर्गेंथॉ यांनी केली आहे. क्विन्सी राईट, इ. एच. कार, जॉर्ज श्वेत्झनबर्जर, जॉर्ज केन्नन, शुमन, केनेथ थॉम्पसन, डॉ. हेंरी किसिंजर, हेरॉल्ड लासवेल, क्लाड इ. विचारवंतांनी या दृष्टीकोनाचा पुरस्कार करून याला वास्तविकता प्राप्त करून देण्याचे कार्य केले आहे. हॅन्स मॉर्गेंथॉच्या पूर्वी एन.जे.स्पाईक, नित्से,ट्राटस्की, हेरॉल्ड लासवेल इ.विचारवंतांनी वास्तववादी दृष्टीकोनातून सत्तेचे महत्व स्पष्ट केले आहे.

**हॅन्स मार्गेंथॉचा वास्तववादी दृष्टीकोन :**

अमेरिकन विचारवंत हॅन्स मॉर्गेंथॉ यांनी 'पॉलिटिक्स अमंग नेशन्स' (झेश्रळींळली ओपस छरींळेपी) या ग्रंथात वास्तववादी दृष्टीकोनाची शास्त्रीय दृष्टीकोनातून मांडणी करून वास्तववादी दृष्टीकोनाची सहा मुलतत्त्वे पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत-

**१) आंतरराष्ट्रीय राजकारणाचे वास्तविक नियमाद्वारे नियंत्रण :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात वास्तविक नियमांना महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर कोणताही निर्णय घेत असताना वास्तविकतेला धरून घ्यावा लागते. मॉर्गेंथॉच्या मते,समाजामध्ये सामाजिक नियंत्रणासाठी जसे अनेक नियम असतात त्याचप्रमाणे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नियंत्रण करण्यासाठी काही नियम, तत्त्वे वेगवेगळी असतात. या तत्त्वांचा आधार घेऊन आंतरराष्ट्रीय राजकारणात वास्तविक नियमाद्वारे निर्णय घ्यावे लागतात.

**२) राष्ट्रीय हिताच्या प्राप्तीसाठी शक्तीचा उपयोग :**

मॉर्गेंथॉ यांनी राष्ट्रीय हितासाठी शक्ती किंवा सत्ता हा शब्द वापरला आहे. मॉर्गेंथॉच्या मते, ''शक्ती किंवा सत्ता म्हणजे एका व्यक्तीचे अन्य व्यक्तीच्या मन आणि कृतीवर नियंत्रण प्रस्थापित करणे होय.'' या सिध्दांतानुसार राजकीय नेत्यांना नैतिक आणि अनैतिक या गोष्टींचा विचार न करता राष्ट्रांच्या हितानुसार विचार आणि कार्य करावे लागते. परिणामतः कोणत्याही राष्ट्राचे परराष्ट्र धोरण हे त्या राष्ट्राचे हित, आवश्यकता यानुसारच निश्चित केले जाते.

**३) राष्ट्रीय हितात परिस्थितीनुसार परिवर्तन होते :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रीय हित हे कायम नसून त्यात परिस्थितीनुसार परिवर्तन घडत असते. मॉर्गेंथॉ

यांच्या मते, ''परिस्थिती  राष्ट्रीय हित निर्धारक करण्यात महत्त्वाची भूमिका बजावीत असते. तसेच त्या हिताच्या अनुषंगानेच राजकीय व्यवहार निश्चित होत असतात.'' याच कारणामुळे राजकीय नेतृत्वाला बदलती परिस्थिती लक्षात घेऊन राष्ट्रीय हिताचा विचार करून परराष्ट्रीय धोरण निश्चित करावे लागते.

**४) नैतिकतेला गौण स्थान :**

नैतिकता, नीती, नियम या बाबींना वास्तववादाचा विरोध नसला तरी ही आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्राचे हित, आवश्यकता, परिस्थिती लक्षात घेऊनच नीतिनियमांचा उपयोग करावा लागतो. गरज भासलीच तर अनैतिक मार्गाच्या विचाराचा अवलंब करून राष्ट्रहिताचे संरक्षण करावे यावर वास्तववादाचा भर आहे. वास्तववादानुसार राजकारणात विवेक आणि दूरदर्शीपणा या गोष्टींना सर्वात अधिक महत्त्व आहे.

**५) राष्ट्रीय नैतिकता आणि आंतरराष्ट्रीय नैतिकता यात समन्वयाचा अभाव :**

मॉर्गेंथॉ यांनी वास्तववादाचा पुरस्कार करताना राष्ट्रीय नैतिकता, नीतिमत्ता आणि आंतरराष्ट्रीय नैतिकता यांच्यात कोणत्याच प्रकारचा संबंध किंवा समन्वय मान्य केलेला नाही.आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रत्येक राष्ट्राचे स्वतंत्र राजकीय व्यक्तीमत्त्व असून स्वत:च्या हिताची पूर्ती करणे हेच त्याचे प्रमुख कार्य असल्यामुळे नैतिकतेचे नियम यांच्यावर बंधनकारक नसतात.

**६) राजकीय क्षेत्रात स्वायतत्ता :**

वास्तववादाचा भर राजकीय क्षेत्रात स्वायतत्ता प्रस्थापित करण्यावर असतो. आर्थिक क्षेत्रात जसे संपतीला महत्व असते तसे राजकीय क्षेत्रात सत्तेला महत्व असते. राष्ट्रीय हित साध्य करण्यासाठी शक्तीच्या वापरावरअधिक भर देवून वैज्ञानिक किंवा नैतिक दृष्टीकोन पूर्णत: नाकारला आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात राजकीय विचारांचे श्रेष्ठत्व मान्य केलेले असते.

मॉर्गेंथॉने वरीलप्रमाणे वास्तववादी सिद्धांताची सहा प्रमुख तत्त्वे सांगितली आहेत त्या तत्त्वांचे विश्लेषण केल्यास तो पुढील तीन गृहीत तत्त्वावर आधारलेला असल्याचे स्पष्ट होते.

१) राजकीय व्यक्तींची आपल्या राष्ट्राचे हित साध्य करण्याची इच्छा.

२) कोणत्याही राष्ट्राचे हित हे त्या राष्ट्राच्या सीमेसंबंधी तसेच आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक प्रभाव वाढविण्याशी संबंधित असते.

३) राष्ट्रीय हिताच्या रक्षणासाठी राज्य शक्तीचा वापर करीत असतात.

मॉर्गेंथॉ म्हणतात, ''जग हे परस्परविरोधी हितसंबंधाच्या संघर्षाचे जग होय.'' मॉर्गेंथॉच्या मते, राजकीय नियम हे मनुष्य स्वभावाचा परिणाम असून संपूर्ण विश्व हे मानवी स्वभावाची प्रतिकृती आहे.स्वार्थ आणि सत्तेची लालसा मनुष्य स्वभावात नेहमीच महत्त्वाची ठरत असल्यामुळे वाईट आणि संघर्ष यांचा मनुष्य स्वभावाचे गुण म्हणून स्वीकार करावा लागतो. मॉर्गेंथॉ म्हणतात, कोणत्याही प्रकारचे राजकारण असो त्यात सत्तेसाठी सतत

संघर्ष चालू असतो. प्रत्येक राजकीय क्रिया ही १) सत्ता प्राप्त करणे तसेच ती कायम ठेवणे २) सत्तेत वाढ करणे ३) सत्तेचे प्रदर्शन करणे, यावरच आधारित असते.

प्रत्येक राष्ट्र स्वत:च्या हिताला महत्त्व देऊ लागले तर संघर्ष अनिवार्य बनतो मग अशा स्थितीत शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने मॉर्गेंथॉनी पुढील तीन मार्ग सुचविले आहेत,

१) सत्ता नियंत्रित करणे - नि:शस्त्रीकरण, शांतता करार इत्यादीने

२) सत्ता हस्तांतरित करणे - विश्वराज्याची निर्मिती करून

३) करार करून - राजनय पध्दतीचा स्वीकार.

मॉर्गेंथॉ यांनी राजनयाद्वारे शांतता प्रस्थापित करता येईल असे म्हटले आहे. त्यांच्या मते, राजनय प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असे दोन प्रकारचे कार्य करतो. प्रत्यक्ष कार्याद्वारे राजनय संघर्षाचे स्वरूप मर्यादित करतो आणि अप्रत्यक्ष कार्याद्वारे विश्वसमाजाच्या विकासास सहाय्य करीत असतो. अशा प्रकारे मॉर्गेंथॉनी राष्ट्रीय हित आणि सता प्राप्तीच्या विभिन्न सिध्दांताचा आंतरराष्ट्रीय राजकारणात वापर करून त्यांना सैध्दांतिक अधिष्ठान प्राप्त करून दिले.

**वास्तववादी दृष्टीकोनाचे मूल्यमापन :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात वास्तवादी दृष्टीकोनास अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. मॉर्गेंथॉ यांनी वास्तववादी दृष्टीकोनाची शास्त्रशुध्द मांडणी करून या सिध्दांतास मोठा नावलौकिक मिळवून दिला आहे. हा दृष्टीकोन वास्तविकतेला धरून असला तरी ही यात काही दोष आढळून येतात ते पुढीलप्रमाणे-

**१) सत्ता हेच अंतिम सत्य नाही :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तेला अतिशय महत्त्व आहे. पण दुसऱ्या बाजूने विचार केल्यास सत्ता हीच मानवी जीवनाचे अंतिम सत्य होवू शकत नाही. मनुष्य हा पूर्णपणे राजकीय प्राणी होऊ शकत नाही. राजकीय इच्छेसाठीच मनुष्य धावपळ करू लागला तर त्याच्या इच्छा पूर्ण होऊ शकत नाहीत. मानवाकडे राजकीय अंगाऐवजी इतरही अंगे महत्त्वाची असतात. त्यांना बाजूला सारून मानवी संस्कृतीस पूर्णत्व प्राप्त होऊ शकत नाही. त्यामुळे सत्ता हेच अंतिम सत्य नाही.

**२) सत्तेपेक्षा इतरही घटक महत्त्वाचे :**

आंतरराष्ट्रीय पातळीवर जसे सत्तेला महत्त्व आहे तसे इतर घटकांनाही महत्त्व आहे. सत्ता हीच सर्वश्रेष्ठ असू शकत नाही. सत्तेबरोबर लोकमत, जनतेची अधिमान्यता, राजकीय नेत्यांची मुत्सद्देगिरी, आदर्शवाद यांचाही आंतरराष्ट्रीय संबंधावर परिणाम होत असतो म्हणजे केवळ सत्तेभोवतीच आंतरराष्ट्रीय राजकारण फिरत असते. असे म्हणणे संयुक्तिक असू शकत नाही.

**३) राष्ट्रीय हिताची कल्पना अनाकलनीय :**

वास्तववादी विचारवंतांनी राष्ट्रीय हितास मोठे प्राधान्य दिले आहे. परंतु या विचारवंतामध्ये राष्ट्रीय

हितासंदर्भात एकमत दिसून येत नाही. त्यामुळे राष्ट्रीय हिताची कल्पना अनाकलनीय आणि अस्पष्ट स्वरूपाची वाटते.

**४) युध्दास पोषक वातावरण :**

वास्तववादी विचारवंतांनी सत्तेस अवास्तव महत्त्व दिल्यामुळे राष्ट्राराष्ट्रात सत्तेसाठी मोठे संघर्ष आणि स्पर्धा निर्माण झाली. या जगात सत्तेपेक्षा दुसरी कोणतीच बाब श्रेष्ठ नाही अशी एकांगी विचारधारा पुढे आल्याने युध्दास पोषक वातावरण निर्माण झाले.

**५) विचारधारेकडे दुर्लक्ष :**

जगातील प्रत्येक राष्ट्राची एक वेगळी विचारधारा आहे. त्यावर कोणतीही कोणी ही बंधने घालू शकत नाहीत. प्रत्येक देशाची विचारधारा दुसऱ्या राष्ट्राबरोबर जुळेल हे म्हणणे संयुक्तीक होणार नाही याकडे वास्तववाद्यांनी दुर्लक्ष केले.

**६) मानवी स्वभावाचा एकांगी विचार :**

मॉर्गेंथॉच्या मते, प्रत्येक माणूस सताभिलाषी आहे. म्हणूनच तो आक्रमक व सत्तापिपासू आहे हे गृहित धरून त्यांनी वास्तववादी दृष्टीकोनाची मांडणी केली. पण या जगात काही लोक नि:स्वार्थी तर काही लोक स्वार्थी आहेत. त्यामुळे सर्वांना स्वार्थी अथवा नि:स्वार्थी म्हणणे बरोबर नाही. म्हणजेच हा विचार मानवी स्वभावासाठी एकांगी स्वरूपाचा आहे.

वरीलप्रमाणे वास्तववादी दृष्टीकोनामध्ये काही दोष, त्रूटी आढळत असल्या तरी या दृष्टीकोनाचे काही गुण ही विचारात घेण्यासारखे आहेत.

**वास्तववादी दृष्टीकोनाचे गुण :**

**१) शास्त्रीय दृष्टीकोन :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्ता संकल्पनेला केंद्रबिंदू मानून वास्तववादी दृष्टीकोनाची शास्त्रीय मांडणी करून मॉर्गेंथॉ, जॉर्ज कॅटलीन यांनी वास्तववादी दृष्टीकोनाचा अवलंब करून राजकीय जीवनाचे विश्लेषण केले आहे. मॉर्गेंथॉ यांनी वास्तववादी दृष्टीकोनाला शास्त्रीय स्वरूपाची जोड देऊन वास्तववादाचा शास्त्रशुध्द पाया रचला.

**२) सत्तेचे महत्त्व :**

आंतरराष्ट्रीय संबंधात सत्तेला अत्यंत महत्त्व आहे. या सत्तेचे महत्त्व त्रिकालाबाधित स्वरूपाचे आहे. सत्तेच्या जोरावर राष्ट्रास आंतरराष्ट्रीय राजकारणात पत, प्रतिष्ठा व महत्त्व प्राप्त होते. आज सत्तेच्या जोरावरच अमेरिकेने आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वत:चे वर्चस्व निर्माण केले आहे.

**३) व्यावहारिक दृष्टीकोन :**

व्यवस्थावादी सिध्दांताच्या निर्मितीमुळे या सिध्दांताची काही बाबतीत पिछेहाट झाली आहे हे मान्य करावे लागते. पण आंतरराष्ट्रीय समस्यांचे आकलन व निराकरण केवळ नैतिकतेला आणि आदर्शवादाला ग्राह्य मानून होत नाही. राजकारणात आदर्शवादी विचारवंतांना स्वप्नाळू जगाच्या बाहेर काढण्याचे काम वास्तववादी दृष्टीकोनाने केले आहे. म्हणूनच या दृष्टीकोनास व्यावहारिक स्वरूप प्राप्त झाले आहे.

वरीलप्रमाणे वास्तववादी सिध्दांतात काही दोष आणि गुण असले तरी आज सत्तेसाठी संघर्ष चालूच आहे. आंतरराष्ट्रीय संघर्ष नष्ट झालेला नाही. म्हणून आज ही मॉर्गेंथॉ यांच्या वास्तववादी सिध्दांताचे महत्त्व आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ५ :**

**पुढील प्रश्नांची एक–दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

१. हॅन्स जे मॉर्गेंथॉ यांनी कोणत्या ग्रंथात वास्तववादी दृष्टीकोन मांडला ?

२. वास्तववावादी दृष्टीकोनाचा प्रमुख उद्गाता म्हणून कोणास ओळखले जाते ?

३. वास्तववादी दृष्टीकोनाचे दोन गुण सांगा ?

४. वास्तववादी दृष्टीकोनाचे दोन दोष सांगा ?

५. थॉमस हॉब्जने कोणत्या ग्रंथात राज्याच्या सत्तेला महत्वाचे स्थान दिलेले आहे.

## १.३ सारांश (Summary) :

आंतरराष्ट्रीय राजकारण स्वरूप आणि व्याप्ती– या घटकात आपण विषय विवेचन,अर्थ,विविध विचारवंतांच्या व्याख्या, आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप आणि व्याप्ती यांचा अभ्यास केला आहे. तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाचे आदर्शवादी आणि वास्तववादी सिध्दांताचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आदर्शवादी दृष्टीकोन अतिप्राचीन आहे. आदर्शवादाची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी यान स्मट्स, लॉर्ड रॉबर्ट, सेसिल, लिओ बुझ्र्वा यांनी पुरस्कार केला. आदर्शवादी सिध्दांताचे पुरस्कर्त्यामध्ये वुड्रो विल्सन, बर्ट्रांड रसेल, रिचर्ड कॉबेन, विल्यम लँड, ऑडलस हक्सल, जॉन केनेडी इ. चा समावेश होता. विशिष्ट नैतिक मुल्यांचा स्विकार करून राष्ट्राराष्ट्रात शांतता, बंधुभाव या आधारावर नवी आंतरराष्ट्रीय व्यवस्था अस्तित्वात आणणे सोईचे होईल असे मानणारा हा दृष्टीकोन आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणात १९३० नंतर वास्तववादी दृष्टीकोनाचा स्वीकार करण्यात आला. प्राचीन चिनी विचारवंत सुन झूंच्या ''आर्ट ऑफ वॉर'' या ग्रंथात आणि युसिडाईडसच्या 'क्ळीींू ेष ींहश शिपेेपिपशीळरप'ुरी) या ग्रंथात वास्तववादी सिध्दांतावर भाष्य करण्यात आले आहे. आधुनिक काळात हॅन्स मॉर्गेंथॉ यांनी या वास्तववादी सिध्दांताची सुत्रबध्द मांडणी केली तसेच जॉर्ज केनन, राइस नॉल्ड, श्वेत्झनबर्जर, डॉ. हेंरी

किसिंजर, निश्ले, ट्रिश्के, हेरॉल्ड लासवेल, क्विन्सी राईट, ई. एच, कार, क्लॉवुड, शुमन इ. नी या सिध्दांतास वास्तविकता प्राप्त करून देण्याचे कार्य केले.

वरीलप्रमाणे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप, व्याप्ती आणि अभ्यासासाठी असलेले आदर्शवादी आणि वास्तववादी दृष्टीकोन याविषयीची सविस्तर मांडणी प्रस्तुत प्रकरणात करण्यात आलेली आहे. परंतु सारांश रूपाने आपणास असे म्हणता यईल की, ''आंतरराष्ट्रीय राजकारण हा विषय गतीमान असल्यामुळे त्याचे स्वरूप ही गतीशील आहे.''

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ (Terms to Remember) :

**आंतरराष्ट्रीय संबंध :** राष्ट्राराष्ट्रातील परस्पर संबंध.

**आंतरराष्ट्रीय राजकारण :** राष्ट्रांच्या शासन पध्दतीचा आंतरराष्ट्रीय संबंधाच्या संदर्भातील अभ्यास.

**तह :** करार, संधी.

**कुटनिती :** व्युहरचना

**सत्तेचे द्विध्रुवीकरण :** दोन राष्ट्रात सत्ता वाटप.

**परिवर्तन :** बदल

**सार्वभौम :** राज्याची सर्वश्रेष्ठ सत्ता, प्रभूसत्ता.

**सत्ता :** अन्य व्यक्तीच्या वर्तनावर प्रभाव पाडण्याची क्षमता.

**परराष्ट्र धोरण :** एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राबाबत स्विकारलेले धोरण.

**राष्ट्रीय हित :** एखाद्या राष्ट्राद्वारे सैध्दांतिक दृष्ट्या निश्चित केलेले ध्येय.

**राजनय :** वाटाघाटी म्हणून आंतरराष्ट्रीय संबंधाचे व्यवस्थापन करणे.

## १.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न १ उत्तरे :**

१) आंतरराष्ट्रीय हा शब्दप्रयोग प्रथम जेरेमी बेंथम यांनी केला.

२) आंतरराष्ट्रीय संबंध या विषयावर पहिले पुस्तक पॉल एस. रिश यांनी लिहिले.

३) आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास म्हणजे राष्ट्रांच्या विदेशनीतीचा अभ्यास होय. ही व्याख्या फेलिक्स ग्रॉस यांनी केली

४) १९१९ मध्ये वेल्स येथील विद्यापीठात आंतरराष्ट्रीय संबंध हा विषय शिकविण्यास प्रारंभ झाला

५) आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तेसाठी सतत संघर्ष असतो.

६) हॅन्स जे मॉर्गेंथॉ यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाला आंतरराष्ट्रीय संबंधाचा गाभा मानले आहे.

७) राष्ट्राराष्ट्रातील सर्व प्रकारच्या संबंधाचा जो अभ्यास असतो त्यास आंतरराष्ट्रीय राजकारण असे म्हणतात. असे चार्ल्स स्लायचर यांनी म्हटले आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न २ उत्तरे :**

१) पूर्वीच्या काळी आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप हे मुख्यत्वे करून कुटनीती आणि सैनिकी स्वरूपाचे होते.

२) इ.स. १९४५ साली संयुक्त राष्ट्र संघटनेची सदस्य संख्या ५१ होती.

३) भारत-चीन संबंध सुरुवातीला मैत्रीचे होते.

४) जगातील खनिज तेलाचा मोठा साठा असलेला देश म्हणून लिबीयाला ओळखले जाते.

५) १९६३ साली भारताने ''व्हाईस ऑफ अमेरिका''चे ट्रांसमीटर बसविण्याचे ठरविले होते.

६) साम्यवादी सोव्हिएट रशियाचे डिसेंबर १९९१ रोजी विघटन होवून साम्यवादी संघराज्य संपुष्टात आले.

**स्वयं अध्ययन प्रश्न ३ उत्तरे :**

१) भौगोलिक स्थान, आर्थिक साधनसामुग्री, तंत्रशास्त्राची कुशलता, बौध्दिक आणि शैक्षणिक संस्था, कुशल आणि आटोपशीर लोकसंख्या, योग्य संघटन इ. राष्ट्रीय सत्तेचे महत्त्वाचे घटक आहेत.

२) एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राबाबत स्वीकारलेले धोरण किंवा केलेला व्यवहार होय.

३) आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रांचे संबंध परस्परात दोन प्रकारचे असतात. ते म्हणजे मित्रत्वाचे आणि शत्रूत्वाचे संबंध. मित्रत्वाच्या संबंधात परस्पर सहकार्य व मदतीची भावना असते.तर शत्रूत्वाच्या संबंधामध्ये राष्ट्रांचे संबंध हे मतभेदाचे, संघर्षाचे किंवा युध्दसदृश्य असतात.

४) आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाचे अस्तित्वच मुळी केंद्रीय सत्तेचा अभाव असलेला आंतरराष्ट्रीय समाज असल्यामुळे राष्ट्राराष्ट्रांनी परस्पर संबंधाबाबतच्या काही नियमांना मान्यता दिलेली असते. त्यांनाच आंतरराष्ट्रीय कायदे म्हणतात.

५) आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप आणि त्यातील प्रमुख घटकांचा (शक्तींचा) अभ्यास,आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील राजकीय, आर्थिक व सामाजिक संघटनांचा अभ्यास आणि राष्ट्रीय सत्तेचे प्रमुख घटक (साधने) इत्यादी

**स्वयं अध्ययन प्रश्न ४ उत्तरे :**

१) चूक

२) बरोबर

३) बरोबर

४) बरोबर

५) चूक

**स्वयं अध्ययन प्रश्न ५ उत्तरे :**

१) हॅन्स जे मॉर्गेंथॉ यांनी 'झेश्रळींळली ओपस छ्रींळेपी' या ग्रंथात वास्तववादी दृष्टीकोन मांडला आहे.

२) हॅन्स मॉर्गेंथॉ यांना वास्तववादी दृष्टीकोनाचा उद्गाता म्हणून ओळखले जाते.

३) शास्त्रीय दृष्टीकोन, सत्तेचे महत्त्व, व्यावहारिक दृष्टीकोन हे वास्तववादी दृष्टीकोनाचे गुण सांगता येतात.

४) वास्तववादी दृष्टीकोनाचे युध्दास पोषक वातावरण,मानवी स्वभावाचा एकांगी विचार हे दोष आहेत.

५) थॉमस हॉब्जने ''लेव्हीएथन'' या ग्रंथात राज्याच्या सत्तेला महत्वाचे स्थान दिलेले आहे.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

१) आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अर्थ सांगुन त्याचे स्वरूप स्पष्ट करा.

२) आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याप्ती स्पष्ट करा.

३) आंतरराष्ट्रीय राजकारणाचा आदर्शवादी दृष्टीकोन स्पष्ट करा.

४) आंतरराष्ट्रीय राजकारणाचा वास्तववादी दृष्टीकोन स्पष्ट करा.

## १.७ अधिक वाचनासाठी ग्रंथ (Reference for further study) :


१) प्रा वराडकर रघुनंदन घ. : आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण, नागपूर : विद्या प्रकाशन. (१९९१)

२) डॉ. जोशी सुधाकर गं. : आंतरराष्ट्रीय संबंध, परभणी : गोमटेश प्रकाशन. (१९९२)

३) डॉ. बाचल वि. मा. आणि डॉ. टोनप, ललिता : आंतरराष्ट्रीय राजकारण, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन. (१९९६)

४) डोळे ना. य. : आंतरराष्ट्रीय संबंध, औरंगाबाद : विद्या बुक्स पब्लिशर्स. (१९९८)

५) डॉ. दाते सुनील : आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण, औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स. (१९९८)

६) डॉ रायपूरकर वसंत : आंतरराष्ट्रीय संबंध, नागपूर : मंगेश प्रकाशन. (२००१)

७) डॉ. भोगले शांताराम : आंतरराष्ट्रीय संबंध, नागपूर : विद्या प्रकाशन. (२००१)

८) प्रा. कुलकर्णी बी. वाय. आणि प्रा. नाईकवाडे अशोक. :आंतरराष्ट्रीय संबंध सिध्दांत आणि व्यवहार, पुणे : श्री विद्या प्रकाशन.(२००४)

९) प्रा. कुलकर्णी सुधाकर : आंतरराष्ट्रीय संबंध, लातूर : विद्याभारती प्रकाशन. (२००५)

१०) डॉ. रासम वासंती आणि डॉ. खापरे करिअप्पा : आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (२००७)

११) डॉ नलावडे पंडित : आंतरराष्ट्रीय संबंध, औरंगाबाद : कैलास प्रकाशन (२०१४)

१२) डॉ अमृतकर प्रशांत : आंतरराष्ट्रीय संबंधाचे सिध्दांत, औरंगाबाद : चिन्मय प्रकाशन. (२०१४)

१३) प्रा. पाटील बी.बी. : आंतरराष्ट्रीय राजकारण, कोल्हापूर : फडके प्रकाशन. (२०१५)

१४) पवार श्रीराम : जगाच्या अंगणात, पुणे : सकाळ प्रकाशन. (२०१८)

❍❍❍

घटक २

# राष्ट्रसत्ता

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ राष्ट्रसत्तेचा अर्थ आणि व्याख्या

२.२.२ राष्ट्रसत्तेचे घटक

२.२.२.१ अ) स्थायी घटक

१) भौगोलिक घटक

२) लोकसंख्या

३) नैसर्गिक साधनसंपत्ती

४) तंत्रज्ञान

ब) अस्थायी घटक

१) विचारधारा

२) नेतृत्त्व

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ.

२.५ स्वयंअध्ययन प्रश्न आणि उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे :

ह्या घटकांच्या अभ्यासानंतर आपल्याला

१) राष्ट्रीय सत्ता ही संकल्पना समजून घेता येईल.

२) राष्ट्रसत्तेचा अर्थ आणि व्याख्या स्पष्ट करता येईल.

३) राष्ट्रसत्तेच्या प्रमुख घटकांची भूगोल, लोकसंख्या, नैसर्गिक साधनसंपत्ती, तंत्रज्ञान, विचारप्रणाली व राजकीय नेतृत्व माहिती घेता येईल.

## २.१ प्रस्तावना (Introduction) :

राष्ट्रीय सत्ता ही आंतरराष्ट्रीय राजकारणातील मध्यवर्ती संकल्पना मानली जाते. 'सत्ता' हा राजकारणाचा पाया आहे. सत्ता ही राष्ट्रीय संरक्षण आणि हितसंबंध जोपासण्याचे प्रमुख साधन आहे. आंतरराष्ट्रीय समुदायामध्ये कोणत्याही राष्ट्राचा दर्जा हा त्या राष्ट्राच्या सामर्थ्यावर, सत्तेवर अवलंबून असतो. परिणामी प्रत्येक राष्ट्र आपली सत्ता, सामर्थ्य वाढविण्याच्या प्रयत्नात असते त्यातूनच राष्ट्राराष्ट्रामध्ये स्पर्धा निर्माण होते. कारण त्यावरच राष्ट्राचे अस्तित्व, त्याचे सार्वभौमत्व व त्याच्या हितसंबंधाची जपणूक अवलंबून असते. अशा या राष्ट्रीय सत्तेची जोपासना ही त्या देशाचे भौगोलिक स्थान, समाजरचना, नैसर्गिक साधनसंपत्ती, औद्योगिक क्षमता, तंत्रज्ञान, राजकीय व्यवस्था, राष्ट्रीय मनोधैर्य, लष्करी सामर्थ्य, नेतृत्व या घटकांवर अवलंबून असते. म्हणूनच राष्ट्रीय सत्ता ही संकल्पना विचारात घेताना त्याचा अर्थ आणि विविध घटक समजून घेण्याची आवश्यकता आहे.

## २.२ विषय विवेचन (Presentation of Subject matter) :

सत्तेची संकल्पना ही जरी युरोपमध्ये १६व्या शतकात राष्ट्र-राज्याच्या कल्पनेच्या उदयाबरोबर विकसित झाली असली तरी त्याच्या कितीतरी अगोदर भारत व चीन सारख्या देशामध्ये विचारवंतांनी आपल्या विचारात व साहित्यात केंद्रस्थान दिले होते. त्यांनी सत्ता ही राजकारणाचा केंद्रबिंदू आहे असे म्हटले आहे. प्रत्येक देशाच्या सत्ता सामर्थ्यावर परराष्ट्र धोरण ठरत असते. प्रस्तुत प्रकरणामध्ये राष्ट्रीय सत्तेचा अर्थ आणि त्याचे घटक याचा विचार करावयाचा आहे. सुरवातीला आपण राष्ट्रसत्तेचा अर्थ विचारात घेणार आहोत.

### २.२.१ राष्ट्रसत्तेचा अर्थ आणि व्याख्या :

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये राष्ट्रीय सत्तेचा, सामर्थ्याचा प्रामुख्याने विचार केला जातो.

राष्ट्रसत्ता ही आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रमुख संकल्पना आहे. मॉर्गेन्था यांच्या मते आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे राष्ट्राराष्ट्रात चाललेला सत्ता-संघर्ष होय. त्यांच्या मते जग हे परस्परविरोधी हितसंबंधांच्या संघर्षाचे जग आहे. जगात चांगले-वाईट, आरोग्य व रोगराई, शांतता व युद्ध यांच्यामध्ये कधीही न संपणारा संघर्ष सदैव चालू असतो. सत्तालालसा ही मनुष्य मात्रात महत्त्वाची असते. ही लालसा राजकारणाचा

केंद्रबिंदू असते सत्ता हे राष्ट्रहित साध्य करण्याचे साधन होय. राष्ट्राचा उज्ज्वल भविष्यकाळ राष्ट्रीय सत्तेवर अवलंबून असतो. राष्ट्रीय सत्तेचा विचार १६व्या शतकात राष्ट्र-राज्याच्या कल्पनेच्या उदयाबरोबर विकसित झालेला असला तरी त्याच्या कितीतरी आधी भारत चीनसारख्या देशात काही विचारवंतांनी सत्तेचा विचार केलेला आहे. मनुस्मृतीत परराष्ट्रसंबंध आणि युद्धविषयक विचारात सत्ता सामर्थ्यालाच महत्त्व दिले आहे. महाभारतातील शांतीपर्वात सत्तेला महत्त्व दिले आहे. कौटिल्याने आपल्या 'अर्थशास्त्र' ग्रंथात सत्तेच्या बाबतीत महत्त्वपूर्ण विचार मांडलेले आहेत. चीनी विचारवंत सन त्स्यू (Sun Tzu) याने आपल्या 'आर्ट ऑफ वॉर' या ग्रंथात सत्तेविषयी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत.

मध्ययुगात मॅकियाव्हेली, थॉमस हॉब्स, हेगेल यांनी राष्ट्रीय सत्तेचा विचार केला होता. २०व्या शतकात मॉर्गेन्थॉ, लॉसवेल, डाईक इ. विचारवंतांनी सत्तेचा विचार केला होता. सत्तेचे स्वरूप सतत बदलत असते त्यामुळे जागतिक राजकारण हे परिवर्तनशील आढळते. १९ व्या शतकात इंग्लंड हे महासत्ता होते. तर आज अमेरिका हे राष्ट्र प्रमुख महासत्ता बनले आहे. दुसऱ्या महायुद्धात बेचिराख झालेले जपान हे छोटे राष्ट्र आज जागतिक आर्थिक महासत्ता बनत आहे. भारत-चीन सारखी राष्ट्रे महासत्तेच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. आंतरराष्ट्रीय राजकारण समजून घेण्यासाठी सत्तेची संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे.

**राष्ट्रीय सत्तेची व्याख्या :**

आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रीय सत्ता (छ्रींळेपरश्र झेुशी) हा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. सत्तेवर राष्ट्र टिकते व सामर्थ्यावर राष्ट्राचे भवितव्य अवलंबून असते. सत्ता राष्ट्राचा सर्व व्यवहाराचा केंद्रबिंदू मानला जातो. म्हणूनच राष्ट्राचे परराष्ट्र धोरण सत्तेच्या संकल्पनेभोवती फिरत असते.

काही विचारवंतांनी राष्ट्रीय सत्तेची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे.

१) **हॅन्स जे. मार्गेन्थॉ यांच्या मते,**

''सत्ता म्हणजे एका माणसाचे दुसऱ्या माणसाच्या मन व कृतींवर नियंत्रण होय.''

२) **जॉर्ज श्वेत्झनबर्जरच्या मतानुसार,**

''आपली इच्छा इतरांवर थोपवण्यासाठी आणि इतरांनी विरोध केला तर तो विरोध मोडून इच्छा लादण्याची परिणामकारक शक्ती म्हणजे सत्ता होय.''

३) **लॉसवेल आणि अब्राहम यांच्या मते,**

''निर्णय प्रक्रियेतील सहभाग म्हणजे राष्ट्रसत्ता होय.''

४) **ऑर्गेस्कीच्या मते,**

''आपल्या हितसंबंधाच्या संरक्षणासाठी दुसऱ्या राष्ट्राच्या व्यवहाराला प्रभावित करण्याची क्षमता म्हणजे राष्ट्रीय शक्ती होय.''

**५) फेडलफोर्ड आणि लिंकन यांच्या मते,**

''आर्थिक, मानसिक, नैतिक, लष्करी आणि राजकीय घटकापासून बनलेले आणि राष्ट्रहिताच्या संवर्धनासाठी यशस्वीपणे वापरले जाणारे राष्ट्राचे सामर्थ्य म्हणजे राष्ट्रशक्ती होय.''

वरील व्याख्यांचा आशय लक्षात घेता आधुनिक राज्यव्यवस्थेत सत्ता ही संकल्पना महत्त्वाची आहे. एका राष्ट्राने किंवा व्यक्तीने दुसऱ्या राष्ट्रावर अथवा व्यक्तीवर नियंत्रण ठेवणे व आपल्या इच्छेप्रमाणे व्यवहार करण्यास प्रवृत्त करणे किंवा दुसऱ्या राष्ट्रास मनाप्रमाणे व्यवहार करण्यापासून रोखण्याची एका राष्ट्रची योग्यता म्हणजे 'राष्ट्रीय सत्ता' होय.

### २.२.२ राष्ट्रसत्तेचे घटक :

राष्ट्रीय सत्तेचा, सामर्थ्याचा आंतरराष्ट्रीय राजकारणावर परिणाम होत असतो. प्रत्येक राष्ट्राजवळ कमी-अधिक प्रमाणात सत्ता असते. राष्ट्राची सत्ता ज्या घटकामुळे निश्चित होते त्याला राष्ट्रसत्तेचे घटक असे म्हणतात. यातील काही घटक मूर्त स्वरूपात दिसतात तर काही अमूर्त असतात. तसेच काही स्थायी तर काही अस्थायी असतात अशा सर्वच घटकांची मिळून राष्ट्रसत्ता निर्धारित होते असते. सत्ता ही आंतरराष्ट्रीय राजकारणाची मध्यवर्ती संकल्पना आहे. जगातील सर्व संघर्ष सत्तेसाठीच चाललेले असतात. त्यामुळे प्रत्येक राष्ट्र आपली शक्ती अथवा सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न करीत असते. त्यामुळे हे सामर्थ्य अथवा शक्ती ज्या घटकावर अवलंबून असते त्या राष्ट्रसत्तेच्या घटकांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे-

### २.२.२.१ अ) स्थायी घटक - :

१) भौगोलिक घटक - यामध्ये नकाशे, सीमा, हवामान, आकार, स्थिती अथवा स्थान, स्थलाकृती इ.

२) लोकसंख्या

३) नैसर्गिक साधनसंपत्ती

**ब) अस्थायी घटक - :**

१) तंत्रज्ञान २) विचारधारा ३) नेतृत्व ४) जनतेचे मनोबल किंवा मनोधैर्य

### अ-१ भौगोलिक घटक :

भूगोल हा एखाद्या देशाशी सत्ता निर्माण करणारा अथवा सबल करणारा अत्यंत महत्त्वाचा घटक होय. देशाचे परराष्ट्र धोरण त्याचा भूगोल ठरवितो असे नेपोलियनने म्हटले आहे. राज्यशास्त्रासंदर्भातील भूगोलाच्या अभ्यासाला भूराज्यशास्त्र असे म्हणतात. मॅकिंडर, स्पाईकमन, रूडॉल्फ जेलेन यांनी या पद्धतीचा अभ्यास केला. प्रत्येक देशाच्या अंतर्गत व बाह्य राजकारणावर त्या देशाच्या भौगोलिक स्थितीचा परिणाम होत असतो. कोणत्याही देशाच्या परराष्ट्र धोरणातील इतर घटक बदलू शकतात

परंतु देशाला लाभलेली भूमी बदलू शकत नाही म्हणून भौगोलिक घटकांचा राष्ट्राच्या सत्तेवर व सामर्थ्यावर निश्चित परिणाम होत असतो. या घटकाला पुढील घटक समाविष्ट होतात.

**अ) नकाशे (Maps) :**

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासासाठी विविध प्रकारचे नकाशे अत्यंत उपयुक्त ठरतात. नकाशाच्या माध्यमातून एकूण क्षेत्रफळ, लोकसंख्या, नैसर्गिक साधनसंपत्ती, खनिज द्रव्यांचे साठे, त्या देशातील महत्त्वाची ठिकाणे, युद्धस्थळे इत्यादींचा तुलनात्मक अभ्यास करता येतो. या नकाशांचा उपयोग शेजारी राष्ट्रांशी निर्माण झालेले सीमावाद सोडविण्यासाठी करण्यात येतो. युद्धकाळात तर नकाशांना फारच महत्त्व प्राप्त होते. कारण त्याद्वारे शत्रूंची स्थळे, त्यांच्या हालचाली यांचे सखोल ज्ञान प्राप्त होते. काही देश तर स्वतःच्या देशाचे नकाशे नवीन पद्धतीने तयार करून त्यात आपल्या जवळच्या राष्ट्राचा भाग आपला म्हणून दाखवितात. उदा.- चीन व पाकिस्तान. चीनने भारताचा बराच भाग व स्थळे आपल्या नकाशात दाखविला आहे. तर पाकिस्तानने काश्मीरचा काही भाग आपल्या नकाशात दाखविला आहे. याच कारणामुळे चीन व पाकिस्तानबरोबर भारताचा संघर्ष सुरू आहे. एकंदरीला नकाशा हा भौगोलिक घटकातील महत्त्वाचा घटक मानला जातो.

**ब) क्षेत्रफळ–आकार (Size) :**

राष्ट्रसत्तेचा दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे त्या देशाचे आकारमान होय. कोणत्याही देशाचा आकार, क्षेत्रफळ किंवा विस्तार त्या देशाची सत्ता किंवा शक्ती निर्धारित करतो. जगाच्या नकाशावरून नजर फिरविल्यास असे दिसते की काही राज्ये लहान तर काही राज्ये आकार विस्ताराने खूप मोठी असलेली दिसतात. सर्वात लहान राज्य व्हॅटीकन सीटी तर सर्वात मोठे रशिया हे आहे. देशाचे क्षेत्रफळ मोठे, जमीन सुपीक असेल तर त्या राष्ट्राची शक्ती नेहमी वाढत राहते. मोठा भूप्रदेश लाभलेल्या देशात जास्त लोकसंख्या राहू शकते शिवाय युद्धप्रसंगी शत्रू अशा देशावर कब्जा करू शकत नाही. रशिया, चीन, कॅनडा यांचा आकार मोठा असल्याने त्यांना इतर राज्ये जिंकू शकत नाहीत. आपल्या मोठ्या आकारामुळेच रशिया नेपोलियन व हिटलरचा पराभव करू शकला. मोठ्या देशाचा काही भाग शत्रू राष्टाने जिंकला तरी त्यावरचा ताबा फार काळ ठेवू शकत नाही. उदा. जपानने अनेक वेळा चीनचा प्रदेश जिंकला परंतु नंतर त्याला तो भाग सोडून द्यावा लागला. याउलट आकाराने लहान असलेल्या उदा. सोमालिया, बल्गेरिया, बेल्जियम, झेकोस्लाव्हिया, व ग्रीस या राज्यांना अनेक वेळा पराभव स्वीकारावा लागला.

अर्थात आकार व क्षेत्रफळाच्या संदर्भात काही राज्ये अपवाद आहेत उदा. इंग्लंड व जपान यांचा आकार लहान असूनही त्यांचे फारसे नुकसान झालेले नाही. उलट आकार मोठा असून, तेथील जमीन सुपीक नसली, तेथे खनिज संपत्तीचा अभाव असला तर त्या ठिकाणी औद्योगिक प्रगती होऊ शकत नाही. एकंदरीत देशाचा आकार हा संरक्षण व आक्रमणात्मक युद्धासाठी उपयोगी ठरू शकतो परंतु

राष्ट्रीय सत्तेचे तेच एक निर्णायक तत्त्व ठरू शकत नाही कारण मोठ्या आकाराच्या देशांना सीमेचे संरक्षण व अंतर्गत सुरक्षा यावर खूप खर्च करावा लागतो. थोडक्यात आजच्या विज्ञान व तंत्रज्ञानामुळे लहान राष्ट्रांनासुद्धा आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्व प्राप्त झाले आहे. तरी आजही देशाचा आकार हा भौगोलिक घटकातील महत्त्वाचा घटक मानला जातो.

**क) हवामान (Climate) :**

कोणत्याही देशाच्या राष्ट्रसत्तेवर पर्यायाने त्या देशाच्या परराष्ट्र धोरणावर हवामानाचा मोठा परिणाम होत असतो. राष्ट्रसत्तेवर पर्यायाने त्या देशाच्या भौगोलिक स्थिती अथवा स्थानावर त्या देशाचे हवामान अवलंबून असते. देशाचे हवामान अती उष्ण किंवा अती थंड हवामान, रोगट व दमट हवामान तसेच सतत पाऊस असू नये. त्यामुळे त्या देशाच्या माणसांच्या कार्यशक्ती व उत्साहावर परिणाम करतात. त्यामुळे श्रम व शक्ती यांचा उत्पादन क्षेत्रात पूर्ण उपयोग होऊ शकत नाही. राष्ट्राचे उत्पादन घटते पर्यायाने त्याचा राष्ट्राच्या शक्तीवर विपरीत परिणाम होतो. याउलट समशीतोष्ण हवामान असणारे देश प्रगती करू शकतात. उत्साहवर्धक हवामानात लोक उत्साहाने काम करतात, त्यांची कार्यशक्ती, उद्योगशीलता वाढते. अती उष्ण हवामानात लोक वर्षभर श्रम करू शकत नाहीत. त्यांच्यात निरूत्साह व आळस निर्माण होतो. त्याचप्रमाणे अती थंड प्रदेशातील लोक फार काम करू शकत नाहीत कारण सतत बर्फ पडत असतो. देशाचे पर्जन्यमान, अक्षांश, वाऱ्याची दिशा यावरूनही हवामान ठरत असते. प्रचंड पाऊस व वाळवंट असलेले प्रदेश मानवी वस्तीला उपयोगी ठरत नाहीत.

हवामानाच्या परराष्ट्रधोरण व राष्ट्रशक्तीवर फार परिणाम होतो. अमेरिका, रशिया, जर्मनी, फ्रान्स, इटली या देशांच्या उत्तम हवामानामुळे त्यांची जागतिक प्रतिष्ठा वाढलेली दिसते. याच्याउलट दक्षिण व दक्षिण पूर्वेकडील देशांना पावसावर अवलंबून रहावे लागते. तसेच ह्या भागातील हवामान उष्ण आहे. उदा. भारत, इंडोनेशिया, मलाया इ. त्यामुळे या देशांची विशेष प्रगती झालेली नाही. हवामानाचा राष्ट्राच्या सामर्थ्यावर पर्यायाने परराष्ट्र धोरणावर सकारात्मक अथवा नकारात्मक परिणाम होत असतो. त्यामुळेच अलीकडील काळात राष्ट्रांना हवामानावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न करावे लागत आहेत.

**ड ) स्थिती किंवा स्थान (Location) :**

देशाच्या आकारापेक्षा महत्त्वाचे तत्त्व म्हणजे त्या देशाचे स्थान किंवा स्थिती होय. याचा राष्ट्राच्या सामर्थ्यावर परिणाम होत असतो. तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्त्व तसेच आर्थिक विकास व संरक्षण हे या घटकावर अवलंबून असते. भौगोलिक स्थानाचा परराष्ट्र धोरणाशी निकटचा संबंध आहे. इंग्लंड व जपान या देशांच्या विशिष्ट स्थानामुळे त्यांना जागतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. अमेरिका युरोप खंडापासून अटलांटिक महासागरामुळे पृथक झाली असल्यामुळे युरोपच्या राजकारणापासून स्वतंत्र राहू शकली व आज जागतिक महासत्ता म्हणून कार्यरत आहे. तसेच इंग्लंडसुद्धा युरोपिय देशापासून पृथक असल्यामुळे ते अडीच शतके सत्तासंतुलनाचे कार्य करू शकले. आल्पस पर्वतामुळे इटलीचे

अनेक वेळा रक्षण झाले आहे. याच पर्वतामुळे मध्यपूर्वेकडील देशाकडून इटलीवर क्वचितच आक्रमण झालेले दिसते. हाँगकाँग, माल्टा, एडन, सिंगापूर या बंदरांचा त्यांच्या विशिष्ट स्थितीमुळे विकास झाला आहे. आर्थिक व्यवस्थेशी देखील स्थितीचा संबंध असतो. उदा. मासेमारी, शिकार, पशुपालन, शेती इ. व्यवसाय राज्याच्या स्थितीवर अवलंबून असतात. आंतरराष्ट्रीय वायुमार्ग व जलमार्ग विकसित झालेल्या मार्गावरील राज्यांचा विकास होतो. भारताच्या बाबतीत उत्तरेस हिमालय, दक्षिणेस हिंदी महासागर, पश्चिमेस अरबी समुद्र व पूर्वेस बंगालचा उपसागर या नैसर्गिक स्थानामुळे भारताचे संरक्षण झालेले आहे. त्याचप्रमाणे स्वित्झर्लंड, नॉर्वे व स्वीडन ही राष्ट्रे आपल्या विशिष्ट भौगोलिक स्थानामुळे युरोपच्या राजकारणापासून स्वतंत्र राहिलेली आढळतात. थोडक्यात राष्ट्राची भौगोलिक स्थिती किंवा स्थान राष्ट्राचे सामर्थ्य प्रभावित करीत असते.

**इ ) स्थलाकृती (Topography) :**

नैसर्गिक सीमा असलेल्या राज्यास आक्रमणापासून बचाव करता येतो. सीमेवरील मोठेमोठे पर्वत राज्याचे रक्षण करीत असतात. त्याचप्रमाणे राज्यात वाहणाऱ्या नद्या तसेच समुद्र यांचाही संरक्षणासाठी उपयोग होतो. युरोपीय राज्यांची स्थलाकृती उत्तम असल्यामुळे तेथे चांगली बंदरे निर्माण झाली आहेत. या बंदरांमुळे उर्वरीत जगाशी संपर्क येऊन विकास करता येतो. याउलट आफ्रिकेला उत्तम स्थलाकृतीच्या अभावी विकास करता आलेला नाही. मोठमोठ्या नद्यामुळे सर्वदूर स्वस्तात वाहतूक होऊ शकते. व व्यापार व्यवसाय वाढू शकतो. उत्तम स्थलाकृतीमुळे भरपूर पाऊस पडतो. हवा चांगली राहते व त्यामुळे राज्याच्या आर्थिक व सांस्कृतिक विकासाला चालना मिळते. उत्तर व्हिएतनाम व द. व्हिएतनाम संघर्षात उत्तर व्हिएतनामध्ये दाट जंगल असल्यामुळे व्हिएटकाँग सैन्याला गमिनी काव्याने द. व्हिएतनामशी लढता आले. अमेरिकेने हे जंगल बाँब टाकून नष्ट करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांना त्यात यश आले नाही. त्याचप्रमाणे शेकडो वर्षापासून उत्तरेकडे हिमालय, दक्षिणेकडे समुद्र अशा वैशिष्ट्यपूर्ण स्थलाकृतीमुळे भारताचे रक्षण झाले आहे.

**फ ) सीमा (Boundaries) :**

देशाच्या सीमा नैसर्गिक अथवा कृत्रिमही असतात. समुद्रकिनारा, पर्वत, नद्या ह्या त्या देशाच्या नैसर्गिक सीमा ठरतात. त्याचप्रमाणे काही देशाच्या सीमा कृत्रिमरित्या आखलेल्या असतात. त्यांच्या सीमारेषात बदल होऊ शकतो. उदा. जर्मनी व फ्रान्स यांच्या सीमा कृत्रिम असल्याने त्यांच्यात अनेक वेळा युद्धे झालेली आहेत. तसेच जर्मनी व ऑस्ट्रिया, चीन व भारत, चीन व रशिया, भारत व पाकिस्तान, अरब-इस्त्राइल, इराण व इराक यांच्यामध्ये सीमा संघर्ष चालू असतात. म्हणूनच सीमा ह्या नैसर्गिक असतील तर शेजारील राष्ट्राबरोबर शांतता प्रस्थापित करायला, संरक्षणावरील खर्च कमी करायला मदत होते. परंतु सीमेवरून संघर्ष असेल तर असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होते.

राष्ट्रसत्तेचा घटक म्हणून आज भौगोलिक घटकाचे महत्त्व कमी झाले आहे असे वाटते. आज

विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात राष्ट्रसत्तेचा घटक म्हणून भौगोलिक स्थितीचे महत्त्वकमी होत आहे. आकार, स्थलाकृती, स्थिती या घटकांना विज्ञानाच्या युगात फारसे महत्त्व राहिले नाही असे समजले जाते. आकाराने लहान असणारी राष्ट्रे उदा. जपान, इंग्लंड यांनी आपले उत्तम आरमार, कुटनीती, सुयोग्य नेतृत्व यांच्या जीवावर आपली प्रगती केलेली आहे. ब्रिटनने तर अर्ध्या जगावर आपले साम्राज्य प्रस्थापित केले. भौगोलिक घटकांचे महत्त्व आज कमी झाले असले तरी उत्तम भौगोलिक स्थितीच्या राज्यास निश्चित लाभ होत असतो. म्हणून भौगोलिक स्थितीचे महत्त्व आजही आहे हे मान्य करावे लागेल.

**भूराज्यशास्त्राचे विज्ञान (Science of Geo-politics) :**

आधुनिक काळात 'भूराजनीती'(Geo-politics) ही नवी अभ्यासशाखा उदयाला आली आहे. देशाच्या भौगोलिक स्थितीचा राजकारणावर परिणाम होतो तसेच त्या देशाच्या परराष्ट्र धोरणावरही परिणाम होत असतो. भूगोलाचा राजकारणावर होणारा परिणाम लक्षात घेऊन अनेक विचारवंतांनी भूराज्यशास्त्राची निर्मिती केली आहे. मॅकिंडर, कार्ल हौशफर व रॅटझेल, स्पाईकमन, रुडाल्फ जेलेन इत्यादींचा उल्लेख भूराज्यशास्त्रज्ञ म्हणून करता येतो.

मॅकिंडर ह्या लेखकाने 'Heart Land Theory' हा सिद्धांत मांडला. हार्ट लँडचा थोडक्यात अर्थ असा कि, होलगा नदी, आर्क्टिक समुद्र, यांगत्सी नदी व हिमालय हे जगाला भौगोलिक दृष्ट्या व राजकीय दृष्ट्या नियंत्रित करू शकतात. जी राज्ये पूर्व युरोपावर नियंत्रण ठेवू शकतील तीच हार्ट लँड नियंत्रित करू शकतात. म्हणूनच जर्मनी व रशिया मिळून हार्ट लँडला म्हणजेच जगाला नियंत्रित करू शकतात. भारताच्या भौगोलिक स्थानाचा विचार करून मकिंडर यांनी असे म्हटले आहे की, 'भारत हा पृथ्वीवरील मोठा नैसर्गिक किल्ला आहे.'

या सिद्धांतानुसार हिटलरच्या नाझी राजवटीत म्युनिक येथे एक 'भूराज्यशास्त्र संस्था' स्थापन केली. हौशफर च्या नेतृत्वाखाली जर्मनीच्या विस्ताराच्या व विजयाचा एक फार मोठा आराखडा तयार करण्यात आला होता. एकंदरीत भूगोलाचा राजकारणावर व परराष्ट्र धोरणावर फार मोठा प्रभाव या सिद्धांतातून स्पष्ट होतो.

**अ) २) लोकसंख्या (Population) :**

देशाची लोकसंख्या हा राष्ट्रसत्तेचा आधार मानला जातो. पूर्वी जास्त लोकसंख्येवरून राष्ट्राचे सामर्थ्य ठरायचे. मात्र लोकसंख्येचे प्रमाण किती असावे हे निश्चित करता येत नसले तरी संख्यात्मक व गुणात्मक दृष्ट्या त्याचे निश्चित महत्त्व आहे. प्राचीन काळी प्लेटोने ५०४० तर ॲरिस्टॉटलने १०,००० लोकसंख्या आदर्श राज्यासाठी असावी असे मत व्यक्त केले आहे. राष्ट्राचे चारित्र्य, राष्ट्रीय नीतिमत्ता आणि शासनाचा दर्जा या घटकावर लोकसंख्येचे गुणात्मक मुल्यमापन अवलंबून असते.

जास्त लोकसंख्येमुळे देश शक्तीशाली बनतो म्हणून त्याचे समर्थन केले जाते. शेती, उद्योग,

व्यापार, सेवाक्षेत्रे, लष्कर, विमानदल, नौदल यामध्ये काम करण्यासाठी लोकांची गरज असते. यातून राष्ट्राची शक्ती वाढते. जादा लोकसंख्येमुळे देशातील मालाला स्वतःची बाजारपेठ उपलब्ध होते. शत्रूला सहजासहजी राज्य जिंकता येत नाही. लोकसंख्येमध्ये स्त्री-पुरुषांचे प्रमाण योग्य असले पाहिजे. १८ ते ४५ वयोगटातील लोक जास्त असले पाहिजेत त्यांचा सैन्य व उद्योगधंद्यासाठी उपयोग होतो. अर्थात राष्ट्राची लोकसंख्या केवळ संख्येने जास्त असून चालणार नाही तर तेथील जनता कष्टाळू, कार्यक्षम व चारित्र्यसंपन्न असावी. तशी ती नसेल तर ते राष्ट्र प्रगती करू शकत नाही. अशा अतिरिक्त लोकसंख्येमुळे अन्नधान्य, बेरोजगारी, दारिद्र्य, निरक्षरता, कुपोषण, उपासमार इत्यादी समस्या निर्माण होणे, विषमता वाढणे, राहणीमानाचा दर्जा खालावतो, समाजात गुन्हेगारी वाढते या सर्वांचा परिणाम राष्ट्राच्या सामर्थ्यावर होतो.

राज्याची कमी लोकसंख्या असल्यास राष्ट्राच्या शक्तीवर त्याचा परिणाम होतो. विविध क्षेत्रामध्ये काम करण्यासाठी मनुष्यबळ कमी पड़ते. अमेरिकेची विशाल व सुपीक जमीन कसण्यासाठी मनुष्यबळ कमी पडू लागल्यानंतर अफ्रिकन निग्रो लोकांना आणून कामाला लावले. इंग्लंडचा वसाहतवाद अशा लोकाच्या श्रमावरच पोसला होता. औद्योगिक उत्पादनासाठीही श्रमिक लोकांची आवश्यकता असते. जगातील प्रत्येक देशाची लोकसंख्या वाढते अथवा कमी होत असते. काही देशात ती स्थिर असते. उदा. भारत, पाकिस्तान, बांगला देश यासारख्या आशियातील देशांची लोकसंख्या वाढत असल्याचे दिसते तर रशिया, जर्मनी, फ्रान्स या पाश्चिमात्य देशात ती घटत चाललेली दिसते. जपानची लोकसंख्या भारत व चीनच्या तुलनेत कमी आहे पण जपानचा समावेश जगातील पहिल्या पाच श्रीमंत राष्ट्राच्या यादीत झाला आहे. जपानी माणूस कष्टाळू, कार्यक्षम व देशभक्त म्हणून ओळखला जातो.

सारांश कोणत्याही देशाची लोकसंख्या फार कमी किंवा फार जास्त नसावी. लोकसंख्या ही गुणवत्तेवर आधारलेली असावी शिक्षण, मनोधैर्य, विचार, चारित्र्य, शिक्षण इ. ने संपन्न असावी. जनता आधुनिकीकरण, यांत्रिकता, संगणक, भौतिकवादी, वैज्ञानिक दृष्टिकोण बाळगणारी असावी. वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन इ. साधनांचा वापर लोकांनी कुशलतेने करावा.रूढी, जुन्या चालीरिती अंधश्रद्धा, वाईट सवयी इ. त्याग करून आदर्श लोकसंख्या देशाची प्रगती पर्यायाने राष्ट्रशक्ती वाढवत असते.

**३) नैसर्गिक साधनसंपत्ती (Natural Resources) :**

राष्ट्रसत्तेत वाढ करणारा एक महत्त्वाचा घटक म्हणजे नैसर्गिक साधनसंपत्ती होय. नैसर्गिक संपत्ती हा राष्ट्रसत्तेचा स्थिर घटक आहे. नैसर्गिक संपत्ती ही कायम स्वरूपात असते. आणि राष्ट्राच्या औद्योगिक विकासासाठी ती आवश्यक असते. नैसर्गिक साधनसंपत्ती, अन्नधान्य व खनिज द्रव्ये यांच्या उपलब्धतेवर त्या राष्ट्राचे सामर्थ्य ठरत असते.

मॉर्गेन्था यांच्या मते नैसर्गिक साधने दोन प्रकारची असतात १) अन्नधान्य २) कच्चा माल.

पामर आणि पर्किन्स यांनी नैसर्गिक साधनांची विभागणी चार भागात केली आहे. १) कच्चा माल

२) खनिज पदार्थ ३) औद्योगिक शक्तीची साधने ४) अन्नधान्य व कृषी उत्पादन. ढोबळमानाने आपण अन्नधान्य व खनिज द्रव्यांचा विचार करणार आहोत.

**अ) अन्नधान्य (Food Stuffs) :**

प्रत्येक देशाने आपल्या लोकसंख्येला पुरेल अशा पुरेशा प्रमाणात अन्नधान्य उत्पादन केले तरच तो देश सर्व क्षेत्रात प्रगती करू शकतो. अन्नधान्याच्या बाबतीत जो देश समृद्ध असतो त्याचे राष्ट्रीय सामर्थ्य आपोआपच वाढते. अन्नधान्याचे उत्पादन जर पुरेशा प्रमाणात राष्ट्र करू शकले नाही तर त्याला बाहेरील देशाकडून आयात करावे लागते. त्याचे परावलंबित्व वाढते. राष्ट्रीय उत्पन्न कमी होऊन राष्ट्रशक्ती कमी होते. आज अमेरिका, अर्जेंटिना, कॅनडा, जपान, ऑस्ट्रेलिया हे देश अन्नधान्याच्या बाबतीत आघाडीवर आहेत. अमेरिका आज इतर राष्ट्रांना अन्नधान्याचा पुरवठा करते परंतु त्याचबरोबर काही नियंत्रणेही लादते. भारतात अन्नधान्य टंचाई होती आता नाही. मॉर्गेन्थॉ यांनी भारताच्या अन्नधान्याच्या परावलंबित्वास 'परराष्ट्र धोरणातील कायमचा दुबळेपणा' असे म्हटले होते. अलिकडील काळात भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करीत आहे. इंग्लंडला अन्नधान्याच्या बाबतीत कायमच परावलंबित्वाला तोंड द्यावे लागते. इंग्लंड आपल्या एकूण गरजेच्या ३०% च धान्य उत्पादित करतो. अन्नधान्याच्या बाबतीत परावलंबी असणाऱ्या देशाच्या राष्ट्राच्या शक्तीवर मर्यादा येते. प्रसंगी अन्नधान्याच्या टंचाईमुळे देशात क्रांती होऊ शकते किंवा त्याला गुलामगिरी स्वीकारावी लागते. युद्ध काळात तर अन्नधान्याची आवश्यकता फार असते म्हणूनच अन्नधान्य महत्त्वाचा घटक ठरतो.

**ब) खनिजद्रव्ये (Minerals) :**

राष्ट्राच्या विकासासाठी खनिजद्रव्ये आवश्यक असतात. ती राष्ट्राच्या शक्तीमध्ये भर घालतात. ज्या देशाकडे नैसर्गिक साधनसंपत्ती विपुल प्रमाणात असते ते देश सामर्थ्यवान बनतात. आज अमेरिका व रशिया याबाबतीत स्वयंपूर्ण आहेत. अत्यंत महत्त्वाच्या २७ खनिजद्रव्यापैकी पंधरा अमेरिकेत तर तेरा रशियात आहेत त्यामुळेच या दोन राष्ट्रांनी प्रचंड प्रगती करून महासत्ता म्हणून मान्यता मिळविली. याउलट नैसर्गिक साधनांच्या अभावी काही राज्यांना इतर राज्यांवर अवलंबून राहावे लागते. उदा. भारताला पेट्रोलसाठी अरब राष्ट्रावर अवलंबून राहावे लागत आहे. आज भारताला तेलासाठी करोडो रुपये खर्च करावे लागतात. त्यामुळेच आज अरब राष्ट्रे शक्तीशाली बनली आहेत. नैसर्गिक साधनसंपत्तीचा पूर्णपणे वापर केल्यास ते राष्ट्र औद्योगिक दृष्ट्या प्रगत होते. औद्योगिककरणासाठी कच्च्या मालाचे उत्पादन व त्यावर प्रक्रिया करून पक्का माल तयार करण्यासाठी कच्च्या मालाचे उत्पादन व त्यावर प्रक्रिया करून पक्का माल तयार करण्यासाठी कोळसा, लोह, खनिज, ॲल्युमिनिअम, बॉक्साईट, अभ्रक, तांबे, जस्त, मँगेनीज, चुनखडी, शिसे, सोने, युरेनियम, गंधक, नैसर्गिक वायू इ. खनिजद्रव्ये राष्ट्राकडे असतील तर त्या राष्ट्राची शक्ती प्रचंड प्रमाणात वाढते. आज अमेरिका, इंग्लंड, रशिया, जपान, फ्रान्स, जर्मनी या राष्ट्रांनी आपल्या सत्ता निर्माण केल्या. इंग्लंडने तर साम्राज्य निर्माण केले.

अर्थात खनिजसंपत्तीची विपुलता हा दोष सुद्धा ठरतो. अनेकवेळा खनिजसंपत्तीची विपुलता असेल तर दुसऱ्या राष्ट्रांच्या वर्चस्वाला बळी पडावे लागते. अमेरिका पाश्चात्यांच्या नियंत्रणाखाली त्यामुळेच बराच काळ राहिली तर भारतास ब्रिटिशांचे वर्चस्व सहन करावे लागले तसेच तेलाच्या विपुलतेमुळेच इराण, इराक, सौदी अरेबियासारखी राष्ट्रे बड्या राष्ट्रांच्या राजकारणाला बळी पडत आहेत त्यालाच आपण तेलाची राजनीती म्हणतो. असे असले तरी केवळ नैसर्गिक साधनसंपत्ती असून उपयोगी नाही. त्या संपत्तीचा वापर करता आला पाहिजे. ते करण्यासाठी प्रगत तंत्रज्ञानाची, कुशल कामगार व भांडवलाची आवश्यकता असते. ब्राझीलमधील लोखंडाचे साठे अमेरिकेच्या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शोधून काढता आले हे विसरता येत नाही. त्यामुळे नैसर्गिक साधन संपत्ती राष्ट्राची शक्ती वाढविते अथवा कमी करते.

**स्वयं अध्ययन प्रश्न –१**

**अ) स्थायी घटक : खालील प्रश्नांची एक दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

१. राष्ट्रीय सत्ता ही आंतरराष्ट्रीय राजकारणाची मध्यवर्ती संकल्पना आहे.

२. राष्ट्रीय सत्तेचा अर्थ स्पष्ट करा.

३. भू–राज्यशास्त्र (Geo-politics) म्हणजे काय ?

४. भारताच्या नैसर्गिक सीमा स्पष्ट करा.

५. आधुनिक काळात भौगोलिक घटकांचे महत्त्व का कमी झाले आहे ?

६. 'भारत हा पृथ्वीवरील मोठा नैसर्गिक किल्ला आहे' असे कोणी म्हटले आहे ?

७. भारताच्या अन्नधान्याच्या परावलंबत्वास परराष्ट्र धोरणातील कायमचा दुबळेपणा असे कोणी म्हटले आहे ?

८. आज अरब राष्ट्रे कशामुळे शक्तीशाली बनली आहेत ?

९. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासासाठी नकाशे कसे उपयुक्त ठरतात ?

१०. पाथर आणि पार्किन्स यांनी नैसर्गिक साधनांची कोणत्या चार भागात विभागणी केली आहे ?

२.२.२.१ **ब) अस्थायी घटक –** यामध्ये,

१) तंत्रज्ञान

२) विचारधारा

३) नेतृत्व

४) जनतेचे मनोबल किंवा मनोधैर्य या घटकांचा समावेश होतो.

### १) तंत्रज्ञान (Technology) :

तंत्रज्ञान ही एक व्यापक संकल्पना आहे. साधारपणपणे तंत्रज्ञान म्हणजे विशिष्ट ज्ञान. जीवनाच्या विविध क्षेत्रात कृषी, उद्योग, आरोग्य, प्रशासन, शिक्षण, दळणवळण, आर्थिक व्यवहार अशा अनेक क्षेत्राच्या विकासासाठी वापरण्यात आलेले संघटित वैज्ञानिक ज्ञान. एका अर्थाने विज्ञानाचे उपयोजन म्हणजे तंत्रज्ञान. तंत्रज्ञान हे राष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीचा मुख्य आधार आहे. आजच्या युगात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या महाक्रांतीमुळे जगाचा चेहरामोहराच बदललेला आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नवनवीन लागणाऱ्या शोधामुळे संपूर्ण मानवी जीवन बदलून टाकत शक्ती व सामर्थ्यामध्ये प्रचंड वाढ होत आहे. तंत्रज्ञानामुळे उत्पादन वाढते, आर्थिक विकास होतो, अर्थव्यवस्था मजबूत होते. युद्ध, अवकाश संशोधन, संगणक, दळणवळण या क्षेत्रातील तंत्रज्ञानात एखाद्या राष्ट्राने घडवून आणलेल्या प्रगतीवरून त्या राष्ट्राची सत्ता ठरवली जाते.

आधुनिक तंत्रविज्ञानामुळे युद्धतंत्रात आमुलाग्र बदल झालेला आहे. लष्करी तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे पाश्चात्य राष्ट्रांनी साम्राज्यवाद व वसाहती स्थापन केल्या. दुसऱ्या महायुद्धात आधुनिक शस्त्रास्त्रे व अणुनिर्मितीमुळे युद्धाचे स्वरूपच बदलले आहे. आज अण्वस्त्रामुळे जग नष्ट होण्याची भीती निर्माण झाली आहे. क्षेपणास्त्रे, अंतराळ यान, उपग्रहांची निर्मिती केल्यामुळे अमेरिका महासत्ता बनली आहे. भारतानेही चंद्रयान मोहीम यशस्वी करून अवकाश संशोधनात टाकलेले पाऊल महत्त्वाचे व देशाचे सामर्थ्य ठरविणारे आहे. अवकाश संशोधन, क्षेपणास्त्रे अणुचाचण्या, महासंगणक इ. क्षेत्रात भारताने उज्ज्वल कामगिरी केल्यामुळे भारताचे महत्त्व वाढत चालले आहे.

आज तंत्रज्ञानाच्या विकासामुळे दळणवळण अधिक सुलभ झाले आहे. जग अगदी लहान होत चालले आहे. आज रेडिओ, दूरदर्शन, विमान, बस वाहतूक, आगगाड्या, वायरलेस, दूरध्वनी, भ्रमणध्वनी, संगणक, इंटरनेट सुविधा ही प्रमुख दळणवळणाची व प्रचाराची प्रभावी साधने वापरली जाऊ लागली आहेत. या साधनामुळे राजदूतांच्या कार्यावरही परिणाम झाला आहे. राजदूत पूर्वी स्वतंत्र निर्णय घेत असत परंतु आज दळणवळणातील साधनांचा विकास झाल्यामुळे त्यांना आपल्या शासनाच्या आदेशाची वाट पहावी लागते. आज जगातील प्रमुख बड्या राष्ट्रांनी संहारक शस्त्रे निर्माण केल्यामुळे निशस्त्रीकरणावर भर दिला जात आहे. तसेच आज दोन राष्ट्रात किंवा विविध राष्ट्रात संपर्क साधने सहज शक्य झाल्यामुळे युद्ध टाळणे किंवा शांतता स्थापन करणे शक्य झाले आहे.

आज विज्ञान तंत्रज्ञानाच्या विकासामुळे नैसर्गिक साधन सामग्रीचा विकास करणे शक्य झाले आहे. केवळ नैसर्गिक साधन संपत्ती असून चालत नाही तर तिचा उपयोग करून राष्ट्रांच्या संपत्तीत प्रत्यक्ष रूपांतर करण्याची क्षमता असणारी राष्ट्रेच बलवान ठरतात. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या विकासाशिवाय राष्ट्राचे सामर्थ्य वाढू शकत नाही किंबहुना राष्ट्राचे भवितव्य तंत्रज्ञानाच्या विकासावरतीच अवलंबून असते.

## २) विचारधारा (Ideology) :

आंतरराष्ट्रीय संबंधात 'विचारधारा' हा शब्द सतत वापरला जातो. विचारधारा ही एक विश्वासाची पद्धती आहे. ती राजकीय किंवा अराजकीय स्वरूपाची असू शकते. विचारधारा प्रत्येक शतकात निर्माण होत असल्यातरी २०व्या शतकात विचारधारेला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. विचारधारा राष्ट्रास मनोबल पुरविते, विचारधारा नागरिकात एकता व शक्ती निर्माण करतात. साम्यवादी विचारधारेमुळे रशिया व चीन महाशक्ती बनल्या. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनी व इटली ही राष्ट्रे नाझी व फॅशिझम या विचारसरणीमुळेच शक्तीशाली बनली. ज्या देशात विविध विचारधारेचे लोक राहतात तेथे एकतेचा अभाव असतो ते राष्ट्र प्रगती करू शकत नाही. भारताने धर्मनिरपेक्षता स्वीकारल्यामुळे भारतात विविधतेत एकात्मता दिसून येते. विचारधारेमुळे राष्ट्र एकसंघ राहून आपला प्रभाव आंतरराष्ट्रीय राजकारणात निर्माण करू शकते. म्हणूनच विचारधारा हा राष्ट्रसत्तेचा महत्त्वाचा घटक मानला जातो.

विचारधारेचा माणसाच्या कार्यावर आणि विचारावर प्रभाव पडत असतो. मनुष्य आपल्या धार्मिक, सामाजिक आणि राजकीय विचारांच्या आधारावर काही आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो अशा आदर्शांनाच आधुनिक युगात विचारधारा असे म्हणतात. विचारधारेच्या आधारावरच राष्ट्राराष्ट्रात मतभेद आणि संघर्ष होतात.

व्याख्या - १) नॉर्मल पेडलफोर्ड आणि जॉर्ज लिंकन यांच्या मते, ''विचारप्रणाली म्हणजे आर्थिक, सामाजिक आणि राजकीय मूल्ये आणि उद्दिष्ट्ये यांच्याशी संबंधित अशा विचारांचा समूह की जो उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी कार्यात्मक योजना तयार करीत असतो.''

२) स्नायडर आणि विल्सन यांच्या मते, ''विचारधारा म्हणजे जीवन, समाज व शासनाशी संबंधित विचारांचा असा समूह की जो प्रामुख्याने सामाजिक, धार्मिक, आणि राजकीय घोषवाक्यांनी किंवा युद्धातील घोषवाक्यांनी निर्माण होतो. तसेच त्याचा सतत प्रयोग केल्याने तेथील समाजाचा किंवा राष्ट्राचा मुख्य विश्वासप्रिय सिद्धांत बनतो.''

३) स्ट्राईचर यांच्या मते ''विचारधारा व्यक्तींच्या अमूर्त विचाराची अशी व्यवस्था आहे की त्याद्वारे वास्तविकता आणि मूल्याधिष्ठित उद्दीष्ट्ये स्पष्ट होतात. तसेच त्यांच्या आधारावर निश्चित सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याचा किंवा ती कायम ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.''

थोडक्यात विचारधारांचा प्रभाव त्या त्या राष्ट्रातील लोकांच्या मनावर, कार्यक्षमतेवर व चारित्र्यावर पडत असतो. विचारधारेचे स्वरूप आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, नैतिक, भांडवलशाही, साम्राज्यवादी, समाजवादी, असू शकते. उदा. भांडवलशाही विरुद्ध साम्यवादी विचारसरणीने अमेरिका विरुद्ध रशिया संघर्षाचे रूपांतर जागतिक शीतयुद्धात झाले. या शीतयुद्धामुळे तिसरे महायुद्ध होते काय अशी भीती निर्माण झाली होती. दुसऱ्या महायुद्धानंतर तिसऱ्या जगातील नव्याने उदयाला आलेल्या राष्ट्रांनी विविध

विचारप्रणालींचा पुरस्कार केला. विचारप्रणालींच्या आधाराने साम्यवादी राष्ट्रे, लोकशाही राष्ट्रे, धर्माधिष्ठित राष्ट्रे असे गट निर्माण झाले. साम्यवाद, समाजवाद, उदारमतवादी लोकशाही, राष्ट्रवाद, वसाहतवाद व साम्राज्यवाद अशा प्रकारच्या विचारप्रणाली लोकांना प्रभावित करू लागल्या.

विचारप्रणालीत भेद हे आंतरराष्ट्रीय राजकारणातील संघर्षाचे प्रमुख उगमस्थान आहे. कारण राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष, तंटे शांततामय मार्गाने सोडविण्याच्या मार्गात अनेक प्रसंगी विचारधारा अडथळा निर्माण करतात. मॉर्गेन्था यांनी विचारधारेचे तीन प्रकार स्पष्ट केलेले आहेत. अ) यथास्थिती विचारधारा (Ideology of statusquo) ब) साम्राज्यवादी विचारधारा (Ideology of Imerialism) क) संदिग्ध किंवा अनिश्चित विचारधारा (Imbiguous Ideology)

यथास्थिती विचारधारा म्हणजे जैसे थे वादी विचारसरणी, अशी विचारधारा शक्तिमान राष्ट्रांनी स्वीकारलेली असते. कारण त्यांना बदलातून काहीही साध्य करायचे नसते. विकसनशील राष्ट्रांना प्रगतीसाठी स्थैर्य हवे असते म्हणून तेही याचा पुरस्कार करतात.

साम्राज्यवादी राष्ट्रांना विचारधारेची जास्त आवश्यकता असते. कारण विजेत्या राष्ट्रांना आपल्या आक्रमणाचे समर्थन करण्यासाठी विचारधारेचा आधार घेता येतो. ब्रिटनने वसाहतवाद व साम्राज्यवादाचे समर्थन 'व्हाईट मॅन्सबर्डन' 'गोऱ्या माणसाचे कर्तव्य' या गोंडस सिद्धांताखाली केले तसेच ब्रिटनने - 'National Mission' 'राष्ट्रीय कर्तव्य' 'Sacred trust' 'पवित्र विश्वास' अशी बिरूदावली त्यांनी लावली. अमेरिकेने फिलिपाईन्सवर विजय मिळविताना 'मानवतेच्या रक्षणासाठी' असे कारण दिले होते.

तिसरी विचारधारा म्हणजे संदिग्ध विचारधारा अशी विचारधारा संदिग्ध असते कारण ती दोन्ही अर्थांनी वापरली जाते. आक्रमणाकरीता आणि यथास्थिती रक्षणासाठी केला जातो. उदा. अमेरिकेने साम्यवाद रोखण्यासाठी आक्रमणे केली तर इंग्लंड सत्ता समतोलाचा विचार साम्राज्यवादी आक्रमणासाठी वापरला. वुड्रो विल्सन यांनी शस्त्रनियंत्रणाचे तत्त्व मांडले त्यामागेही संदिग्ध विचारसरणी होती. त्यामुळे वास्तव परिस्थिती लपविण्यासाठी किंवा राजकीय नेत्यांचे खरे हेतु गुप्त ठेवण्यासाठी विचारधारांचा आश्रय घेतला जातो.

अशा रीतीने विचारधारा एखाद्या देशाची सत्ता निर्माण करते व परराष्ट्र धोरणाला आकार देते. भिन्न विचारधारा असणाऱ्या राष्ट्रांनी जागतिक तणावांना जन्म दिला. आपल्या विचारधारेचे जगावर साम्राज्य निर्माण व्हावे असे प्रत्येक राष्ट्रांना वाटायला लागले तर जागतिक तणावांना अंतच राहणार नाही. विचारधारांना युद्धाचे माध्यम बनवायचे का? हे राष्ट्रांनी निश्चित केले पाहिजे परंतु क्विन्सी राईट सारख्या लेखकांना असे वाटते की, उदारमतवाद, मानवतावाद, व्यवहारवाद या विचारसरणी आज आधुनिक संस्कृतीच्या भाग बनत आहेत त्यातून एक सर्व संमत एक जागतिक विचारसरणी निर्माण झाली तर जगातील सर्व समस्या सुटून सत्ता नियंत्रित स्वरूपाची बनेल व राष्ट्राराष्ट्राप्रमाणेच अंतरराष्ट्रवाद ही विचारधारा जागतिक कल्याणासाठी उपयोगी पडेल.

### ३) नेतृत्व (Leadership) :

राष्ट्रीय शक्तीच्या घटकात नेतृत्वाला विशेष महत्त्व आहे. उत्तम नेतृत्वाच्या अभावी राष्ट्रसत्तेत वाढ होत नाही. राष्ट्राच्या सर्वांगिण प्रगतीसाठी योग्य नेतृत्व आवश्यक असते. नेतृत्वामुळे लोकांचे मनोबल वाढते. नेतृत्वामुळे राष्ट्राचे ऐक्य टिकून राहते. नेतृत्वाचे आदर्श गुण राष्ट्रास शक्तिशाली बनवितात. राष्टांचे अंतर्गत व परराष्ट्र धोरण नेतृत्व ठरवित असते. शांततेच्या काळात योग्य परराष्ट्र धोरण व राजनयाच्या माध्यमातून राष्ट्राचा सन्मान वाढविण्याचे कार्य नेतृत्वावर अवलंबून असते. युद्धकाळात तर नेतृत्वच राष्ट्राचे प्रतीक समजले जाते. युद्धातील विजय, पराभव नेतृत्वावर अवलंबून असतो. आजच्या सर्वस्पर्शी युद्धाच्या काळात नेतृत्वाची जबाबदारी वाढली आहे. अन्नधान्य, वाहतुक, संपर्क, आरोग्य, मनोधैर्य, सैन्यव्यवस्था ह्या सर्व क्षेत्रात कुशल नेतृत्वाची गरज असते. राजकीय नेतृत्वाबरोबरच इतर क्षेत्रातही योग्य नेतृत्वाची गरज असते. कुशल राजदूत, सैन्यातील पायदल, वायुदल, नाविकादलासाठी कार्यक्षम नेतृत्वाची गरज असते. औद्योगिक क्षेत्रात योग्य मजूर पुढारी, उत्तम वक्ते व शिक्षणतज्ञांचीही गरज असते.

राज्याची प्रगती, राज्याचे सामर्थ्य नेतृत्वाच्या दर्जावरून मोजले जाते. नेतृत्व म्हणजे नेते किंवा नेत्यांच्या गटाद्वारे उपलब्ध करून दिलेले असे साधन की ज्याद्वारे भौगोलिक व आर्थिक तत्त्वे, लोकसंख्या, तंत्रविकास, विचारधारा, मनोधैर्य या सर्व घटकांचा राष्ट्राच्या उद्देशपूर्तीसाठी योग्यपणे उपयोग करून घेतला जातो. राष्ट्रसत्तेच्या सर्व घटकांचे यशापयश नेतृत्वावर अवलंबून असते. राष्ट्रसत्तेचे सर्व घटक अस्तित्वात असूनही चांगले नेतृत्व नसेल तर ते कुचकामी ठरते. आपल्या भाषणातून लिखाणातून राष्ट्राला वेळोवेळी दिलेल्या संदेशातून नेतृत्वाने राष्ट्रीय मनोबल उंचावल्याचे आढळते. नेत्यांच्या प्रभावाने संकटकाळात राष्ट्रात चैतन्य निर्माण होते. उदा. भारत-चीन युद्धावेळी लाल बहादूर शास्त्रींनी दिलेल्या संदेशामुळे भारतीय जनतेचे मनोबल उंचावले होते. दुसऱ्या महायुद्धकाळात चर्चिल यांच्या दमदार राजकीय व सैनिकी नेतृत्वामुळे पराजयाच्या सीमेवरून विजयश्रीची माळ इंग्लंडला मिळाली. मेटरनिक व टेलीरॅड यांच्या राजकीय नेतृत्वामुळे ऑस्ट्रिया, फ्रान्सच्या राष्ट्रसत्तेत वाढ झाली होती. केमालपाशा यांच्या नेतृत्वामुळे तुर्कस्तानमध्ये राजकीय व सामाजिक क्रांती घडून आली. त्याचप्रमाणे नेपोलियन, हिटलर, मुसोलिनी, रुझवेल्ट, लेनिन, माओ-लो-तुंग, जोसेफ केनेडी, जनरल द गॉल, पं. नेहरू, इंदिरा गांधी यांनी देशास कुशल नेतृत्व दिले व आंतरराष्ट्रीय राजकारणात आपल्या राष्ट्रास प्रतिष्ठा मिळवून देण्याचे कार्य नेतृत्वाने केले.

### ४) जनतेचे मनोबल किंवा नीतिमत्ता (Morale) :

राष्ट्रातील जनतेचे मनोबल हा राष्ट्रीय सामर्थ्य आणि सत्तेच्या दृष्टीने महत्त्वाचा घटक आहे. राष्ट्रीय मनोबल म्हणजे राष्ट्राविषयी नागरिकांना वाटणारे नितांत प्रेम, राष्ट्रावरील त्यांची श्रद्धा, राष्ट्रासाठी स्वार्थत्याग

करण्याची, राष्ट्रासाठी परिश्रम घेण्याची त्यांची तयारी, प्रसंगी राष्ट्रासाठी प्राण देण्याची मानसिक तयारी, निर्धार ही एक अशी कार्यशक्ती आहे जी नागरिकांना राष्ट्रीय प्रगतीसाठी कार्यास प्रवृत्त करते. युद्ध व संकटकाळात ती राज्यव्यवस्थेच्या पाठीशी ठामपणे उभी राहते. अशा काळात धर्म, जात, भाषा अशी कृत्रीम बंधने बाजूला सारून राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडविते.

पामर आणि पर्किन्सच्या मते, ''मनोधैर्यामुळे स्त्री-पुरुष अधिक कार्य करून त्याग करण्यासाठी व संघर्षासाठी तयार होत असतात. मनोधैर्य त्यांचे व्यक्तिगत मतभेद दूर करून स्वेच्छेने राष्ट्रसेवा करण्यासाठी जास्तीत-जास्त बलिदान करण्यास त्यास प्रवृत्त करीत असते. त्यामुळे विजयाची पक्की खात्री तयार होते.''

मनोबल अथवा नीतिमत्तेचा विकास चारित्र्यामुळे होत असतो. मनोधैर्य हे राष्ट्रवादाचे महत्त्वाचे तत्त्व आहे. त्याला देशभक्ती किंवा राष्ट्रप्रेमाच्या नावाने देखील संबोधले जाते. युद्धकाळात मनोधैर्याची कसोटी लागते. मनोधैर्यामुळेच सैनिक दुसऱ्या राष्ट्रावर तुटून पडतात व विजयी होतात. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीचे आक्रमण परतवून लावताना रशिया व फ्रान्सच्या जनतेच्या मनोबलाचे यथार्थदर्शन साऱ्या जगाला झाले. तसेच भारत-पाक, भारत-चीन युद्धात भारतीय जनता एक दिलाने सरकारच्या पाठीशी उभी राहिलेली दिसते.

शांततेच्या काळातही मनोधैर्य आवश्यक असते. त्यामुळे स्वार्थी वृत्तीला तिलांजली दिली जाते. स्वार्थत्याग, परिश्रम यातून मोठी आर्थिक प्रगती देश आपल्या जनतेच्या मनोबलावरच करू शकते. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे जपानी जनता आज जपान पहिल्या पाच श्रीमंत राष्ट्रांपैकी एक आहे. हे जपानी जनतेच्या अपूर्व त्यागातून हे शक्य झाले आहे.

जनतेचे मनोबल देशातील नेतृत्वावर देखील अवलंबून आहे. राजकीय नेतृत्वाकडून जनतेचे मनोबल उंचावण्याचे प्रयत्न सातत्याने केले जातात त्यासाठी विचारसरणी, प्रचारतंत्राचा वापर केला जातो. राष्ट्रीय नेत्यांच्या व्यक्तिमत्त्वांनी व त्यांच्या प्रभावी भाषणांनी प्रभावित होऊन राष्ट्रासाठी प्राणाची आहुती देण्यास लोक तयार होतात.

**स्वयं अध्ययन प्रश्न -२**

१. आधुनिक तंत्रज्ञानामुळे युद्धतंत्रात अमुलाग्र बदल झाला आहे.

२. तंत्रज्ञानामुळे दळणवळणाच्या क्षेत्रात काय प्रगती झाली ?

३. तंत्रज्ञानामुळे राजदूतांच्या कार्यावर कोणता परिणाम झाला आहे ?

४. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे राष्ट्र कसे सामर्थ्यवान बनले ?

५. विचारधारा म्हणजे काय ?

६. मॉर्गेन्थॉ यांनी विचारधारेचे कोणते तीन प्रकार सांगितले आहेत ?

७. विचारधारांना जागतिक राजकारणात कसे महत्त्व प्राप्त होते ?

८. राष्ट्राची शक्ती निर्धारणातील नेतृत्त्वाची भूमिका सांगा.

९. आदर्श व चांगले नेतृत्त्व नसेल तर त्याचे दुष्परिणाम स्पष्ट करा.

१०. भारतातील आदर्श व प्रभावी नेतृत्त्वाची उदाहरणे सांगा.

११. राष्ट्रीय मनोबल म्हणजे काय ?

## २.३ सारांश :

आधुनिक आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रीय सत्ता ही मध्यवर्ती संकल्पना ठरली आहे. 'सत्ता' राजकारणातील मुलभूत घटक आहे. राष्ट्राचा उज्ज्वल भविष्यकाळ राष्ट्रीय सत्तेवर अवलंबून आहे. राष्ट्रीय सत्तेचा विचार प्लेटो, ॲरिस्टॉटल, कौटिल्य यासारख्या प्राचीन राजकीय विचारवंतांनीही केला होता. मध्ययुगात मॅकियाव्हेली, थॉमस हॉब्ज, हेगेल यांनी राष्ट्रसत्तेचा विचार केला होता. २०व्या शतकात मॉगेन्थॉ, हेरॉल्ड लॉसवेल, डाईक विचारवंतानी राष्ट्रीय सत्तेचा विचार केला आहे.

राष्ट्रीय सत्ता या घटकात आपण हॅन्स जे मॉर्गेन्थॉ, जॉर्ज श्वेत्झर्नबर्जर, लॉसवेल आणि अब्राहम, ऑग्रेस्की, फेडलफोर्ड आणि लिंकन यांच्या व्याख्या विचारात घेतल्या आहेत.

**राष्ट्रसत्तेचे घटक**

अ) स्थायी घटक - यामध्ये

१) भौगोलिक घटक - नकाशे, आकार किंवा विस्तार, हवामान, स्थिती किंवा स्थान, स्थलाकृती, सीमा इत्यादी.

२) लोकसंख्या - गुणदोष

३) नैसर्गिक साधनसंपत्ती अ) लोकसंख्या ब) खनिजद्रव्ये इ.

४) तंत्रज्ञान

ब) अस्थायी घटक - यामध्ये

१) विचारधारा

२) नेतृत्व

३) जनतेचे मनोबल किंवा मनोधैर्य

अशा प्रकारे राष्ट्रसत्तेच्या घटकांचा अभ्यास केल्यानंतर एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे की वरील घटकापैकी कोणत्याही एका घटकामुळे राष्ट्रसत्तेत वाढ होऊ शकत नाही तर त्यासाठी वरील सर्व

घटकात समन्वय व संतुलन प्रस्थापित करूनच राष्ट्रीय शक्तीत वाढ करता येते. राष्ट्रसत्तेच्या संदर्भात लक्षात ठेवण्याजोगी दुसरी गोष्ट म्हणजे सापेक्षता. याचा अर्थ एका राष्ट्राच्या शक्तीचा अभ्यास हा आंतरराष्ट्रीय राजकारणात भाग घेणाऱ्या दुसऱ्या राष्ट्राच्या संदर्भात केला पाहिजे. कारण राष्ट्राच्या शक्तीला कोणतीच सीमा नाही. राष्ट्रसत्तेच्या विविध घटकांचे महत्त्व परिस्थितीनुसार, काळानुसार बदलत असते हे परिवर्तन लक्षात घेऊनच त्याचा विचार केला पाहिजे.

## २.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

**सत्ता** : शक्ती

**भू-राज्यनीती** : भौगौलिक राजनीती (भूगोल आणि राज्यशास्त्र यांच्या सहयोगातून उदयास आलेली नवी अभ्यास शाखा)

**आकार** : विस्तार

**स्थिती** : स्थान

**सीमा** : मर्यादा, हद्द

**खनिज द्रव्य** : खाणीतील, भूगर्भातील खनिज धातु.

**तंत्रज्ञान** : औद्योगिक कलाशास्त्र, तंत्र विज्ञान

**विचारधारा** : विचारप्रणाली, विचारसरणी

**नेतृत्त्व** : पुढारीपणा.

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्न - १

**रिकाम्या जागा भरून खालील वाक्ये पूर्ण करा.**

१. ................ ही आंतरराष्ट्रीय राजकारणातील मध्यवर्ती कल्पना आहे.

२. ................ यांच्या मते, 'सत्ता म्हणजे एका माणसाचे दुसऱ्या माणसाच्या मन व कृतींवर नियंत्रण होय.'

३. राज्यशास्त्राच्या संदर्भात भूगोलाच्या अभ्यासाला ................ म्हणतात.

४. क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात लहान देश ................ व सर्वात मोठा देश ................ आहे.

५. 'भारत हा पृथ्वीवरील मोठा नैसर्गिक किल्ला आहे' असे ............. यांनी म्हटले आहे.

६. नैसर्गिक साधनसंपत्ती हा राष्ट्रसत्तेचा ................ घटक मानला जातो.

७. इंग्लंड हा देश आपल्या एकूण गरजेच्या ................ टक्के अन्नधान्य उत्पादित करतो.

८. अत्यंत महत्त्वाच्या २७ खनिज द्रव्यांपैकी अमेरिकेत ................ व रशियात ............... खनिज द्रव्ये सापडतात.

९. अरब राष्ट्रे ................ या नैसर्गिक साधनामुळे शक्तीशाली बनली आहेत.

१०. आधुनिक काळात ............... विकासामुळे भौगोलिक घटकांचे महत्त्व कमी झाले आहे.

११. ................ यांनी भारताच्या अन्नधान्याच्या परावलंबत्त्वास 'परराष्ट्र धोरणातील कायमचा दुबळेपणा' असे म्हटले आहे.

१२. ................ या विचारवंताने 'Heart Land Theory' हा सिद्धांत मांडला.

**२.५ स्वयं अध्ययन प्रश्न – २**

**रिकाम्या जागा भरून खालील वाक्ये पूर्ण करा.**

१. ................ विचारधारेमुळे रशिया व चीन महाशक्ती बनल्या.

२. ................ विचारधारा म्हणजे जैसे थे वादी विचारधारा होय.

३. ................ राष्ट्रांना विचारधारेची जास्त आवश्यकता असते.

४. लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा जगात ................ क्रमांक लागतो.

५. दुसऱ्या महायुद्धकाळात इंग्लंडला ................ यांचे कुशल नेतृत्त्व लाभले.

६. ................ यांच्या नेतृत्त्वामुळे तुर्कस्तानमध्ये राजकीय व सामाजिक क्रांती घडून आली.

७. ................ हे राष्ट्रवादाचे महत्त्वाचे तत्त्व आहे.

८. ब्रिटनने आपल्या वसाहतवाद व साम्राज्यवादाचे समर्थन ................ या गोंडस सिद्धांताखाली केले.

९. विज्ञानाचे उपयोजन म्हणजे ................ होय.

१०. भारताने ................ ही मोहिम यशस्वी करुन अवकाश संशोधनात महत्त्वाचे पाऊल टाकले.

११. प्लेटोने आदर्श राज्याची लोकसंख्या ................ असावी असे म्हटले आहे.

**२.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे – १**

**खालील प्रश्नांची एक–दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

१. आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रीय सत्ता ही मध्यवर्ती संकल्पना आहे. सत्ता ही राजकारणाचा

पाया आहे. राष्ट्रांच्या सर्व व्यवहारांचा तो केंद्रबिंदू आहे. सत्ता ही राष्ट्रीय संरक्षण व हितसंबंध जोपासण्याचे प्रमुख साधन आहे.

२. आपल्या राष्ट्राच्या हितसंबंधाच्या संरक्षणासाठी दुसऱ्या राष्ट्रांवर नियंत्रण ठेवणे व आपल्या इच्छेप्रमाणे दुसऱ्या राष्ट्रास व्यवहार करण्यास परावृत्त करणे किंवा दुसऱ्या राष्ट्रास त्याच्या मनाप्रमाणे व्यवहार करण्यापासून रोखण्याची एका राष्ट्राची योग्यता म्हणजे 'राष्ट्रीय सत्ता' होय.

३. आधुनिक काळात भूराजनिती ही नवी अभ्यास शाखा उदयास आली आहे. राज्यशास्त्राच्या संदर्भातील भूगोलाच्या अभ्यासाला भू-राज्यशास्त्र असे म्हणतात.

४. भारताला उत्तरेस हिमालय पर्वत, पश्चिमेला अरबी समुद्र, दक्षिणेला हिंदी महासागर व पूर्वेला बंगालचा उपसागर अशा नैसर्गिक सीमा लाभल्या आहेत.

५. आधुनिक काळात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासामुळे राष्ट्रसत्तेचा घटक म्हणून काही भौगोलिक घटकांचे महत्त्व कमी झाले आहे.

६. 'भारत हा पृथ्वीवरील मोठा नैसर्गिक किल्ला आहे.' असे जर्मन विचारवंत मॅकिंडर यांनी म्हटले आहे.

७. भारताच्या अन्नधान्याच्या परावलंबत्वास 'परराष्ट्र धोरणातील कायमचा दुबळेपणा' असे हॅन्स जे. मॉर्गेन्थॉ यांनी म्हटले आहे.

८. आज अरब राष्ट्रे पेट्रोलच्या उत्पादनामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात शक्तीशाली बनली आहेत. खनिज तेलाच्या या उत्पादनामुळे अरब-राष्ट्रे प्रभावी बनली आहेत. त्यालाच आपण तेलाचा राजनय असे म्हणतो.

९. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासासाठी नकाशे अत्यंत उपयुक्त ठरतात. नकाशामुळे एखाद्या राष्ट्राचे क्षेत्रफळ, लोकसंख्या, नैसर्गिक साधनसंपत्ती, त्या देशातील महत्त्वाची व मोक्याची ठिकाणे, युद्धस्थळे इत्यादींचा तुलनात्मक अभ्यास करता येतो.

१०. पामर आणि पर्किन्स यांनी नैसर्गिक साधनांची १. कच्चा माल २. खनिज पदार्थ ३ . औद्योगिक शक्तीची साधने ४. अन्नधान्य व कृषी उत्पादन या चार भागात विभागणी केली आहे.

**रिकाम्या जागा भरून खालील वाक्ये पूर्ण करा.**

१. राष्ट्रीय सत्ता २. मॉर्गेन्थॉ ३. भूराजनीती ४. व्हॅटिकन सिटी, रशिया

५. मॅकिंडर ६. स्थायी घटक ७. ३० ८. १५, १३

९. पेट्रोल १०. विज्ञान व तंत्रज्ञान ११. मॉर्गेन्थॉ १२. मॅकिंडर

**स्वयं अध्ययन प्रश्न – २**

**खालील प्रश्नांची एक–दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

१. आधुनिक काळात नवनवीन शस्त्रास्त्रे व अण्वस्त्रामुळे युद्धाचे स्वरूपच बदलुन गेले आहे. आज संपूर्ण जग नष्ट करण्याची शक्ती अणुबाँबच्या निर्मितीमुळे काही राष्ट्रांनी साध्य केलेली आहे. आधुनिक तंत्र–विज्ञानामुळे युद्ध तंत्रात अमुलाग्र बदल झालेला आहे.

२. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासामुळे दळणवळणाच्या साधनात प्रचंड प्रमाणात विकास झालेला आहे. रेडिओ, दूरदर्शन, रेल्वे, बस वाहतुक, वायरलेस, विमाने, दूरध्वनी, मोबाईल, इंटरनेट ही दळणवळणाची साधने प्रभावीपणे वापरली जात आहेत.

३. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे परराष्ट्रधोरण निर्धारणातील पारंपरिक दुवा म्हणजे राजदूत होय. राजदूतांच्या कार्यावर याचा परिणाम झाला आहे. राजदूतांना पूर्वी स्वतंत्र निर्णय घेता येत परंतु आज दळणवळणाच्या सुविधामुळे त्यांना आपल्या शासनाच्या आदेशाची वाट पहावी लागते.

४. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे नैसर्गिक साधनांचा विकास करणे शक्य झाले आहे. त्यामुळे प्रत्येक राष्ट्राला तंत्रज्ञानाच्या विकासावर भर देणे आवश्यक झाले आहे. कृषी औद्योगिक विकास त्यावरच अवलंबुन आहे. तंत्रज्ञानाच्या विकासावरच राष्ट्र सामर्थ्यवान बनते.

५. विचारधारा एक विश्वासाची पद्धती आहे. ऐतिहासिक प्रेरणामूल्ये, परंपरा, नैतिक, धार्मिक विचार इ. च्या माध्यमातून विचारधारा घडत असते. विचारधारेच्या आधारावर भक्कम समाजव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो.

६. मॉर्गेन्थॉ यांनी १. यथास्थिती विचारप्रणाली २. साम्राज्यवादी विचारप्रणाली ३. संदिग्ध किंवा अस्पष्ट विचारप्रणाली असे तीन प्रकार सांगितले आहेत.

७. कोणत्याही विचारप्रणालीला राष्ट्रीय सत्तेचे पाठबळ असते. त्यामुळे साहजिकच विचारप्रणालींना आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्व प्राप्त होत असते. सत्तेचे पाठबळ नसेल तर विचारप्रणाली ही कल्पना म्हणून अस्तित्वात राहते.

८. नेतृत्त्वामुळे जनतेचे मनोबल वाढते. नेतृत्त्वामुळे राष्ट्रीय ऐक्य व एकात्मता निर्माण होते. प्रभावी, आकर्षक व वलयांकित नेतृत्त्व राष्ट्रास शक्तीशाली बनविले.

९. राष्ट्रीय सत्तेच्या इतर घटकांचे यशापयश नेतृत्त्वावर अवलंबून असते. राष्ट्रीय सत्तेचे इतर सर्व घटक अस्तित्वात असूनही चांगले नेतृत्त्व नसेल तर ते निरुपयोगी ठरतात.

१०. महात्मा गांधी, पंडित नेहरु, इंदिरा गांधी ही भारतातील प्रभावी नेतृत्त्वाची उदाहरणे आहेत.

११. राष्ट्रीय मनोबल ही एक मनोवस्था आहे. आपल्या राष्ट्राविषयी नागरिकांना वाटणारे प्रेम, राष्ट्रावरील त्यांची श्रद्धा, राष्ट्रासाठी स्वार्थ त्याग करण्याची प्रसंगी राष्ट्रासाठी प्राण देण्याची तयारी म्हणजे मनोबल होय. याच आधारावर राष्ट्र आपले एकात्मतेचे दर्शन घडविते.

**रिकाम्या जागा भरून खालील वाक्ये पूर्ण करा.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. साम्यवादी | २. यथास्थिती | ३. साम्राज्यवादी | ४. दुसरा |
| ५. विस्टन चर्चिल | ६. केमालपाशा | ७. मनोधैर्य | ८. गोऱ्या माणसाचे कर्तव्य |
| ९. तंत्रज्ञान | १०. चांद्रयान | ११. ५०४० | |

**२.६ सरावासाठी स्वाध्याय :**

**अ) पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) राष्ट्रीय सत्ता म्हणजे काय ? राष्ट्रीय सत्तेचे घटक स्पष्ट करा?

२) राष्ट्रसत्तेचे स्थायी घटक म्हणून भौगोलिक परिस्थिती व नैसर्गिक साधन संपत्ती या घटकांचे वर्णन करा.

३) भौगोलिक परिस्थितीचा राष्ट्राच्या शक्तीवर कसा प्रभाव पडतो ते स्पष्ट करा.

४) राष्ट्रसत्तेचा घटक म्हणून विचारप्रणालीचे महत्त्व स्पष्ट करा.

५) राष्ट्रसत्तेचे घटक या दृष्टीने लोकसंख्या आणि तंत्रज्ञान यांचे महत्त्व सांगा.

६) विचारप्रणालीचा अर्थ स्पष्ट करुन आंतरराष्ट्रीय राजकारणातील तिचे महत्त्व स्पष्ट करा.

७) जनतेचे मनोबल (मनोधैर्य) यांचा राष्ट्रीय शक्तीचे घटक या दृष्टिकोनातून परीक्षण करा.

८) 'राष्ट्रसत्तेच्या वृद्धीसाठी केवळ एक किंवा दोन घटक पुरेसे नाहीत' स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१. भौगोलिक घटक

२. विचारप्रणाली

३. जनतेचे मनोधैर्य

४. नेतृत्त्व

५. तंत्रविज्ञान

## २.७ अधिक वाचनासाठी ग्रंथ :


१) डॉ. वसंत रायपुरकर : आंतरराष्ट्रीय संबंध-श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, सातवी आवृत्ती : वर्ष प्रतिपदा २००६.

२) डॉ. वि. मा. बाचल : आंतरराष्ट्रीय राजकारण
डॉ ललिता टोनप कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, प्रकाशन, १५ जुलै १९९६.

३) डॉ. वासंती रासम : आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण
डॉ. करिआप्पा खापरे फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती जाने.२००४.

४) प्रा. रघुनंदन घ. वराडकर : आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, जून १९९१.

५) डॉ. सुनिल दाते : आंतरराष्ट्रीय संबंध व राजकारण विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, आवृत्ती - जुलै, १९९८.

६) डॉ. शांताराम भोगले : आंतरराष्ट्रीय संबंध विद्या प्रकाशन, नागपूर, पुनर्मुद्रण -२००१.

७) प्रा. बी. वाय. कुलकर्णी : आंतरराष्ट्रीय संबंध
प्रा. अशोक नाईकवाडे श्री विद्या प्रकाशन पुणे, प्रकाशन काल - २५ नोव्हेंबर २००५.

९) प्रा. बी. वाय. कुलकर्णी : आंतरराष्ट्रीय संबंध विद्या प्रकाशन नागपूर. प्रथमावृत्ती - १ जून २००५.

१०) Palmer Perkins … International Relations, CBS Publishers Delhi, 1985.


❍❍❍

### घटक ३

# राजनय (Diplomacy)


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ राजनयाचा अर्थ

३.२.२ राजनयाचे प्रकार व राजनयाची कार्ये

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ स्वयं अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.० उद्दिष्टे :

या घटकांच्या अभ्यासानंतर आपल्याला -

१) आंतरराष्ट्रीय राजकारणातील राजनय या गुंतागुंतीच्या कलेची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे.

२) राजनयाचा अर्थ, वैशिष्ट्ये आणि स्वरूप स्पष्ट करता येईल.

३) समकालीन आंतरराष्ट्रीय संबंधाची जोपासना करण्यात एक महत्त्वाचे साधन म्हणून वाटाघाटी यांच्या उपयोगितेचा शोध घेवून त्याची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे.

४) राजनयाचे प्रकार समजून घेता येतील.

५) राजनयच्या कार्यपद्धतीची चर्चा या घटकामध्ये प्रामुख्याने करता येईल.

## ३.१ प्रास्ताविक :

समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये राज्यांमधील द्विपक्षीय आणि बहुपक्षीय संबंधाची जोपासना व वृद्धींगतपणा यांच्याशी आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता जोडलेली आहे. आतंरराष्ट्रीय राजकारणात प्रत्येक राष्ट्र आपल्या हितसंबंधाच्या जपणुकीसाठी आग्रही असते. म्हणून हा परराष्ट्र धोरणाचा मुख्य हेतू असतो. ग्रीक, रोमन, इजिप्शियन, अरब, चिनी आणि भारतीयांनी राजनय कलेच्या विकासात महत्त्वपूर्ण भर घातली आहे. राष्ट्राचे हित सुरक्षित ठेवण्याचे व ते वाढवण्याचे महत्त्वाचे आणि प्रभावी साधन म्हणून राजनयाचे महत्त्व प्राचीन काळापासून ते आजतागायत सर्वांनी मान्य केले आहे. प्राचीन काळापासून सत्ता, संपत्ती आणि भौतिक साधनांच्या हव्यासापोटी मानव जातीमध्ये संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली आहे. या वृत्तीमध्ये आजपर्यंत बदल झालेला नाही. राजनय ही आधुनिक काळात राष्ट्र-राज्य व्यवस्थेच्या धोरण निर्मिती हा त्याच्या अंमलबजावणीतील महत्त्वाचा घटक आहे. राजनय प्राचीन काळापासून राजनयिक वा राजदूत इतर राज्यामध्ये ठेवण्याची प्रथा होती. ग्रीक नगर राज्यातील अथेन्स व स्पार्टा या नगरराज्यामध्ये ही राजनयिक अधिकारी पद्धतीचा अवलंब केला जात होता. भारतातील पौराणिक काळापासून राजदूत या संकल्पनेचा अवलंब 'देवदूत' या माध्यमातून कार्यरत असल्याचे दिसते. देवर्षी नारद हे प्रथम देवलौकिय राजनयिक अधिकारी होते. अशी आख्यायिका आहे. हनुमान हे राम यांचे एक प्रकारे राजदूत म्हणूनच कार्यरत होते. असे पुराणकथामध्ये सांगितले जाते. आधुनिक राजनय पद्धतीचा विकास घडून येण्याची प्रक्रिया ग्रीक नगरराज्यामध्ये पार पडली. ग्रीक नगराज्यामध्ये संम्मेलन परिषदाच्या माध्यमातून राज्या-राज्यांमधील संबंधावर चर्चा व निर्णयप्रक्रिया घडून येत असे. या परिषदांच्या माध्यमातून राज्या-राज्यांचे संबंध, त्यांच्या समस्या, प्रश्न हे सभा संमेलनामध्ये राजनयिकांची भूमिका महत्त्वाची होती, असे निकोलसन यांनी सांगितले आहे.

मध्ययुगामध्ये राजनयास विशिष्ट्य महत्त्व प्राप्त झाले. या कालखंडामध्ये सामंतशाहीचा उदय व विकास झाला. या काळात युद्ध ही नित्याची बाब बनली. युद्धापासून बचाव तसेच विजय मिळवण्यासाठी युरोपमधील राज्ये प्रगतीच्या दृष्टीने प्रयत्न करू लागली. याचवेळी औद्योगिक क्रांतीने व्यापारास चालना देण्यामुळे या कालावधीत राजनयाचे विशिष्ट स्वरूप प्रचलित झाले. गुप्तहेर प्रमाणे राजनयिक स्वरूप या कालावधीत त्यास प्राप्त झाले. खोटे बोलणे ही त्याची सर्वश्रेष्ठ पात्रता त्याकाळी प्रचलित होती. 'The Prince' या ग्रंथामध्ये मॅक्यव्हीली यांनी राजनयास अधिकच व्यावहारिक मध्ययुगीन काळात वास्तविक कला म्हणून पुढे आणले. राजाच्या दृष्टीने यश हेच सर्व बऱ्यावाईट तंत्राचा अंतिम व उद्देश असावा. अधिक मूभा कालावधीत दिल्यामुळे राजनयाचे स्वरूप अधिकच विकृत आणि मध्ययुगात राजनयाचा कालखंड भ्रष्ट कालखंड मानावा लागेल.

आधुनिक काळामध्ये राष्ट्र-राज्य व्यवस्थेत अर्थबोध प्राप्त झाला. औद्योगिक क्रांतीने मानवी विकास साम्राज्यवादी चढाओढ गतिमानता. तसेच औद्योगिक क्रांतीने प्रगत झालेल्या राष्ट्रामध्ये वसाहती राज्यांच्या मालकीवरून संघर्ष सुरू झाले. पहिले महायुद्धाच्या समाप्तीनंतर राजनयास जगात शांतता प्रस्थापित

करण्याच्या दृष्टीने संघर्षाऐवजी, वाटाघाटीने जगात शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने संघर्षाऐवजी, वाटाघाटीने, शांततेच्या मार्गाने प्रश्न सोडवण्याबाबत विचार होवू लागला. राजनयास जागतिक मान्यता मिळविण्याकरिता वुड्रो विल्सन यांच्या संकल्पनेतून १९१९ राष्ट्रसंघाची स्थापना झाली. मात्र पुढे बड्या राष्ट्राच्या असहकार्यपूर्ण धोरणामुळे राष्ट्रसंघाच्या व राजनयाच्या कार्यास मर्यादा आलेल्या दिसतात. १९३९ झाली दुसरे महायुद्ध सुरू झाले. १९४५ हे महायुद्ध संपल्यानंतर अशा प्रकारचे युद्ध पुन्हा होवू नये. यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना करण्यात आली. मानवजातीचे दुसऱ्या महायुद्धाच्यावेळी मोठ्या उध्वस्तीकरण झाले होते. यावरती वंश, जात, धर्म, प्रदेश व भाषा या माध्यमातून कोणताही भेदभाव न करता वाटाघाटी करता याव्यात आणि शांततामय मार्गने संबंध वाढीस लागण्यासाठी संयुक्त राष्ट्राच्या सनदेच्या कलम ३३ (१) मध्ये पुढील गोष्टीचा अर्थपूर्ण उल्लेख केला आहे तो असा की संघर्षात गुंतलेल्या देशांनी, त्यांच्यातील संघर्षामुळे जर आंतरराष्ट्रीय शांतता सुरक्षितता धोक्यात येण्याची शक्यता असेल तर प्राधान्याने संघर्ष मिटवण्यास वाटाघाटी, चर्चा, चौकशी, मध्यस्थाची मदत, तडजोड, तटस्थ यंत्रणेकडून निवाडा, न्यायालयीन निवाडा इ. मार्गाचा अवलंब करावा, अशा पद्धतीने प्राचीन देवदुतांपासून आजच्या राजनयिक अधिकाऱ्यापर्यंतचा राजनयाचा विकास घडून आलेला दिसतो. त्यामुळे राजनयाचे आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये राजनय संकल्पनेचा अर्थ, प्रकार, याबरोबरच राजनयिक अधिकाऱ्याची कार्ये या घटकामध्ये आपण सविस्तरपणे अभ्यासणार आहोत. व्हिएन्ना परिषद (१८१५) ते पहिले महायुद्ध या शंभर वर्षाच्या कालखंडास राजकीय इतिहासात सुवर्णयुग म्हणून मानले जाते. कारण युरोपाच्या सत्तावैभवाचा आणि साम्राज्यवादी समृद्धीचा तो कालखंड होता आणि राजकीय वातावरणाचा परिणाम त्या तत्कालीन राजकीय प्रक्रियेवर झाला होता. म्हणजेच राजनीती हे राजकारणाचे स्वरूप ठरवित नसून राजकारण हे राजनीतीचे स्वरूप ठरविते.

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ राजनय या संकल्पनेचा अर्थ :

आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करित असताना राजनयाची व्याख्या करणे अवघड आहे. राजनयाची सर्वसमावेशक अशी व्याख्या करण्याचा प्रयत्न अनेक अभ्यासकांनी केला आहे. राजनयाशी संबंधीत एक अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य हे परराष्ट्र धोरणाच्या पूर्व अस्तित्वाशी जोडलेले आहे. हे परराष्ट्र धोरण अनेकविविध घटकांवर आधारलेले असते आणि या धोरणाच्या पूर्ततेसाठी राजनयिक पद्धती आणि तंत्रे यांची गरज असते म्हणूनच, काही निश्चित साध्ये प्राप्त करण्यासाठी राजनय आणि परराष्ट्र धोरण परस्परांना सहाय्यभूत ठरतात. या दोन्ही संज्ञामध्ये भेद करता येणे शक्य आहे. मात्र प्रत्यक्षात कार्यवाहीच्या काही टप्प्यांवर मात्र त्यांच्यात फरक करता येत नाही. यावरून राजनय म्हणजे काय ते पुढीलप्रमाणे पाहता येईल.

सर्वसाधारणपणे आंतरराष्ट्रीय संबंधांचे वाटाघाटीद्वारे व्यवस्थापन करणे म्हणजे राजनय होय. ही

एक अशी पद्धत आहे ज्याद्वारे राजनयिक अधिकारी आंतरराष्ट्रीय संबंधाचे वाटाघाटी अथवा तडजोडीद्वारे व्यवस्थापन करतात, अशी व्याख्या निकोलसन यांनी केली आहे. ते पुढे असेही म्हणतात की ते राजनयिक अधिकाऱ्यांचा तो व्यवसाय व कला असते.

**अर्थ :**

◆ **हेरॉल्ड निकोलसन –** यांच्या मते, ''आंतरराष्ट्रीय वाटाघाटीद्वारे व्यवस्थापन करण्याची एक अशी पद्धती की ज्याद्वारे राजनयिक अधिकारी आंतरराष्ट्रीय संबंधाचे तडजोडीद्वारे व्यवस्थापन करतात आणि राजनयिक अधिकाऱ्यांचा तो व्यवसाय किंवा कला असते.''

◆ **सर अर्नेस्ट सातोव –** यांच्या मते, ''राष्ट्रां-राष्ट्रामधील व्यवहारांचे शांततामय मार्गाने संचलन म्हणजे राजनय होय.'' यामध्ये राजनय म्हणजे बुद्धीमत्ता आणि युक्ती यांचा उपयोग करून स्वतंत्र राष्ट्रांच्या शासन संस्थामधील अधिकृत संबंधाचे संचलन करणे होय. काही वेळेस राजनयाची व्याप्ती अंकित राष्ट्रांबरोबरच्या संबंधापर्यंतही वाढते.

◆ **हन्स मॉर्गेन्थ्यू –** ''राष्ट्रीय हितसंबंधाची वृद्धी आणि संरक्षणासाठी शांततापूर्ण मार्गाचा अवलंब म्हणजे राजनय होय.''

◆ **ऑर्गेस्की –** ''दोन किंवा दोनपेक्षा अधिक देशांच्या प्रतिनिधीमध्ये होणारी समझोत्याची प्रक्रिया म्हणजे राजनय होय.''

◆ **पामर व पार्किन्स –** ''राजनय वा राजनिती एखाद्या यंत्राप्रमाणे असून त्याला नैतिक अथवा अनैतिक म्हणता येणार नाही. ज्या व्यक्तीकडून त्याचा वापर करण्यात येतो. त्या व्यक्तीच्या परस्पर क्रिया आणि कौशल्यावर राजनयाचे मूल्य आधारित असते.''

राजनय म्हणजे परराष्ट्र धोरणाची अंमलबजावणी करणारी प्रक्रिया होय. अशा प्रकारे राजनयाच्या वरील विविध व्याख्यांमधून या कलेचे अनेक घटक आणि बाजू ठळकपणे समोर येतात. राजनयाच्या या कलेसंबंधी असे म्हटले जाते की एखाद्या राष्ट्राच्या परराष्ट्र संबंधाचे, त्या राष्ट्राचे राष्ट्रीय हित वृद्धींगत होईल, अशा पद्धतीने संचलन करण्याचे शास्त्र म्हणजे राजनय होय. राजनय म्हणजे राष्ट्रीय सामर्थ्याचा एक घटक मानून तो राजनयाचा आणखी एक आयाम म्हणून ठळकपणे नोंदवला जातो. राजनयाच्या खूबीतून आणि प्रत्यक्ष अनुभवजन्य परिस्थितीतून राज्याच्या सत्तेची पातळी समजते व त्यातूनच त्या राज्याचा लष्करी, राजकीय आणि आर्थिक दर्जा व्यक्त होतो. म्हणूनच सर अर्नेस्ट सातोव आपल्या 'द गाईड टू डिप्लोमॅटिवक प्रॅक्टिस' या ग्रंथामध्ये म्हणतात की आंतरराष्ट्रीय संबंधाच्या संचलनात राजनयाला एक महत्त्वाचे स्थान आहे.

काळाच्या ओघामध्ये राजनयाचा आशय हा विकसित होत गेला आणि विशिष्ट परिस्थितीत राजनयाने नवीन रूप धारण करित गेला तरी राजनयिक अधिकाऱ्याला आपली नेहमीची कामे करावीच

लागतात. अशा अर्थाने राजनय ही प्रामुख्याने एक राजकीय वृत्ती आहे, ती सत्तेचा महत्त्वाचा घटक असते. बळ, प्रचार किंवा कायदा या कोणत्याच बाबींचा वापर न करता आपल्या परराष्ट्र धोरणाची उद्दिष्ट्ये प्राप्त करण्यासाठी राज्यांना सक्षम करणे, हे राजनयाचे ध्येय असते. अशा प्रकारे पुढे राजनयाची वैशिष्ट्ये अभ्यासता येतील.

❑ **राजनयाची वैशिष्ट्ये :**

१) राजनय कलेचा वापर शांतता व युद्ध अशा दोन्ही परिस्थितीमध्ये केला जातो.

२) राजनय हे मूलत: नैतिक वा अनैतिक अशा स्वरूपाचे नसून योग्यता आणि उद्देश या आधारावर राजनयाचे मोजमाप, मूल्यमापन केले जाते.

३) राजनयाचा उपयोग प्रामुख्याने परराष्ट्रातील दूतावास, कचेऱ्या राजदूत व अन्य राजकीय प्रतिनिधी यांच्या माध्यमातून प्रामुख्याने केला जातो.

४) राजनयाचे स्वरूप मुख्यता द्विपक्षीय असते. कारण त्याचा वापर संबंधीत दोन राष्ट्रामध्ये होत असते, अशी वैशिष्ट्ये पामर आणि पार्किन्स यांनी मांडली आहेत.

सातत्याने आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये राजनयाच्या वेगवेगळ्या गुण वैशिष्ट्यांवर भर दिला जातो. कारण आंतरराष्ट्रीय संबंधाच्या क्षेत्रामध्ये राजनय ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. प्रत्येक राष्ट्राला आपले अस्तित्व टिकवायचे असते. आपली अस्मिता जपण्यासाठी आणि ती वाढवण्याच्या दृष्टीने प्रत्येक राज्य प्रयत्नशील असते. त्यासाठी ते अनेक साधनांचा वापर करतात बऱ्याच वेळ ती साधने छुप्या स्वरूपात स्पष्ट स्वरूपात आपआपल्या राज्याची वाढ, त्याचा विकास, समृद्धी आणि सत्ता या उद्दिष्ट्यापोटी ती राज्ये नेहमी दडपणाखाली असतात. म्हणूनच महत्त्वाचे साधन म्हणून राजनय हे राजकारण, अर्थकारण शस्त्र सामर्थ्य व यासारख्या अन्य घटकांप्रमाणे परिवर्तनशील होत जाते. आजच्या परिस्थितीमध्ये जनसंपर्काच्या साधनाच्या क्षेत्रातील व्यापक क्रांतीकारक विकासामुळे अत्यंत महत्त्वपूर्ण बदल झाला आहे. नव्या बदलाशी जुळवून घेवून राजनयाचे स्वरूप हे अधिकच अद्ययावत आणि सातत्याने वाढवणाऱ्या राजकीय संसूचनाच्या माध्यमातून व वाटाघाटीच्या कौशल्याचे, कसब हे त्याचे प्रमुख वैशिष्ट्य बनले आहे. वृत्तपत्रे, लोकमत, नेते आणि जनता यांच्यापर्यंत पोहचण्याचे माध्यमे संसूचन तंत्रज्ञानातील मोठ्या प्रमाणात झालेल्या विकासामुळे वरील घटक हे राजनयाच्या क्रांतिकारक बदलाचे कळीचे घटक आहेत. सध्याच्या परिस्थितीमध्ये राजनय हे राज्याचे धोरण राहिले नसून शासनसंस्था आणि जनता विविध शासनसंस्था आणि जगातील लोक यांच्यातील संपर्काचे मार्ग आता व्यापक झाले आहेत. त्यामुळे राजनय ही अधिकाधिक संमिश्र व नव्या प्रकारात रूपांतरित झाले आहे.

### ३.२.४ राजनयाचे प्रकार :

समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये राजनयाला आपले जुने किंवा पारंपरिक स्वरूप टिकवताना किंवा त्यांचे नव्याने अन्वयार्थ लावताना विविध आयाम प्राप्त झाले आहे, ते पुढील प्रमाणे पाहता येईल.

**१) जुना राजनय :**

इ. स. १५ व्या शतकापासून ते प्रथम महायुद्धाच्या कालखंडापर्यंत म्हणजेच १९१९ पर्यंतच्या राजनयास जुना राजनय असे संबोधले जाते. १९ व्या शतकापर्यंत जगातील अनेक देशात काही शक्तीशाली युरोपीय राष्ट्रांच्या वसाहती अस्तित्वात होत्या. अशा एकूण परिस्थितीत लहान स्वतंत्र राष्ट्र अस्तित्वात होती, परंतु मोठी राष्ट्र त्यांचा उपयोग सत्तासंतुलनासाठी करीत असत. राजनयाचा मुख्य हेतू हा होता की जे मित्र राष्ट्र असतील त्यांना शत्रू राष्ट्रापासून दूर करून आपल्याकडे वळविणे व आपल्या मित्रराष्ट्राच्या संख्येत वाढ करणे, हा होता. मात्र ही प्रक्रिया करित असताना कोणत्याही प्रकारची घृणा निर्माण होईल वा हिंसेस प्रोत्साहन मिळेल, अशा कोणत्याही कृतीस मान्यता देण्यात आली नव्हती. कारण तत्कालीन काळात युरोपामध्ये राजतंत्र व कुलीनतंत्र या शासन प्रकार अंतर्गत युरोपीय समुदाय एकजीव स्वरूपात होता. त्यामुळे जुन्या राजनयाचे स्वरूप उदार मानवीय, नम्रतेने व बुद्धीमता व सहिष्णुतेच्या आधारे वापरण्याची एक कला म्हणून विकसित झाले होते. हा राजनय गुप्ततेवर आधारलेला होता. देशातील सामान्य जनतेस वा अन्य राष्ट्रे यांना यांसदर्भात कोणतीच माहिती दिली जात नसे. या राजनयामध्ये व्यापक अर्थाने राजाचे व्यक्तिगत हितसंबंध सुरक्षित राखणे हा होता ना की राष्ट्राचे हित हा राजनय गुप्त पद्धतीवर आधारला असल्याने जगास पहिल्या महायुद्धास सामोरे जावे लागले.

**२) नवा राजनय :**

मध्यपूर्व व जपानचा अपवाद वगळला तर आशिया खंडातील सर्व देश युरोपमधील राष्ट्रांच्या नियंत्रणाखाली असल्याने राजनैतिकदृष्ट्या या गुलाम राष्ट्रांना कोणत्याही प्रकारचे स्वतंत्र्य नव्हते. पुढे पहिल्या महायुद्धानंतर आशिया व आफ्रिका खंडातील राष्ट्रामध्ये स्वतंत्र चळवळींनी जोर धरला. पुढे दुसऱ्या महायुद्धाच्यानंतर या वसाहतीक गुलामगिरीतून या खंडातील अनेक राष्ट्रे स्वतंत्र सार्वभौम झाली. तेथे निर्वाचित जनप्रतिनिधींचे शासन निर्माण झाले. या राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्राचे सदस्यत्व स्वीकारत आंतरराष्ट्रीय राजकारणात आपल्या स्वतंत्र राजनयाच्या माध्यमातून वेगळा ठसा उमटवण्यास सुरुवात केली. या राष्ट्रांच्या माध्यमास पुढे अलिप्ततावादी चळवळीने पुढे जोर धरला मात्र अमेरिकेने जागतिक राजकारणात हस्तक्षेपाची भूमिका सुरू केली. त्याने अलिप्ततेच्या धोरणाचा स्वीकार केला नाही आणि याच कालावधीत अमेरिका व सोव्हिएत या दोन देशांचा जागतिक राजकारणात दोन महासत्ता म्हणून उदय झाला. त्यातूनच १९४५ नंतरचे जग शीतयुद्धाच्या छायेत विभागले गेले. अशा कालावधीत जुन्या राजनयाची पद्धती जी युरोपमधील राष्ट्र - राज्यांपूरतीच मर्यादित होती. ती गृहीत ठरली त्यातूनच नवीन राजनय पद्धतीचा उदय झाला

आणि गुप्त राजनयाच्या जागेवरती मुक्त राजनय आलेला दिसतो. या पद्धतीमध्ये राजकर्ते जनतेस ग्रहित न धरला जनतेस आव्हान करून चांगल्या किंवा वाईट बाजू सांगण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रचार करण्यावर भर देवून टिका प्रतिटिका धमकी, आक्रमणाची भाषा शस्त्रास्त्र निर्मिती करून दबाव वाढवणे यासारख्या तंत्राचा प्रामुख्याने वापर केला जातो. या राजनयाची काही प्रमुख वैशिष्ट्ये श्री. के. एम. पणिक्कर यांनी खालीलप्रमाणे सांगितली आहेत.

१. प्रतिपक्षावर सातत्याने आक्रमक भाषेचा वापर करून राष्ट्रावर व राज्यकर्ते वर अटी लादणे.

२. शासनकर्त्यास व्यापक प्रचार तंत्राचा वापर करून बदनाम करणे.

३. त्याचबरोबर शत्रुराष्ट्राच्या नेतृत्त्वास आवाहन करण्याऐवजी त्या राष्ट्रातील जनतेस आव्हान करण्यावर भर देणे.

४. राजनैतिक संबंध हे केवळ अधिकारी स्तरावर प्रस्थापित करणे बाकी दोन्ही राष्ट्राच्या जनतेस सामाजिक संबंधावर ते प्रस्थापित होवू न देणे त्यावर निमंत्रण प्रस्थापित करणे.

**३) गुप्त राजनय :**

अगदी प्राचीन काळापासून गुप्त राजनय हा जुन्या राजनयाचा प्रकार मानला जातो. याचे सहअस्तित्व आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आढळले. या राजनयाच्या तंत्रामध्ये गुप्तताही स्वाभाविक बाब मानली जाते. म्हणजेच दोन राष्ट्रे वा राष्ट्र प्रमुख यांच्यातील चर्चा होते किंवा वाटाघाटी होतात त्यास कधीही सार्वत्रिक केले जात नाही. गुप्त राजनयाच्या पद्धतीमध्ये दोन राष्ट्रामध्ये होणारे करारही गुप्त ठेवण्यावर भर दिला जातो. हा गुप्त राजनयाचा प्रमुख दोष मानला जात असला तरी ज्या राष्ट्रांना उघडपणे करता येणे शक्य होत नाही त्या गोष्टी या राजनयातून शक्य होते. म्हणजेच शासनकर्त्यांना राष्ट्रहिताचा निर्णय घेत असताना सामान्य जनतेस कल्पना न देता काही करार संधी करणे आवश्यक ठरते. ते गुप्त राजनयाच्या माध्यमातून शक्य होते.

१९ व्या शतकाच्या शेवटी आणि २० व्या शतकाच्या पूर्वार्धात गुप्त राजनय पद्धतीने आंतरराष्ट्रीय राजकारणात संशय, भीती, असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते. गुप्त राजनयास या कालावधीमध्ये जर्मनीच्या प्रिन्स बिस्मार्कने मोठी प्रसिद्धी मिळवून दिली होती. सन १९७८ ची बर्लिन काँग्रेस हे गुप्त राजनयाचे महत्त्वाचे उदाहरण मानले जाते. पहिल्या महायुद्धाच्या पूर्वी गुप्त राजनयाअंतर्गत अनेक गुप्त करार युरोपियन राष्ट्रांमध्ये झाले होते.

**४) प्रगट/खुला राजनय :**

पहिल्या महायुद्धानंतर खुल्या राजनयाचा अवलंब करण्याविषयी राष्ट्रांमध्ये एकमत होण्याचे कारण म्हणजे पहिल्या महायुद्धास गुप्त राजनय कारणीभूत ठरला. गुप्त राजनयामुळे २० व्या शतकाच्या पहिल्या दशकात युरोपाचा राजकारणात मोठ्या प्रमाणात गटबाजी सुरू झाली. यातून असुरक्षितता, परस्पर

संशयाचे वातावरण निर्माण झाले. या काळात शस्त्रास्त्र स्पर्धा वाढली. त्यामुळेच खुला राजनायाचा विकास होण्यास मदत झाली. लोकशाहीवादी राष्ट्रांचा उदय झाल्यामुळे अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांची लोकशाहीवर आधारित तत्त्वांवर १४ चौदा कलमी योजना तसेच लोकशाही मूल्यांचा युरोपामध्ये होत असलेला प्रसार आणि प्रगट वा मुक्त राजनयाचा सर्वसामान्यत: असा अर्थ घेण्यात आला की, ज्यामध्ये 'दोन राष्ट्रात ज्या वाटाघाटी, चर्चा होतात तसेच वाटाघाटीनंतर जे करार संधी होतात. त्यांना पूर्णपणे प्रसिद्ध देवून जाहिर करणे तसेच जनतेस त्यासंबंधी पूर्ण माहिती मिळून त्यासंबंधी आपली मते भावना व्यक्त करता यावीत आपले लोकमत आजमावण्याची संधी उपलब्ध करण्यात आली.

आंतरराष्ट्रीय राजकारणात पारदर्शकता येण्याच्या दृष्टीने प्रगट राजनय महत्त्वाची भूमिका बजावेल, अशी अपेक्षा तत्त्वचिंतकाना होती. मात्र वास्तव प्रगट राजनयाने आंतरराष्ट्रीय राजकारणातील समस्या अधिकच जटील झाल्याचे समोर आले.

१. मुक्त, खुला किंवा प्रगट राजनयाने प्रमुख प्रश्नाबाबत राष्ट्रे एकत्र येऊन उघडपणे करार वा संधी करीन असले तरी ती अंमलात आणण्यासंदर्भात उदासीनता असल्याचे दिसते. उदा. १९२८ मध्ये पॅरिस संधी वर जगातील सर्व प्रमुख राज्यांनी स्वाक्षऱ्या केल्या. जगास यापुढे महायुद्धाचा धोका होणार नाही, अशी घोषणा ही संयुक्तपणे केली खरी पण कराराचे वास्तवात कोणत्याही राष्ट्राने पालन केले नाही.

२. राजनय पद्धतीची प्रक्रिया वा परिणाम मागील फरकही गुप्त राजनयाच्या कार्यन्वयावरील प्रमुख मर्यादा ठरतांना दिसते.

३. लोकशाही शासन प्रकारात प्रगट राजनय कार्यन्वित करणे शक्य होत नाही. कारण देशातील सर्वच जनतेस आंतरराष्ट्रीय राजकारणाविषयी रूची असते, असे नव्हे त्यासंबंधी योग्य समज वा प्रतिसाद असतेच असे नव्हे आंतरराष्ट्रीय राजकारणात / राजकीय व्यवहारात त्यासाठी प्रशिक्षित वर्गाची अपरिहार्यता वेळोवेळी प्रत्ययास येते.

४. राजनयाबद्दल लोकांना किती आणि कसे सांगावे हा प्रश्न लोकशाही शासनव्यवस्थेतील राज्यकर्ते समोर असतो. त्यामुळे प्रगट राजनयाने या शासनव्यवस्थेमध्ये जनता व राज्यकर्ते यांच्यातील नात्यामध्ये अविश्वासाची झालर निर्माण होते. अशा मर्यादा असल्यातरी प्रगट राजनय पद्धतीच्या तंत्राचा प्रामुख्याने वापर समकालीन संदर्भात केला जातो.

**५) हुकुमशाही राजनय / सर्वंकष राजनय :**

हुकुशाहीत सर्व सत्ता एका व्यक्तीच्या हाती सोपवलेली असते व जनतेस विश्वासात न घेता राजनयिक पातळीवर सर्व निर्णय घेतले जातात. सर्वसाधारणपणे पहिल्या महायुद्धानंतर युरोपामध्ये अस्थिर

आर्थिक आणि राजकीय परिस्थिती निर्माण झाली. त्यातूनच अनेक राष्ट्रामध्ये हुकुमशाही सत्ता निर्माण झाल्या. यातूनच हुकुमशाही राजनयाला आपल्या राष्ट्रीय धोरणाचे साधन म्हणून वापरले आपल्या यशस्वितेसाठी, प्रभाव वाढवण्यासाठी शेजारी राष्ट्रामध्ये गुप्त कारवायांसाठी, लोकशाही शासनव्यवस्था पाडण्यासाठी, शांतता प्रस्थापित करण्यावर त्याचा विश्वास नसतो. हुकुमशाही पद्धतीचा राजनय तोपर्यंतच आंतरराष्ट्रीय कायद्यास मानतो की जोपर्यंत राष्ट्राचे हित साध्य होत नाही. हुकुमशाही शासनपद्धती असूनही जर एखादे राष्ट्र इतर राष्ट्रांशी राजनयिक संबंध स्थापन करू इच्छित असेल तर हुकुमशाही राजनयाच्या दृष्टीने ते राष्ट्र दुर्बल आहे, असा सरळ अर्थ लावला जातो. हेरगिरी करणे, घातपात करणे, युद्ध व राज्याचा विस्तार करणे हे या हुकुमशाही राजनयाचे मुख्य तत्त्वे असते. हुकुमशाही राजनयात विश्वासाचा भाग अनिवार्य नसतोच पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात इटलीमध्ये मूसोलिनी, जर्मनीत हिटलर यांनी परराष्ट्र संबंधा संदर्भात जे राजनयाचे तंत्र स्वीकारले ते प्रामुख्याने हुकुमशाही राजनयाचे होते. या प्रकारच्या राजनयाने जर्मनी, इटली, जपान ह्यासारख्या राष्ट्रांनी परस्परांशी गुप्त तह करून वेगळा गट निर्माण केला. ज्याने जगाला दुसऱ्या महायुद्धाच्या गर्तेत लोटले.

**६) परिषद राजनय :**

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये विविध आंतरराष्ट्रीय व विभागीय संघटना, संस्थाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या परिषदांमधून विकसित झाला. जगातील सर्व राष्ट्रासमोर काही समस्या समान आहेत. जसे पर्यावरण प्रदुषण, अण्वस्त्रे प्रसार, व्यापारामधील अडथळे, महिलांवरील अत्याचार, बाल कामगार प्रथा इ. वैश्विक समस्यांवर वैश्विक किंवा विभागीय पातळीवर तोडगा काढण्यासाठी अनेक राष्ट्रे अशा परिषदांच्या माध्यमातून एकत्र येतात. यातून बहुपक्षीय करार होऊन काही निर्णय घेतले जातात. परिषद राजनयाच्या माध्यमातून अशा समस्यावर, प्रश्नांवर जागतिक पातळीवर लोकमत संघटीत होण्यास सुरुवात झाली. यात केवळ राजकीय स्वरूपाच्या नाहीतर बिगर राजकीय समस्या देखील चर्चिल्या जात असल्यामुळे जुन्या राजनयापेक्षा हा प्रकार वेगळा आहे. अण्वस्त्र प्रसारबंदी करार, अणुचाचणी बंदी करार हे महत्त्वाचे निशस्त्रीकरण करार हे परिषद राजनयामधून मान्य झाले आहेत.

**७) शिखर राजनय :**

राजनयिक बाबी संदर्भात राजनयिक अधिकाऱ्याऐवजी संबंधीत राष्ट्राचे परराष्ट्रमंत्री पंतप्रधान, राष्ट्राध्यक्ष यांनीच प्रत्यक्ष वाटाघाटी करणे म्हणजे व्यक्तिगत वा शिखर राजनय होय. हा राजनय प्राचीन काळापासून प्रचलित असलेला दिसतो. राष्ट्राध्यक्ष सम्राट, राजे वा पंतप्रधान, परराष्ट्रमंत्री आपल्या स्तरावरती व्यक्तिगत स्वरूपाच्या राजनैतिक बैठका घेत असत तेव्हा ते शिखर राजनय असे म्हटले जाते. २० शतकाच्या शिखर राजनयाचा विकास झालेला दिसतो. दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान चर्चिल, रुझवेल्ट, स्टॅलिन यांच्यामध्ये १९४३ मधील तेहरान व १९४५ मधील याल्टा परिषद ही शिखर राजनयाची महत्त्वाची वैशिष्ट्ये होत. दुसऱ्या महायुद्धानंतर वरीलप्रमाणे राष्ट्रप्रमुखांच्या भेटी दरम्यान महत्त्वाचे करार करण्याचा

प्रकार वाढला. निशस्त्रीकरणाच्या प्रश्नांवर अमेरिका व सोव्हिएत रशियाच्या राष्ट्रप्रमुखांमध्ये अनेकदा भेटी होऊन स्टार्ट (START) साल्ट (SALT) सारखे करार झाले. नाटो व वार्सासारख्या शीतयुद्धकालिन संघटना शिखर राजनयातून निर्माण झाल्या. आशिया, आफ्रिका व लॅटीन अमेरिका राष्ट्रांची अलिप्तवादी संघटना आपला सामाजिक, आर्थिक विकास साधण्यासाठी शीतयुद्धापासून अलिप्त राहून शिखर राजनयाच्या माध्यमातून निर्माण झाला.

**८) लोकशाही पद्धतीचा अथवा लोकतंत्रिक राजनय :**

या राजनयिक प्रकारामध्ये राज्यकर्त्याची इच्छा नव्हे तर त्या देशातील जनमताचा कौल महत्त्वाची भूमिका दर्शवितो. लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये परराष्ट्रसंबंधा संदर्भात सामान्य जनता आपल्या भावना स्पष्ट स्वरूपात व्यक्त करत असतात. याबरोबरच राष्ट्राराष्ट्रातील सामान्य जनतेने औपचारिक व अनौपचारिक अनेक बाबतीत भेट, संबंध प्रस्थापित झालेले दिसतात. राजनयिक अधिकाऱ्याला शासनकर्त्यांनी केलेल्या विविध संधी, करारांना संसदेची जनतेच्या भाव-भावनांचा ही आदर करावा लागतो. राजनयिक प्रकारामध्ये संधी आणि करारांना संसदेची मान्यता असावीच लागते. अशा सर्व बाबींमध्ये जनता ही लोकप्रतिनिधींच्या मार्फत परराष्ट्र धोरणावर ही अप्रत्यक्षपणे नियंत्रण ठेवताना दिसते.

**९) संसदीय राजनय पद्धती :**

अशा प्रकारचा राजनयाची संकल्पना सर्वप्रथम अमेरिकन परराष्ट्रमंत्री डिन रज्क यांनी वापरली त्यांच्या मते एखाद्या राज्यातील कार्यवाहीचे स्वरूप प्रमाणेच संयुक्त राष्ट्रसंघातील असते. राज्यातील संसदेप्रमाणे ज्या पद्धतीने वेगवेगळ्या गटाचे अथवा पक्षाचे प्रतिनिधी चर्चात भाग घेतात. त्याप्रमाणे संयुक्त राष्ट्रातील बैठकीचे स्वरूप त्याच पद्धतीचे असते. देशामध्ये विविध राजकीय पक्ष व दबावगट आपला प्रभाव संसदेत पाडण्याचा प्रयत्न करतात त्याचप्रमाणे संयुक्त राष्ट्रात सदस्य राष्ट्रांचे गट आपआपल्या हितसंबंधानुसार विचार करून पुढे आलेल्या विषयासंदर्भात कार्यवाही पार पडत असल्याने डिन रज्क यांनी त्यास संसदीय राजनय असे त्या संबोधतात. संसदीय राजनय पद्धतीवर ही मोठ्या प्रमाणात टिका केली जाते. संयुक्त बहुमताने निर्णय घेण्याची पद्धती ही दोषपूर्ण आहे. कारण तो प्रश्न सुटण्याऐवजी अधिकच गुंतागुंतीचा बनतो या राजनय पद्धतीमध्ये कोणत्याही समस्येचा खोलवर जावून विचार केला जात नाही. अशा पद्धतीमध्ये काही दोष असले तरी एखाद्या प्रश्नासंदर्भात जागतिक मत जागृत करणे अधिकाधिक राष्ट्रांचे सहकार्य प्राप्त करून सामूहिक सुरक्षितेच्या मार्गानुसार प्रश्न केला जातो.

**१०) राजकीय राजनय :**

राजकीय राजनयाचा प्रामुख्याने परराष्ट्राच्या संबंधाच्या राजकीय बाजूशी आहे. राजकीय अर्थाने एका राज्याचे दुसऱ्या राज्याच्या प्रश्नाबाबत असलेले धोरण हे होय. त्याच्याशी राजनयाची राजकीय बाजू जोडलेली असते. राज्यांमधील सत्तेसाठीची स्पर्धा हा राजनयाचे महत्त्व वाढवण्या मागील मुख्य

घटक आहे. प्रत्येक राष्ट्राला राजकीयदृष्ट्या अधिक प्रबळ होण्याची इच्छा असते. राजकीय सत्ता हा घटक राजनयाचा आधारभूत घटक असतो. म्हणूनच राजकीय मुत्सद्दी, राजकीय नेते राजनयिक अधिकारी, नागरिक आणि बिगर शासकीय संस्था आपापल्या राज्याने राजकीय ताकद वाढवावी म्हणून आग्रह धरतात. राज्याच्या राजकीय कार्यक्रम पत्रिकेत लष्करी, आर्थिक, इ. अनेक प्रकारचे हितसंबंध प्रतिबिंबित होतात. काही वेळेस राजनयिक अधिकारी हे अन्य हितसंबंधांना राजकीय स्वरूप देतात. मात्र त्यांची अंमलबजावणी मात्र राज्यांच्या वेगवेगळ्या अधिकाऱ्यामार्फत होते. राजकीय निरीक्षण मुत्सद्दी आणि सामान्य जनता हे सर्वच लोक राजनयिक अधिकाऱ्यांना राजकीय रूपरेषा ठरविण्याच्या कामी मदत करीत असतात. राजकीय राजनय जागतिक पातळीवरील संवाद, चर्चा आणि वाटाघाटीद्वारे विशिष्ठ प्रश्नांवर लक्ष केंद्रीत करण्यास प्रोत्साहित करतो. अहिंसेच्या मार्गाने आपले संघर्ष सोडविण्यासाठीच्या तंत्राचा स्वीकार करण्यास राज्यांना प्रोत्साहन देतो. अशा अर्थाने राजकीय राजनय जगात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यात योगदान देतो. राजकीय राजनयाच्या या काही महत्त्वपूर्ण घटकांमुळे आंतरराष्ट्रीय संबंधांची एक लोकप्रिय पद्धत म्हणून त्याकडे पाहिले जाते.

**११) लष्करी राजनय :**

राजकीय राजनयाचा एक घटक म्हणून लष्करी राजनयाकडे पहिले जात असले तरी मात्र ही भिन्न स्वरूपाची आहे. लष्करी माहितीचे विशेषिकृत क्षेत्र कोणत्याही राष्ट्राचे दुर्बल किंवा प्रथम राष्ट्रात रुपांतर करू शकते. उदा. अमेरिकेच्या श्रेष्ठत्वाचे कारण म्हणजे जगावर आपले लष्करी प्रभूत्व प्रस्थापित करण्यासाठी प्रगत शस्त्रास्त्रे आणि तंत्रज्ञान यात अमेरिकेने प्राप्त केलेले विशेष ज्ञान होय. शीतयुद्धाच्या कालखंडात दोन गटांमधील लष्करी प्रभुत्वासाठीचा न संपणारा संघर्ष जगाने अनुभवला आहे. सोव्हिएत युनियनच्या नेतृत्त्वाखालील साम्यवादी राष्ट्राचे छोट्या-छोट्या राज्यांमध्ये विघटन झाल्याबरोबरच अमेरिकेच्या लष्करी राजनयाचा विजय झाल्याचे सर्वज्ञ आहे. लष्करीदृष्ट्या प्रगत देशांचे राजनयिक अधिकारी विकसनशील राष्ट्रांच्या राजनयिक अधिकाऱ्यांपेक्षा वरचढ असतात. राष्ट्रीय दिनादिवशी लष्करी सामर्थ्यांचे प्रदर्शन केले जाते. त्याहूनही लष्करी राजनयाची कामगिरी उल्लेखनीय होते. या अर्थाने अत्यंत प्रगत लष्करी सत्ता ही सर्व प्रकारच्या लष्करी घडामोडींमध्ये आपोआप यश मिळेल याची खात्री देत नाही. अमेरिका आणि मित्र राष्ट्रांनी इराक किंवा अफगाणिस्तान येथे उच्च दर्जाच्या व जटील अशा लष्करी ताकदीचा वापर करूनही अमेरिकेला यश मिळाले नाही. म्हणून राजनयाची लष्करी ताकद ही आंतरराष्ट्रीय संबंधातील एक महत्त्वाचा घटक म्हणून पुढे येताना दिसतो.

**१२) आर्थिक राजनय किंवा विकासाचा राजनय :**

दुसऱ्या महायुद्धानंतर जगाचे दोन गटांमध्ये विभाजन झाले. १) भांडवलदारांचा आणि दुसरा साम्यवादी राष्ट्रांचे विभाजन झाले तेव्हा आंतरराष्ट्रीय संबंधात फार मोठा बदल घडून आला. युद्धानंतर राजकीय

घडामोडींमधून राजनयाचे नवेच क्षेत्र उदयास आले. युद्धामध्ये झालेले नुकसान भरून काढण्यासाठी आर्थिक पुनर्रचना करावयाच्या हेतूने अनेक उपाय तथा योजना म्हणून जेत्या राष्ट्रांनी मार्शल प्लॅनची घोषणा संयुक्त राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक परिषदेचे कार्यक्रम आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या (IMF) आणि पुनर्रचना व विकासासाठीच्या आंतरराष्ट्रीय बँकेच्या योजनांनी (IBRD) एका नवीन माध्यामातून आर्थिक राजनयाचा उदय झाला. यालाच विकासाचा राजनय, असे म्हटले जाते.

राज्याचे आर्थिक हितसंबंध राजनयिक प्रयत्नांद्वारे वाढीस लागतात. यामधून नवीन हितसंबंध निर्माण होतात. त्याचे स्पष्टीकरण दिले जाते. या सर्व गोष्टी खुल्या आणि गुप्त अशा दोन्ही हितसंबंधाना आकार देतात. आर्थिक राजनयात, व्यापार-उद्योग, औद्योगिक आयात-निर्यातीतील अल्प व दिर्घकालीन हितसंवर्धन, शेती आणि अन्य क्षेत्रांतील देवाघेवाणीचे कार्यक्रम यांचा समावेश होतो. आर्थिक राजनय विविध माध्यमातून व्यक्त होतो. त्यापैकी एक म्हणजे परकीय मदत-राजकीय डावपेच, राजकीय तडजोडी या माध्यमातून परकीय मदत होत असते.

आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थांच्या गुंतवणुकीने आर्थिक राजनयाच्या गुंतागुंतीच्या स्वरूपात अधिक भर घातली आहे. जागतिक व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक इ. संस्थांच्या धोरणांची आर्थिक राजनयाच्या आयामाच्या विकासात निश्चितपणे महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. जगातल्या महत्त्वाच्या आर्थिक प्रश्नांच्या संदर्भात अमेरिका आणि चीन यांच्यात जे आर्थिक शीतयुद्ध चालले आहे, तो त्या दोन राज्यांमधील आर्थिक राजनयाचा उत्तम आविष्कार आहे. अफगाणिस्तान, इराक आणि सौदी अरेबिया येथील अमेरिकेच्या लष्कराच्या अस्तित्वाचा अन्वयार्थ काही राजकीय तज्ञांनी अमेरिकेच्या तेलाच्या राजनयाचा भाग असा लावला आहे. खनिज तेलाच्या निर्मिती करणाऱ्या क्षेत्रावर राजकीय डावपेचाच्या माध्यमातून नियंत्रण प्रस्थापित करणे यातून आर्थिक राजनयाला महत्त्वपूर्ण स्थापन प्राप्त होते.

**१३) सांस्कृतिक राजनय :**

राज्ये तेथील जनता, संस्था आणि संघटना व राजनयिक अधिकारी या माध्यमातून सांस्कृतिक राजनय उदयास येवून तो हळूहळू उत्कांत होत जाते. संस्कृती हा दोन राज्यांमधील अधिकारी आणि जनता यांच्यातील आंतरक्रियेचा नेहमीचा मध्यवर्ती घटक असल्याचे दिसते. माहिती तंत्रज्ञानाच्या विस्ताबरोबरच राज्यकारभारतातील उपयोगिते बरोबरच राजकीय संस्कृतीचा राजनयिक कृतीवर प्रभाव पडतो. जगातील सर्व प्रकारच्या कृती संस्कृती या नावाने स्थिरावल्या आहेत आणि त्यांना एक आंतरराष्ट्रीय प्रवाह म्हणून लोकांची आणि त्यांच्या शासन संस्थांची मान्यता व पाठिंबा मिळत आहे. राज्यांमधील सांस्कृतिक करारांतर्गत व्यासंगी शिक्षक, शास्त्रज्ञ, विद्यार्थी, कलाकार, क्रिडा क्षेत्रातील खेळाडू पत्रकार इत्यादीच्या परस्पर देवाणघेवाणीचे अनेक कार्यक्रम पार पाडले जात आहेत.

राज्ये आणि त्याच्या राजनयिक कार्यक्रमांद्वारे सांस्कृतिक देवाण-घेवाण करून या माध्यमातून सांस्कृतिक राजनयाचा सिद्धांत आणि व्यवहार प्रस्थापित करणारी संस्था करून संयुक्त राष्ट्रांच्या शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटनेच्या उल्लेख याद्वारे करता येईल. राज्याच्या पातळीवर शिक्षण, विज्ञान आणि संस्कृती या क्षेत्रात सहकार्य करून आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षितता आणि विकासात भर घालणे. सार्वत्रिक शिक्षण आणि संस्कृती यांना नव्याने चालना देणे अशा पद्धतीने भारताचा सांस्कृतिक राजनय वाटचाल करताना दिसून येतो.

### ३.२.२ **राजनयाची कार्य :**

राजनयास विविध प्रकारची कार्य करावी लागतात. जगाच्या इतिहासात आणि राजदूत याची प्रतिमा शांततेचा संदेशदूत, अशी नोंदवण्यात आलेली आहे. ग्रीक नगर राज्यातील राजदूत म्हणून मान्यता मिळालेल्या ज्येष्ठ रोमन साम्राज्यातील प्रवक्ते बायझनटाईन साम्राज्यातील राजनयिक परंपरा आणि युद्ध व शांततेसंबंधीची क्युरॅनिक कुराण पद्धती या सर्वांमधील एकसमान बाब म्हणजे (दूत) राजनयिक अधिकाऱ्याबाबतची आदराची व त्याच्या सन्मानाची भावना होय. त्याला विनोदाने टेलिफोन गर्ल्स ऑफ हिस्ट्री, असेही म्हटलं जातं. राजदूत हे त्याच्या शासनाचे कान व डोळे समजले जातात. राजदूत आपल्या शासनासंबंधीत राष्ट्राच्या संदर्भात जगातील प्रमुख घडामोडी विषयी माहिती देत असतात. राजनयिक अधिकाऱ्याचे कार्य पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१. स्वराष्ट्रहिताचे रक्षण** (Functions of Diplomacy) **:**

प्रत्येक देश दुसऱ्या देशाच्या संदर्भात हित साधण्यासाठी विदेशाशी कायम स्वरूपाचे मैत्रीचे संबंध प्रस्थापित करीत असतो. आपल्या देशाच्या हिताला बाधा येईल, असे निर्णय विदेशातील सरकार घेणार नाही. या दृष्टीने राजकीय प्रयत्न करणे, तसे राष्ट्रीय हितास बाधक निर्णय घेतल्यास स्वराष्ट्रीय सरकारला कळविणे व सावध करणे, स्वागतकर्त्या राष्ट्राला त्याच्या निर्णयापासून परावृत्त करणे, हे कार्य राजनयिक संस्था करीत असते. यशस्वी राजनय तोच मानला जातो की जो इतरांना न दुखावता स्वराष्ट्र हितवर्धनाचे कार्य साधू शकतो. राजनयाच्या कुशल व्यवहाराने अनेक राष्ट्रांतील वाद किंवा तणाव (Tenction) नाहीसा केला जातो. इंग्लंडच्या इतिहासात राजपरिवाराच्या मध्यस्थीने इंग्लंड व फ्रान्स यांच्यातील राजकीय तणाव नष्ट झाल्याचे आढळून येते. अमेरिका व भारत यांच्यात 'राजकीय समाज' निर्माण करण्याचे कार्य किसिंजरच्या राजनयाने केलेले दिसून येते.

**२. युद्ध टाळणे :**

राजनय हा युद्धाचा पर्याय मानला जातो. राजनय अपशयी ठरल्यास युद्ध ही निश्चित घटना घडून येत असते. यशस्वी राजनय स्वहितासाठी युद्ध घडवून आणू शकतो किंवा तो कटाक्षाने टाळू शकतो. बिस्मार्कने जर्मनीच्या एकीकरणासाठी ऑस्ट्रियाशी युद्ध स्विकारताना इतर देश ऑस्ट्रिया-प्रशिया युद्धापासून

अलग राहतील या हेतूने यशस्वी राजनयिक प्रयत्न केले म्हणूनच जर्मन एकीकरणाचा त्याचा हेतू सफल झाला. बांगला देशाचा प्रश्न सोडविताना भारतीय राजनयज्ञाना जागतिक लोकमतापुढे आपल्या हस्तक्षेपाचे यथार्थ कारण स्पष्ट करून जगातील इतर राष्ट्रांना शक्य तो भारत-पाक संघर्षापासून अलिप्त ठेवले व आपले उद्दिष्ट साध्य केले व तद्नंतर युद्ध नको असल्याने संघिवार्तेचा मार्ग खुला केला ही राजनयाची भूमिका आपले राष्ट्रीय पार पाडण्यास सर्वच देशांना कुशलतेने पार पाडावी लागते.

**३. विदेशात प्रतिनिधित्व करणे :**

समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये प्रत्येक देशाच्या राजदूताचे प्रमुख कर्तव्य म्हणजे आपल्या राष्ट्राचे प्रतिनिधित्व करणे होय. राजनयिक अधिकारी हे आपल्या शासनाचे व जनतेचे प्रतिनिधित्व करत असतो. दोन राष्ट्राचे संबंध जोडताना राजनयिक अधिकारीला संबंधित राज्यातील प्रतिष्ठित व्यक्ती महत्त्वपूर्ण गट व सर्व क्षेत्रातील प्रमुख व्यक्तींशी संबंध प्रस्थापित करावे लागतात. या दृष्टीने उत्तम कौशल्य गुणवत्तापूर्ण हाताळणी आणि त्यासंबंधी अधिकाऱ्याचा प्रामाणिकपणा याची नितांत गरज असते. ज्या राज्यात राजनयिक अधिकाऱ्यला पाठवले आहेत त्या राज्याच्या लष्करी आणि राजकीय आर्थिक, व्यावसायिक, सामाजिक आणि सार्वजनिक जीवनाच्या बाजूंचे त्याला विस्तृत ज्ञान असले पाहिजे. त्याचबरोबर त्यांनी अत्यंत काळजीपूर्वक आणि जागरूक राहून योग्य राजनयिक भाषा आत्मसात केली पाहिजे. राजनयिक अधिकारी त्याला पाठवणाऱ्या राज्यांच्या राजकीय व्यवस्थेचे केवळ प्रतिनिधित्व करीत नाही तर इतर अनेक महत्त्वाच्या वैशिष्ट्यांचे तो प्रतिनिधित्व करतो. सर्व राजकीय आर्थिक व्यावसायिक आणि वैज्ञानिक प्रगतीच्या संदर्भातील घडामोडी वरती त्याची बारीक नजर असली पाहिजे.

**४. वाटाघाटी करणे :**

आंतरराष्ट्रीय संबंधाच्या व्यवस्थापनामध्ये राजनयिक अधिकाऱ्याचं महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे दोन अथवा अनेक राज्यांमधील समस्यांचे निराकरण करण्यासाठी तिचा वापर करणाऱ्या व्यक्तीद्वारे ही कला अधिक उन्नत आणि परिपूर्ण होत जाते. वाटाघाटी करण्यासाठी नि:शंकपणे उत्तम कौशल्याची गरज असते. विरोधी पक्षाला आपले मत किंवा दृष्टिकोन पटवून देण्यासाठी ज्ञान आणि तंत्र राजनयिक अधिकाऱ्याला अवगत असावी लागतात. इच्छित प्रमाणात आपले प्रश्न सोडवून घेण्याची कला राजनयिक अधिकाऱ्याकडे असली पाहिजे. प्रत्येक परिस्थितीत वाटाघाटी या मार्गाचा अवलंब केला जात नाही. काही वेळेस अन्य मार्गाचाही अवलंब करावा लागतो. चाईल्डस् म्हणतात की राजदूताचे मुख्य कार्य म्हणजे द्विपक्षीय बहुपक्षीय संधी करार यासाठी मसुदा तयार करणे गरजेचे असते. हे करार व संधी आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक स्वरूपाच्या असतात. सध्या मात्र द्विपक्षीय करारा ऐवजी बहुपक्षीय करारांना महत्त्व प्राप्त होत असल्यामुळे राजनयिक अधिकाऱ्याचे कार्य बऱ्याच प्रमाणात कमी होऊन राष्ट्र प्रमुख व परराष्ट्र मंत्र्याच्या कार्यात वाढ झाली आहे. राजदूतांचे हे पारंपारिक स्वरूपाचे कार्य समजले जाते.

राजनयिक अधिकाऱ्यांच्या माध्यमातून दोन राष्ट्रांमध्ये द्विपक्षीय बहुपक्षीय कराराद्वारे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय स्वरूपाचे संबंध प्रस्थापित करावे लागतात या सोबतच व्यापार औद्योगीकरण आधुनिक तंत्रज्ञानाचे हस्तांतरण व आयात निर्यात याबाबत महत्त्वपूर्ण कार्य करावे लागतात. त्या दृष्टीने राजनयिक अधिकाऱ्याची भूमिका महत्त्वाची मानली जाते वाटाघाटी द्वारे तह आणि मैत्रिचे करार याच व्यवस्थापन केले जाते. त्यासाठी वेगवेगळ्या टप्प्यावर चर्चा घडवून आणली जाते. काही वेळेस या वाटाघाटी दीर्घकाळ चालू राहतात. कोणताही निर्णय न घेता, न होता त्या संपतात किंवा काही वेळेस कराराचे अंतिम मसुदेही त्यातून तयार होतात. वाटाघाटी लगेच केल्या जात नाहीत. तत्पूर्वी राजनयिक अधिकारी बोलणी करतात. वाटाघाटीचा कार्यक्रम आणि त्यांच्याशी संबंधित विस्तृत माहितीची या पातळीवर चर्चा होते. राष्ट्रीय हितसंबंधाची जोपासना व त्याची सुरक्षितता याची विशेष काळजी घेतली जाते आणि राजनयिक अधिकारी आपल्या राज्यांच्या हितसंबंधाची जोपासना होईल. याबाबत दक्ष असतात या सर्व वाटाघाटीमध्ये राजनयिक अधिकारी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात आणि त्याद्वारे आपल्या राज्याचे परराष्ट्र धोरण अधिक रेखीव करण्याचा प्रयत्न करतात.

जागतिकीकरणामुळे वाढणाऱ्या दबावाच्या पार्श्वभूमीवर राजनयाच्या पडद्यामागे होणाऱ्या क्लुप्त्या या अधिकाधिक गुंतागुंतीच्या होत आहेत काही वेळेस विरुद्ध बाजूचे राजनयिक अधिकारी आर्थिक करार आणि आर्थिक मूल्यवर्धित होण्यासाठी अनेक तडजोडी एकत्रितपणे देऊ करतात, असे करताना राजनयिक अधिकारी आपल्या देशातील आर्थिक संघटनांचे आर्थिक हितसंबंध नजरेसमोर ठेवण्याची शक्यता असते या अर्थाने आंतरराष्ट्रीय संबंध वरील जागतिकीकरणाचा परिणाम विचारात घेता राजनयिक अधिकारी वर्गात अधिकाधिक अर्थतज्ज्ञाचा समावेश केला जात आहे. जी८, जी७, जी११ याबरोबरच असियान, युरोपीय संघ यासारखे आर्थिक गट ही राजनयाची निर्मिती आहे. साहजिकच राष्ट्राच्या कल्याणासाठी अशा प्रकारच्या आर्थिक समन्वयाला राजनयिक वर्तुळात एक नवी गती मिळाली आहे.

**५. अहवाल सादर करणे किंवा प्रतिवेदन :**

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये राजनयिक अधिकाऱ्याचे तिसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे संबंधित राष्ट्रातील घडामोडीचा इतिवृत्तांत अहवाल व निवेदन आपल्या देशात सादर करावे लागतात. आपल्या राष्ट्राच्या धोरणांची केवळ अंमलबजावणीच नाही तर असे धोरण तयार करण्यासाठी आवश्यक पूरक माहिती राजनयिक अधिकारी आपल्या राष्ट्राला पुरवत असतात. त्या देशातील शासन लोकप्रतिनिधी प्रसारमाध्यमे विद्वान यांच्या प्रतिक्रिया आपल्या राष्ट्राला कळवण्याबरोबरच तेथील सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचे विश्लेषण करून त्याचा परराष्ट्र धोरण ठरविताना कसा अवलंब करता येईल, याविषयीची माहिती आपल्या राष्ट्राला पाठवितात. हा प्रतिनिधी कोणत्या प्रकारची माहिती पाठवतो यावर दोन राष्ट्रांमधील संबंध अवलंबून असतात त्या राष्ट्रात घडलेली अशी एखादी घटना की जी दोन्ही देशाच्या संबंधावर

ती सकारात्मक किंवा नकारात्मक दृष्टिकोनातून परिणाम करू शकते, अशा घटनेची सविस्तर माहिती राष्ट्र प्रमुख परराष्ट्र मंत्र्याचे आपल्या राष्ट्राशी संबंधित निवेदन राजनयिक अधिकारी आपल्या राष्ट्राला कळवितात. या सर्व कार्यासाठी राजनयिक प्रतिनिधीला ज्या देशात नियुक्ती होईल, त्या देशाची उद्दिष्टे सामर्थ्याविषयी सविस्तर माहिती असावी लागते. उदाहरणार्थ, १९४० मध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या काळात इंग्लंडमधील अमेरिकेचे राजनयिक अधिकारी जोसेफ सी. केनेडी यांनी अमेरिकेच्या अध्यक्षांना एकंदर परिस्थितीसंबंधी दिलेली माहिती ब्रिटन युद्धात पराभूत झाला, अशी होती परंतु अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी अन्य सुत्राद्वारे मिळवलेल्या अचूक माहिती नुसार ब्रिटन युद्धात पराभूत झालेला नाही, अशी होती त्यामुळे परराष्ट्र धोरणासंबंधी पुढे होणारी चूक घडली नाही.

**६. सांस्कृतिक संबंध व आर्थिक सहयोग :**

'राजनय' ही केवळ राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्याचे कार्य करणारी यंत्रणा, आजच्या काळात राहिलेली नसून दोन देशांच्या सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा सखोल अभ्यास करून दोन देशांच्या सांस्कृतिक ऐक्य व आर्थिक सहयोग प्रस्थापित करण्याचे कार्य राजनयाला करावे लागते. दुसऱ्या देशातील जनतेच्या मनात स्वदेशातील जनता व सरकारविषयी आदर, सद्‌भावना निर्माण करण्यास सांस्कृतिक संबंध प्रस्थापित जनता व सरकारविषयी आदर, सद्‌भावना निर्माण करण्यास सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करण्याची गरज आजच्या काळात निर्माण झालेली आहे. तसेच वाढते उद्योगधंदे कारखाने, शास्त्रीय संशोधने यामुळे राष्ट्रीय जीवनाच्या गरजा वाढल्या असून कोणताही देश आपल्या राष्ट्रीय गरजा पूर्ण करण्यास स्वयंपूर्ण राहिलेला नाही. त्याला इतर देशांकडून वस्तू, पैसा, कच्चा, माल किंवा औद्योगिक यंत्रसामुग्री इत्यादीविषयक मदत प्राप्त करावी लागते. अगदी अमेरिकेसारख्या पूर्ण-विकसित राष्ट्राला आपल्या उद्योग, व्यवसायांसाठी नव्या बाजारपेठा शोधण्याची गरज निर्माण झालेली आहे व त्यासाठी अल्पविकसित राष्ट्रांशी आर्थिक संबंध प्रस्थापित करणे व स्थिर ठेवणे हे कार्य अमेरिकेला करावे लागत आहे. यंत्रसामुग्री, युद्ध साहित्य, आंतरराष्ट्रीय अधिकोष, मुद्रा व्यवहार, आर्थिक सहाय्य, अन्नधान्य, औषधी-द्रव्य, पेट्रोल, इत्यादी विविध बाबतीत निर्माण झालेले परस्परावलंबित्व आर्थिक संबंध प्रस्थापित करण्यास कारण ठरले आहे. म्हणून राजनयिक कार्याबरोबरच व्यापार वाणिज्यीय कार्ये, आर्थिक हितसंबंधाचे रक्षण व संवर्धन करण्याचेही कार्य राजनयाच्या कक्षेत एक प्रमुख कार्य म्हणून संबोधले जाते.

**७. हितसंबंधाचे संरक्षण करणे किंवा जपणूक करणे :**

राजनयाचे प्रमुख कार्य व उद्दिष्ट म्हणजे आपल्या स्वराष्ट्राचे हितसंबंध जोपासणे हे होय. हा दृष्टिकोन आंतरराष्ट्रीय नैतिकतेच्या दृष्टीने एक अर्थाने स्वार्थी संकुचित वाटत असला तरी राजनय याचा मात्र हा प्रमुख आधार असतो. याकरिता राजनयिक प्रतिनिधी परराष्ट्रीय देशात आपल्या राष्ट्राची बाजू विविध आघाड्यावर मांडत असतो. आपले राष्ट्रीय हितसंबंध साध्य करण्याकरिता दुसऱ्या राष्ट्रांमध्ये

अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याबरोबरच परराष्ट्रात स्थायिक झालेल्या आपल्या राष्ट्रातील नागरिकांचे, उद्योगपती, व्यावसायिकांचे हित साध्य करण्याकरिता राजनयिक प्रतिनिधी त्यांना मार्गदर्शन सहकार्य व संरक्षण पुरवित असतात. प्रादेशिक सरकार व नागरिकांकडून जर त्यांच्यावर अन्याय होत असेल तर तो दूर करण्याचे कामाजनयिक प्रतिनिधींना करावे लागते. आपल्या देशातील संबंधित देशात काही कामानिमित्त व्यापारी वर्ग गेलेला असेल तसेच काही विद्यार्थी सहली करता गेलेले असतील तर त्यांना तेथे कोणत्याही अडचणी येऊ नये यासंबंधी राष्ट्राकडून त्यांना वाईट वागणूक मिळू नये, याकरिता राजनयिक प्रतिनिधी काळजी घेत असतात. राष्ट्रीय हितसंबंधाची जपणूक करणे हे राजनयिक प्रतिनिधीचे प्रमुख कार्य असल्याकारणाने हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या त्याच्या वागण्यात व बोलण्यात अंतर पडले तरी चालेल हे एक प्रकारे गृहीत धरले जाते. चाणक्य या संदर्भात असे म्हणतात की राजनयिक प्रतिनिधीने साम-दाम-दंड-भेद अशा उपायांचा अवलंब करून राष्ट्रीय हित साध्य करायला हवे. परराष्ट्र धोरण आणि राजनयाला राष्ट्रीय हितसंबंधाच्या जपणूकीचे प्रमुख साधन मानतात. सन २००० मध्ये फिजीमधील महेंद्र चौधरी यांचे शासन तेथिल स्थानिक बंडखोरांनी असंविधानीक मार्गाने उलथून टाकल्यानंतर फिजीमधील भारतीय नागरिकांच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी तसेच सप्टेंबर २००१ मध्ये अमेरिकेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर गैरसमुजतीतून तेथील शीख समुदायावर होत असलेल्या हल्ल्यापासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी राजनयिक पातळीवर त्वरित पावले उचलण्यात आल्याचे दिसते.

**५) इतर कार्य :**

वरील प्रमुख कार्याशिवाय राजनयास काही अन्य स्वरूपाची कार्य पाडावी लागतात ती पुढीलप्रमाणे -

१) राजनयास परराष्ट्र सरकारशी गैर शासकीय पद्धतीने ही कार्य करून घेता येतात. उदा. विदेशी शासनाच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक धोरणांचे निरीक्षण करणे, आपल्या देशाच्या हिताच्या दृष्टीने त्याचा अर्थ लावणे, विश्लेषण व परीक्षण करून ते शासनास कळविणे.

२) राजनयाला काही कार्य ही कौटुंबिक स्वरूपाची असतात. त्याकरिता विदेशी शासनाशी संपर्क राखण्याची आवश्यकता नसते. उदा. आपल्या देशातील नागरिकांचे जन्म, मृत्यु, विवाह इत्यादीची नोंद ठेवणे.

३) कांही प्रसंगाममध्ये राजनयास परराष्ट्र शासनाशी सरळ संपर्क साधावा लागतो. उदा. अपराधी, गुन्हेगारांसंदर्भात, नागरिकांना पारपत्र प्रदान करणे, त्यांचे विधिवत करणे, त्यांच्या जिवीताचे व मालमत्तेचे संरक्षण करणे इत्यादी संबंधीची कार्य. एकंदरीत राजनयज्ञांना अशी विविध स्वरूपाची कार्य पार पाडावी लागतात.

**❑ राजनयाची प्रस्तुतता :**

राजनयाच्या तंत्रापुढे आजच्या संचारक्रांतीने व समकालीन जागतिक राजकारणाच्या बदलत्या

परिस्थितीतीमध्ये आव्हाने निर्माण करून राजनयाच्या एकूण प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण केलेले दिसत असले तरी राजनयास प्रस्तुत करणारे अनेक घटक कार्यरत असलेले दिसतात. समकालीन जग हे आण्विक शस्त्रास्त्रांनी सज्ज झालेले आहे. आण्विक युद्धाचा सामना जगास करावा लागला तर या पृथ्वीवर मानवप्राणी शिल्लक राहणार नाही. म्हणून आईन्स्टाइन या संदर्भात म्हणाले होते. तिसरे महायुद्ध कोणत्या शस्त्रास्त्रांनी लढले जाईल, हे मला सांगता येणार नाही. मात्र चौथे महायुद्ध हे नक्कीच दगड-धोंडे व काठ्यांनी लढले जाईल. म्हणजे जगात तिसरे महायुद्ध घडून आले तर संपूर्ण पृथ्वीतलाचा विनाश होण्याची भीती जागतिक मानवजातीवर आहे. अशा परिस्थितीत राजनयाकडेच आण्विक युद्धापासून जगास वाचवण्याचे साधन म्हणून पाहिले जाते.'' त्यामुळे जागतिक शांतता प्रस्थापित करण्याचे महत्त्वाचे उत्तरदायित्व राजनयाकडे आहे. त्यामुळे समकालिन संदर्भात राजनयाचे महत्त्व संपलेले नसून ते अधिक वाढले आहे. जागतिक राजकारणात संवादाचे माध्यमातून स्पष्टपणे जाणवते की, राज्याच्या प्रत्यक्ष व्यवहारात अनेकवेळा राज्या-राज्यांमधील राजनयिक संबंध अनेकवेळा तुटत असले तरी ही परिस्थिती कायम ठेवण्याकडे राज्यांचा कल आढळत नाही. तर गंभीर संघर्षाचे प्रश्न असणारे शत्रू राष्ट्रही संवादाकरिता पुढे येताना आढळतात. भारत-चीन व भारत-पाक यातील द्विपक्षीय चर्चा हे याचे उत्तम उदाहरण होय. या राष्ट्राकडून संवादा करिता राजनयिक व्यवस्थेचाच प्रभावी उपयोग करून घेतलेला दिसतो.

द्विधृवीय राष्ट्रांमधील समन्वयाचे माध्यम म्हणून राजनयिक व्यवस्थेच्या दृष्टीने एक प्रमुख आव्हान वाटत असली तरी राजनयिक यंत्रणेनेचे दोन महासत्तांमधील संवादाची कोंडी फोडण्याचे कार्य पार पाडलेले दिसते. उदा. अमेरिका व सोव्हिएत रशियात शीत युद्धाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली होती व जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर होते. त्यावेळी ही कोंडी फोडण्याचे महान कार्य राजनयिक अधिकाऱ्यांनी केले. उदा. चीन, अमेरिका, सोव्हिएत रशिया, अमेरिका व द. कोरिया, चीन व जपान हे होय. संचार वळणाच्या साधनात झालेल्या प्रचंड वाढीमुळे कोणतेही राज्य जागतिक प्रवाहापासून स्वत:ला वेगळे ठेवू शकत नाही. आपल्या गरजांच्या पूर्ततेकरिता अगदी शत्रुराष्ट्रांशी ही संबंधीत राहणे एक अपरिहार्य गरज म्हणून पुढे आली आहे. त्यामुळे सर्वच राष्ट्रांना सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक संबंधाची वाढ करणे आवश्यक ठरत आहे. ते राजनयाच्या माध्यमातून प्रत्यक्षात येऊ शकते.

## ३.३ सारांश :

शांततापूर्ण मार्गाद्वारे राष्ट्रहिताची वृद्धी करणे, हा राजनयाचा प्राथमिक हेतू असतो. जागतिक शांतता प्रस्थापित करण्याचे उत्तरदायित्व आज राजनयावर येऊन पडले आहे. परराष्ट्र धोरण हे एक साध्य असून राजनय हे त्याचे केवळ एक साधन असते. सत्ता संतुलन पद्धतीत राजनयाचे कार्य अधिक क्षमतेने होऊ शकते. समकालीन जगामध्ये आजचा राजनय हा राष्ट्र प्रमुखांच्या (नियंत्रित) प्रयत्नांशी संबंधित झाला आहे. त्यास बहुतांशी संमेलनीय व लोकतंत्रात्मक स्वरूप प्राप्त झाले आहे. आज जागतिक राजकीय व्यवस्थेचे स्वरूप हे केवळ राजकीय न राहता त्यास सांस्कृतिक, आर्थिक अंगांनीही प्रभावित केलेले दिसते.

### ३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ. :

१) द्विपक्षीय : दोन देशातील

२) बहुपक्षीय : अनेक देशांमधील

३) विदेश : परराष्ट्र

४) विदेशमंत्री : परराष्ट्र मंत्री

### ३.५ स्वयं अध्ययन प्रश्न आणि उत्तरे :

### ३.५.१ स्वयं अध्ययन प्रश्न – १

१) राजनय म्हणजे काय?

२) सर अर्नेस्ट सातोव यांनी कोणता ग्रंथ लिहिला?

**उत्तरे :**

१) परराष्ट्र धोरणाची अंमलबजावणी ज्या प्रक्रियेद्वारे होते ती प्रक्रिया म्हणजे राजनय होय.

२) द गाईड टू डिप्लोमॅटिक प्रॅक्टिस

### ३.५.२ स्वयं अध्ययन प्रश्न – २

**रिकाम्या जागा भरा.**

१) ........... यांनी असे म्हटले आहे की, राजनयिक अधिकाऱ्याने साम, दंड, भेद अशा उपायाचा अवलंब करून राष्ट्रहित साध्य करावयास हवे.

२) दोन किंवा दोन पेक्षा अधिक देशाच्या प्रतिनिधीमध्ये होणारी समझोत्याची प्रक्रिया म्हणजे ......... होय.

३) राजदूत हे त्याच्या शासनाचे ........ व ......... डोळे समजले जातात.

**उत्तरे :**

१) कौटिल्य, २) राजनय, ३) कान व डोळे

### ३.६ सरावासाठी स्वाध्याय :

**पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) राजनयाचा अर्थ सांगून राजनयच्या प्रकारांची सविस्तर चर्चा करा.

२) राजनयिक अधिकाऱ्याची कार्ये सांगून त्याचे मूल्यमापन करा.

३) आंतरराष्ट्रीय राजकारणात राजनयाचे महत्त्व स्पष्ट करा.

## ३.७ टिपा लिहा.

१) गुप्त राजनय

२) सांस्कृतिक राजनय

३) संसदीय राजनय

४) राजनयाची प्रस्तुतता

५) राजनय आणि परराष्ट्र धोरण

## ३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) रायपूरकर वसंत, (२००६) – 'आंतरराष्ट्रीय संबंध', मंगेश प्रकाशन, नागपूर.

२) पेंडसे अरुणा, सहस्रबुद्धे उत्तरा (२००८) – 'आंतरराष्ट्रीय संबंध शीत युद्धोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण', ओरिएंट ब्लॅकश्वान.

३) बसू रूमकी संपा. (२०१७) – 'आंतरराष्ट्रीय राजकारण संकल्पना, सिद्धांत आणि समस्या', सेज प्रकाशन, नवी दिल्ली.

४) रासम वासंती, करियप्पा खापरे (२०११) – 'आंतरराष्ट्रीय राजकारण आणि संबंध', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५) प्रा. दी. वा. इंदा पवार (२००८) – 'राजनय', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

६) Alexander, P. C. (1991) - My Years with Indira Gandhi, New Delhi : Vision, Singh, Bahadur, 1979. The Other India, New Delhi : Arnold Heinemann.

७) Bandyopodhyay, J. 1979. The Making of India's Foreign Policy, New Delhi : Allied.


❍❍❍

**घटक ४**

# नवीन जागतिक व्यवस्था

## (New World Order)


४.० **उद्दिष्टे**

४.१ **प्रस्तावना**

४.२ **विषय विवेचन**

४.२.१ **शीतयुद्धोत्तर आंतरराष्ट्रीय व्यवस्था**

४.२.२ **प्रादेशिक संघटना – आसियान, युरोपीय संघ.**

४.२.३ **आर्थिक संघटना – जागतिक व्यापार संघटना, ब्रिक्स**

४.३ **सारांश**

४.५ **पारिभाषिक शब्द, शब्दार्थ**

४.६ **स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे**

४.७ **सरावासाठी स्वाध्याय**

४.७ **अधिक वाचनासाठी पुस्तके**


### ४.० उद्दिष्टे :

१) या घटकांच्या अभ्यासानंतर जागतिक शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर जी नवी आंतरराष्ट्रीय व्यवस्था उदयास आली तिचे स्वरूप समजावून घेता येईल.

२) प्रादेशिक संघटनांचा उदय त्यांचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्व तसेच आसियान, युरोपीय संघ या प्रादेशिक संघटनांचा उदय, उद्दिष्ट्ये व त्यांचे महत्व समजावून घेता येईल.

३) आर्थिक संघटनांचा उदय त्यांचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्व तसेच जागतिक व्यापारी संघटना, ब्रिक्स या संघटनांच्या उदयाची पार्श्वभूमी, उद्दिष्ट्ये आणि जागतिक राजकारणातील महत्व अभ्यासता येईल.

## ४.१ प्रास्ताविक :

आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास हा महत्वाचा समजला जातो. कारण जागतिक राजकारणामध्ये घडत असलेल्या प्रत्येक घटनेचा परिणाम हा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष हा घडत असतो. जगामधील आज कोणताही देश कितीही श्रीमंत असला तरी त्याला त्याच्या कोणत्या ना कोणत्या गरजेच्या पुर्ततेसाठी दुसऱ्या राष्ट्रावर अवलंबून रहावे लागते. आज जगामध्ये प्रत्येक देश स्वावलंबी राहिलेला नसून तो परस्परावलंबी झालेला आहे. त्यातूनच राष्ट्रांराष्ट्रामध्ये संबंध प्रस्थापित होत असतात या संबंधाचा अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये केला जातो.

राष्ट्रा राष्ट्रातील संबंधाच्या पार्श्वभूमीवर प्रस्तुत प्रकरणामध्ये आपणास शीतयुद्धोत्तर आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचा उदय आणि त्याचे परिणाम अभ्यासने महत्वाचे वाटते. शीतयुद्धाला खऱ्या अर्थाने द्वितीय महायुद्धानंतर प्रारंभ झाला. शीतयुद्धातील अनेक चढउतार जगाने अनुभवले आहेत. परंतु शीतयुद्धोत्तर जागतिक व्यवस्था वैशिष्ट्य पूर्ण मानली जाते. जग जसे अनेक बाबतीत मुक्त झाले तसेच अनेक नव्या समस्यांना त्याने जन्मही दिल्याचे दिसते. इ. सन १९९० नंतर विशेषत: मिखाईल गोर्बाचेव्ह यांच्या रशियातील उदयाबरोबर शीतयुद्धोत्तर जागतिक घडामोडींना वेगाने चालना मिळाल्याचे दिसते. 'पेरिस्त्रोईका व ग्लासनोस्त' म्हणजेच पुर्नरचना व स्वातंत्र्य या शब्दांनी संपूर्ण जग भाराऊन गेले होते. द्विध्रुवीय जगाचा अंत होऊन एक ध्रुवीय जगाचा उदय झाला, जागतिक राजकारणामध्ये अमेरिकेचे वर्चस्व वाढले. अमेरिका केंद्रित जागतिक राजकारण असे म्हटले गेले. त्यानंतर बहुध्रुवीय राजकारणामध्ये त्याचे रूपांतर झाल्याचे आपणास म्हणावे लागेल. सार्क, आसियान, युरोपीय संघ, तसेच जागतिक व्यापारी संघटना, ब्रिक्स संघ यांचा नव्याने झालेला उदय आणि त्याच्या कार्यामुळे १९९० नंतर जागतिक राजकारणामध्ये होत असलेले बदल यांचा अभ्यास नविन जागतिक व्यवस्था समजून घेण्यासाठी महत्वाचा ठरत आहे.

## ४.२ विषय-विवेचन :

### शीतयुद्धाचा अर्थ :

द्वितीय महायुद्धाची आग विझते न विझते तोच इ. स. १९४६ मध्ये शीतयुद्धाला प्रारंभ झाला. त्या वेळेपासून ह्या नवीन स्वरूपाच्या युद्धाने आंतरराष्ट्रीय राजकारणाला प्रभावित केले. आज शीतयुद्ध चालूच आहे परंतू त्याचे स्वरूप मात्र बदलले आहे. शीतयुद्धाची मुख्यत्वेकरून सुरूवात द्वितीय महायुद्धानंतर मानली जाते.

''शीतयुद्ध म्हणजे सत्तेसाठी चाललेली स्पर्धा होय.'' शीतयुद्ध हा एक मनोवैज्ञानिक संघर्ष आहे.

''शीतयुद्ध म्हणजे दोन परस्पर विरोधी राजकीय पद्धती किंवा विचारधारांमध्ये चाललेला संघर्ष होय.'' एनसायक्लोपिडीया ब्रिटानिकामध्ये शितयुद्धाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ''द्वितीय महायुद्धानंतर रशिया व अमेरिका यांच्यात युद्धकाळानंतर मित्रत्वाऐवजी खुले शत्रुत्व निर्माण होऊन जागतिक राजकारणाचे द्विध्रुवीकरण घडवून आणणारी आंतरराष्ट्रीय राजकारणातील अशी स्थिती म्हणजे शीतयुद्ध होय.''

**पहिल्या महायुद्धापूर्वीची विश्वरचना :**

पहिल्या महायुद्धापूर्वीची युरोपीय सत्तासमतोलावर आधारित विश्वरचना ही एकोणीसाव्या शतकापासून टिकून होती. नेपोलियन बोनापार्टच्या पराभवानंतर ही विश्वरचना निर्माण झाली. ही युरोपमधील इंग्लंड, फ्रान्स बेल्जियम, ऑस्ट्रिया, नेदरलँडस यासारख्या साम्राज्यवादी सत्ताभोवती केंद्रीत होती. या विश्वरचनेचे नेतृत्व इंग्लंडसारख्या महासत्तेकडे होते. इंग्लंडचे आरमार, जगभर पसरलेले साम्राज्य या जोरावर एकोणीसाव्या शतकात युरोपीय राजकारणातील सत्ता समतोल टिकवून धरण्याची जबाबदारी इंग्लंडवर होती. ही विश्वरचना युरोपीय राष्ट्रांच्या साम्राज्यवादी हितसंबंधाना पूरक असल्यामुळे ती टिकविण्यासाठी युरोपीय राष्ट्रांनी सामूहिक प्रयत्न केले. ही जागतिक व्यवस्था पहिल्या महायुद्धापर्यंत टिकून होती.

**पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धादरम्यानची विश्वरचना :**

दोन महायुद्धांच्या दरम्यान (१९१९-१९३९) युरोप खंडात राजकीय व आर्थिक अस्थिरता निर्माण झाली होती. पहिल्या महायुद्धानंतर जर्मनी ऑस्ट्रिया, हंगेरी, रशिया, तुर्कस्थान यांची साम्राज्ये संपुष्टात आली. पहिल्या महायुद्धामुळे प्राणहानी व वित्तहानी फार मोठ्या प्रमाणात झाली. आंतरराष्ट्रीय राजकारणावर राष्ट्रसंघाचे नियंत्रण राहिले नाही त्यामुळे युरोप खंडात राजकीय अस्थिरता निर्माण झाली. दरम्यान हिटलर, मुसोलिनी या हुकूमशाहांनी आक्रमक राष्ट्रवाद आणि साम्राज्य विस्ताराचे धोरण स्वीकारल्यामुळे दुसऱ्या महायुद्धाला तोंड द्यावे लागले.

**शीतयुद्धकालीन द्विध्रुवीकरण विश्वरचना :**

ही विश्वरचना दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि सोविएत रशियादरम्यान जो द्विध्रुवी सत्तासमतोल निर्माण झाला त्यावर आधारित होती. या दोन महासत्तांच्या दरम्यान सुरू झालेले शीतयुद्धाचे राजकारण या विश्वरचनेच्या केंद्रस्थानी होते. साम्यवादाच्या वाढत्या जागतिक प्रसाराला थोपविण्यासाठी अमेरिकेने साम्यवादाच्या परिरोधनाचे धोरण आखले. या धोरणाअंतर्गत युरोप आणि आशिया खंडात सामुहिक सुरक्षिततेच्या तत्वावर आधारित काही लष्करी संघटनांची निर्मिती करण्यात आली. उदा. नाटो, सिटो, सेन्टो, सोविएत रशियानेदेखील लष्करी करार (वार्साकरार) करून आपल्या समर्थक राष्ट्रांची संघटना तयार केली. त्यामुळे जागतिक राजकारणाच्या ध्रुवीकरणाची प्रक्रिया गतिशील बनली. आर्थिक आणि लष्करी सामर्थ्यांच्या जोरावर आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव पाडण्यासाठी अमेरिका आणि सोविएत रशिया दरम्यानची चढाआढ हे या विश्वरचनेचे महत्वाचे वैशिष्ट होते. या विश्वरचनेत संयुक्त राष्ट्रसंघटना तसेच अलिप्ततावादी राष्ट्रांची संघटना यासारखी इतर सत्ता केंद्रे असली तरी अमेरिका आणि सोविएत रशिया भोवतीच ही विश्वरचना केंद्रीत होती. या विश्वरचनेत नेतृत्व या दोन महासत्तांकडे होते. भांडवलवादी आणि साम्यवादी गटातील परस्पर असहकार्य, अविश्वास, शस्त्रास्त्र स्पर्धा, प्ररोधन, दहशतीचा समतोल ही या विश्वरचनेची आणखी काही वैशिष्टे सांगता येतील. यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील स्थैर्य टिकून राहिले. ही विश्वरचना सोविएत रशियाच्या विघटनापर्यंत (१९९१) टिकून होती.

### ४.२.१ शीतयुद्धोत्तर आंतरराष्ट्रीय व्यवस्था :

सन १९९० च्या दशकात आंतरराष्ट्रीय राजकारणात आमूलाग्र बदल घडून आले. सोविएत रशियाचे विघटन होऊन ४५ वर्षे चाललेल्या शीतयुद्धाचा शेवट घडून आला. द्विध्रुवीकरणावर आधारित शीतयुद्धकालीन सत्तासमतोलाची व्यवस्था कोसळली. सत्तासमतोल, दहशतीचा समतोल या संकल्पना मागे पडल्या आणि शीतयुद्धकालीन लष्करी संघटनेचे करार (नाटो सोडून) विसर्जित झाले. राजकीय, लष्करी हितसंबंधाचे महत्व कमी होऊन आर्थिक हितसंबंधाच्या संरक्षणाला प्राधान्य प्राप्त झाले. आर्थिक हितसंबंधाच्या सरंक्षणात विभागीय व्यापार संघाची भूमिका वाढली. पश्चिम आणि पूर्वजर्मनीचे एकीकरण घडून आले. उत्तर आणि दक्षिण कोरियाच्या एकीकरणासाठी वाटाघाटी सुरू झाल्या. अफगाणिस्तानमधून सोविएत रशियाने सैन्य काढून घेतल्यामुळे १९९० पर्यंत तसेच इराण-इराक युद्धाचा शेवट घडून आल्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील संघर्षाचे वातावरण शिथिल होण्यास मदत झाली. आंतरराष्ट्रीय राजकारणात लोकशाहीकरण, निशस्त्रीकरण, पर्यावरण आणि मानवी हक्कांचे संरक्षण यासाठी चळवळी तीव्र झाल्या.

**नवीन विश्वरचना :**

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या महत्वपूर्ण बदलामुळे एक नवीन विश्वरचना आकाराला आली. या विश्वरचनेचे स्वरूप कोणते आहे. याविषयी अभ्यासकामध्ये एकमत नाही. सोविएत रशियाच्या विघटनानंतर अमेरिकेचा एकमेव महासत्ता म्हणून उदय झाल्यामुळे नवीन विश्वरचना एकध्रुवीय आहे असे मत काही अभ्यासकांचे आहे. याउलट अमेरिका जरी लष्करीदृष्ट्या महासत्ता असली तरी आर्थिक क्षेत्रात अमेरिकेच्या नेतृत्वाला जपान, जर्मनी, युरोपीयन महासंघ, आशियान यासारख्या नवीन सत्ता केंद्रांकडून आव्हान असल्यामुळे नवीन विश्वरचना अनेक सत्ता केंद्राचे अस्तित्व असणारी बहुकेंद्रीय व्यवस्था आहे असे मत काही अभ्यासक मांडतात.

सन १९९१ मध्ये अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश (सिनियर) यांनी अमेरिकेचे नवीन विश्वरचनेचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांची नवी विश्वरचना पुढील पाच तत्वावर आधारलेली होती.

१) जागतिक राजकारणाचे नेतृत्व अमेरिकेकडे. अमेरिका हे विश्वरचनेचे केंद्र राहील.

२) आंतरराष्ट्राय कायदा आणि सामुहीक सुरक्षा तत्वाला महत्व.

३) संयुक्त राष्ट्र संघटनेची महत्वाची जबाबदारी.

४) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेसाठी मोठ्या राष्ट्रामध्ये सहकार्य.

५) अण्वस्त्रांच्या वापराला आळा.

अशाप्रकारे विश्वरचनेची कल्पना प्रथम सन १९४५ मध्ये अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी रूझवेल्ट यांनी मांडली होती. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेसाठी रूझवेल्ट यांनी अमेरिका आणि सर्व राष्ट्रांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एखाद्या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या पुढाकारावर भर दिला होता.

शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आकाराला आलेल्या नवीन विश्वरचनेचे स्वरूप जाणून घेण्यासाठी या विश्वरचनेची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीप्रमाणे.

**१) एक ध्रुवीय विश्वरचना :**

ज्या विश्वरचनेमध्ये एका राष्ट्राचे प्राबल्य असते. त्याला एक ध्रुवीय विश्वरचना असे म्हणतात. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे सुत्र हे त्या बड्या राष्ट्राच्या हाती असते आणि आंतरराष्ट्रीय राजकारणातील घडामोडीवर त्या राष्ट्राचा सर्वाधिक प्रभाव असतो. ते राष्ट्र आंतरराष्ट्रीय घडामोडीच्या केंद्रस्थानी असते. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर अशा प्रकारची विश्वरचना निर्माण झाली असून अमेरिका आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी असल्याचा काही अभ्यासक दावा करतात. या अभ्यासकांच्या मते –

१) सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर अमेरिका ही एकमेव महासत्ता ठरली आहे. अमेरिकेची बरोबरी करू शकेल असे दुसरे सत्ता केंद्र अस्तित्वात नाही.

२) लष्करी व आर्थीक सामर्थ्य, विज्ञान-तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानातील प्रगतीच्या आधारावर जागतिक राजकारणाचे नेतृत्व करण्याची क्षमता फक्त अमेरिकेकडे आहे.

३) शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर भांडवलवादी लोकशाही ही जगातील सर्वात प्रभावशाली विचारसरणी बनली असून या विचारसरणीचे प्रतिनिधित्व अमेरिकेकडे आहे.

४) अमेरिकेच्या आर्थिक आणि लष्करी सामर्थ्याचा प्रभाव हा स्थानिक किंवा विभागीय नसून तो वैश्विक आहे.

अमेरिकेच्या तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश (सिनिअर) यांनी सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर विश्वरचनेची घोषणा केली होती. ही विश्वरचना एक ध्रुवीय विश्वरचनेच्या कल्पनेवर आधारित आहे. या विश्वरचनेत अमरिकेने जगाचे नेतृत्व करावे. अशी बुश यांना अभिप्रेत होते. याच आधारावर अमेरिकेने आपली धोरणे देखील आखलेली दिसतात. सन १९९१ ते २००६ पर्यंतच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील विविध घडामोडींचा आढावा घेतला तर शीतयुद्धोत्तर विश्वरचना एकध्रुवीय असल्याचे स्पष्ट संकेत मिळतात. या पंधरा वर्षाच्या काळात अमेरिकेची एकाधिकारशाही वाढलेली दिसते. अमेरिकेच्या या वाढत्या एकाधिकारशाहीला शह देण्यात संयुक्त राष्ट्र संघटनेला अपयश आले आहे. १९९१ च्या खाडी युद्धात इराक-कुवेत संघर्षात इराक विरूद्ध जी लष्करी कारवाई करण्यात आली तिचे नेतृत्व अमेरिकेकडे होते.

बोस्निया आणि सर्बिया येथील वांशिक हिंसाचार थांबवण्यासाठी सन १९९५ व १९९९ मध्ये झालेले लष्करी हल्ले नाटो या अमेरिकेच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या संघटनेनेच केले होते. ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेवर झालेल्या दहशतवादी हल्याचा सूत्रधार व अल कायदा या संघटनेचा सर्वेसर्वा ओसामा बिन लादेन याला अफगणिस्तानातील तालिबान राजवटीने आश्रय दिल्याच्या संशयावरून अफगाणिस्तानवर अमेरिका व तिच्या मित्रराष्ट्रांनी लष्करी हल्ले केले. २००१ नंतर जागतिक दहशतवादा विरूद्ध अमेरिकेने जे

युद्ध पुकारले आहे त्या नावाखाली कोणत्याही सार्वभौम राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्याचा सपाटा अमेरिकेने सुरु केला आहे.

सन २००३ मध्ये इराकमधून सद्दाम हुसेन यांना सत्तेवरून हटविण्यासाठी केलेली लष्करी कारवाई हा अमेरिकेच्या एकाधिकारशाहीचा सर्वोच्च नमुना म्हणता येईल. आंतरराष्ट्रीय राजकारणातील अमेरिकेची सध्याची भूमिका ही एखाद्या स्वयंघोषित विश्वरक्षणकर्त्यांची आहे आणि त्यासाठी अण्वस्त्रे बाळगण्याचा अधिकार केवळ आपल्याला व आपल्या मित्र राष्ट्रांना (इंग्लंड, फ्रान्स) आहे. ही अमेरिकेची भूमिका आहे. या सर्व उदाहरणावरून अमेरिकेची वाढती एकाधिकारशाही स्पष्ट होते. अमेरिकेची भूमिका जरी विश्वसंरक्षणकर्त्यांची असली तरी अमेरिकेने केवळ अशाच वेळी हस्तक्षेप केला. ज्यावेळी अमेरिकेचे राष्ट्रीय हितसंबंध गुंतले आहेत किंवा धोक्यात आले आहेत.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांना अफगाणिस्तान, पाकिस्तान, इराक इत्यादी देशातील आपले लष्कर २०१४ पर्यंत काढून घेऊन तेथे आपल्या नियंत्रणाखाली चालणारी सरकारे आणून आपले राजकीय व आर्थिक वर्चस्व टिकवायचे आहे. यावरून अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात आणि प्रत्यक्ष कृतीत दुटप्पीपणा आणि विरोधाभास आढळून येतो. यावरून अमेरिकेची एकाधिकारशाहीची धोरणे जागतिक राजकारणातील बहुतेक राष्ट्राच्या लक्षात आलेली आहेत.

**२) बहुध्रुवीय विश्वरचना –**

एकध्रुवीय विश्वरचनेचा विचार हा बहुध्रुवीय विश्वरचनेच्या विरोधी आहे. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आकाराला आलेली नवी विश्वरचना ही अमेरिका केंद्रित एक ध्रुवीय नसून सत्तेची अनेक केंद्रे असणारी बहुध्रुवीय विश्वरचना असल्याचे मत अनेक अभ्यासक मांडतात. बहुध्रुवीय विश्वरचनेचे समर्थन भारत, चीन, रशिया यासारखी राष्ट्रे करतात. बहुध्रुवीय विश्वरचनेचे समर्थक पुढीलप्रमाणे आपली मते मांडतात.

१) शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर लष्करी सामर्थ्याचे महत्व कमी होऊन आर्थिक सामर्थ्याचे महत्व वाढलेले आहे. लष्करी आणि संरक्षण क्षेत्रात अमेरिकेचे वर्चस्व मान्य केले तरी आर्थिक सामर्थ्यांचे महत्व वाढलेले आहे. लष्करी आणि संरक्षण क्षेत्रात अमेरिकेचे वर्चस्व मान्य केले तरी आर्थिक क्षेत्रात अमेरिकेला जपान, जर्मनी, युरोपीयन संघ, आसियान यासारखी राष्ट्रे आणि व्यापार संघाबरोबर स्पर्धा करावी लागत आहे.

२) शीतयुद्धोत्तर जगाची विभागणी अनेक सत्ता केंद्रामध्ये झाली आहे. जपान, जर्मनी, युरोपीयन संघ, आसियान, चीन, भारत ही सत्तेची नवीन केंद्रे उदयास आली.

३) जागतिक राजकारणाचे नेतृत्व कोणत्याही एकाच राष्ट्राकडे विशेषत: अमेरिकेकडे नसून अमेरिका, जपान, जर्मनी, युरोपीयन महासंघ, चीन, भारत यांचे सामूहिक नेतृत्व उदयास आले आहे. यालाच काही अभ्यासकांनी सामूहिक शक्ती किंवा सत्ता असेही म्हणतात. १९९१ च्या खाडी युद्धाचे नेतृत्व जरी अमेरिकेने केलेले असले तरी इराक विरूद्धची लष्करी मोहिम जपान, जर्मनी, फ्रान्स, रशिया या राष्ट्रांच्या सहकार्याशिवाय यशस्वी होवू शकली नसती.

४) आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी या प्रमुख राष्ट्रामधील आणि व्यापार संघामधील आर्थिक व व्यापारी संबंध असून आंतरराष्ट्रीय राजकारणाचे व्यवस्थापन सामूहिकपणे या राष्ट्रांकडून केले जात आहे.

वरील विवेचनावरून नवी विश्वरचना ही एक ध्रुवीय नसून बहुध्रुवीय असल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे.

**३) आर्थिक हितसंबंधांना महत्व –**

राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणांमध्ये आर्थिक हितसंबंधाना मिळालेले प्राधान्य ही शीतयुद्धोत्तर काळातील महत्वाची घटना आहे. शीतयुद्धाच्या काळात विचारसरणीवर आधारीत राजकारणाला, राजकीय हितसंबंधाला महत्व होते. त्यासाठी आर्थिक हितसंबंधाचा बळी दिला जायचा. साम्यवादाच्या प्रतिरोधासाठी अमेरिकेकडून युरोप, आशिया, आफ्रिका खंडातील राष्ट्रांना मोठे आर्थिक सहाय्य, कर्ज, शस्त्रास्त्र पुरवठा केला गेला. मित्रराष्ट्रांना आर्थिक, व्यापारी सवलत सूट दिली गेली याची झळ अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला पोहचली. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर विचार सरणीच्या संरक्षणासाठी आणि अस्तित्वासाठी अशा स्वरूपाच्या मदती कालबाह्य झाल्या. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी आर्थिक हितसंबंधाना प्राधान्य देण्याचे नवे धोरण स्वीकारून जागतिक बाजारपेठेमध्ये अमेरिकेचे आर्थिक आणि व्यापारी हितसंबंध जोपासण्याच्या धोरणाला प्राधान्य दिले. त्यासाठी अमेरिकेकडून आर्थिक राजकारणाचा वापर मोठ्या प्रमाणावर होताना दिसत आहे.

**४) आंतरराष्ट्रीय राजकारणात आशियाई राष्ट्रांचे महत्व वाढले –**

शीतयुद्धोत्तर काळ हा आशिया खंडाचा काळ म्हणून ओळखला जातो. युरोप खंड शीतयुद्धाच्या राजकारणात केंद्रस्थानी असल्यामुळे या काळात युरोपीयन राष्ट्राचे महत्व वाढले होते. तथापि शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाचे केंद्र आशिया खंडात स्थलांतरीत झाले. सिंगापूर, मलेशिया, थायलंड, जपान, चीन, भारत या सारख्या आशियाई राष्ट्रांनी झपाट्याने आर्थिक प्रगती केली असून त्यांची आंतरराष्ट्रीय राजकारणातील भूमिका महत्त्वाची आहे. आशियान आणि ओपेकसारख्या आशियाई व्यापार संघाचे महत्व वाढले. त्यामुळे अनेक युरोपीयन राष्ट्रे देखील या व्यापार संघाच्या सदस्यत्वासाठी प्रयत्नशील आहेत. चीन, जपान आणि भारत या २१ व्या शतकातील महासत्ता असून आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या नेतृत्वासाठी अमरिकेला त्यांच्याशी स्पर्धा करावी लागणार आहे. शीतयुद्धोत्तर काळात भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार झपाट्याने वाढला असून तो सध्या दहा अब्ज डॉलर्स पेक्षा अधिक आहे.

**५) लोकशाहीला गती –**

शीतयुद्धोत्तर काळातील सकारात्मक घडामोडींमध्ये लोकशाहीचा प्रसार ही महत्वाची घटना होत आहे. शीतयुद्धोत्तर काळात आंतरराष्ट्रीय पातळीवर लोकशाही करणाची प्रक्रिया गतीशील बनली आहे. सोविएत रशियाच्या विघटनाबरोबर पोलंड, हंगेरी, रूमानिया, बल्गेरियासारख्या पूर्व युरोपीय राष्ट्रांनी लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केला. या राष्ट्रांमध्ये पूर्वी साम्यवादी राजवटी होत्या शीतयुद्धोत्तर काळात भांडवलवाद

आणि लोकशाही या विचारसरणीच्या झपाट्याने प्रसार होत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने भांडवलवादाला चालना दिली आहे. लोकशाहीच्या प्रसारासाठी विशेष प्रयत्न करणे, हे शीतयुद्धोत्तर काळात अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट्य आहे. दक्षिण आशियामध्ये देखील काही राष्ट्रांमधून लष्करी हुकूमशाही व राजेशाहीकडून लोकशाहीकडे प्रवास चालू आहे. भूतान, नेपाळ, बांगला देशामधून संसदीय लोकशाही आकाराला येत आहे.

### ६) आंतरराष्ट्रीय सहकार्यात वाढ –

नवीन विश्वरचना ही आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या तत्त्वावर आधारित असून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने आंतरराष्ट्रीय सहकार्याला गती दिली आहे. जागतिकीकरणामुळे राष्ट्रांराष्ट्रामधील परावलंबीत्व वाढले असून या प्रक्रियेपासून अलिप्त राहणे कोणत्याही राष्ट्राला शक्य नाही. आर्थिक सामर्थ्याच्या वाढीला महत्व प्राप्त झाल्यामुळे युरोप, अमेरिका-रशिया, रशिया-चीन, अमेरिका-चीन तसेच भारत-पाकिस्तान यांचेतील आर्थिक व व्यापारी संबंध सुधारत आहेत. चीनचे १५ हुन अधिक राष्ट्राबरोबर सीमावाद होते. पण सहकार्याच्या माध्यमातून बहुतांश सीमावाद चीनने सोडवले आहेत तसेच भारत चीन संबंध सुधारत आहेत.

### ७) संयुक्त राष्ट्रसंघाची बदलती भूमिका –

नवीन विश्व रचनेत बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीनुसार संयुक्त राष्ट्र संघटनेची भूमिका देखील बदलत आहे. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षितता आणि विकासाची जाणीव जागतिक बनली असून या उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी संयुक्त राष्ट्रांकडून सक्रिय आणि सकारात्मक भूमिकेचे स्वरूप २४ ऑक्टोबर १९९१ रोजी युनोचे तत्कालीन सरचिटणीस झेविअर पेरेझ दी क्यूलर यांनी आपल्या संदेशात स्पष्ट केले आहे की, राजकीय मुद्यापेक्षा, आर्थिक आणि सामाजिक मुद्यावर युनो अधिक लक्ष केंद्रीत करणार असल्याचे स्पष्ट केले होते. गरीबी, बेकारी निर्मूलन, सामाजिक विषमतेचे निर्मूलन, मूलभूत मानवी हक्काचे संरक्षण, शांतता, लोकशाही आणि राजकीय स्थिरता निर्माण करण्यासाठी आणि ती टिकविण्यासाठी विशेष प्रयत्न जागतिकीकरणाबरोबर समतोल आर्थिक विकास, नि:शस्त्रीकरण आणि पर्यावरणाचे संरक्षण, एड्स सारख्या रोगांना आळा घालणे, अंमली पदार्थांच्या व्यापाराला प्रतिबंध या मुद्यांना संयुक्त राष्ट्रांच्या उद्दिष्टांमध्ये अग्रक्रम मिळाला या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी संयुक्त राष्ट्रांचे 'शांतता सैनिक' महत्वाची भूमिका बजावत आहेत. युनोच्या शांती सैनिकांनी दहाहून अधिक राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप केला आहे. यालाच मानवीय हस्तक्षेप असे म्हटले जाते. संयुक्त राष्ट्रांच्या बदललेल्या भूमिकेबरोबर युनोच्या लोकशाही करणाची मागणी जोर पकडत आहे. अमेरिकेच्या वाढत्या एकाधिकारशाहीला आळा घालण्यासाठी युनोचे सबलीकरण आणि लोकशाहीकरण आवश्यक आहे.

### ८) नि:शस्त्रीकरणाला गती –

शीतयुद्धोत्तर काळातील नि:शस्त्रीकरणाची प्रक्रिया गतिशील बनली. शीतयुद्धाच्या काळात शस्त्रास्त्र स्पर्धा वाढली. अण्वस्त्रांचा प्रसार घडून आला. १९७० च्या दशकापर्यंत अमेरिका, सोविएत रशिया, इंग्लंड, फ्रान्स आणि चीन या पाच राष्ट्रांकडे अण्वस्त्रे होती पण पुढे अण्वस्त्रधारी राष्ट्रांच्या गटामध्ये भारत, पाकिस्तान,

इस्त्राईल, उत्तर कोरिया सारख्या राष्ट्रांचा समावेश झाला. याशिवाय इराण, इराक, लिबिया, चिली, क्युबा सिरियासारख्या राष्ट्रांकडे अण्वस्त्रे असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. अण्वस्त्रांच्या वाढत्या प्रसाराबरोबरच आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आली. यावर उपाय म्हणजे संपूर्ण नि:शस्त्रीकरणाचा मार्ग, संयुक्त राष्ट्र संघटनेने नि:शस्त्रीकरणाच्या उद्दिष्टाला प्राधान्य दिले. शीतयुद्धोत्तर काळामध्ये नि:शस्त्रीकरणाच्या दिशेने पहिले पाऊल १९९१ मध्ये अमेरिका आणि रशियामधील द्विपक्षपातळीवरील कराराने पडते. हा करार सामारिक शस्त्रास्त्रांच्या कपातीसाठी होता. जो सामरिक शस्त्रास्त्र कपात करार या नावाने ओळखला जातो. १९९५ मध्ये बहुचर्चित अण्वस्त्र प्रसारबंदी कराराला अनिश्चित काळासाठी मुदत वाढ देण्यात आली. १९९९ मध्ये सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करार बहुमताने मंजूर करण्यात आला. नि:शस्त्रीकरणाच्या दिशेने झालेले हे महत्वपूर्ण करार होते.

**९) पर्यावरण संरक्षणाची जागतिक गरज –**

पर्यावरणाच्या प्रदूषणाची समस्या ही केवळ एखाद्या राष्ट्राला भेडसावणारी समस्या नसून ती आंतरराष्ट्रीय स्वरूपाची समस्या आहे आणि त्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे ही जाणीव शीतयुद्धोत्तर काळात विकसित झाली. या जाणिवेचे पहिले प्रतिबिंब १९९२ च्या ब्राझिलमधील रिओ दि जानिरो येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषदेमध्ये पडले. या परिषदेत पर्यावरण संरक्षणाचा जाहीरनामा तयार करण्यात आला. तो ''रिओ घोषणा'' या नावाने ओळखला जातो. राष्ट्रीय विकास आणि पर्यावरण संरक्षणाची सांगड घालण्याचा प्रयत्न या परिषदेमध्ये करण्यात आला. १९९७ मध्ये जपान मधील क्योटो इथे दुसरी आंतरराष्ट्रीय पर्यावरण परिषद पार पडली.

**१०) व्यापारी संघाची भूमिका –**

शीतयुद्धोत्तर काळामध्ये व्यापार संघांची संख्या आणि भूमिका वाढली. शीतयुद्धकालीन लष्करी संघटनांची जागा विभागीय व्यापार संघानी घेतली. विभागीय पातळीवरील आर्थिक विकासासाठी काही नवीन व्यापार संघ अस्तित्वात आले. विभागीय आर्थिक विकास आणि विभागीय आर्थिक एकीकरणाच्या प्रक्रियेत व्यापार संघ महत्वाची भूमिका पार पाडत आहेत. अनेक राष्ट्रांच्या आर्थिक विकासामध्ये विभागीय व्यापार संघाची भूमिका महत्वाची आहे. सार्क, आशियान, ओपेक, युरोपीय महासंघ, नाफ्टा, आफ्रिकन महासंघ यासारख्या व्यापारी संघानी राष्ट्रांना विभागीय पातळीवर आर्थिक आणि व्यापारी सहकार्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

**११) जागतिकीकरण –**

शीतयुद्धोत्तर काळात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला गती प्राप्त झाली. जागतिकीकरण ही वैश्विक प्रक्रिया असून कोणतेही राष्ट्र यापासून अलिप्त राहू शकत नाही. भांडवलशाहीचा जागतिक पातळीवर झालेला प्रसार, आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वाढते जाळे यामुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला वेग प्राप्त झाला आहे. जागतिकीकरण ही वैश्विक पातळीवर राष्ट्रातील आर्थिक, सामाजिक,

सांस्कृतिक संबंध घनिष्ठ करून एक परस्परावलंबी विश्वाची निर्मिती करणारी प्रक्रिया आहे. १९९५ मध्ये विश्व व्यापार संघटनेच्या स्थापनेबरोबर जागतिकीकरणाला गती मिळाली.

**१२) मानवी हक्क संरक्षणाची जाणीव –**

संयुक्त राष्ट्र संघटनेकडून मुलभूत मानवी हक्कांचा जाहिरनामा १९४८ साली घोषित करण्यात आला होता. मात्र शीतयुद्धाच्या राजकारणामुळे मानवाधिकारांच्या संरक्षणाविषयी आंतरराष्ट्रीय जनमत गतिशिल बनविण्यात संयुक्त राष्ट्र संघटनेला अपयश आले. शीतयुद्धोत्तर काळात मानवाधिकारांच्या संरक्षणासाठी सक्रिय भूमिकेची युनोकडून अपेक्षा केली जाऊ लागली. वांशिक हिंसाचारापासून मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शांतिसेनेने काही राष्ट्रांमध्ये लष्करी हस्तक्षेप केले. भारतामध्ये १९९३ मध्ये राष्ट्रीय मानवधिकार संरक्षण कायदा मंजूर करण्यात आला व राष्ट्रीय मानवाधिकार आयोग आणि राज्य मानवाधिकार आयोगाची निर्मिती करण्यात आली हे आयोग या अधिकाराचे उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षा देण्याचे कार्य करतात.

**१३) वंशवाद –**

शीतयुद्धोत्तर काळात अमेरिका आणि रशिया यांच्यातील आंतरराष्ट्रीय पातळीवरील संघर्ष संपुष्टात आले असले तरी यातील बहुतांश संघर्ष हे वांशिक भेदभावातून निर्माण झालेले आहेत. अनेक राष्ट्रांमधून वांशिक चळवळीमुळे प्रादेशिक वाद आणि संकुचितवादाची भावना जोपासली जात आह. वांशिक संघर्ष बोस्निया, क्रोएशिया, सर्बिया, श्रीलंका, अफगाणिस्तान, इराक, भूतान, चीन, सायप्रस, इथोपिया, सोमालिया, पूर्व तिमोर, इंडोनेशिया सारख्या राष्ट्रांचा समावेश होतो. या राष्ट्रात वांशिक संघर्ष होऊन त्यांत हजारो निष्पाप नागरिक मृत्युमुखी पडत आहेत. रवांडा या देशात हुतू आणि तुत्सी या वांशिक गटाच्या संघर्षात केवळ एका वर्षात पाच लाख लोक मारले गेले. वांशिक संघर्षामुळे केवळ राष्ट्रांतर्गत नाही तर विभागीय पातळीवरील शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आलेली आहे. यातून मानवाधिकाराचे होणारे उल्लंघन थांबविणे हे संयुक्त राष्ट्र संघटनेचे सर्वात मोठे आव्हान आहे.

**१४) धार्मिक मूलतत्ववाद –**

शीतयुद्धोत्तर काळातील नकारात्मक घडमोडींमध्ये काही राष्ट्रांमधून धार्मिक मूलतत्ववादी चळवळींनी धरलेला जोर ही गंभीर बाब आहे. धार्मिक मूलतत्ववादी चळवळीमधून दहशतवाद, वांशिक हिंसाचाराला चालना मिळत आहे. धार्मिक मूलतत्ववादी चळवळी धार्मिक श्रेष्ठत्वाची भावना जोपासण्यासाठी, धर्माचे अस्तित्व किंवा स्वतंत्र ओळख टिकवण्यासाठी, धर्माच्या आधारावर लोकांना संघटीत करण्यासाठी सक्रिय झाल्या आहेत. पश्चिम आशियातील आणि आफ्रिकेतील बहुसंख्य राष्ट्रांमधून धार्मिक मूलतत्ववादी चळवळीनी जोर पकडला आहे. अल्जेरिया, इजिप्त, जॉर्डन, अफगाणिस्तान, इराण ही राष्ट्रे धार्मिक मूलतत्ववादाला बळी पडलेली आहेत. १९७९ ची इराणमधील धार्मिक क्रांती तसेच १९९६ व २०२१ मध्ये अफगाणिस्तानमध्ये प्रस्तावीत झालेले तालीबान शासन धार्मिक मूलतत्वाने प्रभावित झाले. धार्मिक मूलतत्ववादी चळवळीतून आकाराला आलेल्या दहशतवादाने आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आणली.

**१५) आंतरराष्ट्रीय दहशतवाद –**

शीतयुद्धोत्तर काळामध्ये आंतरराष्ट्रीय दहशतवादाने उग्र रूप धारण केले आहे. अमेरिका, रशिया, चीन इंग्लंड, स्पेन, इस्त्रायल, भारत यासारख्या मोठ्या राष्ट्रांच्या सुरक्षेला दहशतवादाने आव्हान दिले आहे. शीतयुद्धोत्तर काळातील दहशतवाद हा प्रामख्याने धार्मिक आणि वांशिक भावनेने प्रभावित झालेला असून त्याचे मूळ धार्मिक मूलतत्ववादी चळवळीमध्ये आहे. सार्वजनिक ठिकाणी बॉम्बस्फोट घडवून आणणे, गोळीबार, अपहरण, राजकीय नेत्यांचे खून इ. साधनांचा वापर करून दहशतवादी हिंसाचार घडवून आणत आहेत. त्यासाठी आत्मघातकी पथकांचा वापर केला जात आहे. शीतयुद्धोत्तर काळामध्ये भारतातील जम्मू-काश्मीरच्या खोऱ्यात पाकिस्तान पुरस्कात सीमापार दहशतवादाने पन्नास हजाराहून अधिक लोकांचा बळी गेला आहे. वाढत्या दहशतवादी कारवायांबरोबर अंमली पदार्थांचा व्यापार देखील वाढला आहे. त्याच्यामधून उभा करण्यात आलेला पैसा दहशतवादी संघटनांना आर्थिक साह्य करण्यासाठी वापरला जातो. दहशतवादाच्या समस्येमुळे अण्वस्त्रांचा काळ्या बाजारातील व्यापार देखील वाढला आहे. अल कायदा सारख्या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेकडे अण्वस्त्रे, रासायनिक शस्त्रास्त्रे असल्याचा संशय आहे. ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर व भारतामध्ये २६ नोव्हेंबर २००८ मध्ये मुंबई शहरावर झालेला दहशतवादी हल्ल्या नंतर आंतरराष्ट्रीय दहशतवादाच्या वाढत्या सामर्थ्यांची साक्ष जगाला पटली.

**१६) मानवी सुरक्षेचा प्रश्न –**

शीतयुद्धोत्तर काळामध्ये मानवी सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. मानवी सुरक्षा म्हणजे सर्व प्रकारचा हिंसाचार, भिती आणि असुरक्षिततेपासून व्यक्तीची मुक्तता शीतयुद्धकालीन तणाव, परस्पर अविश्वास, संशय आणि भितीचे वातावरण यामुळे मानवी असुरक्षितता वाढली होती. शीतयुद्धोत्तर काळामध्ये विविध प्रकारच्या संघर्षामुळे मानवी सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. १९९० च्या दशकामध्ये व आजही लहान-मोठे सशस्त्र संघर्ष होत आहेत. राजकीय कारणामुळे अंतर्गत यादवी युद्धे वांशिक संघर्षातून वाढणारा, हिंसाचार, धार्मिक मूलतत्ववादी चळवळी, आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांच्या कारवाया, अण्वस्त्रांचा प्रसार, अमली पदार्थाचा व्यापार इ. कारणामुळे मानवी असुरक्षितता वाढली आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न – १ :**

**रिकाम्या जागा भरा.**

१. ............ नवीन विश्वरचनेचा प्रारंभ सन १९९० नंतर होतो.

२. .......... यांनी १९९१ मध्ये अमेरिकेच्या दृष्टीकोनातून नवीन विश्वरचनेची कल्पना मांडली.

३. दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय क्षेत्रात अमेरिका व ........... या दोन महासत्ताचा उदय झाला.

४. 'पुन:र्रचना' व 'खुलेपणा' या दोन शब्दांचा वापर रशियाच्या संदर्भात ........... यांनी सर्वप्रथम केला.

५. ........... हा एक मनोवैज्ञानिक संघर्ष आहे.

### ४.२.२ प्रादेशिक संघटना :

प्रादेशिक किंवा क्षेत्रिय संघटनांचा अधिक विकास २० व्या शतकाच्या उत्तरार्धात म्हणजेच प्रामुख्याने दुसऱ्या महायुद्धानंतर अधिक गतीने झाल्याचे दिसते. यापैकी ठळक घटना म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना (२४ ऑक्टोंबर १९४५) होय. संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेनंतर संपूर्ण जग दोन परस्पर विरोधी गटात आणि विचारधारांमध्ये विभागले गेले. जगावर वर्चस्व मिळविण्यासाठी या दोन गटांमध्ये चढाओढ सुरू झाली. या संघर्षामुळे शीतयुद्धाला व शस्त्रास्त्र स्पर्धेल प्रारंभ झाला. त्यामुळे प्रत्येक लहान राष्ट्रापुढे त्यांच्या अस्तित्वाचाच प्रश्न उभा राहिला. त्यातूनच द्वितीय महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणात वेगवेगळ्या राष्ट्रांनी परस्परांमध्ये आर्थिक, राजकीय, लष्करी स्वरूपाच्या प्रादेशिक संघटना निर्माण केल्याचे दिसते. या क्षेत्रिय / प्रादेशिक संघटना हा आंतरराष्ट्रीय राजकारणातील एक नवीन प्रयोग आहे. म्हणून या प्रादेशिक संघटनाना संयुक्त राष्ट्रांच्या अभ्यासाइतकेच महत्त्व दिले जाते. आजचे जग स्वावलंबी नाही तर ते परस्परावलंबी आहे. म्हणजेच प्रत्येक राष्ट्राला आपल्या कोणत्या ना कोणत्या गरजेच्या पूर्ततेसाठी दुसऱ्या राष्ट्राची मदत घ्यावी लागते. त्यामुळे सार्वभौम राष्ट्रांनी एकत्र येऊन आपले हेतू पूर्ण करण्यासाठी क्षेत्रिय / प्रादेशिक संघटना स्थापना करणे आवश्यक वाटू लागले आणि या गरजेतून क्षेत्रिय संघटनांचा उदय झाला. शस्त्रास्त्र स्पर्धेच्या आजच्या युगात स्वत:च्या हिताचे संरक्षण एकट्यानेच करणे अशक्य आहे. म्हणून सामूहिकरीत्या राष्ट्रीय हिताची जपणूक करण्याच्या दृष्टिने प्रादेशिक संघटनांचा विकास झाला.

प्रादेशिक संघटना म्हणजे काय ? त्याची स्पष्ट व सर्वसमावेशक अशी व्याख्या सांगता येत नाही. कारण काही राष्ट्रे आपल्या क्षेत्रातून दूर असलेल्या प्रादेशिक संघटनांमध्ये सहभागी झाल्याचे दिसतात. उदा. अमेरिका जगातील पाच संरक्षणात्मक संधीमध्ये सहभागी झालेली आहे. तर दक्षिण पूर्व आशियायी राष्ट्रांच्या संघटनेमध्ये (सिटो) पूर्व आशियातील थायलंड व फिलिपाईन्स या दोन राष्ट्रांच्या व्यतिरिक्त इतर चार राष्ट्रे व अन्य खंडातील आहेत. यावरुन असे म्हणता येईल की, प्रादेशिक संघटनाबाबत निश्चित असा नियम / निकष नाही. नार्मन हील यांनी क्षेत्रिय संघटनाऐवजी 'सीमित आंतरराष्ट्रीय संघटना' असे नाव सुचविले आहे. तरीसुद्धा क्षेत्रीय संघटना म्हणजे समान उद्देशाच्या प्राप्तीसाठी राज्याच्या समुदायांनी एकत्र येवून स्थापन केलेले संघटन होय.

प्रादेशिक संघटनाना संयुक्त राष्ट्रांनी मान्यता दिलेली असली तरी अशा संघटनांच्या स्वरूप व उद्देशाबाबत स्पष्टीकरण दिलेले नाही. क्षेत्रीय संघटनांचे समर्थक अशा संघटना संयुक्त राष्ट्रांच्या उद्देशपूर्तीसाठी आवश्यक आहेत असे मानतात. कारण संयुक्त राष्ट्राद्वारे ज्यावेळी कारवाई होत नाही अशावेळी संयुक्त राष्ट्राच्या घटनेनुसार सामूहिक संरक्षणाचे अधिकार अशा प्रादेशिक क्षेत्रिय संघटनांनी देण्यात येतात. पुढील काही महत्त्वाच्या प्रादेशिक संघटना त्यांच्या अभ्यासाद्वारे आपणास समजून घेता येतील.

**युरोपियन महासंघ –**

जगातील सर्वात शक्तिशाली व्यापारसंघ म्हणून युरोपियन महासंघाचा उल्लेख केला जातो. युरोपियन महासंघाचा उदय हा जरी सन १९९१ च्या ऐतिहासिक मॅस्ट्रिश करारातून झालेला असला तरी गेल्या चाळीस

वर्षांत युरोपियन राष्ट्रांमध्ये झालेल्या विविध करारांनी या महासंघाची पार्श्वभूमी तयार केली. या संघात एकूण १५ सभासद होते. मात्र सद्यस्थितीत त्यांची संख्या २७ झाली आहे. यापैकी काही प्रमुख करार खालीलप्रमाणे आहेत.

१. पॅरिस करार – १९५१ साली फ्रान्स, पूर्व जर्मनी, बेल्जियम, लक्झेंबर्ग, इटली, हॉलंड इत्यादी राष्ट्रांनी 'युरोपियन कोळसा आणि पोलाद समुदाय' ही संस्था स्थापन केली.

२. रोम करार – १९५७ साली उपरोक्त राष्ट्रांनी 'युरोपियन आर्थिक समुदाय' व 'युरोपियन अणुशक्ती समुदाय' असे दोन संघ स्थापन केले.

३. एकीकृत युरोपियन कायद्यासंबंधीचा करार – १९८६ साली युरोपियन राष्ट्रांनी युरोपियन कायद्यासंबंधीचा करार करून युरोपिय कौन्सिल स्थापन केले.

४. मॅस्ट्रिश करार (१९९१)– मॅस्ट्रिश करारानुसार १९९३ साली युरोपियन संघाची स्थापना झाली. युरोपियन महासंघाचे कार्यालय बेल्जियममधील ब्रुसेल्स येथे आहे.

**युरोपियन महासंघाची उद्दिष्टे –**

अ) आर्थिक, व्यापारी, सामाजिक, राजकीय पातळीवरील सहकार्य वाढवणे.

आ) आर्थिक, वित्तीय संघ स्थापण्याच्या दिशेने प्रयत्न करणे.

इ) एका चलन व्यवस्थेच्या निर्मितीसाठी प्रयत्न करणे.

ई) युरोपच्या सामूहिक संरक्षण आणि परराष्ट्र धोरण निर्मितीसाठी प्रयत्न करणे.

उ) संपूर्ण युरोपसाठी एका नागरिकत्वाच्या निर्मितीसाठी प्रयत्न करणे.

ऊ) युरोपीय देशात राजकीय व शासकीय संयुक्तता आणणे.

र) समान अर्थव्यवस्था व समान व्यापार नियम लागू करणे.

ऐ) समान चलन – युरो अस्तित्वात आणणे.

**युरोपियन महासंघाची रचना –**

युरोपियन महासंघाचे सात प्रमुख घटक असून त्यात –

१. युरोपियन परिषद – सात सदस्य राष्ट्रांच्या शासकीय प्रमुखाचा समावेश होतो.

२. युरोपियन संसद – यामध्ये युरोपियन महासंघाच्या १५ सदस्य राष्ट्रांमधून निवडून आलेले ६२६ सदस्यांचा समावेश होतो. या सदस्यांची निवड पाच वर्षांसाठी केली जाते.

३. मंत्री परिषद – यामध्ये २७ सदस्य राष्ट्रांच्या परराष्ट्र मंत्र्याच्या समावेश होतो. सर्व महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याचे कार्यही परिषद करते.

४. युरोपियन आयोग – युरोपियन आयोगाचे कार्य हे कार्यकारी प्रमुखाचे असून युरोपियन महासंघाच्या दैनंदिन प्रशासनाचे कार्य युरोपियन आयोगाकडून होतो.

५. न्यायालय – न्यायालयाचे मुख्यालय लुक्झेंबर्ग येथे असून यात १५ न्यायाधीशांचा समावेश होतो. युरोपियन महासंघाच्या करारातील तरतुदींचा अर्थ लावण्याचे कार्य न्यायालयाकडून होते.

६. लेखापालांचे न्यायालय – युरोपियन महासंघाचा खर्च आणि उत्पन्नाच्या हिशोबाचे कार्य लेखापालांच्या न्यायालयाकडून होते.

७. सल्लागार समित्या – विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी आणि सल्ला देण्यासाठी अशा समित्यांची निर्मिती करण्यात आली आहे. उदा. आर्थिक आणि सामाजिक समिती, क्षेत्रिय समिती इ.

युरोपियन महासंघाकडून सन १९९९ मध्ये एक चलनव्यवस्था सुरू करण्यात आली. ती युरो नावाने ओळखली जाते. सन २००० पर्यंत युरोपियन महासंघाच्या २७ सदस्य राष्ट्रांपैकी ११ राष्ट्रांनी या चलनव्यवस्थेचा स्वीकार केला जातो.

युरोपियन संघातील सभासद देशामधील वस्तू, व्यक्ती, सेवा आणि भांडवल यांच्या मुक्त वहनाचे तत्त्व या कराराने प्रस्थापित केले. रोम करारातील अटीची अंमलबजावणी करणे सभासद राष्ट्रांवर बंधनकारक असल्यामुळे रोम करार हे एक प्रकारे युरोपीय समुहाचे संविधान आहे, असे म्हणता येते. बाजारात एकात्मिकरणाची प्रक्रिया पूर्णत्वास नेणे. हे १९८७ च्या एक युरोप कायद्याचे उद्दिष्ट होते, हे याद्वारे यशस्वी करण्यात आले आहे.

तसेच आर्थिक सेवा, विमा, दळणवळण या क्षेत्राचे विविध सभासद देशांतील नियमन, तसेच सुरक्षाविषयक आणि तंत्रज्ञानविषयक मानके यांच्यात सुसूत्रता आणण्याचा निर्धार या संघाने तडीस नेलेला आहे. १९९२ मधील मॅट्रिस करारामुळे पश्चिम युरोपच्या एकात्मिकरणाच्या प्रक्रियेने आणखी एक पाऊल पुढे टाकले. त्यातूनच पश्चिम युरोपचा आर्थिक संघ निर्माण होण्याच्या प्रक्रियेने वेग घेतला. त्याचबरोबर युरोपीय देशाच्या सामाजिक धोरणात सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न झाला. डेन्मार्क आणि फ्रान्समध्ये मोठ्या संख्येने लोकांनी या कराराविरुद्ध मतदान केले. तर ब्रिटनने या करारातून बाहेर पडण्याचा हक्क राखून ठेवला. परंतु शेवटची युरोपीय संघाच्या सर्वच सभासद राष्ट्रांनी मॅट्रिस करारास अखेर मंजूरी दिली. त्यानंतर २०२० मध्ये ब्रिटन बेक्झीटद्वारे युरोपीय संघातून बाहेर पडला. त्यामुळे त्याच्या औद्योगिक उत्पादनावर व रोजगारावर परिणाम होतील. मात्र स्वतःच्या सामर्थ्यावर नवीन औद्योगिक बदल, तंत्रज्ञान याची उभारणी ब्रिटनला करता येईल.

व्यापार करारावर एकमत झाल्यामुळे आता एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून अनेक संधी उपलब्ध होतील. शून्य दर आणि शून्य कोठा यांचा आधारे मुक्त व्यापार करण्यात आला आहे. दोन्ही बाजूंनी केलेला हा सर्वांत मोठा करार असून यात २०१९ मधील ६६८ अब्ज ब्रिटीश पौंडांच्या व्यापाराचाही समावेश आहे. या करारामुळे आता ब्रिटनचा पैसा, सीमा, कायदे, व्यापार आणि आपल्या समुद्रातील मासेमारी या सर्वांवर केवळ

ब्रिटनचेच नियंत्रण असणार आहे. तसेच ब्रिटन युरोपिय महासंघाच्या नियमांनी बद्ध असणार नाही. युरोपीय न्यायालयाचे कायदे ही ब्रिटनला चालणार नाहीत. १ जानेवारी २०२१ पासून ब्रिटनला राजकीय आणि आर्थिक स्वातंत्र्य असेल.

या करारानंतर ब्रिटनशी भारताचा मुक्त व्यापार करार होऊ शकतो. ब्रिटन हा देश एक मध्यवर्ती बाजारपेठ असल्याने पोर्तुगाल, ग्रीस सारखे देश ब्रिटनमधून वस्तू घेतात. त्यामुळे भारताला मोठी संधी मिळणार आहे. आता भारत उत्पादन आणि सेवा क्षेत्राबाबत महत्त्वाची सेवा बजावू शकतो. तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, संरक्षण आणि आर्थिक क्षेत्राच्या दृष्टीने भारताला फायदा होऊ शकतो.

जागतिक राजकारणाचे स्वरूप बदलले आहे आणि चीन, अमेरिका या दोन आर्थिक महासत्तांत खरी स्पर्धा सुरू आहे. आज अमेरिकेची अर्थव्यवस्था २२ ट्रिलियन डॉलर्स एवढी आहे, तर चीनची अर्थव्यवस्था १३ ट्रिलियन डॉलर्स एवढी आहे. तसेच जपानची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर्स व जर्मनीची ४ ट्रिलीयन डॉलर्स, भारत २.८ ट्रिलियन डॉलर्स तर युरोपीयन संघाचे १६ ट्रिलियन डॉलर्स एवढे उत्पन्न आहे, पण ते वेगवेगळ्या देशांचे मिळून आहे. याचा अर्थ असा की, चीन आणि अमेरिका या दोनच सत्ता या खऱ्या अर्थाने आर्थिक महासत्ता आहेत. त्याचबरोबर आज रशियाचा जी. डी. पी. २ ट्रिलियन डॉलर्स असला, तरी लष्करीदृष्ट्या ती दुसऱ्या क्रमांकाची शक्ती आहे. ऊर्जा, सैन्यबळ, शस्त्रास्त्र निर्मिती, अण्वस्त्रे, अवकाश विज्ञान व विज्ञान या क्षेत्रात त्यांचे अव्वल स्थान आहे.

**आसियान (दक्षिणपूर्व आशियायी राष्ट्रसंघ) :**

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आसियान क्षेत्र हे सागरी व भौगोलिक स्थिती पाहता अत्यंत महत्त्वाचे आहे. या क्षेत्रातील राष्ट्रे प्रशांत महासागराला हिमसागराशी जोडणारी आहेत. तसेच ही राष्ट्रे आर्थिक व नैसर्गिक दृष्टीने समृद्ध आहेत. द्वितीय महायुद्धानंतर ब्रिटनने या क्षेत्रातून माघार घेतली. त्यानंतर चीन, तत्कालीन सोविएत संघ व अमेरिका या राष्ट्रांनी या क्षेत्रावर आपला प्रभाव निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केलेला दिसतो. परंतु या प्रयत्नांना शह देण्याचा या राष्ट्रांचा निर्धार आहे.

आसियानची स्थापना :

आसियान संघटनेच्या स्थापनेला २०२२ मध्ये ५५ वर्षे पूर्ण झाली. आसियान ही आग्नेय आशियातील १० देशांची संघटना आहे. यात ब्रुनेई, म्यानमार, कंबोडिया, इंडोनेशिया, लाओस, मलेशिया, फिलीपाइन्स, सिंगापूर, थायलंड आणि व्हिएतनाम हे देश येतात. याचे सचिवालय जकार्ता येथे आहे. ८ ऑगस्ट १९६७ रोजी संघटना स्थापन करण्याची घोषणा झाली, यालाच 'बँकॉक घोषणा' म्हणतात.

स्थापनेवेळी इंडोनेशिया, मलेशिया, फिलीपाइन्स, सिंगापूर, थायलंड हे पाच देश होते. त्यानंतर ब्रुनेई हा सहावा देश जोडला गेला. १९९५ साली व्हिएतनाम, १९९७ साली लाओस व म्यानमार आणि १९९९ साली कंबोडिया हे देश जोडले गेले. जगाच्या लोकसंख्येपैकी ८.८% लोकसंख्या आसियान देशांची आहे.

तसेच जगाच्या एकूण जमिनक्षेत्रापैकी ३% क्षेत्र आसियान देशांनी व्यापलेले आहे. सर्व आसियन देशांची मिळून एक अर्थव्यवस्था मानली तर ती जगातील सातव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे.

आसियानमध्ये अनेक 'संवाद भागिदारांचा' समावेश झालेला आहे. सद्य:परिस्थितीत आसियानसोबत १० 'संवाद भागिदारांचा' समावेश आहे. ते म्हणजे ऑस्ट्रेलिया, कॅनडा, चीन, जपान, युरोपीय संघ, भारत, कोरिया, न्यूझिलंड, रशिया आणि अमेरिका. १९७० पासून आसियानच्या औपचारिक प्रतिबद्धतेला सुरवात झाली. आसियान आणि 'संवाद भागिदारांमध्ये' सातत्याने उच्चस्तरिय देवाण-घेवाण व संवाद होत असतो. तसेच मंत्रिमंडळाच्या व शिखर बैठका देखील होत असतात. सुरवातीला आसियानच्या विकसनशील अर्थव्यवस्थेला तांत्रिक व आर्थिक सहाय्य करण्यावर या 'संवाद भागिदारांनी विशेष भर दिलेला दिसून येतो.

**आसियानची रचना :**

आसियान रचना खालील घटकामध्ये विभागली आहे.

**१) शिखर परिषद :**

आसियान संघटनेतील सर्वोच्च घटक म्हणजे शिखर परिषद होय. सभासद राष्ट्रांचे राष्ट्रप्रमुख या शिखर परिषदेचे सभासद आहेत. आसियानच्या बैठका वर्षातून दोन वेळा होतात. आसियानचे अध्यक्षपद ज्या सभासद राष्ट्राकडे असते ते राष्ट्र शिखर परिषद भरवते. तसेच गरज असेल तर विशेष व तातडीच्या बैठका देखील घेतल्या जातात.

**२) समन्वय परिषद :**

आसियानचा दुसरा घटक म्हणजे आसियान समन्वय परिषद. सभासद राष्ट्रांचे परराष्ट्रमंत्री या समन्वय परिषदेचे सदस्य असतात. त्यांच्या बैठका वर्षातून दोन वेळा होतात. या परिषदेला संबंधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांचा पाठिंबा असावा लागतो. ही परिषद आसियान शिखर परिषदेच्या बैठकांची तयारी करते. करार, निर्णय, ठराव यांच्या अंमलबजावणीमध्ये समन्वय ठेवते, महासचिवांचा अहवाल मान्य करते, इ. कार्ये पार पाडते.

**३) समुदाय परिषद :**

आसियान संघटनेतील तिसरा घटक म्हणजे आसियान समुदाय परिषद. आसियान राजकिय सुरक्षा समुदाय परिषद, आर्थिक समुदाय परिषद आणि सामाजिक-सांस्कृतिक समुदाय परिषद यांचे सभासद या परिषदेचे सदस्य असतात. वर्षातून दोन वेळा या परिषदेची बैठक होते. आसियानचे अध्यक्षपद भूषविणाऱ्या सभासद राष्ट्रांचा संबंधित मंत्री समुदाय परिषदेचा अध्यक्ष असतो. प्रत्येक आसियान समुदाय परिषदेला संबंधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांचा पाठींबा असावा लागतो.

**४) क्षेत्रीय मंत्रिमंडळ :**

आसियानचा चौथा घटक म्हणजे क्षेत्रीय मंत्रिमंडळ. या मंत्रिमंडळाचे सदस्य राजकीय-सुरक्षा परिषद,

आर्थिक समुदाय परिषद आणि सामाजिक-सांस्कृतिक समुदाय परिषद, यांच्या अंतर्गत येणारी सर्व केंद्रे व संस्था आहेत. ही मंत्रिमंडळे आपापल्या स्थापना आदेशानुसार कार्यरत असतात. त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या आसियान शिखर संमेलनातील निर्णय व करारांची अंमलबजावणी करतात. आसियानच्या एकात्मीकरणास व समुदाय दृढतेस सहाय्यता व्हावी व पाठिंबा मिळावा म्हणून आपापल्या समुदाय परिषदेकडे अहवाल आणि शिफारशी पाठवत असतात. प्रत्येक क्षेत्रीय मंत्रिमंडळाचा अखत्यारित संबंधित वरिष्ठ अधिकारी आणि त्यांची सहाय्यक मंडळ कार्यरत असतात.

**५) महासचिव आणि सचिवालय :**

आसियानच्या महासचिवाची नेमणूक पाच वर्षांसाठी होते. पुन्हा त्याच व्यक्तीची नेमणूक या पदावर होत नाही. महासचिव आसियाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी म्हणून देखील कार्यरत असतात. महासचिवांना सहाय्य करण्यासाठी चार सहयोगी सचिवांची नेमणूक करतात. हे चार सचिव आसियान सदस्य राष्ट्रांमधून निवडतात. सहयोगी सचिवांचा कार्यकाल तीन वर्षांचा असतो. आसियान सचिवालयामध्ये महासचिव, सहयोगी सचिव आणि इतर आवश्यक कर्मचाऱ्यांचा समावेश असतो. आसियानचे सचिवालय हे जकार्ता येथे आहे. आसियान संदर्भातील सर्व जबाबदारी आसियानचे सचिवालय पार पाडत असते.

**६) स्थायी व अस्थायी समित्या :**

आसियानमध्ये प्रत्येक सभासद राष्ट्र राजदूत दर्जाच्या स्थायी प्रतिनिधीची नेमणूक करत असते. ही समिती समुदाय परिषद व क्षेत्रीय मंत्रिमंडळांना त्यांच्या कामात सहकार्य करते. तसेच राष्ट्रीय सचिवालय आणि इतर क्षेत्रीय मंत्रिमंडळामध्ये समन्वय साधते. महासचिव आणि सचिवालय यांच्या सर्व संबंधित कामकाजाच्या विषयामध्ये दुवा बनण्याचे कार्य करते. बाह्य भागिदार आणि आसियान समन्वय परिषदेने निश्चित केलेली इतर कार्ये पार पाडते. सध्या या संघटनेमध्ये नऊ स्थायी व आठ अस्थायी समित्या आहेत.

**७) राष्ट्रीय सचिवालय :**

आसियानचा सातवा घटक म्हणजे राष्ट्रीय सचिवालय आहे. प्रत्येक आसियान सभासद राष्ट्राने आपल्या राष्ट्रात राष्ट्रीय सचिवालय स्थापन केलेले असेल. हे सचिवालय त्या त्या राष्ट्रांच्या राष्ट्रीय पातळीवर केंद्रस्थ बिंदू म्हणून सेवा देईल. राष्ट्रीय पातळीवर आसियानच्या निर्णयाच्या अंमलबजावणीचे समन्वय करेल. आसियानच्या बैठकांसाठी राष्ट्रीय आसियानची ओळख व जाणिव निर्माण करते आणि आसियान समुदाय दृढतेसाठी प्रयत्नशील असते.

**८) मानवी हक्क संस्था :**

आसियानमधील आठवा घटक म्हणजे मानवी हक्क संस्था होय. मानवी हक्काच्या आणि मूलभूत स्वातंत्र्याच्या सुरक्षेसाठी आसियानने आसियान मानवी हक्क संस्था स्थापन केलेली आहे.

**९) आसियान फाऊंडेशन :**

आसियान मधील नववा घटक म्हणजे आसियान फाऊंडेशन होय. फाऊंडेशन हे महासचिवांना सहाय्य करते. संबंधित संस्थांना समुदाय निर्मितीसाठी सहयोग करते. हा सहयोग आसियानची ओळख व जाणीव निर्माण करण्यासाठी, लोका-लोकांत सुसंवाद आणि उद्योग क्षेत्र, नागरी समाज, शैक्षणिक क्षेत्र आणि इतर आसियान भागधारकांत निकट सहकार्य निर्माण करण्यासाठी केला जातो. आसियान फाऊंडेशन आसियान महासचिवांना जबाबदार राहून आपली कार्य पार पाडत असते.

**आसियानची वैशिष्ट्ये :**

आसियान हे समुद्रस्तरीय अराजकीय व बिगरसैनिकी असे आर्थिक संघटन आहे. ही संघटना स्थापन करण्यामागचा प्रमुख उद्देश म्हणजे दक्षिण-पूर्व आशियाई राष्ट्रांमध्ये आर्थिक सहकार्यात वाढ करणे, सदस्य राष्ट्रांमधील साधनसंपत्तीचा सामूहिक वापर करणे हा होता. याशिवाय या संघटनेची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत -

१) या प्रदेशातील आर्थिक वाद, सामाजिक प्रगती आणि सांस्कृतिक विकास गतिमान करणे.

२) आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक, वैज्ञानिक व प्रशासकीय क्षेत्रात सर्वांच्या हितासाठी सक्रीय व परस्पर सहकार्याला प्रोत्साहन देणे.

३) सभासद राष्ट्रांच्या कृषी व उद्योग यांचा अधिक प्रभावी उपयोग करून घेण्यासाठी सहयोग करणे.

४) व्यापार वाढविणे तसेच आंतरराष्ट्रीय वस्तूंच्या व्यापार संदर्भातील समस्यांचा अभ्यास करणे.

५) दळणवळण सुविधांमध्ये सुधारणा करणे.

६) या क्षेत्रातील नागरिकांच्या राहणीमानात सुधारणा करणे.

**मूलभूत तत्त्वे :**

१) सर्व राष्ट्रांचे स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, समता, प्रादेशिक अखंडता आणि राष्ट्रीय अस्मिता यांचा परस्पर आदर करणे.

२) प्रत्येक राष्ट्रांचे अस्तित्व जोपासण्याचा अधिकार बाह्यहस्तक्षेप, विध्वंस यापासून मुक्त करणे.

३) परस्परांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे.

४) आपापसातील मतभेद/तंटे शांततेच्या मार्गाने सोडविणे.

५) धमकीचा किंवा बळाचा वापर न करणे.

६) परस्परांमध्ये प्रभावी सहकार्य करणे.

**आसियानची कार्ये :**

आसियान राष्ट्रांमधील व्यापारी, आर्थिक, सामाजिक आणि संरक्षण क्षेत्रातील सहकार्यामध्ये आसियानची

............

भूमिका महत्त्वाची आहे. आज जगातील सर्वात शक्तीशाली व्यापारसंघापैकी आसियान हा एक असून त्यामध्ये प्रवेश मिळावा यासाठी अनेक देश उत्सुक आहेत. आर्थिक सहकार्याबरोबरच विभागीय संरक्षणावर चर्चा करण्यासाठी 'आसियान रिजनल फोरम' नावाचे व्यासपीठ तयार करण्यात आले आहे. भारतदेखील या फोरमचा सदस्य आहे. आसियानशी सहकार्य वाढवण्यासाठी भारताने १९९१ मध्येच 'लूक ईस्ट' नावाचे धोरण स्विकारले आहे. तर २०१४ मध्ये अॅक्ट ईस्ट धोरण स्विकारले. आसियानमध्ये भारताला विभागीय सहकाऱ्याचा दर्जा देण्यात आला आहे.

**कार्य :**

१) आर्थिक सहकार्य.

२) आसियान राष्ट्रामध्ये आणि आसियान व इतर राष्ट्रांमध्ये प्रोत्साहन देणे.

३) आसियान सभासद राष्ट्रांदरम्यान संयुक्त संशोधन आणि तांत्रिक सहकार्य कार्यक्रम आखणे.

४) दक्षिण-पूर्व (आग्नेय) आशियाचा अभ्यास आणि पर्यटनाचा विकास करणे.

५) आसियान सभासद राष्ट्रामध्ये सांस्कृतिक, वैज्ञानिक, शैक्षणिक आणि प्रशासकिय देवाण-घेवाण, अंतर्भूत करणे.

व्हिएतनाम युद्धानंतर बदललेल्या दक्षिणपूर्व आशियाची सत्ता संतुलनामुळे आसियानला नवे राजकीय सामंजस्य प्राप्त झालेले दिसते. १९७० मध्ये सभासद राष्ट्रांनी गतिमान आर्थिक विकास देखील अनुभवला. त्यामुळे या राष्ट्रामध्ये दृढ ऐक्य निर्माण झाले. तसेच सर्व प्रशांत खोरे आणि त्या बाहेरील घटक जसे की युरोपीय संघ आणि अमेरिका यांना क्षेत्रीय राजनयाने समाविष्ट करून चीन व जपानचे वर्चस्व असलेल्या दक्षिण-पूर्व आणि पूर्व आशिया उपक्षेत्रात आसियानने सत्ता संतुलनाचा प्रयत्न केलेला दिसतो. १३ ते १५ नोव्हेंबर २०२० पर्यंत आसियनच्या एकूण ३७ शिखर परिषद संम्मेलने झालेली आहेत.

आशियान संघाने भारताला आसियानचे पूर्ण सदस्यत्व न देता सेक्टोरल डायलॉग पार्टनर करून घेतले, त्यामुळे व्यापार आणि संरक्षण या कारणाने आसियान संघ भारतासाठी उपयुक्त ठरला. चीनने समुद्र सीमारेषा निश्चित करण्यावरून आग्नेय आशियाई देशांशी वाद सुरू केले होते. चीनच्या विस्तारवादी धोरणाला शह देण्यासाठी भारताचे सहकार्य घेणे आसियान संघाला अपेक्षीत होते. याशिवाय भविष्यकाळात भारत आणि आसियान व्यापार संघ यांच्यात भांडवल पुरवठा, पर्यावरण नैसर्गिक संपत्ती, तेल, गॅस, रस्ते जोडणी अशा क्षेत्रात परस्परांना सहकार्य करणे सोयीचे झाले.

मात्र चीनचे दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्रांबरोबर समुद्रसीमारेषा निश्चित करण्याबाबत संघर्ष सुरू झाले आहेत. चीन दक्षिणपूर्व आशियातील काही प्रदेश आणि बेटावर आपला हक्क सांगत आहे. चीनच्या आक्रमक विस्तारवादामुळे ही लहान राष्ट्रे भयभीत होऊन भारताकडे संरक्षणाच्या दृष्टीने सहकार्याची अपेक्षा करीत आहेत. तेव्हा भारताने आसियान राष्ट्रांच्या संरक्षण, व्यापार या क्षेत्रांशी सहकार्य संबंध ठेवले पाहिजेत.

आसियान संघटनेतील दहा सदस्य देशांची आर्थिक परिस्थिती, सामाजिक व राजकीय समस्या समानच आहेत. तेव्हा त्यांनी आपल्या देशापुरता विचार न करता एकत्रितपणे विचार करून परराष्ट्र सहकार्यातून आर्थिक विकास साधला पाहिजे. या सर्व राष्ट्रांकडून मुक्त व्यापार हे धोरण राबविले पाहिजे.

दक्षिण आशियाच्या मर्यादित चौकटीत स्वत:ला बांधून न ठेवता, जागतिक पातळीवर चीनला सामोरे जाण्याचे धोरण भारत राबवीत आहे. दक्षिण आशियाई देशांना चीनची उपयुक्तता जाणवत असली, तरी चिनी प्रकल्पांविरोधात जनतेत पसरत असलेला असंतोष आणि राग याची जाणीवही आहे. त्याचा वापर भारताला करावा लागेल. भारत चीनला पर्याय असणार नाही; परंतु भारताबाबत या देशांत आदर निर्माण होण्याची गरज आहे. भारताच्या विरुद्ध आपण काही करू शकणार नाही, ही जाणीव निर्माण होण्याची गरज आहे. भारताच्या दक्षिण आशियाई रणनीती समोर आज हे आव्हान आहे.

**स्वयं अध्ययन प्रश्न – २ :**

**रिकाम्या जागा भरा.**

१. संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना ............ रोजी झाली.

२. युरोपियन महासंघाची स्थापना ............ साली झाली.

३. युरोपियन महासंघात ............ सदस्य राष्ट्रे आहेत.

४. युरोपियन महासंघाचे मुख्यालय ............ येथे आहे.

५. आसियानचे सचिवालय .......... येथे आहे.

६. आसियानच्या महासचिवाची नेमणूक ......... वर्षासाठी होते.

७. आसियाच्या शिखर बैठका वर्षातून ........ वेळा होता.

## ४.२.३ आर्थिक संघटना :

*** जागतिक व्यापार संघटना – (W.T.O)**

जागतिक राजकारणात व अर्थकारणात आमुलाग्र बदल होत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक व्यवहाराची गुंतागुंत असल्याने त्यात सुलभपणा आणण्यासाठी जागतिक स्तरावर काही कायदे करण्यात आले. याच हेतूने सन १९४८ मध्ये २३ राष्ट्रांनी एकत्र येवून जकात व व्यापाराबाबतची सर्वसामान्य करार करण्यात आला. यालाच 'गॅट करार' या प्रसिद्ध नावाने ओळखले जाते. भारत गॅटचा संस्थापक सदस्य देश आहे. गॅटच्या मार्गदर्शक तत्वानुसार जगात जकात व व्यापार व्यवहार चालत होते. परंतु सन १९८५ नंतर गॅटच्या व्यवहाराबाबत मतभेद निर्माण झाल्याने गॅटचे तत्कालिन अध्यक्ष ऑर्थर डंकेल यांनी एक मसूदा तयार केला. हा मसूदा जगभर 'डंकेल प्रस्ताव' म्हणून ओळखला गेला. डंकेल यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर विचार विनिमय करण्यासाठी उरूग्वे येथे गॅट राष्ट्रांची परिषद भरली. डंकेल प्रस्तावाला प्रारंभीच्या काळात गरीब व विकसनशील देशांनी, जागतिक कामगार संघटनानी मोठा विरोध केला. परंतु अंतिमत: एप्रिल १९९४

मध्ये सर्व सदस्य राष्ट्रांनी डंकेल प्रस्तावाला मान्यता देवून अंतिम कायदा तयार करण्यात आला. अमेरिकेच्या दबावाला बळी पडून अनेक विकसनशील देशांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. गॅट कराराची सुधारीत आवृत्ती म्हणजे डंकेल प्रस्ताव होय आणि याच डंकेल प्रस्तावाचे रूपांतर १ जानेवारी १९९५ रोजी 'विश्व व्यापार संघटनेत' झाले.

गॅट हा केवळ कायदेशीर करार होता. तर जागतिक व्यापार संघटना ही एक आंतरराष्ट्रीय संघटना आहे. हा या दोन्हीमधील मुख्य व महत्त्वाचा फरक आहे. वस्तू व सेवांचा व्यापार, विदेशी गुंतवणूक, बुद्धी संपदेचा अधिकार, राशी पतन विरोधी कायदे वगैरेबाबत लक्ष ठेऊन मुक्त व चांगल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी विश्व व्यापार संघटनेची स्थापना करण्यात आलेली आहे. सध्या १५१ राष्ट्रे विश्व व्यापार संघटनेची सदस्य राष्ट्रे असून एकूण जागतिक व्यापारापैकी ९० टक्के व्यापार विश्व व्यापार संघटनेअंतर्गत होतो. विश्वव्यापार संघटनेचे मुख्यालय जिनिव्हा (स्वित्झर्लंड) येथे आहे.

**विश्व व्यापार संघटनेची उद्दिष्ट्ये –**

विश्व व्यापार संघटनेच्या करारानुसार संघटनेची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आलेली आहेत.

१. परस्पर सहकार्य आणि समतेच्या तत्त्वावर उदार आणि मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार वाढीसाठी प्रयत्न करणे.

२. विश्व व्यापार संघटनेच्या सदस्य राष्ट्रांच्या आर्थिक, औद्योगिक विकासासाठी प्रयत्न करणे.

३. आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबतच्या नियमांचा आढावा व पुनर्विलोकन करणारी यंत्रणा स्थापन करणे.

४. सदस्य राष्ट्रामधील जनतेचे राहणीमान उंचावणे.

५. आर्थिक विकास व पर्यावरण संरक्षण यांची सांगड घालणे.

६. गरीब, अविकसीत राष्ट्रांच्या आर्थिक विकासासाठी विशेष प्रयत्न करणे.

७. सदस्य राष्ट्रामधील व्यापाराशी निगडीत वाद, तंटे यांची सोडवणूक करणे.

**जागतिक व्यापार संघटनेची रचना –**

विश्व व्यापार संघटनेचे मुख्य दोन घटक आहेत.

अ) मंत्री परिषद ब) सर्वसाधारण परिषद

**अ) मंत्री परिषद –**

जागतिक व्यापार संघटनेच्या मंत्रीपरिषदेमध्ये सदस्य राष्ट्रांच्या व्यापार मंत्र्यांचा समावेश होतो. मंत्री परिषद ही विश्व व्यापार संघटनेची सर्वोच्च निर्णय घेणारी समिती असून दर दोन वर्षांनी या परिषदेची बैठक होते. बहुपक्षीय व्यापाराबाबत महत्त्वाचे निर्णय घेण्याचे कार्य मंत्री परिषद पार पाडत असते. मंत्री परिषदेच्या

बैठका आतापर्यंत सिॲटल, दोहा, कॅनकन या ठिकाणी पार पडलेल्या आहेत. मंत्री परिषदेमध्ये होणारे निर्णय सर्वानुमते घेतले जातात. परंतु जेव्हा एखाद्या प्रस्तावाला विरोध होतो तेव्हा त्यावर मतदान घेतले जाते.

**ब) सर्वसाधारण परिषद –**

विश्व व्यापार संघटनेच्या सर्वसाधारण परिषदेत सदस्य राष्ट्रांच्या व्यापार प्रतिनिधींचा समावेश होतो. आंतरराष्ट्रीय व्यापार अधिक सुरळीतपणे चालवा, त्यातील गुंतागुंत कमी व्हावी, मतभेद वाढीस लागू नयेत आणि त्यातून संघर्ष निर्माण होवू नये. व्यापाराच्या नियमांमध्ये सुधारणा व संशोधन याबाबत सर्वसाधारण परिषद दक्ष असते. विश्व व्यापार संघटनेच्या रचनेमध्ये आणि तिचे कामकाज सुरळीतपणे चालावे यासाठी मंत्री परिषद महत्त्वाची भूमिका बजावत असते.

**विश्व व्यापार संघटनेची कार्ये :**

१) बहुपक्षीय व्यापारासंबंधीच्या कराराचे प्रशासन आणि अंमलबजावणी करणे.

२) आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाटाघाटी घडवून आणण्यासाठी व्यासपीठ म्हणून कार्य करते.

३) सदस्य देशांमधील व्यापारात निर्माण झालेले कलह व तंटे सोडविण्याचा प्रयत्न करणे.

४) जकात आणि व्यापारातील इतर निर्बंध कमी करण्यासाठी आचारसंहिता व नियमावली तयार करणे.

५) विश्व व्यापार धोरण ठरविणाऱ्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँकेसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांना सहकार्य करणे.

६) जागतिक व्यापार धोरण ठरविणाऱ्या आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँकेसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांना सहकार्य करणे.

**विश्व व्यापार संघटनेचा जागतिक स्तरावरील प्रभाव व महत्त्व –**

आज राष्ट्रीय व्यापाराइतकेच आंतरराष्ट्रीय व्यापारालाही महत्त्व प्राप्त झालेले आहे. विकसित देशांच्या आर्थिक प्रगतीमुळे त्यांचा आर्थिक व राजकीय क्षेत्रात प्रभाव वाढत आहे. त्यामुळे त्याचा परिणाम विकसनशील व गरीब राष्ट्रांवर पडत आहे. आर्थिक शक्तीचा हा दबाव वाढत चालल्यामुळे अनेक देशांना आपली आर्थिक धोरणे इच्छा असो अथवा नसो बदलणे भाग पडत आहे. उदा – भारताने स्वातंत्र्योत्तर काळात मिश्र अर्थव्यवस्थेच्या धोरणांचा पुरस्कार केला होता. परंतु विकसित राष्ट्रांच्या दबावामुळे भारताने आपले आर्थिक धोरण बदलले असून सन १९९०–९१ पासून 'खुल्या' किंवा 'मुक्त' अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केलेला आहे. हीच परिस्थिती कमी अधिक प्रमाणात जगभरातील देशांमध्ये आढळते.

विश्व व्यापार संघटनेच्या स्थापनेनंतर उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण यांना वेग आला आहे. कोणतेच राष्ट्र या प्रक्रियेपासून स्वत:ला दूर ठेवू शकत नाही. विश्व व्यापार संघटनेच्या माध्यमातून गरीब राष्ट्रांचे शोषण बडी राष्ट्रे करीत आहेत. अशीही टीका होत आहे. त्यामुळेच अनेक देशामध्ये विश्व व्यापार

संघटनेच्या धोरणांना लोक विरोध करताना दिसतात. या टीकेत निश्चितच तथ्य आहे. असे असले तरी गरीब व अविकसित राष्ट्रांच्या दृष्टीने विचार केल्यास श्रीमंत राष्ट्रांकडून मिळणारे भांडवल व तंत्रज्ञान, प्रशिक्षित मनुष्यबळ या साधनांचा वापर गरीब राष्ट्रांना उपलब्ध झाला आहे. जागतिक स्तरावर असणारी व्यापारी बंधने विश्व व्यापार संघटनेच्या माध्यमातून घटवली गेल्यास व जग व्यापारी दृष्ट्या मुक्त झाल्यास जगातील ग्राहक असलेल्या जनतेचा सर्वाधिक फायदा होईल असे म्हटले जाते. थोडक्यात विश्व व्यापार संघटनेचा जागतिक राजकारणांवर व अर्थकारणावर सर्वाधिक प्रभाव असल्याचे आणि तो उत्तरोत्तर वाढत असल्याचे दिसते.

**जागतिक व्यापार संघटनेच्या परिषदा**

| मंत्री परिषद | दिनांक | स्थल |
|---|---|---|
| १. | ९ ते १३ डिसेंबर, १९९६ सिंगापूर | |
| २. | १८ ते ते २० मे, १९९८ जिनीव्हा (स्वित्झर्लंड) | |
| ३. | ३० नोव्हेंबर ते ३ डिसेंबर, १९९९ | सिटले (युनायटेड स्टेटस) |
| ४. | ९ ते १४ नोव्हेंबर, २००१ दोहा (कतार) | |
| ५. | १० ते १४ सप्टेंबर, २००३ | कॅनकूर (मेक्सिको) |
| ६. | १३ ते १८ डिसेंबर, २००५ | हाँगकाँग |
| ७. | ३० नोव्हेंबर ते २ डिसेंबर, २००९ | जिनीव्हा (स्वित्झर्लंड) |
| ८. | १५ ते १७ डिसेंबर, २०११ | जिनीव्हा (स्वित्झर्लंड) |
| ९. | ३ ते ६ डिसेंबर, २०१३ बाली (इंडोनेशिया) | |
| १०. | १५ ते १९ डिसेंबर, २०१५ | नैरोबी |
| ११. | १० ते १३ डिसेंबर, २०१७ | ब्युनास आयर्स (अर्जेंटिना) |
| १२. | १२ ते १५ जून, २०२२ | जिनिव्हा (स्वित्सर्लंड) |

कोरोनाच्या महामारीत जगातील जवळपास सर्वच देशांची अर्थव्यवस्था ठप्प झाली होती. जागतिक व्यापारावर लक्ष ठेवून असणाऱ्या आणि या व्यापाराच नियमन करणाऱ्या WTO ने काळजीत टाकणारे भाकीत वर्तवले होते. विशेष म्हणजे जागतिक स्तरावर १०० हून अधिक देशांचा व्यापार हा चीन सोबत होतो व २५ पेक्षा जास्त देशांचा म्हणजे ३०% पेक्षा जास्त व्यापार हा एकट्या चीन सोबत होतो. यामुळे परावलंबीत्वाचा धोका येथे निर्माण होतो. आज जागतिक अर्थकारणात चीनची ही मध्यवर्ती भूमीका आहे. कोरोनाच्या काळात चीनमधील उद्योग, व्यवसाय बंद झाल्याने त्याचा परिणाम इतर देशांच्या दैनंदिन व्यवहारावर झाला. अन्न वस्त्र आणि निवारा ह्या मूलभूत गरजा पूर्ण होण्याची जी व्यवस्था होती, ती कोरोनाच्या काळात पूर्णपणे विस्कळीत झाली.

त्यामुळे नागरिकांना स्थलांतराचा पर्याय निवडावा लागला. तर काही लोकांचे मोठ्या प्रमाणात विस्तापन वाढले. तसेच या महामारीमुळे देशांतर्गत व बाहेर गरीब व श्रीमंत ही दरी वाढल्याने यातून रोजगाराच्या मोठ्या समस्या निर्माण झाल्या.

**ब्रिक्स (BRICS) :**

ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका यांच्या समूहाने म्हणजेच 'ब्रिक्स' देशांनी आपली स्वतंत्र बँक स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या बँकेचे वर्णन मिनी आय. एम. एफ. असे केले जात आहे. २०१० पर्यंत या संघटनेला 'ब्रिक' असे नाव होते. २०११ साली दक्षिण आफ्रिका या संघटनेत सामील झाल्यानंतर याला 'ब्रिक्स' असे संबोधण्यात येऊ लागले.

ब्रिक्स संघटना उदय, विकास :

गोल्डमन सॅक्स या कंपनीचे अर्थतज्ज्ञ जिम ओ नील यांनी २००१ मध्ये 'बिल्डिंग बेटर ग्लोबल इकॉनॉमिक ब्रिक्स' प्रकाशनात सर्वप्रथम ब्रिक्स या शब्दाचा पहिल्यांदा उल्लेख केला. त्यानंतर २००६ साली प्रथम ब्राझिल, रशिया, भारत व चीन या चारही देशांच्या परराष्ट्र मंत्री हे संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासत्तेची बैठक संपल्यानंतर एक औपचारिक बैठक घेतली. त्यामध्ये त्यांनी BRIC सारखी संघटना असावी, त्याचे शिखर संमेलन व्हावेत असा निर्णय झाला. त्यानंतर पहिले BRIC संमेलन हे २००९ साली रशियातील बेर्कतेरिनर्बमध्ये पार पडले. त्यामध्ये प्रथम जागतिक वित्त सुधारणेच्या विषयी चर्चा करण्यात आली. यामध्ये दक्षिण आफ्रिका हा देश सहभागी नव्हता. पुढे २०१० साली दक्षिण आफ्रिकेला सदस्यत्व देण्यात आले. ब्रिक्स देशांमध्ये जगातील ४३% लोकसंख्या समाविष्ठ झाली आहे. या संघटनेचा मुख्य उद्देश सहकार्य, सल्लामसलत व संयोजन करणे हा आहे. तसेच स्थैर्य, सुरक्षा, प्रगती इ. अनेक गोष्टींची चर्चा करण्यात आली आहे. पुढे २०११ मध्ये दक्षिण आफ्रिका यामध्ये सामील झाल्यानंतर याला ब्रिक्समध्ये नाव संबोधण्यात आले असून आज जागतिक स्तरावर अत्यंत महत्त्वाची संघटना म्हणून उदयास आली आहे.

**'ब्रिक्स' संघटनेच्या परिषदा**

| बैठक क्र. | तारीख | ठिकाण | यजमान देश |
|---|---|---|---|
| १. | १६ जून २००९ | येकातरिनबर्ग | रशिया |
| २. | १५ एप्रिल २०१० | ब्राझीलिया | ब्राझील |
| ३. | १४ एप्रिल २०११ | सान्या | चीन |
| ४. | २९ मार्च २०१२ | नवी दिल्ली | भारत |
| ५. | २६-२७ मार्च २०१३ | डरबन | दक्षिण आफ्रिका |
| ६. | १४-१६ जुलै २०१४ | फोर्टलिझा | ब्राझील |
| ७. | ८-९ जुलै २०१५ | ऊफा | रशिया |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | १५-१६ ऑक्टोबर २०१६ | गोवा | भारत |
| ९. | ३-५ सप्टेंबर २०१७ | जियामेन | चीन |
| १०. | २५-२७ जुलै २०१८ | जोहान्सबर्ग | दक्षिण आफ्रिका |
| ११. | १३-१४ नोव्हेंबर २०१९ | ब्राझीलिया | ब्राझील |
| १२. | २० नोव्हेंबर २०२० | सेंट पीटसबर्ग | रशिया |
| १३. | २०२१ | - | भारत |
| १४. | २०२२ | बिजिंग | चीन |
| १५. | २०२३ | - | द. आफ्रिका |

**ब्रिक्स बँकेची उद्दिष्ट्ये :**

१. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि पर्यायाने अमेरिका आणि अन्य पाश्चात्य राष्ट्रांच्या आर्थिक प्रभावाला आव्हान देण्यासाठी 'ब्रिक्स बँक' स्थापन करणे.

२. विकसनशील राष्ट्रांना विकास कार्यासाठी जागतिक बँक व नाणेनिधीकडून कर्ज घ्यावे लागते. या दोन्ही संस्था अमेरिका आणि पाश्चात्त्य देशांच्या प्रभावाखाली कार्य करतात. त्यामुळे अप्रत्यक्षपणे या देशांची मर्जी सांभाळावी लागते. तेव्हा हे आर्थिक वर्चस्व झुगारून देण्यासाठी 'ब्रिक्स' बँकेची स्थापना करणे आवश्यक झाले.

३. ब्रिक्सच्या सदस्य राष्ट्रांतील पायाभूत विकास कामासाठी निधी उपलब्ध करून देणे. त्यामध्ये प्रामुख्याने रस्ते बांधणी, पूल उभारणे, विमानतळ उभारणी यांचा समोवश असेल. आरोग्य, शिक्षण, शेती, नगर विकास, स्वच्छ ऊर्जा या घटकांवर लक्ष केंद्रित केले जाईल.

४. ब्रिक्स बँक स्थापन करण्यासाठी सर्व सदस्य राष्ट्रांच्या संसदेकडून तिला मान्यता घेणे आवश्यक आहे.

५. बिगर - ब्रिक्स देशांनाही आर्थिक मदत देण्यासाठी प्रयत्न केले जातील. उदा. अर्जेंटिना या देशाला आर्थिक मदत करण्याचा आग्रह ब्राझीलचे अध्यक्ष दिलमा रौसेफ यांनी धरला.

६. आफ्रिकेसाठी विभागीय केंद्र दक्षिण आफ्रिकेत स्थापन केले जाईल.

७. ब्रिक्स बँकेतील सर्व सदस्य राष्ट्रांना समान अधिकार असतील.

८. दहशतवादाचा निषेध करून त्याचे निर्मूलन करण्याचे प्रयत्न करणे. कोणत्याही प्रकारच्या दहशतवाद्यांना वित्तपुरवठा, प्रोत्साहन देणे, प्रशिक्षण देणे यापासून सर्व संस्थांनी दूर राहणे, हे उद्दिष्ट ब्रिक्स बँकेच्या बाबतीत राहील.

**ब्रिक्स बँकचे स्वरूप :**

ब्रिक्स बँकेचे मुख्यालय शांघाय (चीन) येथे राहील. बँकेचे पहिले अध्यक्षपद भारताकडे सहा वर्षे

राहील. त्यानंतर अनुक्रमे ब्राझील आणि रशियाकडे प्रत्येकी पाच वर्षे राहील. ब्राझील देशाच्या फोर्टलेझा येथे १४ ते १६ जुलै, २०१४ दरम्यान परिषद होऊन ब्रिक्स बँक स्थापनेचा निर्णय घेण्यात आला.

**ब्रिक्स बँकेचे भागभांडवल :**

ब्रिक्स बँकेचे प्राथमिक भागभांडवल १०० अब्ज डॉलर असेल. सुरूवातीला सर्व सदस्य देश प्रत्येकी १० अब्ज डॉलर निधी देणार आहेत. भारत, रशिया आणि ब्राझील हे देश प्रत्येकी १८ अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार आहेत. दक्षिण आफ्रिका पाच अब्ज डॉलरचे भांडवल देणार आहे. चीनने ब्रिक्स बँकेच्या राखीव निधीसाठी ४१ अब्ज डॉलरची तरतूद केली आहे. ब्रिक्स बँकेचे १०० कोटी डॉलर हे भागभांडवल आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (३०० अब्ज डॉलर) आणि जागतिक बँक (४०० अब्ज डॉलर) यांच्या प्रमाणात फारच कमी आहे. तरीपण भविष्य काळात ब्रिक्सची राष्ट्रे या नव्या विकास बँकेचे भागभांडवल वाढवतील कारण ब्रिक्स देशांमध्ये सर्वाधिक आर्थिक संपन्न असणारा चीन देश ब्रिक्स बँकेत विपुल प्रमाणात भागभांडवल पुरवू शकेल.

**'ब्रिक्स' संघटनेचे महत्त्व :**

'ब्रिक्स' बँकेची स्थापना हे जागतिक अर्थव्यवस्थेतील लक्षणीय पाऊल असून सर्व देशांच्या विकासासाठी मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार असणारी ही व्यवस्था अत्यंत महत्त्वपूर्ण आहे,' असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ब्राझील देशातील फोर्टालेझा येथे झालेल्या सहाव्या ब्रिक्स परिषदेत मांडले. 'न्यू डेव्हलपमेन्ट बँक'(N.D.B.) उभारण्यामागचा उद्देश या पाच राष्ट्रांना संकटकालीन आर्थिक तरतूद करण्याचा आहे. विकसित देशांसाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक ही वित्तीय संस्था असल्याने विकसनशील राष्ट्रांकडे निधीसाठी दुर्लक्ष होत असल्याची भारतासह या ब्रिक्स संघटनेतील सदस्य राष्ट्रांची तक्रार होती. या उद्देशानेच या नव्या ब्रिक्स बँकेच्या रूपात समांतर व्यवस्था आकारास येत आहे.

विकसनशील राष्ट्रांना विकास कार्यासाठी जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून कर्ज घ्यावे लागते. या दोन्ही आर्थिक संघटना अमेरिका आणि पाश्चात्त्य देशांच्या प्रभावाखाली काम करतात. या दोन्ही संस्थांच्या नावात जागतिक आणि आंतरराष्ट्रीय असे शब्द असले तरी या दोन्ही संस्था अमेरिका आणि युरोप खंड यांच्याच प्रभावाखाली चालतात. जागतिक बँकेच्या स्थापनेपासून गेल्या सत्तर वर्षात या बँकेचे प्रमुखपद एकाही बिगर अमेरिकी व्यक्तीस मिळालेले नाही तसेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या संघटनेचे प्रमुखपद कायमपणे युरोपीय व्यक्तीकडेच राहील, अशीच ही व्यवस्था आहे. याचे कारण असे की, या दोन्ही संस्थांच्या स्थापनेत अमेरिका आणि युरोपचा लक्षणीय वाटा आहे. या दोन्ही आर्थिक संस्थांचे भागभांडवल सशक्त, सक्षम आहे. जागतिक बँकेच्या आणि नाणेनिधीच्या भागभांडवलाचा पुरवठा विकसनशील राष्ट्रांना देताना अमेरिका आणि पाश्चात्त्य राष्ट्रांच्या मर्जीप्रमाणे होत असतो. आंतरराष्ट्रीय आर्थिक अनिश्चितता पाहता विकसनशील देशांनाही आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी 'ब्रिक्स' या समांतर आर्थिक संस्थेची आवश्यकता भासू लागली. त्यानुसार २०१४ साली ब्रिक्स देशांच्या परिषदेमध्ये ब्रिक्स बँकेची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला.

ब्रिक्स बँकेसाठी राखीव निधी म्हणून ब्रिक्स देशांकडून निधी गोळा केला जाणार आहे. सर्वाधिक निधी (४१०० कोटी डॉलर) चीनकडून येणार आहे. त्यामुळे ब्रिक्सच्या आर्थिक व्यवहारांवर चीनचा प्रभाव वाढेल आणि भारत, रशिया, ब्राझील या देशांना चीनच्या दबावाखाली राहावे लागेल अशी उपरोधिक टीका या आर्थिक संघटनेवर होऊ लागलेली आहे. वास्तविक भविष्यात चीन हा देशच महासत्ता होणार आहे असे म्हणता येणार नाही. ब्रिक्स संघटनेतील सर्वच राष्ट्रे आपल्याला प्रयत्नानुसार प्रगतीपथावर राहणार आहेत. तेव्हा ब्रिक्सवर एकांगी टीका करणे अयोग्य वाटते.

**दहशतवादाला विरोध :**

विकसनशील देशांच्या आर्थिक विकासासाठी स्थापन झालेल्या 'ब्रिक्स' देशांच्या परिषदेमध्ये दहशतवादी विरोधातील जाहीरनामा मंजूर करण्यात आला. राजकीय, धार्मिक, वैचारिक अशा कोणत्याही कारणावरून निर्माण झालेल्या दहशतवादाचे समर्थन होऊ शकणार नाही, असे स्पष्ट करतानाच सर्व प्रकारच्या दहशतवादाचा या जाहीरनाम्यात निषेध करण्यात आलेला आहे. या ठरावामुळे भारताच्या भूमिकेला मोठ्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरून पाठबळ मिळाल्याचे दिसून येते. कोणत्याही प्रकारच्या दहशतवाद्यांना वित्तपुरवठा, प्रोत्साहन देणे, प्रशिक्षण देणे यासारख्या कृतीपासून सर्व संस्थांनी दूर राहावे असे सर्व सदस्य राष्ट्रांना आवाहन करण्यात आले. यामध्ये मानवाधिकार आणि मुलभूत स्वातंत्र्याचा आदर राखण्यात यावा असे म्हटले आहे.

**प्रादेशिक / क्षेत्रिय संघटनांचे महत्त्व :**

क्षेत्रिय संघटनावर काही टीकाकार असा आरोप करतात की, या संघटनांनी संयुक्त राष्ट्रांचे महत्त्व कमी केले आहे. एवढेच नव्हे तर या संघटनांनी संयुक्त राष्ट्रांच्या अस्तित्वालाही धोका निर्माण केलेला आहे. परंतु ही टीका चुकीच्या गृहितांवर आधारलेली आहे. कारण संयुक्त राष्ट्र संघटना ज्या स्वरूपाचे काम करते त्याला पुरक असेच काम वरील प्रादेशिक संघटना करीत असल्याचे दिसते. या संघटनांच्या कार्यक्षेत्राची व्याप्ती संयुक्त राष्ट्रांशी तुलना करता खूपच मर्यादित असल्याचे दिसते. जगातील कोणत्याही विभागातील शेजारील राष्ट्रांनी संघटित होऊन आपले प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणे ही गोष्ट स्वाभाविक आणि योग्य मानली पाहिजे. संघटित झाल्याने आपल्या समस्यांवर ते देश परिणामकारकपणे मात करू शकतात. म्हणजेच एक प्रकारे या क्षेत्रिय संघटना त्यांच्या विभागीय समस्या स्वत:च सोडवून संयुक्त राष्ट्रांवरील कामाचा ताण कमी करतात. असेच म्हटले पाहिजे. त्यामुळे संयुक्त राष्ट्रांना जागतिक महत्त्वाच्या प्रश्नावर लक्ष केंद्रीत करणे शक्य होईल. दुसरी एक महत्त्वाची बाब म्हणजे या क्षेत्रिय संघटनांच्या सहकार्याआड विचार प्रणालीचा अडसरही येताना दिसत नाही. थोडक्यात संयुक्त राष्ट्रांचे महत्त्व कमी न करता क्षेत्रिय संघटना आंतरराष्ट्रीय क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. असा निष्कर्ष काढल्यास तो चुकीचा ठरणार नाही.

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३ :**

**पुढील विधाने चुक की बरोबर ते लिहा.**

१. भारत हा गॅटचा संस्थापक सदस्य देश आहे. (            )

२. जागतिक व्यापार संघटनेचे मुख्य कार्यालय जिनीव्हा येथे आहे. (   )

३. एकूण जागतिक व्यापारापैकी ९० टक्के व्यापार विश्व व्यापार संघटनेमार्फत होतो. (   )

४. २०१४ साली ब्रिक्स संघटनेची सहावी परिषद ब्राझील देशात झाली. (   )

५. ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका हे 'ब्रिक्स' बँकेचे सदस्य आहेत. ( )

**४.३ सारांश –**

* विसाव्या शतकातील आंतरराष्ट्रीय राजकारणाची विभागणी चार व्यवस्थांमध्ये केली जाते. यात पहिल्या महायुद्धापूर्वीची युरोपीयन महासत्तांमधील सत्तासमतोलाची व्यवस्था पहिल्या व दुसऱ्या महायुद्धा दरम्यानची आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्यवस्था.

* शीत युद्धाचा अर्थ म्हणजे दोन परस्पर विरोधी राजकीय पद्धती किंवा विचारधारांमध्ये चाललेला संघर्ष होय. शीतयुद्धोत्तर नवी आंतरराष्ट्रीय व्यवस्था. १९९० च्या दशकात आंतरराष्ट्रीय राजकारणात मोठे बदल झाले. सोव्हिएट रशियाचे विघटन होऊन अमेरिकेचे आंतरराष्ट्रीय राजकारणावरील प्रभुत्व वाढले. एक ध्रुवीय जगाचा उदय, इराण-इराक युद्धाचा शेवट, लोकशाहीकरण, स्पर्धा व आर्थिक संबंधाना महत्व प्राप्त झाले.

* नवीन विश्व रचनेची वैशिष्ट्ये – १) एक ध्रुवीय विश्वरचना २) बहुध्रुवीय विश्वरचना ३) आर्थिक हितसंबंधाना महत्व ४) आंतरराष्ट्रीय राजकारणात आशियाई राष्ट्रांचे महत्व ५) लोकशाहीला गती ६) आंतरराष्ट्रीय सहकार्यात वाढ ७) संयुक्त राष्ट्राची बदलती भूमिका ८) नि:शस्त्रीकरणाला गती ९) पर्यावरणाची गरज १०) व्यापारी संघाची भूमिका ११) जागतिकीकरण १२) मानवी हक्काचे संरक्षणाची जाणीव १३) वंशवाद १४) धार्मिक मूलतत्ववाद १५) आंतरराष्ट्रीय दहशतवाद १६) मानवी सुरक्षेचा प्रश्न.

* प्रादेशिक संघटना म्हणजे समान उद्देशाच्या प्राप्तीसाठी राज्यांचा समुदायांनी एकत्र येवून स्थापन केलेले संघटन.

* आसियान – आसियान संघटनेची स्थापना १९६७ मध्ये झाली. १० राष्ट्रे आसियानची सदस्य राष्ट्रे आहेत. थायलंड, मलेशिया, सिंगापूर, फिलिपाईन्स, इंडोनेशिया, ब्रुनेई, व्हिएतनाम, कंबोडिया, लाओस व म्यानमार हे देश या संघटनेचे सभासद आहेत. आसियानचे मुख्यालय जकार्ता (इंडोनेशिया) येथे आहे. परस्पर व्यापारवृद्धी व आर्थिक सहयोग वाढवणे, अन्नधान्य उत्पादनाच्या वाढीला चालना देणे. त्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे, तंत्रज्ञान, व्यापार, गुंतवणूक व पर्यटन या क्षेत्रात सहकार्य वाढविणे इ. आसियानमध्ये भारताला विभागीय सहकाऱ्याचा दर्जा देण्यात आलेला आहे.

* युरोपियन महासंघ :- मॅस्ट्रिश करारातून १९९३ मध्ये युरोपियन महासंघाचा उदय झाला. ऑस्ट्रिया, बेल्जियम, डेन्मार्क, फिनलंड, फ्रान्स, जर्मनी इ. १५ राष्ट्रे या संघटनेची सदस्य राष्ट्रे आहेत. युरोपियन महासंघाचे मुख्यालय ब्रुसेल्स (बेल्जियम) येथे आहे. आर्थिक वित्तीय संघ स्थापन करणे. एक चलन व्यवस्था निर्माण करणे, युरोपसाठी एक नागरिकत्वाच्या निर्मितीसाठी प्रयत्न करणे हे या संघाचे मुख्य उद्देश आहेत.

※ आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी जागतिक पातळीवर आर्थिक संघटनेची निर्मिती झाली. जागतिक व्यापार / विश्व व्यापार संघटना – १९४८ मध्ये २३ राष्ट्रांनी एकत्र येवून गॅटची स्थापना केली. गॅटचे नवे रूप म्हणजे डब्ल्यू टी. ओ. होय. १ जानेवारी १९९५ रोजी W.T.O ची स्थापना झाली. गॅटचे अध्यक्ष ऑर्थर डंकेल यांनी मांडलेल्या प्रस्तावाला १९९४ मध्ये सर्व सदस्य राष्ट्रांनी मान्यता दिली आणि विश्व व्यापार संघटनेचा उदय झाला. ९० टक्के व्यापार (W.T.O) अंतर्गत होतो. १) उदार व मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापार वाढीसाठी प्रयत्न करणे २) संघटनेतील सदस्यांच्या आर्थिक औद्योगिक विकासासाठी प्रयत्न करणे ३) सदस्य राष्ट्रांमधील जनतेचे राहणीमान सुधारणे ४) आर्थिक विकास व पर्यावरण संरक्षण यांची सांगड घालणे इ. या संघटनेची प्रमुख ध्येये आहेत. मंत्री परिषद व सर्वसाधारण परिषद हे दोन प्रमुख घटक या संघटनेच्या रचनेतील आहेत. विश्व व्यापार संघटनेच्या स्थापनेमुळे उदारीकरण खाजगीकरण व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला गती मिळालेली आहे.

※ 'ब्रिक्स' या संघटनेविषयी जाणून घेणे अतिशय महत्वाचे ठरते. ब्रिक्स ही संघटना २००९ साली उदयाला आली याचे पाच सदस्य देश असून त्यात भारत, रशिया, ब्राझील, चीन आणि दक्षिण आफ्रिका या राष्ट्राचा समावेश होतो. प्रत्येक देशांच्या आद्य अक्षरावरून 'ब्रिक्स' शब्द तयार झाला असून ही बँक सध्या अस्तित्वात असलेल्या अमेरिकन वर्चस्ववादी जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीला पर्याय म्हणून स्थापन होत असणारी बँक आहे. पायाभूत सुविधासाठी निधी उभा करून देणे, आफ्रिकेसाठी विभागीय केंद्र स्थापने, ब्रिक्स बँकेतील सर्व सदस्याना समान अधिकार देणे, ब्रिक्स देशांच्या संसदांकडून बँकेला मान्यता घेणे आवश्यक आहे.

जागतिक बँकेच्या आणि नाणेनिधीच्या भागभांडवलाचा पुरवठा विकसनशील राष्ट्रांना देताना अमेरिका आणि पाश्चात्य राष्ट्रांच्या मर्जीप्रमाणे होत असतो हे पाहता विकसनशील देशांनाही आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी ब्रिक्स देशांनी ब्रिक्स बँकेची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## ४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ इ. :

| | | |
|---|---|---|
| पेरिस्त्रोईका | – | पुनर्रचना |
| ग्लासनोस्त | – | खुलेपणा |
| एक ध्रुविय | – | एक केंद्री |
| युक्तीवाद | – | मत प्रदर्शन |
| मनोवैज्ञानिक | – | मानसिक |
| वैश्विक | – | जागतिक |
| विश्वरचना | – | जगाची रचना, व्यवस्था |
| सर्वेसर्वा | – | प्रमुख, मुख्य सूत्रधार |
| एकाधिकारशाही | – | हुकूमशाही |

| | | |
|---|---|---|
| अग्रक्रम | – | प्राधान्य |
| संवर्धन | – | पोषण |
| मानवधिकार | – | मानवाचा हक्क |
| द्विपक्षीय | – | दोन राष्ट्रांमधील |
| बहुपक्षीय | – | दोन किंवा अधिक राष्ट्रांमधील |
| विस्फोटक | – | धोकादायक |
| धीमी | – | संथ |
| तटस्थ | – | अलिप्त |
| मनुष्यबळ | – | मनुष्य शक्ती, कामगार |
| गृहित | – | समजूत |
| प्रभुत्व | – | वर्चस्व |

## ४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं: अध्ययन प्रश्न – १**

१) शीत युद्धोत्तर

२) जॉर्ज बुश (सिनिअर)

२) सोविएत रशिया

४) मिखाईल गोर्बाचेव्ह

५) शीतयुद्ध

**स्वयं : अध्ययन प्रश्न – २**

१) २४ आक्टोंबर १९४५

२) जकार्ता

३) पाच

४) दोन

५) १९९३

६) १५

७) ब्रुसेल्स (बेल्जियम)

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

१) बरोबर

२) बरोबर

३) बरोबर

४) बरोबर

५) बरोबर.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

**पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) शीतयुद्ध म्हणजे काय? शीतयुद्धोत्तर जगाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) आंतरराष्ट्रीय दहशतवाद व धार्मिक मूलतत्ववाद म्हणजे काय व त्याचे परिणाम स्पष्ट करा.

३) आंतरराष्ट्रीय राजकारणातील अमेरिकेच्या भूमिकेची चर्चा करा.

४) जागतिक व्यापार संघटनेचे स्वरूप सांगून तिच्या कार्याचे मूल्यामापन करा.

५) आसियानची रचना स्पष्ट करून तिची उद्दिष्टे स्पष्ट करा.

**टिपा लिहा.**

१) आसियान संघटना

२) युरोपीय महासंघ

३) जागतिक व्यापार संघटना

४) एकध्रुवीय विश्वरचना

५) बहुध्रुवीय विश्वरचना

६) ब्रिक्स - आर्थिक संघटना

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके / ग्रंथ :


१) डॉ. वसंत रायपूरकर, (२००६) आंतरराष्ट्रीय संबध, मंगेश प्रकाशन, नागपूर.

२) डॉ. देवळाणकर शैलेंद्र, (२००५) आंतरराष्ट्रीय संबध, विद्या प्रकाशन, औरंगाबाद.

३) डॉ. पेंडसे अरूणा, सहस्त्रबुद्धे उत्तरा (२०११), आंतरराष्ट्रीय संबध शितयुद्धोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण, ओरिएंट लॉगमन, हैद्राबाद.

४) प्रा. वराडकर र. घ, आंतरराष्ट्रीय संबध आणि राजकारण, विद्या प्रकाशन नागपूर

५) डॉ. भोगले शांताराम, आंतरराष्ट्रीय संबध, विद्या प्रकाशन, नागपूर.

६) डॉ. कुलकर्णी बी. वाय, व प्रा. नाईकवाडे अशोक, आंतरराष्ट्रीय . संबध सिद्धांत व्यवहार, विद्या प्रकाशन, पुणे.

७) http:/www./org/english : World Trade Organization the wtolei/inbrief/elintrooehtm. (WTO in Brief)

८) डॉ. डोळे ना. य., आंतरराष्ट्रीय संबध, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

९) Palmer-Perkins, International Relations 1985, C.B.S. Publishers, New Delhi.

१०) डॉ. पाटील वा. भा; आंतरराष्ट्रीय संबध, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

११) डॉ. विनोदकुमार पाल - वैश्विक राजनिती एवं आंतरराष्ट्रीय संघटना, डिस्कव्हरी पब्लिशिंग हाऊस प्रा. लि. २०१०.

१२) बी. सी. नरूला - आंतरराष्ट्रीय संघटना, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, २०१२.

## घटक १

# परराष्ट्र धोरण

## (Foreign Policy)


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

- १.२.१ परराष्ट्र धोरणाचा अर्थ, व्याख्या, उद्दिष्टे
- १.२.२ भारतीय परराष्ट्र धोरणांचे निर्धारक घटक
- १.२.३ भारतीय परराष्ट्र धोरणाची मुलतत्वे

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


### १.० उद्दिष्टे :

१) परराष्ट्र धोरणाचा अर्थ व व्याख्या अभ्यासणे.

२) परराष्ट्र धोरणांच्या उद्दिष्टांची चर्चा करणे.

३) भारतीय परराष्ट्र धोरणाच्या निर्धारक घटकांचे विवेचन करणे.

४) भारतीय परराष्ट्र धोरणांच्या मुलभूत तत्वांचा अभ्यास करणे.

## १.१ प्रस्तावना :

मागील सत्रात आपण आंतरराष्ट्रीय संबंध, राष्ट्रीय सत्ता, राजनय, नवीन राजकीय सत्ता या घटकांचा अभ्यास केला आहे. या प्रकरणात आपण परराष्ट्र धोरण व भारताच्या पराराष्ट्र धोरणांची मुलभूत तत्वे अभ्यासणार आहोत. २१ व्या शतकात आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासात परराष्ट्र धोरणाच्या अभ्यासाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. आधुनिक जगातील कोणतेही राज्य स्वयं: पूर्ण व स्वावलंबी नाही. सर्व राज्यांना आपल्या विकासासाठी परस्परांशी संबंध निश्चित करावे लागतात. हे परस्पर संबंध निश्चित अशा तत्वावर आधारित ठेवले जातात. राज्य आपली उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी असे परस्पर संबंध परराष्ट्र धोरणाच्या आधारानेच निश्चित करीत असतात. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाची 'गुरुकिल्ली' म्हणून परराष्ट्र धोरणाकडे पाहिले जाते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासामध्ये जगातील महत्वाच्या राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणांचा अभ्यास एक महत्वाचा भाग ठरतो.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ परराष्ट्र धोरणाचा अर्थ, व्याख्या, उद्दिष्टे :

#### परराष्ट्र धोरण अर्थ (Meaning of Foreign Policy)

जगातील प्रत्येक राष्ट्र आपणास सोईस्कर असलेले वर्तन इतर राष्ट्रांनी करावे, यासाठी आपल्या प्रभावाचा विविध स्वरुपात वापर करुन त्या त्या राज्यातील राज्यकर्त्यांचे मत परिवर्तन करते यालाच ढोबळमानाने परराष्ट्र धोरण म्हटले जाते.

परराष्ट्र धोरण ही एक गतिमान प्रक्रिया असते. कारण अंतर्गत व बाहय अशा अनेक घटकांचा परिणाम होवून परराष्ट्र धोरण आकारला येत असते. परराष्ट्र धोरणाच्या गतिमानतेमुळे कोणतीही एक व्याख्या परिपूर्ण ठरत नाही. तथापी अभ्यासाच्या दृष्टीकोनातून काही महत्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

**१) नॉर्मन हिल :**

यांच्यामते, ''एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राच्या संदर्भात आपल्या हिताच्या संवर्धनार्थ केलेल्या प्रयत्नांचे सार म्हणजे परराष्ट्र धोरण होय.''

**२) चार्लर्स बर्टन :**

यांच्यामते, ''परराष्ट्र धोरण म्हणजे राजसत्तेने आपल्या क्षेत्राबाहेरील परिस्थितीला प्रभावित करण्यासाठी केलेल्या कृतीचा क्रम होय.''

**३) राज्यशास्त्र कोष :**

यांच्यामते, ''एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राविषयी स्वीकारलेले धोरण म्हणजे परराष्ट्र धोरण होय.''

४) **जॉर्ज मोडेल्स्की :–**

यांच्या मतानुसार, परराष्ट्र धोरण म्हणजे एका समुदायाने किंवा राष्ट्राने दुसऱ्या समुदायाची किंवा राष्ट्राचे वर्तन प्रभावीत करण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय पटलावर स्वत:चे स्थान सुरक्षित व मजबूत करण्यासाठी कार्यान्वित केलेला क्रियाकलाप होय. दुसऱ्या राष्ट्रांची वर्तने यशस्वीपणे बदलण्यासाठी आवश्यक त्या निर्णयप्रक्रियेवर आणि स्वव्यवहारावर प्रकाश टाकण्याची भूमिका परराष्ट्र धोरणाला बजावावी लागते. (George Modelski, A Theory of Foreign Policy, (London, 1962) pp G-7) प्रत्येक राष्ट्राच्या व्यवहाराचा व वर्तनाचा परिणाम प्रत्येक दुसऱ्या राष्ट्राच्या निर्णयप्रक्रियेवर प्रत्यक किंवा अप्रत्यक्षपणे, कमी किंवा जास्त प्रमाणात, लाभदायकरित्या किंवा हानीकारकपणे होत असतो. दुसऱ्या राष्ट्रांच्या व्यवहार–वर्तनातून होणारे लाभ जास्तीत जास्त प्रमाणात मिळवणे आणि होऊन शकणारे नुकसान टाळणे अथवा अत्यल्प ठेवणे हे परराष्ट्र धोरणाचे महत्त्वपूर्ण कार्य आहे.

परराष्ट्र धोरण म्हणजे राष्ट्राची इतर राष्ट्रांसोबतची आणि आपल्या सार्वभौमित्व क्षेत्राबाहेरील घटकांशी होणारी किचकट आणि गतिमान राजकीय अन्योन्यक्रिया होय. जोसेफ फ्रांकेल यांच्या मतानुसार, एका राष्ट्रांचा इतर राष्ट्रांशी असलेल्या अन्योन्यक्रियेशी संबंधीत निर्णय आणि प्रक्रियांचा संच म्हणजे त्या राष्ट्राचे परराष्ट्र धोरण. (Joseph Frankel, The Making of Foreign Policy, p.l) याचा अर्थ, परराष्ट्र धोरणात राष्ट्र राज्याच्या सार्वभौमित्वातील अधिकृत शक्तींनी किंवा संस्थांनी राष्ट्र राज्याच्या सार्वभौमित्वाबाहेरील शक्ती किंवा संस्थांच्या प्रती घेतलेले निर्णय आणि लागू केलेल्या प्रक्रियांचा समावेश होतो. एका राष्ट्राने इतर राष्ट्रांची कायदे निर्मिती व अंमलबजावणीची प्रक्रिया प्रभावीत करण्यासाठी आणि आपल्या सार्वभौमित्व क्षेत्राबाहेरील राज्यहीन अथक राष्ट्र राज्याच्या निर्णय प्रक्रियेत अधिकृत स्थान नसलेल्या (non-state actors) घटकांच्या कारवाया, प्रभावीत करण्यासाठी उपयोगात आणणाऱ्या साधन संचाची निवड करण्याचे काम परराष्ट्र धोरण करत असते.

परराष्ट्र धोरण पोकळीत अस्तित्वात येऊ शकत नाही. राजकीय–आर्थिक–सामाजिक–ऐतिहासिक संदर्भामध्ये परराष्ट्र धोरण तयार होत असते. राष्ट्र–राज्याच्या निर्मितीशी संबंधीत ऐतिहासिक घडामोडी, राष्ट्रीय निर्मितीची वैचारिक तत्त्व–चौकट आणि राष्ट्र–राज्याच्या अस्तित्वाचे तार्किक अधिष्ठान यांच्या संगमातून राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाचा उगम होतो. राष्ट्राच्या राज्यसंस्थेचा प्रकार, अर्थव्यवस्थेचे स्वरूप व गरजा, राजकीय परिस्थिती, भौगोलिक स्थान आणि सांस्कृतिक जडणघडण यांच्या संयुक्त साच्यातून परराष्ट्र धोरणाचा आकार–उकार प्राप्त होतो.

**परराष्ट्र धोरणांची उद्‌द्दिष्टे : (Objectives of the foreign policy)**

राष्ट्रहित हा परराष्ट्र धोरणांचा केंद्रबिंदू राहिला आहे. कोणतेही राष्ट्र आपल्या राष्ट्राचे परराष्ट्र धोरण राष्ट्रहिताचा उद्‌देश पुढे ठेवूनच निर्धारित करीत असते.

**राष्ट्रीय हित : (National Interest)**

राष्ट्रहित हा परराष्ट्र धोरणांचा आरंभबिंदू असतो. परराष्ट्र धोरणाचे सार सर्वस्व राष्ट्रहिताशीच निगडीत झालेले असते. राष्ट्रहित साधताना प्रसंगी आंतरराष्ट्रीय हितालाही तिलांजली दिली जाते. राष्ट्रहिताला

बगल देणारी ध्येयधोरणे स्वीकारुन देशाचे नेतृत्व जन न्यायालयात उभेच राहू शकत नाहीत. बदलत्या जागतिक परिस्थितीनुसार राष्ट्रहिताच्या कल्पनेतही बदल होत असतात. उदा. एकलकोंडपणाचा बुरखा पांघरण्याऱ्या जपानने १८५४ नंतर हा बुरखा झुगारुन परदेशांशी व्यापार करण्याचा पायंडा घातला. राष्ट्रहितावर आधारीतच परराष्ट्र धोरण आखावे लागते. इतर राष्ट्रांच्या हिताशी आपल्या राष्ट्रहिताची जुळवणी करवून घ्यावी लागते.

राष्ट्रहितानुसार परराष्ट्र धोरणाच्या उद्‌देशास पुढील तीन वर्गात विभागता येईल.

**१) प्राथमिक उद्दिष्टे : (Primary Objects)**

**(i) देशाचे रक्षण :**

परराष्ट्र धोरणाचे सर्वात महत्वाचे उद्दिष्ट देशाचे रक्षण करणे होय. किंबहुना परराष्ट्र धोरणाचे ते अंतिम ध्येय मानले जाते. प्रत्येक देश आपला भूभाग, नागरीक, संपत्ती याचे रक्षण करीत असतो. देशाच्या रक्षणाबरोबर सांस्कृतिक मूल्ये, विचारसरणी, जीवन पद्‌धती यांचे रक्षण व प्रसार करण्याचे प्रयत्न होतात. त्यामुळे 'स्वदेश रक्षण' हे कोणत्याही देशाच्या परराष्ट्र धोरणाचे त्रिकालाबाधीत असे सुत्र आहे.

**(ii) आर्थिक विकास :**

कोणत्याही शासनाचा मुख्य उद्देश देशाचा आर्थिक विकास घडवून आणणे हा असतो. तेच देशाच्या परराष्ट्र धोरणाचे आवश्यक व अपरिहार्य उद्दिष्टयही असते. स्वत:चा आर्थिक विकास साधण्यासाठी देशांतर्गत अनुकूल अशी व्यवस्था स्वीकारणे तर आलेच, पण जागतिक स्तरावरही आपली आर्थिक उन्नती होईल असेच तत्त्वज्ञान इतर देशांना स्वीकारण्यास भाग पाडण्याचे प्रयत्नही धोरणाद्वारे केले जातात.

**(iii) राष्ट्रसत्तेची वृध्दी :**

राष्ट्रीय सत्तेवरच कोणत्याही राष्ट्राचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील स्थान अवलंबून असते. म्हणून राष्ट्रसत्तेत वाढ करणे, हे ही परराष्ट्र धोरणाचे एक महत्वाचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्रसत्तेत वाढ करण्याच्या उद्देशाने परराष्ट्र धोरण निश्चित करीत असते.

**२) मध्यवर्ती उद्दिष्टे : (Central Objects)**

**(i) राज्यातील दबावगटांचे हितसंबंध सुरक्षित :**

परराष्ट्र धोरण निर्धारण करणाऱ्या यंत्रणेवर निरनिराळे दबाव गट प्रभाव पाडीत असतात. त्यामध्ये आर्थिक, शेती, औद्योगिक, सामाजिक, सांस्कृतिक आदिंचा समावेश केला जातो. उदा. भारतातील मुस्लिम दबाव गट अंतर्गत आणि बाहय धोरणावर प्रभाव पाडतो.

**(ii) भूविस्तार :**

काही राष्ट्रे आपल्या बळाच्या जोरावर भूमीविस्तार करण्यात मग्न असतात. कधी बाजारपेठा, कधी

कच्च्या मालासाठी, कधी राष्ट्रप्रतिष्ठेच्या अट्टाहासापायी भूप्रदेश पादाक्रांत करण्याची चढाओढ अनेक देशात चालू असते. त्यामूळे भूविस्तार करणे हे अनेक देशांच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख उद्दिष्टयच असते. उदा. चीनने उदात्तीकरणाचे विस्तारवादी धोरण स्वीकारलेले आहे. त्यामुळेच १९६२ साली भारतावर आक्रमण करुन बराचसा भूप्रदेश त्यांनी मिळविला आहे. तसेच शेजारील प्रत्येक राष्ट्राबरोबर चीनचा सीमावाद आहे.

**(iii) राष्ट्रप्रतिष्ठा :**

प्रत्येक राष्ट्राची इच्छा असते की, जगात आपला सन्मान व्हावा, प्रतिष्ठा वाढावी, त्याकरिता सदैव प्रयत्नशील असते. दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिका व रशिया यांच्यात अंतराळातील संशोधनातील स्पर्धेमागे जागतिक प्रतिष्ठा मिळविण्याचा उद्देश होता.

**(iv) अराजनैतीक संबंध :**

परराष्ट्र धोरण ठरवित असताना राजनैतिक संबंधाबरोबरच अराजनैतिक संबंध निर्माण केले जातात. त्यामध्ये आर्थिक विकास, समाजकल्याण, संस्कृती, शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञान यासंबंधी जी उद्दिष्टये असतात. याचा राजकारणाशी संबंध नसतो. उदा. स्त्रीयांचा प्रश्न, लहान मुलांचा प्रश्न, धर्मपरिषद इ. क्षेत्रातील देवाण घेवाण याचा उल्लेख अशा अराजनैतिक संबंधामध्ये होतो.

**३) जागतिक उद्दिष्टे : (World Objectives)**

काहीवेळा आपल्या राष्ट्राचे हित पाहता जगाच्या कल्याणासाठी जेंव्हा एखादे धोरण ठरविले जाते. तेव्हा त्यास जागतिक उद्दिष्टे असे म्हणतात. अशी उद्दिष्टे प्रामुख्याने जगातील शक्तीशाली राष्ट्र ठरवित असतात. उदा. राष्ट्रसंघ, संयुक्त राष्ट्र संघटना स्थापन करण्यासाठी अमेरिका, इंग्लड, फ्रान्स अशा शक्तिशाली राष्ट्रांनीच प्रयत्न केलेले दिसून येतात. तसेच जागतिक शांततेसाठी **CTBT** हा करार उदयास आला. हा करार साध्य करण्यासाठी अमेरिकेचे प्रयत्न कारणीभूत ठरले.

**१.२.२ भारतीय परराष्ट्र धोरणांचे निर्धारक घटक (Determinant's of India's Foreign Policy)**

**१) आकार आणि भौगोलिक परिस्थिती :**

राष्ट्र-राज्याच्या भौगोलिक आकाराचा परराष्ट्र धोरणावर स्वाभाविक परिणाम होतो. सर्वसाधारण धारणेनुसार राष्ट्र-राज्याचा भौगोलिक आकार जेवढा जास्त तेवढा आंतरराष्ट्रीय राजकारणात त्याचा दरारा जास्त असतो. या धारणेमागे ३ कारणे आहेत. एक, मोठ्या भौगोलिक क्षेत्रफळामुळे जास्त नैसर्गिक साधनसंपत्ती राष्ट्रांच्या वाटेस येऊ शकते. दोन, वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागवण्यासाठी, उदाहरणार्थ शेतीचा विस्तार करून अन्न-धान्याचे जास्त उत्पादन करण्यासाठी विस्तृत क्षेत्रफळ उपयोगी येऊ शकते. तीन, मोठ्या भूप्रदेशावर ताबा मिळवणे शत्रू राष्ट्रांना कठीण असल्याने आकाराने मोठी राष्ट्रे अपराजित राहू शकतात. जागतिक पटलावर महाशक्ती म्हणून उदयास येण्याच्या भारताच्या सामुहिक इच्छा-शक्ती मागील आत्मविश्वास निर्माण होण्यात भारताच्या विशाल भौगोलिक आकाराची भूमिका मोठी आहे. जगातील राष्ट्रांमध्ये आकाराच्या मानाने भारताचा

७ वा क्रमांक लागतो. आंतरराष्ट्रीय राजकारणावर वर्चस्व असणाऱ्या अमेरिका, रशिया आणि चीन या देशांचा भौगोलिक आकार सुद्धा विशाल आहे. मोठ्या भौगोलिक आकारामुळे भारतासारख्या देशाची सीमा अनेक राष्ट्रांशी संलग्नित होत असल्याने त्या राष्ट्रांसाठी भारत आपोआप महत्त्वपूर्ण देश होती तर त्याचवेळी अनेक शेजारी लाभल्याने भारताचे परराष्ट्र धोरण अधिक आव्हानात्मक होते, भारताच्या विशाल आकारामुळे आशियातील सर्वच महत्त्वाचे प्रदेश भारताला जवळचे होतात. दक्षिण-पूर्व आशिया, चीन, मध्य आशिया आणि पश्चित आशिया या महत्त्वपूर्ण आर्थिक व सामरिक उलाढलींच्या प्रदेशांची भारताला जवळीक आहे. या प्रदेशातील देशांना भारताला दुर्लक्षित करणे शक्य नसल्याने जागतिक राजकारणात भारताला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. विशाल भौगोलिक आकारासह मोठी लोकसंख्या असल्याने जागतिक महाशक्तीसह सर्वच देशांना भारताची नोंद घेणे अपरिहार्य आहे.

### २) **आर्थिक घटक : (Economic Factors)**

भारत स्वतंत्र झाला त्यावेळी आर्थिक दृष्टीने विचार करता भारताची गणना अप्रगत राष्ट्रामध्ये केली जात होती. एक अप्रगत शेती असलेला देश एवढीच भारताची आर्थिक प्रतिष्ठा होती. भारताचे रशियाशी प्रस्थापित झालेले संबंध औद्योगिक विकासाला सहाय्यक ठरलेले आहेत. भारताने आपल्या विकास योजनांच्या पूर्ततेसाठी विदेशांतून अनिर्बंध मदत घेतलेली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील कोणत्याही गटाच्या राजकारणात आपणास गुंतवून न घेता आपली स्वतंत्र समाजवादी अर्थव्यवस्था निर्धाराने राबविलेली आहे.

### ३) **नैसर्गिक साधनसंपत्ती : (Natural Resources)**

देशाच्या आकाराप्रमाणेच देशातील हवामान, जमिनीची पिक उत्पादकता, पिकांमधील वैविध्य, जमिनीच्या आत खनिजे, नैसर्गिक वायू, तेल याची उपलब्धता, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता इत्यादी भौगोलिक बाबींचा राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणावर परिणाम होतो. या घटकांची मुबलक उपलब्धता असल्यास देशाला इतर देशांच्या सहकार्यावर फारसे अवलंबून रहावे लागत नाही आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वबळावर भूमिका घेण्याचे धारिष्ट्य प्राप्त होते. स्वातंत्र्यानंतर भारताला भांडवलशाही गटात किंवा साम्यवादी गटात सहभागी होण्याची आवश्यकता भासली नाही. कारण देशांतर्गत मुबलक नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध होती. तसेच सर्व देशांशी व्यापार करण्यासाठी गरजेच्या वस्तू/उत्पादने आणि मार्ग उपलब्ध होते. त्यामुळे भारताला कोणत्याही गटामध्ये सहभागी न होता स्वत:चे गट-निरपेक्षतेचे धोरण विकसित केले.

### ४) **लोकसंख्या : (Population)**

भारताचा लोकसंख्येबाबत जगात दुसरा क्रमांक लागतो. त्यामध्ये तरुणांचा वाटा मोठा आहे. यामुळेच भारताला तरुणांचा देश म्हणून संबोधण्यात येते. लोकसंख्या हा घटक परराष्ट्र धोरणांवर प्रत्यक्ष परिणाम करणारा घटक आहे. आज अमेरिकेची लोकसंख्या ३० कोटीच्या आसपास आहे. एवढी लोकसंख्या कमी असूनही संपूर्ण जगावर वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. आज अमेरिकेतील वैद्यक, तंत्रज्ञान, शिक्षण इ. क्षेत्रात मोठ्या प्रमाणात भारतीय आहेत. भारतला रोजागाची गरज आहे आणि अमेरिकेला कुशल मनुष्य

बळाची गरज आहे. देशाच्या विकासाला आवश्यक असेल तेवढी लोकसंख्या त्याचा परिणाम परराष्ट्र धोरणावर होत असतो.

**५) लष्करी सुसज्जता :**

इतर राष्ट्रांनी किंवा राष्ट्र – बाह्यशक्तींनी सशस्त्र आक्रमण केल्यास त्यास सडेतोड उत्तर देत देशाच्या सीमांचे रक्षण करण्याच्या राष्ट्रीय सामर्थ्याचा राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणावर चांगला किंवा वाईट परिणाम होतो. या संदर्भात देशाचे लष्करी सामर्थ्य जेवऐ बलवान तेवढे देशाचे परराष्ट्र धोरण स्वतंत्र वाट जोपासू शकते. मात्र लष्करी सामर्थ्यात कमतरता असेल तर स्वतंत्र परराष्ट्र धोरण ठरवण्याऐवजी जागतिक महाशक्तिशी संधी करण्यावर किंवा अनेक देशांसोबत एकत्र येत लष्करी गट तयार करण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

**६) इंटरनेट व सामाजिक माध्यमे :**

२१ व्या शतकात इंटरनेट, विशेषत: सामाजिक माध्यमांची संकेतस्थळे, मोठ्या प्रमाणात ई–मेल द्वारे संपर्क राखणे आणि संदेश पोहोचवणे, ताज्या बातम्या आणि संबंधीत लेखांची संकेतस्थळे इत्यादी माहिती तंत्रज्ञानाशी संबंधीत माध्यमांचा परराष्ट्र धोरणावर नियंत्रित पण अचूक प्रभाव पडण्यास सुरुवात झाली आहे. केवळ व्यापारी आणि तांत्रिक कारणासाठी इंटरनेटच्या वापरला परवानगी देण्यात आली.

तरी इंटरनेटची एकंदरीत संरचना अशी आहे की, त्याद्वारे माहितीची आणि भूमिकांची देवाणझेवाण पूर्णपणे थांबवणे शक्य नाही. परिणामी, खुल्या निवडणूका आणि बहुपक्षीय पद्धती नसलेल्या देशांमध्ये सुद्धा इंटरनेट आणि त्याच्याशी संबंधीत सामाजिक माध्यमांचा फैलाव झालेला असल्यामुळे त्यांच्या परराष्ट्र धोरणावरील प्रभावाकडे अभ्यासक लक्ष लावून आहेत.

**७) सहनशीलता : (Patience)**

सहनशीलता भारतीय परराष्ट्र धोरणाचे पारंपारिक साधन आहे. दुसऱ्यांच्या विचारधारेचा आदर करणे हा भारताचा नैतिक गुण आहे. महात्मा गांधींनी असे म्हटले होते की, हिंदु धर्म प्रत्येक व्यक्तीस आपला विश्वास आणि धर्मानुसार ईश्वराची उपासना करण्याचा अधिकारी प्राप्त करून देतो. भारतीय विचारधारा कोणाचाही अनादर करत नाही. त्यामुळे भारतीय परराष्ट्र धोरणांचा सहनशीलता हा एक घटक आहे.

**८) ऐतिहासिक घटक : (Historical Factor's)**

देशाचे परराष्ट्र धोरण प्रभाविक करणारा घटक म्हणून इतिहास या घटकाचीही दखल घ्यावी लागते. भारतीय इतिहासात भारतीयांनी भारतीय भूखंडाबाहेर दिग्विजय गाजवून साम्राज्य सत्ता कोणत्याही काळात स्थापन केलेली नाही व परराष्ट्र धोरण कधीच उपयोग केलेला नाही. भारतातील साम्राज्ये ही भारतीय सीमेपुरती मर्यादित होती. भारत इतिहासातही विदेशांतील साम्राज्यवादापासून अलिप्त होता. इंग्रज आपले शत्रू नसून इंग्रजी साम्राज्यवाद हा आपला शत्रू आहे ही शिकवण भारतीय परंपरेला अनुसरूनच होती.

## ९) विचारप्रणाली : (Ideology)

भारताने आपले परराष्ट्र धोरण निर्धारित करताना विचारप्रणालीला महत्त्व दिले होते. भारताच्या राष्ट्रीय समस्या सत्य व अहिंसात्मक मार्गाने सोडविल्या जातात. म्हणून आंतरराष्ट्रीय समस्या ही सोडविण्यासाठी भारताने शांततेच्या मार्गाचा स्वीकार केला आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणावर भगवान बुद्ध, महावीर, महात्मा गांधीजींच्या विचाराचा खोलवर परिणाम झालेले आहे. भारतीय तत्त्वज्ञानाप्रमाणेच उदारमतवाद, साम्यवाद याही विचारसणीचा प्रभाव भारताच्या परराष्ट्र नीतीवर पडत आहे.

## १०) राष्ट्राचे नेतृत्त्व :

परराष्ट्र धोरण निर्धारित करण्यात देशाच्या नेतृत्त्वाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. रोसेनौ यांच्या मतानुसार, ''नेतृत्त्वाची विचारप्रणाली'' आंतरराष्ट्रीय राजकारणाचे आकलन, बौद्धिक क्षमता, व्यक्तिगत जीवनातील अनुभव, मानसिक गरजा आणि विश्वासातील व्यक्तींचे विचार या बाबींचा देशाचे परराष्ट्र धोरण ठरवण्यावर आणि अंमलबजावणीवर निश्चितपणे परिणाम होतो. (James N Rosenau in Rosenau, Thompson and Boyd, (Eds), World Politics : An Introduction, p. 28) राज्यव्यवस्थेतील प्रक्रिया प्रणाली आणि सामाजिक संरचना तसेच राष्ट्रीय सामर्थ्य या सर्वांची परराष्ट्र धोरण विकसित होण्यात महत्त्वाची भूमिका असली तरी संकटाच्या काळात आणि पेचप्रसंगी राष्ट्राच्या नेतृत्त्वाने घेतलेल्या निर्णयाची परराष्ट्र धोरणावर अमीट छाप उमटते. सन १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धा दरम्यान इंदिरा गांधीच्या चाणाक्ष निर्णयांनी अमेरिका आणि चीन तर्फे आलेला दबाव झिडकारून लावत पाकिस्तानला पराभूत करण्यात त्यांनी अग्रणी भूमिका बजावली होती.

## ११) लष्करी सामर्थ्य : (Military Capacity)

राष्ट्राच्या स्वत:च्या संरक्षण सिद्धतेचा प्रभाव त्याच्या परराष्ट्र धोरणावर पडत असतो. सैनिकी क्षमतेचा विचार न करता जर राष्ट्राने परराष्ट्र धोरणाचे निर्णय घेतले तर ते फलदायी ठरणार नाहीत. उदा. १९६२ भारत-चीन युद्ध, १९७१ च्या पाकिस्तान बरोबरच्या युद्धाच्या वेळी रशियाशी २० वर्षाचा संरक्षण करार करावा लागला. संघर्षापेक्षा सहकार्याचे परराष्ट्र धोरण निर्धारित करण्याकडे बहुतेक राष्ट्राचा कल आहे. प्रत्येक राष्ट्राला आपली संरक्षण सिद्धता सैनिक क्षमता वाढवून करावी लागते म्हणून भारत व पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांनी १९९८ मध्ये अणुचाचण्या घडवून आणले व संरक्षण सिद्धतेची चमक दाखविली.

## १२) लोकमत : (Public Opinion)

लोकशाही राष्ट्राचे परराष्ट्र धोरण निर्धारित करणारा एक घटक म्हणून लोकमताचे महत्त्व जाणून घेणे आवश्यक आहे. परराष्ट्र धोरण ठरविणे हे पूर्वीप्रमाणे आता राजकीय नेत्याची मक्तेदारी राहिलेली नाही. जनतेमध्ये त्यावर चर्चा होते. लोक त्याबद्दल आपल्या भावना व्यक्त करतात. राज्यकर्त्यांना त्याची दखल घ्यावीच लागते. उदा. भाजप सरकारने लोकमताचा पाठिंबा लक्षात घेवून अणुस्फोट केला. देशातील अंतर्गत

लोकमताचा जसा परराष्ट्र धोरणावर प्रभाव पडतो तसे जगातील लोकमताच्या दबावामुळे देखील देशांना आपल्या परराष्ट्रीय धोरणात परिवर्तन करणे अपरिहार्य ठरते.

**१३) जागतिक परिस्थिती :**

जागतिक परिस्थिती प्रत्येक राष्ट्राचे परस्पर धोरण निर्धारित करत असते. युध्दजन्य परिस्थितीतील परराष्ट्र धोरण शांततेच्या धोरणातील परराष्ट्र धोरणापेक्षा वेगळे असते. शीत युध्दाच्या दरम्यान भारताने परराष्ट्र धोरणात अलिप्ततेला महत्व दिले. १९९१ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी डेज़ एरीं झेश्रळलू स्वीकारुन पूर्वेकडील देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले.

**१४) मित्रराष्ट्रे:**

कौटिल्याने आपल्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथात परराष्ट्र धोरणात मित्र राष्ट्रांना खूपच महत्व दिले आहे. कारण मित्र राष्ट्रांच्या सहकार्यावर देशाची प्रगती अवलंबून असते. जागतिक पातळीवर जे राष्ट्र मित्रराष्ट्र मिळविण्यात यशस्वी होते. ते राष्ट्र सर्वच क्षेत्रात पुढारलेले असते. उदा. भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर एक प्रभावी मित्र मिळविण्यात सोव्हिएट रशियांच्या रुपाने यश आले. रशियाने केलेल्या मदतीवर भारताला विकास करणे सोपे गेले.

**१५) कायदेमंडळ :**

परराष्ट्र धोरण ठरविण्याचे कार्य हे कार्यकारी मंडळाचे असते. मात्र त्यावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य कायदेमंडळ करीत असते. कार्यकारी मंडळाने घेतलेल्या निर्णयास कायदेमंडळाने बहुमताने विरोध केला तर कार्यकारी मंडळास धोरणामध्ये बदल करावा लागतो. उदा. १९६२ च्या भारत-चीन युध्दप्रसंगी पं. नेहरुच्या असंलग्नतेच्या धोरणाचे व पंचशील कराराची झालेली असफलता याबाबत संसदेत चर्चा झाली होती.

वरील अनेक घटकांच्या माध्यमातून भारत आपले परराष्ट्र धोरण निर्धारित करीत असतो.

**(अ) स्वयं: अध्ययन प्रश्न :**

(१) भारतीय परराष्ट्र धोरणाचा केंद्र बिंदू कोणता ?

(२) पं. नेहरुंनी कोणाला पूर्व आशिया व पश्चिम आशिया यामधील सेतू म्हटले आहे ?

(३) भारताच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार कोणास म्हणतात ?

(४) कौटिल्याने कोणता ग्रंथ लिहिला आहे ?

(५) भारत - चीन युध्द कोणत्या साली झाले ?

### १.२.३ भारतीय परराष्ट्र धोरणांची मुलतत्वे : (Basic Principals of India's Foreign Policy)

परस्पर सहकार्यातून सर्वांचा विकास घडवून आणणे हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे महत्वपूर्ण तत्व राहिले

आहे. शेजारील राष्ट्रासोबत सतत मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा भारताने वेळोवेळी प्रयत्न केला आहे. भारतीय परराष्ट्र धोरणाची तत्वे खालीलप्रमाणे आहेत.

### १. अलिप्तता : (Non-alignement)

अलिप्तता याला गटनिरपेक्षतेचे धोरण असेही म्हणतात. भारत स्वतंत्र झाला तेंव्हा जगाचे दोन गटात विभाजन झाले होते. अमेरिकेच्या नेतृत्वाखाली भांडवलशाही राष्ट्राचा एक गट तर सोव्हिएत रशियांच्या नेतृत्वाखाली साम्यवादी राष्ट्राचा दुसरा गट होता. भारताने मात्र दोन्ही गटांपासून अलिप्त राहण्याचे धोरण स्वीकारले होते. त्यास अलिप्तवाद असे म्हणतात.

अलिप्तवादाचा उद्देश दुसऱ्या एका नवीन गटाची निर्मिती न करता त्या दोन गटांमध्ये समन्वय निर्माण करणे. त्यांच्यातील संघर्ष कमी करुन आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्याचा आहे.

### २. जागतिक शांतता : (World Peace)

जागतिक स्तरावर शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करणे हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे प्रमुख तत्व आहे. युध्द आणि संघर्ष स्वतंत्र भारताच्या आर्थिक व राजकीय विकासाच्या विरोधी आहे याची जाणीव भारताला सुरुवातीपासूनच होती. त्यामुळे भारताने शांततेच्या परराष्ट्र धोरणावर भर दिला आहे. आंतरराष्ट्रीय वाद-विवाद, संघर्ष दूर करण्यासाठी भारताने शांततामय साधनांचा म्हणजेच व्दिपक्षीय वार्ता, चर्चा, करार यांचा वापर केलेला आहे. उदा. भारत पाकिस्तान मधील मतभेद दुर करण्यासाठी नेहरु लियाकत अली करार, सिमला करार, आग्रा शिखर परिषद इ. प्रयत्न केले आहेत. युनो, सार्क यासारख्या संघटनामध्येही शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने भारताची भूमिका महत्वाची राहिली आहे.

### ३. साम्राज्यवाद व वसाहतवादास विरोध : (Policy to oppose imperialism and colonialism)

भारतीय परराष्ट्र धोरणाचे एक मुलभूत तत्व म्हणजे साम्राज्यवाद व वसाहतवादास विरोध होय. भारताला वसाहतवाद आणि साम्राज्यवाद यांच्या बंधनातून जावे लागले आहे. त्याच्या दुष्परिणामाची जाणीव भारताने भोगली आहे. त्यामुळे जगातील साम्राज्यवाद संपुष्टात यावा असे भारताचे मत आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने जी राष्ट्रे स्वातंत्र्यप्राप्तींसाठी प्रयत्न करीत होती त्यांना पाठिंबा दिला होता. वसाहतवाद व साम्राज्यवाद संपुष्टात आल्याशिवाय जागतिक शांतता प्रस्थापित होणार नाही. म्हणून भारताने आपल्या परराष्ट्र धोरणात साम्राज्यवादाला विरोध दर्शविला आहे.

### ४. वर्णभेद किंवा वंशभेदाला विरोध : (Opposition to Recialism)

साम्राज्यवाद व वसाहतवादाप्रमाणे भारताने वर्णभेदालाही विरोध केला आहे. ऑस्ट्रेलिया, ऱ्हाडेशिया, दक्षिण अमेरिका, दक्षिण आफ्रिका या देशांतील गोऱ्या सत्ताधारी लोकांनी कृष्णवर्णीय लोकांना अन्यायाची वागणूक दिली. भारताने या राष्ट्राच्या वर्णभेदाला विरोध करुन तो प्रश्न युनो या आंतरराष्ट्रीय संघटनेसमोर मांडला. वर्णभेद संपुष्टात आल्याशिवाय समता प्रस्थापित होवू शकणार नाही म्हणून भारताने सातत्याने आपल्या परराष्ट्रीय धोरणाद्वारे वर्णभेदाचा निषेध चालू ठेवलेला आहे.

### ५. आशियाई व आफ्रिकन राष्ट्रांना साहाय्य :

आशिया व आफ्रिका खंडातील राष्ट्रांचा सर्वांगीण विकास होवून राजकीय स्थैर्य व शांतता प्रस्थापित व्हावी, या उद्देशाने भारताने अनेक शिखर परिषदा व संम्मेलने आयोजित केली होती. उदा. १९४७ आशियाई राष्ट्रांचे संम्मेलन १९५५ साली वसाहतवादाचा निषेध करुन पंचशील तत्वाच्या स्वीकारण्यासाठी बाडूंग येथे परिषद घेतली. १९६१ बेलग्रेड येथे शिखर परिषद घेवून भारताने अलिप्त राष्ट्रांत ऐक्य व मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला होता.

### ६. विकसित राष्ट्रांशी सहकार्य :

भारताने अमेरिका, रशिया, इंग्लड, जर्मनी, जपान या विकसीत राष्ट्रांशी मैत्रीचे व सहकार्याचे संबंध ठेवलेले आहेत. या राष्ट्राबरोबर आर्थिक, सांस्कृतिक व व्यापारविषयक संबंध प्रस्थापित केलेले आहेत. जगात अमेरिका, रशिया या राष्ट्र गटात सामील न होता, त्याच्या बरोबर सहकार्याचे संबंध प्रस्थापीत केले आहेत. आर्थिकदृष्टया विकसित असणारी राष्ट्रे अविकसित राष्ट्रांवर आर्थिक वर्चस्व निर्माण करत आहेत. गॅटसारख्या करारात बहुसंख्य राष्ट्रे सामील झाले आहेत. भारताने या नव्या आर्थिक धोरणाचे स्वागत करुन प्रगत, आर्थिकदृष्टया संपन्न असणाऱ्या देशाशी संबंध ठेवण्याचे धोरण स्विकारले आहे.

### ७. पंचशील तत्त्वांचा स्वीकार :

जागतिक क्षेत्रातील संघर्ष, ताणतणाव कमी होवून शांततामय सहजीवन व सहकार्याची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने पं. नेहरु यांनी पंचशील तत्त्वांचा स्वीकार केला. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे पंचशील तत्व हे मुलभूत तत्व आहेत. १९५४ रोजी भारताचे पंतप्रधान पं. नेहरु व चीनचे पंतप्रधान चौ.एन.लाय यांच्यात पंचशील करार झाला. पंचशील तत्त्वे खालीलप्रमाणे आहेत.

अ) परस्परांशी प्रादेशिक एकात्मता आणि सार्वभौमत्व याबद्दल परस्परांनी आदर बाळगणे.

ब) परस्परांच्या प्रदेशावर आक्रमण न करणे.

क) परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे.

ड) राष्ट्रीय समानता बाळगून परस्परांचे हित सांभाळणे.

इ) शांततामय सहजीवन आणि आर्थिक सहकार्य या तत्त्वाचा स्वीकार करणे.

वरील भारताच्या परराष्ट्र धोरणाची मुलभूत तत्त्वे अभ्यासली असता, भारताने आपल्या राष्ट्रीय हिताबरोबरच आंतरराष्ट्रीय हिताचाही विचार केलेला आहे.

### भारतातील मोदी सरकारचे परराष्ट्र धोरण :

गेल्या सात वर्षात नरेंद्र मोदी यांच्या परदेशदौऱ्यांची आखणी अतिशय सूत्रबद्ध पद्धतीने करण्यात आल्याचे दिसून येते. सधारणत: पाच टप्प्यांमध्ये परराष्ट्र धोरणाची आखणी करण्यात आली आहे. यामध्ये पहिल्या

टप्प्यात दक्षिण आशियातील शेजारील राष्ट्रांशी संबंध घनिष्ठ करण्याचे ठरवले आहे. त्यामागे दोन उद्दिष्टे होती. एक म्हणजे शेजारील राष्ट्रांचा विश्वास संपादन करणे आणि दुसरे उद्दिष्ट गेल्या काही वर्षांमध्ये वाढत चाललेला चीनचा दक्षिण आशियातील हस्तक्षेप कमी करणे, त्यानुसार पंतप्रधानांनी भूतान, नेपाळ, बांगला देश, श्रीलंका आणि मालदीव या देशांचे दौरे केले. या दौऱ्यांमधून काही महत्त्वपूर्ण गोष्टी घडलेल्या आहेत. शेजारील राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था डबघाईला आल्यामुळे त्यांना आर्थिक मदत करणे, त्यांच्या विकासाला मदत करणे याला प्राधान्य देण्यात आले. त्यानुसार नेपाळ आणि भूतानमध्ये जलविद्युत निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणावर मदत करण्यात आली. गेल्या सात वर्षातील एक मोठी उपलब्धी म्हणजे भारत आणि बांगला देश यांच्यामध्ये १९७४ पासून प्रलंबित असणारा भूसीमारेषा करार पूर्णत्वास गेला. त्यामुळे दोन्ही देशांमधील भूखंडांच्या अदलाबदलीचा अतिशय कठीण आणि गुंतागुंतीचा प्रश्न सोडवला गेला. त्यामुळे बांगला देशबरोबरचे संबंध सुधारण्यास फार मोठी मदत झाली. कोरोना महामारीच्या काळातही भारताने बांगला देशला हायड्रॉक्सिक्लोरोक्वीनचा, मास्कचा, पीपीए किट्सचा तसेच लसींचा पुरवठा केला.

सन २०१४ नंतरच्या भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये क्रांतिकारी बदल घडून आले आहेत. अनेक नवीन प्रवाह भारताच्या परराष्ट्र धोरणात दिसून येत आहेत. भारताचे परराष्ट्र धोरण बचावत्मकतेकडून आक्रमकतेकडे चालल आहे. यामध्ये भारताचे काही अधिमान्य सामरिक हितसंबंध आहेत. त्यानुसारच परराष्ट्र धोरणाची आखणी होणार हे आता स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे, भारत आता एकसमान पातळीवर सर्वांशी संवाद चर्चा करून संबंध प्रस्थापित करत आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भारताने पाकिस्तानबाबत जी आक्रमकता दाखवली ती वाखाणण्यासारखी होती. चीन भारताविरुद्ध कितीही कुरघोड्या करुन आपल्याला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करत असला तरी चीन भारतावर आक्रमण करण्याची हिंमत दाखवत नाही याचे कारण आजचा भारत हा १९६२ चा भारत राहिलेला नाही. ही बाब चीनलाही कळून चुकली आहे.

गेल्या काही वर्षात ‘एलएसी’वर केलेल्या विकासकामामुळे भारतीय सैन्य चीनशी दोन हात करण्यास पूर्ण तयार आहे. एकूणच मोदीकालीन परराष्ट्र धोरणाचा विकास हा संद्रिय पद्धतीने झालेला आपल्याला पाहायला मिळतो. आधी भारताने शेजारील देशांशी संबंध घनिष्ठ केले. त्यांच्यासोबतची विश्वासतूट कमी करण्याचा प्रयत्न केला आणि शेजारी देशांबरोबर कनेक्टिव्हिटी कही वाढवता येईल यासाठी प्रयत्न केले. आग्नेय आशियाई देशांबरोबर संबंध प्रस्तापित करण्यासाठी आखलेल्या ‘लूक ईस्ट पॉलिसी’चे नामकरण ‘ॲक्ट ईस्ट’ असे केले आणि या देशांबरोबरचे प्रलंबित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ताकद लावली. त्याचप्रमाणे इस्लामिक देशांबरोबरही संबंध सुधारण्यात त्यांनी गुंतवणूक केली. संयुक्त अरब आमिराती या इस्लामिक देशाबरोबर भारताने मुक्त व्यापार करार केला. इस्लामिक देशांबरोबर संबंध सुधारल्याने रशिया-युक्रेन संघर्ष काळातही भारताला तेलाची टंचाई जाणवली नाही. त्याचप्रमाणे सांस्कृतिक मुत्सद्देपणाचा एक महत्त्वाचा प्रवाह या काळात विकसित झाला. भारतामध्ये उगम पावलेल्या आणि भारतातून प्रसार झालेल्या बुद्धिझमचा वापर करून श्रीलंका, नेपाळ व आग्नेय आशियाई देशांशी संबंध विकसित केले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अमेरिका आणि रशियामध्ये समतोल साधणारा भारत हा जगातील एकमेव देश आहे. आज जगातील अनेक देशांच्या

नेतृत्त्वाकडून, तसेच प्रसारमाध्यमांमधून अशा बातम्या येण्याचे कारण हेच असावे की, रशिया-युक्रेन युद्धसंघर्ष सोडवण्यासाठी भारत महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतो. कारण या दोन्ही राष्ट्रांचा भारतावर विश्वास आहे. तसेच बायडेन आणि पुतिन या दोघांबरोबरही मोदींनी व्यक्तिगत सौहार्द स्थापित केले आहे. त्यामुळे भारताला संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेचे कायम सदस्य बनविले पाहिजे, ही मागणी आता जोर धरू लागली आहे.

भारताच्या परराष्ट्र धोरणातील आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते प्रथमच भारताच्या आर्थिक विकासाशी जोडण्यात आले. मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया, आत्मनिर्भर भारत या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी परराष्ट्र धोरण कसे काम करू शकते. यासाठी विचार झाला आणि त्याला यश आले. सन २०२२ मध्ये सर्वाधिक वस्तूंची निर्यात करणारा देश म्हणून भारत पुऐ आला आहे. संपूर्ण कोव्हीड काळात भारताने जगाला लसींचा पुरवठा केला आणि आज 'आरोग्य सेवा पुरवठादार' म्हणून भारत पुढे आला आहे. भारताच्या या आर्थिक विकासामुळे परराष्ट्र धोरणाला बळकटी येत आहे.

पंडित नेहरूंच्या काळात आशिया खंडाचे नेतृत्त्व भारताने केले पाहिजे, अशी नेहरूंची कल्पना होती. तशाच पद्धतीने जगात नेतृत्त्व करणारी सत्ता म्हणून पुढे येण्याची क्षमता भारतात आहे, ही जाणीव मोदींच्या काळात निर्माण करण्यात आली. पूर्वी आपल्याकडे क्षमता असूनही आपण उच्च स्वप्ने पाहत नव्हतो. आता ती परिस्थिती बदलली आहे. हे मोदींच्या परराष्ट्र धोरणाचे एक खूप महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

**ब. स्वयं: अध्ययनाचे प्रश्न :**

१. अमेरिकेच्या नेतृत्वाखाली ---------- राष्ट्राचा गट होता.

(साम्यवादी, भांडवलशाही, लोकशाही, हुकूमशाही)

२. भारताने ------ गटाची निर्मिती केली.

(अलिप्ततावादी, लोकशाही, साम्यवादी, भांडवलशाही)

३. १९६१ साली ------- येथे अलिप्त राष्ट्रांचे शिखर परिषद आयोजित केली होती.

(बाडुंग, तेहरान, ताश्कंद, बेलग्रेड)

४. भारतीय परराष्ट्र धोरणांचे शिल्पकार ------- यांना म्हटले जाते.

(म. गांधी, डॉ. आंबेडकर, पं. नेहरु, डॉ. राजेंद्र प्रसाद)

५. --------- साली भारत-चीन यांच्यात पंचशील करार झाला.

(१९४८, १९५४, १९५६, १९६१)

## १.३ सारांश :

आज आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासामध्ये परराष्ट्र धोरणाची प्रक्रिया गतिशील झाली आहे. राष्ट्रहित बरोबरच आणि त्या अपुशांगिक घटकाबरोबरच परराष्ट्र धोरण आकार घेत असते. आज जागतिक महासत्ता म्हणून भारताच्या सामूहिक इच्छा आजच्या भारताच्या परराष्ट्र धोरणावरून प्रतिबिंबी होत आहे. याची पार्श्वभूमी ही भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या मूलतत्त्वामधील पंचशील तत्त्वे, जागतिक शांततेचा आग्रह, अलिप्ततावादी धोरण इ. बरोबरच समकालिन सरकारचे वास्तविक मार्गाने परराष्ट्र धोरण सक्रीय होताना दिसते. कारण अंतर्गत व बाह्य अशा अनेक घटकांचा परिणाम होवून परराष्ट्र धोरण आकारला येत असते.

**परराष्ट्रीय धोरणांची उद्दिष्ट्ये :**

१) प्राथमिक उद्दीष्ट्ये :

i) देशाचे रक्षण ii)आर्थिक विकास iii) राष्ट्रसत्तेची वृध्दी

२) मध्यवर्ती उद्दीष्ट्ये :

i) राज्यातील दबाव गटांचे हितसंबंध सुरक्षित ii)भूविस्तार iii) राष्ट्रप्रतिष्ठा iv) अराजकीय संबंध

३) जागतिक उद्दीष्ट्ये :

- **भारतीय परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक :**

१)भौगोलिक स्थिती २) नैसर्गिक साधनसंपत्ती ३) आर्थिक घटक
४) लोकसंख्या ५) सहनशीलता ६) ऐतिहासिक घटक
७) विचारप्रणाली ८) नेतृत्व ९) लष्करी सामर्थ्य
१०) लोकमत ११) जागतिक परिस्थिती १२) मित्रराष्ट्रे
१३) कायदेमंडळ

हे वरील घटक भारतीय परराष्ट्र धोरणांचे निर्धारक घटक आहेत.

- **भारतीय परराष्ट्र धोरणाची मुलभूत तत्वे :**

१) अलिप्तता २) जागतिक शांतता ३) साम्राज्यवाद व वसाहतवादास विरोध
४) वर्णभेद किंवा वंशभेदाला विरोध ५) आशियाई व आफ्रिकन राष्ट्रांना साहाय्य
६) विकसित राष्ट्रांशी सहकार्य ७) पंचशील तत्वांचा स्वीकार

हे भारतीय परराष्ट्र धोरणांची मूलतत्वे आहेत.

## १.४ पारिभाषिक शब्द :

१) वसाहतवाद : एका राज्याने दुसऱ्या राज्यावर (व्यापार, युध्द इ. च्या माध्यमातून) अधिपत्य गाजविणे.

२) कृष्णवर्णीय : आफ्रिका व अमेरिका खंडातील एक जमात

३) भांडवलशाही : एक आर्थिक विचारसरणी, उत्पन्नाच्या साधनावर खाजगी मालकी असणारी अर्थव्यवस्था

४) राष्ट्रहित : प्रत्येक राष्ट्रांचा स्वत:च्या फायदयाचा दृष्टीकोन

५) अलिप्ततावाद : शीतयुध्दाच्या काळात साम्यवादी (सोव्हिएत रशिया) आणि भांडवलशाही (अमेरिका) या दोन महासत्तापासून अंतर ठेवून राहणारी विचारसरणी.

६) वर्णभेद : कृष्णवर्णीय लोकांच्या प्रति गौरवर्णीय लोकांनी दाखविलेली दुजाभाव द. आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांनी गौरवर्णियांच्या दुजाभावाविरुध्द आंदोलनात विकसित झाले.

७) वंशभेद : सर्व वंशाचे लोक एकसमान नाहीत असे मानणारा विचार.

## १.५ स्वयं: अध्ययनांची उत्तरे :

अ) १) राष्ट्रहीत

२) भारत

३) पंडीत नेहरु

४) अर्थशास्त्र

५) १९६२ साली

ब) १) भांडवलशाही

२) अलिप्ततावादी

३) बेलग्रेड

४) पंडित नेहरु

५) १९५४

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

१) राष्ट्रहित यावर चर्चा करा ?

२) परराष्ट्र धोरण म्हणजे काय ? परराष्ट्र धोरणांची उद्दिष्टये स्पष्ट करा ?

३) भारतीय परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक सांगा ?

४) भारताच्या परराष्ट्र धोरणांची मुलभूत तत्वे स्पष्ट करा ?

५) भारतीय परराष्ट्र धोरणाांवर एक निबंध लिहा ?

## १.७ अधिक वाचनांसाठी पुस्तके :

१) देवळाणकर, शैलेंद्र : आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या बुक्स औरंगाबाद (२००५)

२) के सागर, व्ही. बी. पाटील : भारताचे परराष्ट्र धोरण के. सागर पब्लिकेशन्स, पूणे. (२०१०)

३) के. सागर, व्ही. बी. पाटील : आंतरराष्ट्रीय राजकारण, के. सागर पब्लिकेशन्स, पूणे. (२००९)

४) डॉ. पंडित नलावडे : आंतरराष्ट्रीय संबंध, कैलास पब्लिकेशन्स, औरंगापूरा, औरंगाबाद (२०१४)

५) डॉ. वासंती रासम, डॉ. करिअप्पा खापरे : आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (२०११)

६) प्रा. दि. वा. इन्दापवार : प्रचलित विदेशी नीती, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर (जुन १९७६)

७) प्रा. मनोज बोरगांवकर गोपछडे : आंतरराष्ट्रीय संबंध, कल्पना प्रकाशन, नांदेड (१९९८)

८) प्रा. सुधाकर कुलकर्णी : आंतरराष्ट्रीय संबंध, विद्याभारती प्रकाशन, लातूर.

ooo

घटक २

# भारत आणि जागतिक महासत्ता

## (India & World Superpower)

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ भारत – अमेरिका संबंध

२.२.२ भारत – सोव्हिएत संघ आणि भारत–रशिया संबंध

२.२.३ भारत – चीन संबंध

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.३ अधिक वाचनासाठी पुस्तके

### २.० उद्दिष्टे :

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर आपणास,

१) भारताची जागतिक राजकारणातील भूमिका कोणती राहिली आहे याचे आकलन होईल.

२) भारत अमेरिका संबंध विशेषतः शितयुध्दकालीन व शितयुध्दोत्तर कश्या प्रकारचे राहिले आहेत याचे विश्लेषण करता येईल.

३) भारताचे सोव्हिएत संघ व विघटनानंतरचा रशियासोबतचे संबंध कशा प्रकारचे राहिले आहेत याचा बोध होईल.

४) भारताचे वर्तमान चीन सोबतचे संबंध कसे राहिले आहेत याचे आकलन होईल.

## २.१ प्रास्ताविक :

वर्तमान राष्ट्राराज्याच्या व्यवस्थेत कोणतेही राष्ट्र हे जागतिक घडामोडी, जागतिक समस्या व जागतिक संबंधांपासून अलिप्त राहू शकत नाही. प्रत्येक राष्ट्राला आपल्या राष्ट्रहिताच्या पुर्ततेसाठी विकसीत, विकसनशिल आणि अविकसीत राष्ट्रांसोबत आपल्या परराष्ट्र धोरणाची मांडणी परिस्थीती अनुरूप करावी लागते. एखाद्या राष्ट्राचा विकास हा जेवढा त्या राष्ट्राच्या अंतर्गत धोरणावर आधारीत आहे तेवढाच तो त्याच्या परराष्ट्र धोरणावर देखील आधारीत असतो. कौटिल्याने देखिल मित्र हा राष्ट्राचा सातवा घटक मानला होता. जेवढे मित्र राष्ट्र प्रगत व सहकार्य देणारे असतील तेवढा विकासाचा वेग वाढतो तसेच संरक्षणाची हमीही मिळते.

भारताला व्दितीय महायुध्दानंतर स्वातंत्र्य मिळाले, यानंतरची जागतिक परिस्थिती व भारताच्या गरजा यांना अनुसरून आपल्याला अलिप्ततावादाचे धोरण स्वीकारावे लागले. या धोरणाचे निर्माते व संचलनकर्ते हे तत्कालिन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू होते. शितयुध्दाच्या काळात अलिप्ततावादाने तिसऱ्या जगातील राष्ट्रांना केवळ विकासाची संधीच उपलब्ध करून दिली असे नाही, तर प्रसंगी जगाला तिसऱ्या महायुध्दापासून दूर ठेवण्याचे कार्यही पार पाडले आहे. यामध्ये अलिप्ततावादी चळवळीचे नेतृत्व नेहरुंकडे असल्याने त्यांची भूमिका महत्वाची ठरली. नव्याने स्वीकारलेली संसदीय लोकशाहीची व्यवस्था, जगाच्या २.४ टक्के भूभागाचे व्यवस्थापन, तीस – पस्तीस कोटी लोकसंख्येच्या गरजांचे व्यवस्थापन, अंतर्गत एकात्मतेचा प्रश्न अशा अनेक प्रश्नांना उत्तर देण्यासाठी भारताच्या नेतृत्वाला जलद व सर्वांगिण विकास हाच एकमेव पर्याय होता. नव्याने निर्माण होत असलेल्या जागतिक सत्तासमीकरणांमध्ये न पडता अलिप्त राहून सर्व राष्ट्रांकडून सर्व संभाव्य मदतीचे मार्ग खुले ठेवावेत हा धोरण निर्मात्याचा एक व्यावहारीक प्रयत्न होता व तो बहुतांश शितयुध्दाच्या काळात यशस्वी झाला.

२० व्या शतकात जागतिक राजकारणातील समिकरणे बदललेली आहेत, तसे भारताची भूमिकाही बदललेली आहे. भारताने असंलग्नीकरणाऐवजी बहुसंलग्नी करणाचे धोरण स्वीकारलेले दिसते. स्वातंत्र्यानंतर भारताला ज्यात समस्या वाटत होत्या ती आता भारताचे बलस्थाने बनली आहेत. जागतिक राजकारणातही भारताच्या भूमिकेला महत्व प्राप्त झाले आहे. अशा परिस्थितीत भारताच्या परराष्ट्र धोरणाचे विश्लेषण व विश्लेषन हे अतिशय महत्वाचे बनले आहे.

## २.२ विषय विवेचन :

भारताच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास हा भारत आणि जागतिक महासत्तांचे संबंध अभ्यासल्या शिवाय पुर्ण होऊ शकत नाही. व्दितीय महायुद्धानंतर अमेरिका व सोव्हिएत संघ रशिया या दोन महासत्ता बनल्या तर शितयुध्दोत्तर काळात चीन ही जागतिक महासत्ता म्हणून उदयाला आली आहे. प्रस्तुत प्रकरणात आपण उपरोक्त तिन्ही देशांसोबतचे भारताचे कशा प्रकारचे संबंध राहिले आहेत याचा अभ्यास करणार आहोत. यासाठी आपणास या देशांसोबतच्या संबंधांवर परिणाम करणाऱ्या घटनांचा, समस्यांचा व परिस्थीतींचा सखोल अभ्यास करावा लागेल. जागतिक किंवा व्दिपक्षीय समस्या व घटनाक्रमाबाबत भारताची भूमिका व संबंधीत महासत्तांची भूमिका काय होती याचे स्वातंत्र्यापासून आजपर्यंतचे विश्लेषण आपण या प्रकरणात करणार

आहोत. तेव्हा प्रस्तुत प्रकरणाच्या मांडणीसाठी आपणास ऐतिहासिक अध्ययन पद्धती व विश्लेषणात्मक अध्ययन पद्धती यांचा वापर करावा लागेल. तसेच दोन देशातील सहकार्याचे दुवे व तणावाची कारणे काय राहिली आहेत व येणाऱ्या काळात या सर्वांचा उभय पक्षांमधील संबंधावर काय परिणाम होऊ शकतो, याबाबतही आपण अभ्यास करणार आहोत.

तिन्ही देशांच्या संबंधांवर प्रकाश टाकण्यासाठी शितयुध्दा पूर्वीचे संबंध व शितयुध्दोत्तर संबंध अशी अभ्यासाच्या सोईसाठी विभागणी केलेली आहे. सर्वप्रथम उपरोक्त दोन कालखंडात दोन देशांमधील प्रमुख घडामोडींची ऐतिहासिक मांडणी केलेली आहे व नंतर या काळात संबंधांना प्रभावीत करणारे कळीचे मुद्दे व त्यामागचे राजकारण याचे विश्लेषण मुद्द्यांच्या आधारे केले आहे.

### २.२.१ भारत – अमेरिका संबंध :

दुसरे महायुद्ध संपल्यानंतर अमेरिका व रशिया यांनी अल्पावधीत महासत्ता हा दर्जा प्राप्त केला. भारताला स्वातंत्र्य मिळण्यात अमेरिकेचाही अल्प वाटा होता. अमेरिकाही एकेकाळी वसाहतवाद, वंशवादाचा, साम्राज्यवादाच्या आगीत होरपळलेली होती. दोन्ही देशांनी लोकशाहीचा स्वीकार करून जागतिक व्यवस्था लोकशाही तत्त्वाच्या आधारावर निर्माण होण्यास हातभारच लावलेला होता. भारताची घटना बनत असताना अमेरिकेतील राज्यघटनेपासून प्रभावित होऊन लिखित राज्यघटना, संघराज्य व्यवस्था, मुलभूत अधिकार, सर्वोच्च न्यायालय अशा अनेक तरतुदी भारतीय राज्यघटनेत आपण स्वीकारल्या. एवढे असतानाही स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत व अमेरिका संबंध फारसे चांगले होऊ शकले नाहीत हे भूतकाळातील एक सत्य आहे. भारताच्या स्वातंत्र्याबरोबरच निर्माण झालेल्या पाकिस्तानची अमेरिकेला जागतिक राजकारणात असलेली गरज ही वर उल्लेख केलेल्या सर्व तात्विक मुद्यांपेक्षा व्यावहारिक धोरण घेणाऱ्या अमेरिकेच्या नेतृत्वासाठी महत्त्वाची ठरली आणि मग काश्मीर विवाद असो, १९४७, १९६५, १९७१ चे भारत-पाकिस्तान युद्ध असो – प्रत्येक वेळी अमेरिकेने भारताऐवजी पाकिस्तानला पूरक असे धोरण स्वीकारले.

शीतयुद्धानंतर म्हणजेच १९९१ नंतर परिस्थिती बदलेल व भारत अमेरिका संबंध चांगले होतील असा आशावाद भारतातील अमेरिका धार्जीने असणाऱ्या मंडळींना होता. परंतु भारत – अमेरिका संबंध व्यावहारिक पातळीवर सुधारण्यास शीतयुद्धानंतर ही दीड दशकांचा कालावधी उलटावा लागला. तशी भारत – अमेरिका संबंध सुधारणे विश्वासाचे वातावरण निर्माण होणे ही प्रक्रिया २००० सालापासून सुरू झाली होती. अमेरीकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर झालेला दहशतवादी हल्ला आणि त्यानंतरच्या दहशतवादाविरुद्धच्या लढाईत अमेरिकेला हवी असलेली भारताची साथ यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील समीकरणे बदलू लागली. २००० सालानंतर बिल क्लिंटनचा दौरा असेल, भारत-अमेरिका अणुकरार असेल की भारताला एन. एस. जी. मध्ये मागच्या दारातून प्रवेश असेल हा पुढील काळातील सर्व घटनाक्रम भारत-अमेरिका मैत्री संबंधांमध्ये एक स्वप्नवत आहे. २०१४ नंतर अमेरिकेने जागतिक राजकारणात उघड उघड भारताची बाजू घेण्यास सुरुवात केली. मग भारताने पाकव्याप्त काश्मीर किंवा पाकिस्तान मध्ये केलेली कारवाही असो की भारताचे चीन सोबतचे व्यापार युद्ध असो, अमेरिकेने

भारताला सर्व स्तरावर मदत केली. सध्या अमेरिका भारताला पुढील पन्नास वर्षाचा साथीदार या भूमिकेतून पाहतो.

एक व्यावहारिक विरोधक ते एक भागीदार हा प्रवास आठ दशकांचा आहे. भारत अमेरिका संबंध समजून घेण्यासाठी आपणास हा आठ दशकांचा घटनाक्रम प्रमुख दोन टप्प्यात पहावा लागेल.

शीतयुद्धकालीन भारत - अमेरिका संबंध (१९४५ ते १९९१)

शीतयुद्धोत्तर भारत - अमेरिका संबंध (१९९१ ते २०२१)

### २.२.१.१ शीतयुद्धकालीन भारत-अमेरिका संबंध (१९४५ ते १९९१) :

दुसऱ्या महायुद्धात भारतीय सेना ब्रिटनच्या वतीने म्हणजेच एका अर्थाने अमेरिकेच्या बाजूने युद्धात लढत होती. भारताला स्वातंत्र्य मिळावे यासाठी अमेरिकेच्या तत्कालीन राष्ट्राध्यक्षांनी ब्रिटनच्या पंतप्रधानांवर दबाव निर्माण केलेला होता. यापूर्वीच उल्लेख केल्याप्रमाणे भारताच्या घटना निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये ही येथील नेतृत्वावर अमेरिकेच्या शासन प्रणाली चा प्रभाव स्पष्ट दिसून येतो. अमेरिका जगातील सर्वात जुनी लोकशाही आणि भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही, साम्राज्यवादाला, वंशवादाला, विस्तारवादाला दोन्हीही व्यवस्था विरोध करणाऱ्या - एवढे समान दुवे असतानाही भारत-अमेरिका चांगल्या संबंधाचे पंडित नेहरूंचे स्वप्न साकार होऊ शकले नाही. प्रारंभीच्या काळी म्हणजेच १९४५ ते १९४८ पर्यंत अमेरिकेने भारताला मदत केलेली दिसते. यानंतरही कमी-अधिक प्रमाणात तंत्रज्ञान असो की आर्थिक आघाडीवर असो अमेरिकेने भारतासोबत शत्रुत्व स्वीकारले नाही. परंतु अमेरिकेचे दीर्घकालीन परराष्ट्र धोरण ज्या काळात ठरले तो १९४५ ते १९५२ म्हणजे राष्ट्राध्यक्ष ट्रूमन यांचा काळ, या काळात साम्यवादाला युरोप व मध्य आशिया मध्ये विस्तारित होऊ न देण्याच्या अमेरिकेच्या सर्व योजनांमध्ये भारतापेक्षा पाकिस्तानला अधिक महत्त्व दिले गेले. याची परिणीती म्हणजे १९४७ चे भारत पाकिस्तान युद्ध असो की काश्मीर प्रश्न असो, अमेरिकेने कायम पाकिस्तान धार्जिणी भूमिका घेतलेली दिसते. पुढील काळात नेहरूंनी घेतलेली चीनशी सलगी करण्याची नीती किंवा भारत-रशिया मैत्रीचे पर्व हे अमेरिकेपासून भारताला दूर नेण्यास कारणीभूत ठरले.

भारताने स्वीकारलेले अलिप्ततेचे धोरणही राष्ट्राध्यक्ष केनेडी किंवा त्यानंतरच्या अनेक अमेरिकन नेतृत्वाच्या टीकेचा विषय राहिलेला आहे. भारताची अलिप्तता ही फसवी असून भारत साम्यवादी जगताशी संधान साधून आहे, हा संशय कायम अमेरीकन धोरण निर्मात्यांच्या मनामध्ये राहिलेला आहे. १९७१ साली झालेल्या भारत-रशिया मैत्री कराराने हा संशय अधिक दृढ झाला. असे असतानाही अमेरिकेच्या ट्रुमन डॉक्ट्रीन आणि मार्शल योजनेचा भारताला १९६२ च्या भारत-चीन युद्धात फायदाही झाला. साम्यवादी लोकशाही चीनच्या विरोधात आदर्शवादी भारत कमकुवत पडत आहे हे लक्षात येताच अमेरिकेने भारताच्या बाजूने युद्धात हस्तक्षेप केला व भारताचा मोठा पराभव टळला.तरीही भारत अमेरिका संबंधांमध्ये जेव्हा जेव्हा पाकिस्तानचा संदर्भ येतो म्हणजे १९६५ चे १९७१ चे युद्ध अमेरिकेने कायम पाकिस्तानची बाजू घेतलेली दिसते हा देखील त्यांच्या मार्शल योजनेचा किंवा ट्रुमन डॉक्ट्रीन चा एक भाग होता.

१९५० सालचा कोरिया प्रश्न असेल, १९६० चा गोवा प्रश्न असेल, १९६१ चे क्युबा प्रकरण असेल, १९७८ ची अफगाणिस्तानची अंतर्गत यादवी असेल, १९८० सालचे दिएगो-गार्शिया नाविक तळ उभे करण्याचे प्रकरण असेल, भारत आणि अमेरिका सतत आंतरराष्ट्रीय पटलावर एकमेकांच्या विरोधात उभे राहिलेले दिसले. यामुळे उभय राष्ट्रांमधील संबंध विशेष चांगले होऊ शकले नाहीत.

निशस्त्रीकरण हा अमेरिकेचा एक कळीचा मुद्दा होता याही मुद्द्यावर भारत व अमेरिका यांचे हितसंबंध परस्पर विरोधी असल्याचे दिसले. १९६३ ची अणु परीक्षण प्रतिबंधक संधी असेल १९६८ ची परमाणु व प्रसार संधी असेल १९९४ सालची सीटीबीटी असेल भारताने नेहमीच अमेरिकेला नको असलेली परंतु भारताच्या राष्ट्रीय हिताला पूरक अशी स्वतंत्र नीती अवलंबलेली दिसते. ज्यामुळे भारत - अमेरिका संबंध अविश्वासाचे बनले.

विशेषतः भारताच्या आण्विक धोरणावर अमेरिकेप्रमाणे रशियाच्या प्रतिक्रिया दिसल्या नाहीत त्यामुळे साहजिकच भारतीय नेतृत्व रशियाकडे झुकलेले दिसते. भारत अमेरिका संबंधांमध्ये सर्वाधिक तणाव दिसला तो पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या काळात. राष्ट्राध्यक्ष निक्सन ते राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन यांचा संपूर्ण कालावधी भारत विरोधी धोरणांचा दिसतो. १९७१ सालचे भारत पाकिस्तान युद्ध हा भारत-अमेरिका संबंधातील तणावाचा परमोच्च बिंदू म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. या युद्धात अमेरिकेने भारताचे पारडे जड होत आहे हे पाहताच भारतावर दबावतंत्र म्हणून आपले सातवे आरमार हिंद महासागरात उतरवले. युद्ध थांबवा अन्यथा भारतावर आण्विक कारवाई करण्यात येईल अशा पद्धतीची धमकी अमेरिकेकडून भारताला होती. याप्रसंगी रशियाने भारताला केलेली मदत यामुळे भारतातील जनमानस अमेरिका विरोधी व रशियाच्या बाजूने झाले.

एकीकडे निशस्त्रीकरण याच्या मुद्द्यावर अमेरिकेला विरोध तर दुसरीकडे १९७४ साली पोखरण येथे केलेले अणु परीक्षण यामुळे भारत-अमेरिका संबंध या काळात कमालीचे दुरावलेले होते.

शीतयुद्धाच्या दरम्यान भारत-अमेरिका संबंधावर प्रभाव टाकणारे घटक -

**१. काश्मीरचा प्रश्न –** १९४७ साली भारत व पाकिस्तान या दोन देशादरम्यान निर्माण झालेल्या काश्मीर प्रश्नाच्या बाबतीत अमेरिका प्रारंभी पासूनच भारताच्या बाजूने राहिली नाही. भारताने हा प्रश्न जेव्हा सुरक्षा परिषदेत मांडला व सुरक्षा परिषदेने पाकिस्तानला सैन्य माघारी घेण्यास सांगितले तेव्हा त्याची अंमलबजावणी झाली नाही तरीही अमेरिकेने त्याकडे दूर्लक्ष केले. विशेषतः १९५० नंतर अमेरिकेची भूमिका उघड-उघड पाकिस्तान धार्जिणी झाली. एकविसावे शतक उजाडेपर्यंत काश्मीर प्रश्नाच्या बाबतीत अमेरिका कायम भारताच्या विरोधी व पाकिस्तानच्या बाजूने झुकलेला दिसला.

**२. कोरिया प्रश्न १९५० –** १९९० पर्यंत जगामध्ये साम्यवादी व भांडवली असे दोन गट निर्माण झालेले होते आणि यातून निर्माण होणाऱ्या तणावामुळे ठीक-ठिकाणी लहान-मोठे संघर्ष निर्माण होत होते. १९५० साली निर्माण झालेला कोरियाचा प्रश्नही असाच एक होता. दक्षिण कोरियाने उत्तर कोरियावर आक्रमण केले. दक्षिण कोरियाला अमेरिकेचा तर उत्तर कोरियाला रशियाचा पाठिंबा होता. यावेळी भारताने दक्षिण कोरियाच्या

आक्रमणाचा विरोध केला, एका अर्थाने तो अमेरिकेचा विरोध होता. भारताने या युद्धात संयुक्त राष्ट्राच्या शांती सेनेच्या माध्यमातूनही मोठ्याप्रमाणावर हस्तक्षेप केला, व हे युद्ध अधिक विध्वंसक होण्यापासून रोखले. सहाजिकच यामुळे अमेरिका भारताच्या विरोधात गेली.

**३. १९६१ क्युबा प्रश्न –** फिडेल कॅस्ट्रो यांच्या नेतृत्वामध्ये क्युबा मध्ये साम्यवादी राजवट निर्माण झालेली होती. क्यूब अमेरिकेच्या नजीक असलेले एक लहानसे बेट. येथे साम्यवादी क्रांती होणे म्हणजे अमेरिकेला चिथावणी होती. यामुळे अमेरिकेने हे साम्यवादी शासन उलथवून लावण्यासाठी क्युबन एक्साइल्स या संघटनेला सर्वतोपरी मदत करून रशियासोबत तणाव ओढवून घेतला होता. रशियानेही यावर प्रतिक्रिया म्हणून क्युबा मध्ये आपली क्षेपणास्त्रे तैनात केली. जग एका प्रकारे तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर होते. अशावेळी भारताने अमेरिकेच्या कृत्याचा विरोध तर केला परंतु दुसरीकडे अलिप्ततावादी राष्ट्रांच्या प्रमुख या त्याने जागतिक शांतता प्रस्थापित राहण्यासाठी महायुद्ध होणार नाही याची खबरदारी घेतली. अमेरिका व रशिया यांच्यामध्ये संवाद घडवून आणला व प्रकरण निवळण्यास मदत झाली. हे सर्व खरे असले तरीही भारताने अमेरिकेद्वारे क्युबा मध्ये क्रांती घडवण्याच्या इच्छेच्या विरोधात आपले मतप्रदर्शन केले त्यामुळे भारत–अमेरिका संबंध दुरावले.

**४. गोवा प्रश्न (१९६१) –** १९४७ आली भारत स्वतंत्र होऊनही पोर्तुगीज गोवा हा प्रदेश सोडून जाण्यास तयार नव्हते. तेव्हा १९६१ मध्ये भारताने सैनिकी कार्यवाही करून गोवा भारतात समाविष्ट करून घेतला. भारताच्या या कार्यवाहीवर अमेरिकेने युनोमध्ये हरकत घेतली. त्यामुळे भारत–अमेरिका संबंधात तणाव निर्माण झाला.

**५. १९६५ चे भारत पाकिस्तान युद्ध –** १९६२ साली चीन सोबत झालेल्या युद्धाने भारत कमकुवत झालेला आहे, असा समज करून १९६५ साली पाकिस्तानने भारताच्या कच्छ या भागांमध्ये आक्रमण केले. पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या नेतृत्वामध्ये भारताने हे आक्रमण यशस्वीपणे परतवून लावले व पाकिस्तानचा पराभव केला. मात्र यावेळी भारताने पाकिस्तानला अमेरिकेकडून होत असलेल्या मदतीचा वापर भारत विरोधी कारवायांसाठी करतो आहे हे अमेरिकेच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला. परंतु अमेरिकेने त्याकडे कानाडोळा केला, म्हणून भारत - अमेरिका संबंधात अविश्वास निर्माण झाला.

**६. १९७१ चे भारत पाकिस्तान युद्ध –** बांगलादेश मुक्ती संग्रामाच्या घटनेवरून १९७१ साली भारत पाकिस्तान यांच्यामध्ये युद्ध झाले. या युद्धात भारताने पाकिस्तानचा फार मोठा पराभव केला. जवळपास ९० हजार सैन्य युद्धबंदी बनवले व भूप्रदेश पादाक्रांत केला. या वेळी भारतावर दबाव तंत्राचा वापर म्हणून अमेरिकेने पाकिस्तानच्या बाजूने आपले अणवस्त्र सज्ज असे सातवे आरमार अरबी समुद्रात उतरवले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन रशियानेही भारतासाठी अणवस्त्रसज्ज अशा पाणबुड्यांचा ताफा बंगालच्या उपसागरात उभा केला. पुढे सिमला कराराने संघर्ष निवळला मात्र अमेरिकेने भारताला आणू हल्याची धमकी दिली, ही बाब दोन देशांमध्ये वितुष्ट निर्माण होण्यास कारणीभूत ठरली.

**७. पोखरण अणुचाचणी (१९७४) व अमेरिकेची प्रतिक्रिया –** १९७१ च्या युद्धात अमेरिकेने भारताला जी अणुहल्ल्याची धमकी दिलेली होती त्यावरून भारतीय नेतृत्वाने सारासार विचार करून अणवस्त्र संपन्नते साठी पहिले पाऊल म्हणून १९७४ साली पोखरण येथे अणू चाचण्या घडवून आणल्या. अमेरिकेचा भारताला असे करू नये यासाठी पूर्वीपासूनच प्रचंड विरोध होता मात्र कोणालाही कळू न देता भारताने या चाचण्या घडवून आणल्या. जगावर नियंत्रण ठेवणारी अमेरिका भारताच्या अणुचाचण्या रोखू शकली नाही हा अपमान अमेरिकेला सहन झाला नाही व अमेरिकेने भारतावर निर्बंध लादले.

**८. अफगाणिस्तानचा प्रश्न १९७८ –** रशियाच्या मदतीने अफगाणिस्तानमध्ये अंतर्गत संघर्ष शिगेला पोहोचला होता. पाकिस्तान अमेरिका प्रणित लष्करी आघाड्यांमध्ये सामील असल्याने अफगाणिस्तानमधील घडामोडींचा पाकिस्तानच्या सार्वभौमत्वावर विपरीत परिणाम होईल म्हणून संरक्षणासाठी पाकिस्तानला अमेरिकेने फार मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रांची मदत केली. मात्र पाकिस्तान या शस्त्रास्त्रांचा वापर भारताच्या विरोधी करू लागला म्हणुन भारताने अमेरिकेच्या पाकिस्तानला शस्त्र पुरवठा करण्याच्या धोरणाचा आंतरराष्ट्रीय पातळीवर विरोध केला. तेव्हा रशिया अफगाणिस्तानमध्ये हस्तक्षेप करतो याबाबत भारत मौन बाळगत आहे, मात्र अमेरिका पाकिस्तानला मदत करतो आहे याबाबत भारत तक्रार करतो, अशा पद्धतीचे मत अमेरिकेने व्यक्त केले.

**९. दिएगो गार्सिया बेट प्रकरण १९८० –** भारत व मॉरिशस या दोन देशाच्या मध्यभागी समुद्रात दिएगो गार्सिया हे बेट पोर्तुगालने १५३२ मध्ये शोधले. द्वितीय महायुद्धाच्या दरम्यान याचा ताबा ब्रिटन कडे होता पुढे १९६६ मध्ये ब्रिटन सोबत एक करार करून अमेरिकेने हे बेट घेतले व १९७०च्या दशकात या बेटावर सुसज्य असे नाविक तळ उभारणीला सुरुवात केले. आरमार व युद्धनौकांच्या उपस्थितीमुळे दिएगो गार्सिया आणि पर्यायाने हिंदी महासागरातील फार मोठा भाग अशांत बनला. हिंदी महासागरातील देशांनी अमेरिकेच्या या कृतीचा कठोर विरोध केला. भारतही यापैकी एक होता त्यामुळे अमेरिका व भारत यांच्यातील संबंध तणावाचे बनले.

शीतयुद्धाच्या काळात भारत आणि अमेरिका यांच्यात बहुतांश वेळा असहमती, विरोध, तक्रार, तणाव व प्रसंगी संघर्ष ही पहायला मिळतो. मात्र असे असले तरी यादरम्यान काही प्रसंगी अमेरिकेने अनपेक्षितपणे भारताला मदतही केलेली आहे. प्रारंभीची आर्थिक व तंत्रज्ञानाची मदत वगळता १९६२ चे भारत–चीन युद्ध हे अमेरिकेने भारताला केलेल्या मदतीचे एक महत्त्वाचे उदाहरण आहे. १९६२ च्या भारत–चीन युद्धात भारताची बाजू कमकुवत आहे हे लक्षात येताच अमेरिकेने भारताच्या बाजूने युद्धात प्रवेश करून चीनला यथास्थिती युद्धबंद करण्यास भाग पाडले. यामुळे आंतरराष्ट्रीय पटलावर भारताचा फार मोठा पराभव व मोठी मानहानी वाचली. याव्यतिरिक्त जेव्हा १९७२ साली भारतामध्ये दुष्काळ पडलेला होता तेव्हा अमेरिकेने भारताला सढळ हाताने अन्नधान्याची मदत देऊ केली.

### २.२.१.२ शीतयुद्धोत्तर भारत–अमेरिका संबंध (१९९१ ते २०२१) :

१९९१ ते १९९६ हा पंतप्रधान नरसिंह राव यांचा कालावधी. भारत व अमेरिका दोघांसाठीही आपापल्या

परराष्ट्र धोरणा संबंधी पुनर्विचाराचा कालावधी म्हटले तर चुकीचे ठरणार नाही.सोविएत संघाचा पाडाव झालेला होता, शीतयुद्धानंतर अमेरिकेची जागतिक राजकारणातील रणनीती पूर्णपणे बदललेली होती, साहजिकच याचा परिणाम अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय धोरणांवर पडला. ज्या घडामोडींचा भारताशी संबंध नसताना व्यक्त केलेल्या मतामुळे अमेरिकेचे मत भारताच्या विरोधात बनले होते अशा घडामोडी अमेरिका व रशिया यांच्यातील वाद विवाद नष्ट झाल्याने कमी झाल्या. शीतयुद्धोत्तर काळात भारत अमेरिका संबंधांना प्रभावित करणाऱ्या दोन महत्त्वाच्या बाबी म्हणजे जगातील वाढता दहशतवाद आणि जगातील चीनची वाढती सत्ता. या दोन्ही घटनांमध्ये भारत व अमेरिका यांचे हितसंबंध समान होते. त्यामुळे परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन दोन्ही देशांनी आपल्या संबंधास नव्याने सुरुवात केली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.भारताने उदारीकरणाचे धोरण स्वीकारले होते, या धोरणाचे अमेरिकेने खुल्या दिलाने स्वागत केले व भारतासोबत आर्थिक व्यापार वाढवण्यावर भर दिला.

१९९१ ते १९९८ हा कालावधी दोघांच्याही परराष्ट्र धोरणाच्या बाबतीत दुटप्पीपणाचा म्हणता येईल. राजकीय बाबतीत भारत-पाकिस्तान संघर्ष असो की अमेरिकेचे आखाती धोरण असो, भारत व अमेरिका परस्पर विरोधी दिसले. परंतु आर्थिक बाबतीत मात्र अमेरिकेने भारताला सहकार्याचे धोरण ठेवले होते. भारतीय जनता पक्ष हा उजव्या विचारसरणीचा पक्ष म्हणून ओळखला जातो, या अर्थाने तो जेव्हा सत्तेत आला तेव्हा अमेरिकेबरोबर राजकीय संबंधी सुधारतील असा आशावाद अनेकांना होता. परंतु मे १९९८ मध्ये पोखरण येथे पाच अणु चाचण्या करून भारताने पुन्हा एकदा अमेरिकेचा रोष ओढवून घेतला. यानंतर तर अमेरिकेने भारतावर स्वतः आर्थिक निर्बंध लादलेच परंतु इतर राष्ट्रांनाही भारताला कोणत्याही प्रकारच्या सहकार्यास मज्जाव केला. १९९९ साली पाकिस्तानने भारताच्या कारगील भागामध्ये आपले सैन्य घुसवले, भारताने याचा प्रखर प्रतिकार केला. यावेळी भारत व पाकिस्तान दोन्ही अण्वस्त्र संपन्न राष्ट्र एकमेकांच्या विरोधात उभे होते. आंतरराष्ट्रीय दबाव शांततेने प्रश्न सोडवण्यासाठी वाढत होता, मात्र अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी पहिल्यांदाच पाकिस्तानच्या विरोधी भूमिका घेऊन पाकिस्तानचे पंतप्रधान नवाज शरीफ यांना सैन्य माघार घेण्यास भाग पाडले. यावेळी पाकिस्तान पहिल्यांदा अलग पडताना दिसला. आज भारत-अमेरिका संबंध इतके सलोख्याचे दिसतात, त्याची सुरुवात या घटनेने झाली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. यानंतर बिल क्लिंटन यांनी भारताचा दौरा केला व भारताला पूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले.

वर्षभरातच भारत-अमेरिका संबंधाच्या नवीन पर्वाला सुरुवात झाली. भारत अमेरिका संबंध चांगले होण्यास आंतरराष्ट्रीय दहशतवादाच्या काही घटनाही कारणीभूत आहेत. यात खुद्द अमेरिकेवर झालेला वर्ल्ड ट्रेड सेंटर वरील हल्ला व भारताच्या संसदेवर झालेला हल्ला या दोन घटना मैलाचा दगड आहेत. दहशतवादाच्या विरोधी निर्माण झालेल्या आघाडीत पहिल्यांदाच एका बाजूने उभे राहिले.

१९९८ ते २००० या दरम्यान अमेरिकेच्या धोरण निर्मात्यांनी एकविसाव्या शतकातील आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचे स्वरूप कसे असावे याबाबत एक अहवाल पेंटॅगॉन या अमेरिकेच्या कार्यालयाला सादर केलेला होता. यामध्ये येथून पुढच्या प्रवासात भारताचे महत्त्व अधोरेखित केलेले होते. यानुसारच एकविसाव्या

शतकाच्या प्रारंभापासूनच भारत-अमेरिका संबंधातील बदल जाणवू लागला होता. मार्च २००० मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी जो ऐतिहासिक भारत दौरा केला तेथून दोन देशांचे संबंध झपाट्याने सुधारत गेले. यानंतर सत्तेवर आलेल्या प्रत्येक राष्ट्राध्यक्षांनी भारताची भेट घेतलेली आहे. यावरून अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात भारताचे किती महत्त्व वाढत आहे याचा अंदाज येऊ शकतो.

मनमोहन सिंग व जॉर्ज बुश यांच्यातील २००५ सालचा अणु करार असेल की त्यानंतर बराक ओबामा यांची भारत भेट व भारताला केलेले आर्थिक सहकार्य असेल, २००४ ते २०१४ हा कालावधी भारत अमेरिका संबंधासाठी एक पायाभरणीचा कालावधी म्हटले तर वावगे ठरणार नाही. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका पदोपदी भारताच्या विकासात बाधा निर्माण करण्याचा प्रयत्न करत होता. परंतु गेल्या वीस वर्षात तीच अमेरिका भारताच्या विकासाच्या मार्गातील सर्व बाधा प्रसंगी नियम बाजूला ठेवून हटवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे जी अमेरिका भारताच्या अणु परीक्षणावर प्रतिबंध लावत होती तीच अमेरिका भारताचा समावेश न्यूक्लियर सप्लायर ग्रुप मध्ये व्हावा यासाठी सर्व नियमांना बगल देताना व प्रसंगी इतर देशांना प्रभावित करताना दिसली.

२०१४ साली नरेंद्र मोदी पंतप्रधान बनल्यानंतर अमेरिका आपल्या जागतिक दीर्घकालीन धोरणांच्या बाबतीत अधिक सक्रिय झालेली दिसते. या काळात मोदींनी उघडपणे अमेरिकेला हवे असलेले जागतिक धोरण स्वीकारलेले दिसते.एकविसाव्या शतकात अमेरिकेची सर्वात मोठी समस्या चीनचे वाढते सामर्थ्य आहे. या सामर्थ्याला संतुलन करण्यासाठी भारताचा सर्वांगीण विकास व त्या माध्यमातून एक प्रभावी संतुलन म्हणून भारताचा वापर हे अमेरिकेचे धोरण आहे. याचा लाभ घेत भारतीय नेतृत्वाने जागतिक पातळीवर एक प्रभावी सत्ता म्हणून स्थान मिळवण्यात यश प्राप्त केलेले आहे. मोदींचे परराष्ट्र धोरण हे अतिशय सक्रिय असे धोरण आहे. एकाच वेळेला ते दोन आघाड्यांवर चालते, प्रशासकीय करार हा एक भाग असतो आणि दोन नेतृत्वा मधील अनौपचारिक संबंधांचे प्रकटीकरण हा त्याचा दुसरा भाग असतो. साहजिकच त्यामुळे दोन्हीदेशातील व्यापारी वर्गांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण होते.

शीतयुद्धोत्तर काळात भारत-अमेरिका संबंधांना प्रभावीत करणारे महत्वाचे घटक -

शीतयुद्धाच्या काळाप्रमाणे शीतयुद्धोत्तरकाळात देखील भारत-अमेरिका संबंधात तणाव निर्माण करणारे अनेक प्रश्न व घटना यांचा संदर्भ मिळतो. अर्थातच १९९१ ते २००१ या दहा वर्षाच्या काळात हे प्रमाण पुढील वीस वर्षाच्या तुलनेत अधिक दिसते. म्हणजेच २००१ पासून भारत व अमेरिका यांनी आपल्या हितसंबंधांचे व्यवस्थापन चांगल्या पद्धतीने केले असे म्हणता येईल.

**१. बहूध्रुवीय विश्वरचनेसाठी भारताचे प्रयत्न –** शीतयुद्धोत्तर काळातील पहिल्या दशकामध्ये भारत-अमेरिका संबंधात तणाव निर्माण करणारा सर्वात मोठा प्रश्न म्हणजे बहूध्रुवीय विश्वरचनेसाठी भारताचा पाठींबा होता. बहूध्रुवीय विश्वरचनेसाठी भारत सक्रियपणे प्रयत्न करत होता, यासाठी रशिया व चीन यांच्यासोबत एकत्र येऊन प्रसंगी काही युरोपियन देशांना सामील करून, एक ध्रुवीय व्यवस्थेचे बहूध्रुवीय व्यवस्थेमध्ये रूपांतरण करण्यासाठी भारत प्रयत्नशील दिसला. सहाजिकच त्यामुळे अमेरिका भारतावर नाराज होती.

२. **पाकिस्तानला शस्त्र पुरवठा –** अमेरिकेने आखाती देशांमध्ये सुरू केलेल्या मोहिमेत पाकिस्तानची मदत मिळावी या हेतूने १९९२ नंतर मोठ्याप्रमाणावर पाकिस्तानला लढाऊ विमाने व क्षेपणास्त्रे तसेच लष्करी साहित्य पुरवले. अर्थातच याचा वापर आपल्या विरोधात होईल ही शंका भारताच्या मनात होती म्हणून भारताने याचा उघड विरोध केला.

३. **सीटीबीटी –** पाच अण्वस्त्र राष्ट्रांत शिवाय अनेक राष्ट्रांमध्ये अण्वस्त्र निर्मितीची ताकत आहे,त्यांच्याकडे तसे तंत्रज्ञान आहे, याबाबतची शंका अमेरिकेकडून व्यक्त होत होती. तेव्हा अशा राष्ट्रांनी अणु परीक्षण करू नये यासाठी अमेरिकेने सर्वंकष अणुचाचणी बंदी करार युनोच्या माध्यमातून पुढे आणला. यापूर्वीच्या कराराप्रमाणेच याही अणु परीक्षण बंदी कराराला भारताने विरोध केला. भारताने विरोध केला हे कारण दाखवून पाकिस्ताननेही यावर स्वाक्षरी केली नाही. भारताची ही कृती म्हणजे अमेरिकेच्या एकाधिकारशाहीला आव्हान आहे व भारत कधीही दुसऱ्यांदा अण्वस्त्र चाचणी करू शकतो, या शंकेने अमेरिकेने भारतावर दबाव वाढवलेला होता.

४. **पोखरण २ –** १९७४ मध्ये भारताने पोखरण येथेच पहिल्यांदा अणू चाचण्या केल्या होत्या. याच ठिकाणी १९९८ मध्ये पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वामध्ये अणू चाचण्यांचा निर्णय घेण्यात आला व त्या यशस्वीपणे पार पडल्या. थोड्याच दिवसात पाकिस्ताननेही अणू चाचण्या केल्या. मात्र भारताने सीटीबीटी ला विरोध करून अण्वस्त्र चाचण्या केल्या व आशिया खंडात शस्त्रास्त्र स्पर्धांना चालना दिली. हे कारण पुढे ठेवून अमेरिकेने स्वतः भारतावर निर्बंध लादले तसेच जगातील इतर देशांना व संघटनांनाही तसे करण्यास प्रवृत्त केले.

५. **इराकमध्ये शांतिसेना पाठवण्यास नकार –** अमेरिकेने आखाती देशांमध्ये विशेषत: इराकमध्ये जी लष्करी कारवाई केली त्यात मदत म्हणून भारताने शांती सैनिक पाठवावे यासाठी अमेरिका विनंती करत होता. परंतु आखाती देशातील आपले हितसंबंध राखण्यासाठी भारताने याला नकार दिला. इतर ठिकाणी शांतिसेना पाठवण्यास उत्सुक असलेला भारत अमेरिकेच्या विनंतीला मान देत नाही, हे अमेरिकेला आवडणारे नव्हते.

६. **विकसित आणि विकसनशील राष्ट्रांमधील संघर्ष –** अमेरिका हा विकसनशील गटाचा नेता आहे. तर भारत विकसनशील राष्ट्रांमध्ये प्रमुख एक राष्ट्र आहे. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर पर्यावरणाचे संरक्षण, मानवाधिकार व स्त्रियांचे प्रश्न, आंतरराष्ट्रीय व्यापाराची नियमावली, शाश्वत विकास अशा अनेक मुद्द्यांवरून विकसनशील राष्ट्र व विकसित राष्ट्र हे एकमेकांच्या विरोधात उभे असलेले दिसले. या मुद्यांवरून भारत व अमेरिकेत मतभेद असलेले दिसतात.

७. **दोन देशांतर्गत व्यापार, आउटसोर्सिंग व व्हीसा याबाबतचा प्रश्न –** प्रारंभी अमेरिकेने भारताच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी तसेच भारतातील सॉफ्टवेअर तज्ञांची मदत घेऊन अमेरिकेतील उत्पादन वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आउटसोर्सिंगच्या माध्यमातून भारतीय कंपन्यांना कामे दिली. परंतु बराक ओबामा व त्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांच्या काळामध्ये भारतीयांचा व्यापार क्षेत्रातील वाढता दबदबा लक्षात घेता भारतीयांना व्हिसा देण्याबाबत कठोर भूमिका घेण्यास सुरुवात केली. या व्हिसाची मुदत किती असावी,

त्याबाबत किमान किती रुपये कर आकारणी असावी, याबाबतचे नवीन नियम येऊ लागले. जेणेकरून सॉफ्टवेअर इंडस्ट्रीमध्ये काम करणाऱ्या भारतीयांना अमेरिकेत जाऊन काम करणे कठीण होईल. अमेरिकेतील नोकऱ्या मोठ्याप्रमाणावर भारतीय लोक व्यापू लागले. त्यामुळे सहाजिकच अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी तर प्रश्न उपस्थित होऊ लागला. जो कालांतराने राजकीय मुद्दा बनला. २०१७ मध्ये तर डोनाल्ड ट्रम्प यांनी असा नाराच दिलेला होता. त्यामुळे साहजिकच मागच्या वीस वर्षापासून सुरु असलेल्या आउटसोर्सिंग च्या प्रक्रियेला खिळ बसणार होती. एकंदरीत भारत-अमेरिका या दोन देशांमध्ये मागील पाच ते सात वर्षांमध्ये दोन देशांतर्गत व्यापार आउटसोर्सिंग व व्हिसा याबाबत अधून मधून समस्या उत्पन्न होत राहते.

**८. संयुक्त राष्ट्राच्या पुनर्रचनेचा व सुरक्षा परिषदेतील भारताच्या कायम सदस्यत्वाचा प्रश्न –** संयुक्त राष्ट्राची पुनर्रचना व्हावी व सुरक्षा परिषदेत भारताला कायम सदस्यत्व मिळावे याबाबत भारत अनेक वर्षांपासून प्रयत्नशील आहे. या प्रक्रियेत भारताला इंग्लंड, रशिया, फ्रान्स या देशांचे उघड समर्थन मिळालेले आहे. चीनचे भारताला समर्थन मिळणे दुरापास्त आहे. मात्र अमेरिका शीतयुद्धाच्या समाप्तीनंतरही सालापर्यंत सुरक्षा परिषदेत भारताचे कायम सदस्यत्व याबाबत पद्धतशीर मौन बाळगत होता. आशिया खंडातून अमेरिकेसाठी भारतापेक्षा जपान हा सुरक्षा परिषदेतील कायम सदस्यत्वाचा प्रबळ व सुरक्षित दावेदार वाटत होता.

२१ व्या शतकातील भारत - अमेरिका संबंध-यापूर्वीच उल्लेख केल्याप्रमाणे मार्च २००० साली अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी केलेला भारत दौरा हा भारत-अमेरिका संबंधातील नव्या पर्वाची सुरुवात म्हणता येईल. २००० ते २०२१ या २१ वर्षात भारत अमेरिका संबंधांचा प्रवास एक व्यापारी भागीदार, एक स्ट्रॅटेजिक पार्टनर ते एक संरक्षण भागीदार असा राहिला आहे.

भारत-अमेरिका यांच्यातील आर्थिक सहकार्य एकविसाव्या शतकामध्ये कमालीचे वाढले आहे. दोन देशातील राजकीय स्तरावरील विश्वासाचे प्रतिबिंब अर्थकारणावर दिसून येत आहे. अमेरिकेची भारतातील गुंतवणूक व अमेरिकन आंतरराष्ट्रीय कंपन्यांची भारतातील गुंतवणूक वाढलेली आहे. त्याप्रमाणेच मोठ्या प्रमाणावर अमेरीकेतील उत्पादनाचे भारतीय बाजारपेठेत वितरण वाढलेले दिसते.

दहशतवाद विरोधी लढाईमध्ये दोन देशांचे सहकार्य हे केवळ आंतरराष्ट्रीय समुदायाला उद्देशून वरवरचे राहिले नाही, तर हे सहकार्य वेगळ्या पातळीवर जाऊन पोहोचले आहे. दोन देशात दहशतवाद विरोधी लढाईमध्ये माहिती व तंत्रज्ञानाची हस्तांतरण सुरू झालेले आहे. तसेच दहशतवाद विरोधी भारताने घेतलेल्या कठोर पावलांना अमेरिकेचे उघड समर्थन दिसत आहे.

एकविसाव्या शतकातील आणखी एक महत्वाची बाब म्हणजे अणुऊर्जानिर्मिती संबंधात भारत-अमेरिका नागरी अणुऊर्जा निर्मिती करार. पंतप्रधान मनमोहन सिंग व अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश या दोन नेत्यांनी आपापल्या देशातील दबाव गटांचा व जागतिक दबावाचा विरोध झुगारून केलेला हा एक ऐतिहासीक करार म्हणावा लागेल. या कराराने भारतासाठी अणु उर्जा निर्मिती विश्वातील दरवाजे उघडले गेले, तसेच न्यूक्लियर सप्लायर ग्रुप मध्ये भारताच्या प्रवेशाचे मार्ग खुले झाले. प्रारंभी ऑस्ट्रेलियासारख्या युरेनियमच्या

पुरवठादार देशाने भारताच्या न्यूक्लियर सप्लायर ग्रुप मधील प्रवेशास विरोध केला. परंतु अमेरिकेने आपल्या प्रभावाचा वापर करून ऑस्ट्रेलिया, फ्रान्सच्या विरोधाला सौम्य केले व काही अटींच्या आधारावर भारताचा न्यूक्लियर सप्लायर ग्रुप मध्ये मागच्या दाराने प्रवेश सुलभ केला. सध्या फक्त भारताने एन पी टी वर स्वाक्षरी केलेली नाही, या कारणासाठी न्यूक्लियर सप्लायर ग्रुपमध्ये प्रवेशास चीन ने भारताला विरोध केलेला आहे. ऑगस्ट २०२१ मध्येच अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष बायडन यांनी न्यूक्लियर सप्लायर ग्रुप मध्ये भारताच्या सदस्यत्वाचे समर्थन केलेले आहे.

सुरक्षा परिषदेतील कायम सदस्यत्वाचा मुद्दा हा भारतासाठी कळीचा राहिलेला आहे. यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे अमेरिका याबाबत पद्धतशीरपणे मौन बाळगत आलेला होता. परंतु बराक ओबामा, डोनाल्ड ट्रम्प वर्तमान राष्ट्राध्यक्ष बायडन या तिघांनीही सुरक्षा परिषदेतील भारताच्या कायम सदस्यत्वाला उघडपणे समर्थन दिले दिसते. प्रारंभी साशंक वाटणाऱ्या बायडन यांनी देखील ऑगस्ट २०२१ मध्ये भरलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत उघडपणे भारताच्या कायम सदस्यत्वाला समर्थन दिलेले आहे.

काश्मीर प्रश्नाच्या मुद्द्यावरून पाकिस्तान जो भारतामध्ये दहशतवादी कारवाया करत आहे, त्याबाबतही अमेरिका कठोर बनलेली आहे. अमेरिकेने दिलेला पैसा भारत विरोधी कारवायासाठी वापरला जाऊ नये याबाबत आता अमेरिका अधिक जागृत दिसते. गेल्या काही वर्षापासून तर अमेरिकेने पाकिस्तानला देऊ केलेली सर्व आर्थिक मदत गोठवलेली दिसते. याउलट अमेरिकेतून दहशतवाद विरोधी कारवाई यांसाठी भारताला सर्व प्रकारच्या मदतीचा ओघ सुरू झालेला आहे.

अमेरिकेचे एकविसाव्या शतकात काश्मीरबाबत बदललेले धोरण स्पष्ट दिसते. प्रारंभी पाकिस्तान च्या बाजूला झुकलेली अमेरिका एकविसाव्या शतकात उघड उघड भारताच्या बाजूने दिसते. दोन देशांनी हा प्रश्न आपल्या मध्यस्थीने सोडवावा अशी सुरुवातीला अमेरिकेची भावना होती. तशी इच्छाही मागील काही राष्ट्राध्यक्षांनी बोलून दाखवलेली होती. अशी इच्छा व्यक्त करणे म्हणजे पाकिस्तानचा सिमला कराराला असलेला विरोध याचे समर्थन करण्यासारखे होते. परंतु जॉर्ज बुश व त्यानंतर ओबामा, ट्रम्प व सध्या बायडन यांनीदेखील दोन्ही देशांनी हा प्रश्न आपापसातच सोडवावा याबाबत वाच्यता केलेली दिसते. म्हणजेच आता अमेरिका सिमला कराराचे समर्थन करत आहे. जो भारताचा मोठा राजनयिक विजय समजले पाहिजे.

चीन एका ठराविक कालांतराने भारतासोबत सीमेबाबतचे प्रश्न उपस्थित करत आलेला आहे. व या बाबतीत कायमच अमेरिका भारताचे समर्थन करत आलेली आहे. सध्या हा प्रश्न ३४४० किलोमीटर एवढ्या मोठ्या अंतराच्या सीमेबाबत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये डोकलाम, लडाख, सिक्कीम, अरुणाचल अशा विविध भागांमध्ये भारत व चीन यांचे सैन्य एकमेकांच्या विरोधात उभे राहिलेले दिसतात. अनेक ठिकाणी मर्यादित लढाया ही झालेल्या आहेत. अमेरिकेने त्यांच्या धोरणात्मक निती नुसार भारताचे या बाबत समर्थन केलेले आहे.

हिंदी महासागर क्षेत्र हे शांततामय राहावे यासाठी भारत कायम प्रयत्नशील राहिलेला आहे. या क्षेत्रात

चीनचे वाढते अतिक्रमण व प्रभाव भारताबरोबरच अमेरिकेलाही चिंतेत टाकतो. म्हणून अमेरिकेने जपान, ऑस्ट्रेलिया, भारत अशा समविचारी देशांना एकत्र घेऊन क्वाड या संघटनेची निर्मिती केली, जेणेकरून चीनच्या वाढत्या प्रभावाला आळा बसेल.

मार्च २०२० पासून जगाला कोरोनाच्या महामारीने विळखा घातलेला आहे. या महामारीची सुरुवात चीन पासून झाली असा सर्वांचा दावा आहे. भारत व अमेरिका हे या महामारीच्या विरोधात सुरू असलेल्या जागतिक लढ्यात खूप जवळ आलेले दिसले. या दरम्यान दोन्ही देशांमध्ये मोठ्या प्रमाणात वैद्यकीय सोयी-सुविधांची देवाण-घेवाण झालेली दिसते. भारत हा लस निर्मितीमध्ये मोठा उत्पादक देश असल्यामुळे सहाजिकच भारताचे याबाबतचे योगदान जगासाठी जीवदान ठरणारे होते. परंतु या कोरोणा वरील औषध म्हणजेच लस निर्मितीच्या प्रक्रियेत भारत व अमेरिका हे माहिती व तंत्रज्ञान या दोन्ही दृष्टीने एकमेकांच्या जवळ आलेले दिसतात. अनेक व्यासपीठांवरून दोन्ही देशांनी हे एका प्रकारचे युद्ध आहे व भारत व अमेरिका या युद्धात एकमेकांच्या सोबत विषाणूच्या विरोधात लढत आहेत याचा उल्लेख केलेला आहे.

### २.२.२ भारत सोव्हिएत संघ आणि भारत-रशिया संबंध :

स्वतंत्र भारताचा शीत युद्ध काळातील सर्वात महत्वपूर्ण मित्र म्हणून रशियाची ओळख आहे. अशा या रशियाचे १९९१ मध्ये विघटन झाले व तेथून पुढचा कालखंड शीत युद्धोत्तर कालखंड म्हणून ओळखला जातो. भारत-रशिया संबंधांचा अभ्यास करताना देखील आपणास शीत युद्धकालीन भारत रशिया संबंध व शीतयुद्धोत्तर भारत रशिया संबंध आणि सध्यकालीन भारत-रशिया संबंध अशा तीन कालखंडात अभ्यास करावा लागेल. तत्पूर्वी स्वातंत्र्यपूर्व काळात भारत-रशिया यांचे राजनैतिक संबंध कसे होते याचा आपण धावता आढावा घेऊ.

भारताच्या उत्तरेस चीनच्या विस्तीर्ण भूभा पलीकडे चीन पेक्षाही विस्तारित असा प्रदेश म्हणजे रशिया होय. साधारणपणे सोळाव्या शतकापासून रशियामध्ये झार सम्राटांचे अधिराज्य पसरलेले होते. सर्वत्र जगभर ज्या पद्धतीने सरंजामशाही पसरलेली होती, त्याच पद्धतीने रशियात देखील झारशाहीच्या रूपाने एक अमर्याद, निरंकुश, सार्वभौम व एकतंत्री अशा प्रकारची हुकूमशाही शासनपद्धती होती. अर्थातच रशियातील हे शासन लोकांपासून तुटलेले होते. त्यातच १९०५ मध्ये विस्तीर्ण बलाढ्य रशियाचा जपान ने पराभव केला. यामुळे झारशाहीच्या विरोधात रशियाचे जनमत गेले.याचा फायदा मार्क्सवादी विचारांवर आधारित असलेल्या तेथील किसान व कामगारांच्या संघटनांना झाला. झारशाहीच्या विरोधात प्रदीर्घ लढा देऊन १९१७ साली म्हणजेच पहिल्या महायुद्धादरम्यान लेनिन यांच्या नेतृत्वाखाली बोलशेविक क्रांती करून रशियामध्ये झार शाहीचा अंत करण्यात आला. किसान व कामगारांची सत्ता असलेली समाजवादी समाजरचना प्रस्थापित करण्यात आली. शीतयुद्धकालीन जो रशिया सर्वांना माहित आहे, त्याची निर्मिती १९२३ मध्ये सोव्हियत रशिया, बोलोरशिया, युक्रेन व ट्रान्सकोकॅशिया या चार राज्यांच्या एकत्र येण्याने झाली होती.

स्वातंत्र्यलढ्याच्या वेळी भारतामध्ये जो साम्यवादी विचारप्रवाह निर्माण झाला व या माध्यमातून भारतीय स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारक प्रयत्न झाले, त्यामागे रशियातील साम्यवादाचा प्रसार करणारी यंत्रणा कमी-अधिक

प्रमाणात का असेना काम करत होती. मानवेंद्रनाथ रॉय असतील किंवा नेताजी सुभाषचंद्र बोस असतील अशा अनेक क्रांतिकारकांनी स्वातंत्र्य लढ्यामध्ये रशियाची आपल्याला मदत होईल या उद्देशाने तेथील नेतृत्वाशी संबंध प्रस्थापित केले होते. रॉय व लेनिन यांचे संबंध सर्वश्रुत आहेत. एकंदरीतच ब्रिटिशांचे जुलमी शासन झुगारून देऊन भारतामध्ये साम्यवादी क्रांती व्हावी यासाठी रशिया १९४७ पर्यंत सतत प्रयत्नशील होता.

परंतु भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील मुख्य प्रवाहातील नेते म्हणजे पंडित नेहरू, सरदार पटेल, महात्मा गांधी, मौलाना आझाद इ. त्या काळी रशियाच्या सोबत भारताच्या मित्रत्वाबाबत साशंक होते असे म्हणावे लागेल. ब्रुसेल्स संमेलनासाठी १९२७ मध्ये पंडित नेहरू जेव्हा रशियाला गेले होते तेव्हा साम्यवादी विचाराने प्रभावित झाले होते. हा प्रभाव नेहरूंच्या आयुष्यावर शेवटपर्यंत राहिलेला दिसतो.

## २.२.२.१ शीतयुद्धकालीन भारत– सोव्हिएत संघ संबंध (१९४५ ते १९९१) :

भारताच्या परराष्ट्र धोरणात साम्राज्यवादाला विरोध, वसाहतवादाला विरोध ही उद्दिष्टे देखील रशियाच्या परराष्ट्र धोरणाची मिळतीजुळती आहेत. त्यामुळे रशियाने भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाचे समर्थनही केले होते. परंतु मूळ साम्यवादी विचारप्रवाह भारतामध्ये स्वातंत्र्य आंदोलनाच्या केंद्रस्थानी कधीही येऊ शकला नाही, यामुळे भारतीय नेतृत्वाबाबत प्रारंभी लेनिनच्या मनामध्ये शंका असणे साहजिक होते.अशा साशंक वातावरणाचा प्रभाव १९४५ ते १९५० या पहिल्या पाच वर्षांवर दिसतो. भारतीय नेतृत्व हे पश्चिम धार्जिणे आहे, भारतीय राज्यघटनेवर ही बहुतांशी प्रभाव हा पश्चिम मूल्यांचा आहे, याची रशियन नेतृत्वाला खात्री झालेली होती. स्वातंत्र्य मिळूनही भारताने राष्ट्रकुलाचे सदस्यत्व कायम ठेवले यावर रशियन नेतृत्वाने उघड टीका केली होती. १९४९ मध्ये चीनमध्ये साम्यवादी क्रांती यशस्वी झाल्यानंतर एका महिन्याच्या आत भारताने साम्यवादी चीनला मान्यता दिलेली होती. तेव्हाच रशियन नेतृत्वाची भारता प्रति उत्सुकता जागृत झालेली होती. परंतु १९५३ साला पर्यंत म्हणजेच स्टॅलिनच्या मृत्युपर्यंत रशियाचे भारता बाबतचे धोरण फारसे बदलले नाही.

**कोरियन युद्ध – १९५० :** सालच्या कोरियन युद्धाने खऱ्या अर्थाने भारत-रशिया संबंधांमध्ये नवीन वळण आले. १९५० मध्ये प्रारंभी चीनने कोरियावर आक्रमण केले अशी आपली भूमिका घेतली होती. जी अर्थातच रशियाला पश्चिम धार्जिणी वाटली. परंतु वस्तुस्थिती लक्षात येताच भारताने संयुक्त राष्ट्रात चीनला आक्रमक राष्ट्र धरू नये याबाबत आग्रह धरला, जो रशिया साठी आश्चर्यकारक होता.या एका उदाहरणाने भारत हा पश्चिमी देशांच्या प्रभावाखाली न येता स्वतंत्र निर्णय घेऊ शकतो,याबाबत रशियन नेतृत्वाच्या मनात खात्री निर्माण झाली. याचाच परिणाम म्हणून १९५२ मध्ये रशियातील भारताचे राजदूत डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांना भेटण्याची स्टॅलीनने परवानगी दिली. विशेष म्हणजे या आधी स्टॅलिन ने कोणत्याही भारतीय राजदूताला अशी भेटण्याची परवानगी दिलेली नव्हती.

**ख्रुश्चेव व नेहरू भेट १९५५-५६ :** १९५३ साली राष्ट्राध्यक्ष स्टॅलिनचा मृत्यू झाला व ख्रुश्चेव हे रशियाचे सत्ताधारी बनले.यादरम्यान अमेरिकेचे रशियाच्या विरोधातील मित्र राष्ट्रांची साखळी बनवण्याचे धोरण जोर धरू लागले होते. याला प्रत्युत्तर म्हणून बदललेल्या रशियन नेतृत्वाने नवस्वतंत्र आशिया व आफ्रिका

खंडातील संभाव्य मित्रांसोबत जुळवून घेण्याचे धोरण ठरवले. याचाच एक भाग म्हणून १९५५ साली भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू यांनी रशियाला भेट दिली, तर १९५६ साली बुल्गानीन व ख्रुश्चेव यांनी भारताला भेट दिली.

**काश्मीर प्रश्न व रशियाचा नकाराधिकार :** भारत-रशिया मैत्रीच्या सुवर्ण युगाला सुरुवात या दोन भेटींमधून झालेली दिसते.१९५५ मध्ये जेव्हा ख्रुश्चेव भारतात आले तेव्हा त्यांचे एक वाक्य अतिशय प्रसिद्ध झाले, ते म्हणाले 'आम्ही तुमच्या इतक्या जवळ आहोत की तुम्ही हिमालयाच्या टोकावरून आम्हास नुसती आरोळी ही दिली तरी आम्ही तुमच्या बाजूने प्रकट होऊ'.याच भेटीदरम्यान ख्रुश्चेव यांनी भारताच्या पंचशील तत्त्वांना समर्थन दिले. तसेच जेव्हा जेव्हा गरज पडेल तेव्हा रशिया भारताच्या बाजूने उभा राहील याचे आश्वासन दिले. याचा प्रत्यय भारतास १९५७ साली सुरक्षा परिषदेत जेव्हा काश्मीर प्रश्न उपस्थित झाला तेव्हा आला. यावेळी रशियाने नकाराधिकाराचा वापर करून भारताची बाजू उचलून धरली. काश्मीर प्रश्नी रशियाने यानंतरही सुरक्षा परिषदेत भारताची बाजू उचलून धरली आहे.

**गोवा प्रश्न – १९६१ :** मध्ये भारताने गोवा या प्रदेशावरील पोर्तुगीजांचे वर्चस्व संपवून चारशे पन्नास वर्षे प्रदीर्घ अशा एका वसाहतीला मुक्त करून भारतात समाविष्ट केले. या घटनेकडे जगातील प्रत्येक गटाचा बघण्याचा दृष्टिकोन वेगळा वेगळा होता. पाश्चिमात्य जगताने याचा संदर्भ ख्रिश्चन जगताच्या विरोधातली कार्यवाही असा लावला. अर्थातच यामुळे अरब जगताचे भारताला समर्थन मिळाले. आश्चर्यकारकरित्या चीननेही भारताच्या कृतीचे समर्थन केले. परंतु यात सर्वात महत्त्वाची भूमिका निभावली ती रशियाने. अमेरिकेने जागतिक मत भारताच्या विरोधात बनवलेले असताना व सुरक्षा परिषदेत भारताच्या विरोधी ठराव आणला असताना, आपल्या नकाराधिकाराचा वापर करून भारताची बाजू उचलून धरली.

यावेळी ख्रश्चेव यांनी पंडित नेहरूंना वैयक्तिक टेलिग्राम करून पश्चिम देशांच्या प्रतिक्रिया कडे दुर्लक्ष करण्याचा सल्ला दिला. तसेच वसाहतवादाच्या विरोधातली भारताची लढाई ही न्याय व कायदेशीर आहे, त्यामुळे रशिया संपूर्ण ताकदीनिशी भारताच्या बाजूने उभा आहे, याची ग्वाही दिली.

### १९६२ चे भारत चीन युद्ध व रशिया :

पंचशील कराराचा भंग करत चीन ने १९६२ साली भारतावर आक्रमण केले. भारताचा फार मोठा भूभाग नियंत्रीत केला. भारताने युद्धाला प्रतिऊत्तर दिले परंतु तुल्यबळ प्रतिस्पर्ध्यांमध्ये जसा प्रथम चाल करणारा सरस ठरतो तसा चीन युद्धात भारतावर सरस ठरत होता. भारत आदर्शवादाच्या स्वप्नवत जगात होता. यावेळी भारताने रशिया व इतर सत्तास्थानांना मदतीसाठी आवाहन केले.रशियासाठी हा प्रसंग कठीण होता. एकीकडे मित्र तर दुसरीकडे भाऊ अशी त्यांची परिस्थिती होती. रशियाने तटस्थता ठेवली व अमेरिकेने भारताच्या बाजूने भूमिका घेतली.वरवर पहाता रशियाकडून अपेक्षित मदत मिळाली नाही उलट अमेरिकेने सहाय्यता दिली, तेव्हा रशियाने मैत्री निभावली नाही असा अर्थ काहीजण काढून मोकळे झाले. परंतू हे अर्धसत्य आहे, कारण या काळात रशियाचा चीन सोबत संरक्षणात्मक करार असूनही रशियाने चीनची उघड उघड बाजू घेतली नाही. यासोबतच

जे संरक्षण तंत्रज्ञान रशियाने चीनला नाकारले ते तंत्रज्ञान हस्तांतरणाचा करार रशियाने १९६२ मध्ये भारतासोबत केला. अमेरिकेने भारताला देऊ केलेल्या मदतीचा अन्वयार्थ रशियाने त्यानंतर भारताच्या विरोधी असा लावला नाही. कारण साधारण दोन ते तीन वर्षानंतर म्हणजे १९६५ मध्ये भारत-पाकिस्तान युद्धाच्या वेळी रशियाने भारताला सर्वतोपरी मदत केली. त्यामुळे एखाद्या अवघड प्रसंगातील रशियाच्या सावध भूमिकेला सकारात्मकतेने घेणे गरजेचे आहे.

१९६५ चे भारत पाकिस्तान युद्ध व रशिया : १९६५ मध्ये पाकिस्तानने भारतावर कच्छ या भागांमध्ये आक्रमण केले. भारताने याला प्रत्युत्तर दिले व हा संघर्ष युद्धात परिवर्तित झाला. याप्रसंगी अमेरिका प्रणित लष्करी संघटनांचा पाकिस्तान सदस्य देश आहे या नात्याने अमेरिका व नाटो संघटनेचे देश यांनी भारतावर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु रशियाने मात्र भारताची बाजू उचलून धरली, एवढेच नाही तर स्वतः कोसोजीन यांच्या मध्यस्थीने ताश्कंद याठिकाणी भारत व पाकिस्तान यांच्या दरम्यान करार घडवून आणला.

बांग्लादेश मुक्ती संग्राम व भारत रशिया संबंध १९७१ : भारताने १९७१ मध्ये बांगलादेश मुक्ती संग्रामाला सशस्त्र समर्थन करून पूर्व पाकिस्तान हा बांग्लादेश म्हणून स्वतंत्र देश निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. यावेळी देखील भारत पाकिस्तान संघर्ष युद्धात रूपांतरित झाला. भारताने पूर्व पाकिस्तान तर स्वतंत्र करून घेतलाच परंतु पश्चिम आघाडीवर देखील पाकिस्तानचा बराच मोठा भूभाग व जवळपास ९० हजार सैन्य ताब्यात घेतले. यावेळी पुन्हा एकदा युद्धाचे गांभीर्य लक्षात घेऊन अमेरिकेने सातवे आरमार अरबी समुद्रात धाडून भारतावर अनुहल्ल्याचा दबाव निर्माण केला. अशा बिकट प्रसंगी रशियानेही आपल्या अन्वस्त्राने सुसज्ज अशा पाणबुड्या हिंद महासागरात उतरून हा दबाव कमी करण्याचा प्रयत्न केला.

तत्पूर्वी भारत व रशिया यांनी ऑगस्ट १९७१ मध्ये इंडो सोव्हिएट ट्रीटी ऑफ पीस, फ्रेंडशिप ॲन्ड को ऑपरेशन हा करार केला. यामध्ये भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांची विशेष भूमिका होती. या करारावरून भारताच्या असंलग्नतेच्या धोरणावर पाश्चात्त्य जगताकडून टीकेची झोड उठली. परंतु भारताने या विरोधाला जुमानले नाही. याच कराराच्या अनुषंगाने पुढे डिसेंबर १९७१ मध्ये जेव्हा अमेरिकेने भारताविरोधात आपले सातवे आरमार महासागरात उतरवले तेव्हा रशियानेही चोख प्रत्युत्तर दिले. भारत व रशिया हा करार प्रति वीस वर्षानंतर पुनरुज्जीवित करत आले आहेत. विशेष म्हणजे १९९१ साली सोव्हिएट संघाचे विभाजन झाले तरी नवनिर्मित रशियाने हा करार पुढे चालु ठेवण्यावर भर दिला. नुकतेच २०२१ मध्ये या कराराचे पुन्हा पुनरुज्जीवन करण्याचे दोन्ही देशांनी मान्य केले आहे.

रशियाचे १९७८ मध्ये अफगाणिस्तान वरील आक्रमण व भारताची प्रतिक्रिया : रशियाने १९७८ साली जेव्हा अफगाणिस्तान वर आक्रमण केले तेव्हा भारताची परिस्थिती अतिशय बिकट होती. एकीकडे रशियावर परावलंबित्व तर दुसरीकडे अलिप्ततावादाचे नेतृत्व. या अडचणीतून मार्ग काढत १९८० मध्ये आलेल्या इंदिरा गांधी शासनाने रशिया पुरस्कृत डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ अफगाणिस्तान ला समर्थन दर्शवले. सोबतच तेथील शासनास मानवतावादी दृष्टिकोनातून सर्वतोपरी मदत जाहीर केली व दिली. पुढे १९८९ चाली अमेरिकेच्या दबावा नंतर रशियाने अफगाणिस्तानमधून आपले सैन्य काढून घेतले परंतु तरीही भारताने याच कारणावरुन

आपली मदत सुरु ठेवली. मार्च २००६ साली प्रसिद्ध झालेल्या इंडियन फॉरेन जर्नल मध्ये ओरल हिस्टरी इंडियाज रेस्पोन्स टू दिस सोव्हिएट मिलिटरी इंटर्वेशन इंन अफगाणिस्तान या लेखात पूर्व भारतीय पंतप्रधान व १९७९ सालचे भारताचे रशियामधील राजदूत इंद्रकुमार गुजराल यांनी इंदिरा गांधी यांच्या राजनयीक कौशल्यामुळे रशियाच्या अफगाणिस्तानमधील हस्तक्षेपाला समर्थन देण्याच्या बदल्यात रशियाला फार मोठी किंमत मोजावी लागली अशी माहिती दिली आहे.

**शीतयुद्ध काळात भारत–रशिया गैर राजनीतिक संबंध :** तसे पाहता भारत व रशिया हे दोन देश अतिशय भिन्न संस्कृतीवर आधारलेले देश होते. रशिया हा एक पाश्चात्य संस्कृती वर आधारलेला, परंतु रशियन भाषा मानणारा एक देश होता. रशिया ने जो साम्यवाद स्वीकारला तोही भारतीयांनी नाकारून लोकशाही–समाजवाद स्वीकारला. मार्क्सवाद रक्तरंजित क्रांतीचे समर्थन करतो, तर भारतीय स्वातंत्र्य लढा गांधीजींच्या सत्य–अहिंसेवर आधारित होता. इंग्रजांचा भारतावर प्रभाव होता, तसेच अमेरिकन राज्यघटने मधून घटनाकारांनी अनेक तत्त्व स्वीकारले होती. असे असतानाही शीत युद्धकाळातील काही राजकीय समीकरणांनी भारत–रशिया या दोन देशांना जवळ आणले. आपल्यातील सर्व प्रकारच्या भिन्नता मान्य करून दोन्ही देशांच्या नेतृत्वांनी एकमेकांना जाणून घेण्यासाठी तसेच दोन्ही देशांच्या लोकांनी एकमेकांना जाणून घ्यावे यासाठी जाणीवपूर्वक काही धोरणे राबवली. जनमत तयार करण्यासाठी सर्व माध्यमांचा वापर केला गेला. खान–पान, मनोरंजन, साहित्य या सर्वांची देवाण–घेवाण करण्यासाठी विशेष योजना राबवल्या. चित्रपटांनी यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. याला सातत्य व स्थैर्य देण्यासाठी दोन्ही देशातील युवकांनी एकमेकांच्या देशात उच्च शिक्षण घ्यावे यासाठी विशेष योजना राबवल्या. विशेषतः रशियाने भारतीय युवकांना आकर्षित करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक तरतुदी केल्या होत्या. रशियाने भारताला शस्त्रास्त्र पुरवण्या शिवाय भारतात संरचनात्मक राज्याच्या निर्मितीसाठी म्हणजेच रस्ते, उद्योग, धरणे, विद्युत निर्मितीची केंद्रे इत्यादीसाठी भरीव स्वरूपात मदत केलेली होती. शीत युद्ध काळामध्ये भारत–रशिया मैत्रीमध्ये रशिया एक महासत्ता म्हणून अर्थातच देणाऱ्याच्या भूमिकेत होता. राजकीय समर्थना बरोबरच रशियाने भारतास सामरिक, आर्थिक व तंत्रज्ञानाची सर्वतोपरी मदत केलेली होती. याच्या बदल्यात रशियाला भारताच्या रूपाने आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये एक सच्चा मित्र मिळाला होता. भारताकडे तिसऱ्या जगाचे नेतृत्व होते, आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताच्या मताला एक मानाचे स्थान होते. त्यामुळे भारतासारखा देश आपल्या बाजूने असणे यासाठी रशियाने हवी ती किंमत मोजली होती.

### २.२.२.२ शीतयुद्धोत्तर भारत – रशिया संबंध :

१९८५ साली मिखाईल गोर्बाचोव्ह हे सत्तेत आल्यानंतर रशियाच्या धोरणांमध्ये अमुलाग्र बदल झाला. जवळपास चार दशके साम्यवादी जगताचे ओझे वाहून रशियाचे आर्थिक कंबरडे मोडले होते. अनेक लहान मोठ्या राज्यांना मिळून एक संघ रशिया म्हणजेच यु एस एस आर बनला होता. त्यातील लहान लहान घटकांनी केंद्रीय सत्तेच्या विरोधात उठाव करण्यास सुरुवात केली होती. जागतिक राजकारणात भांडवली गट व अलिप्ततावादी राष्ट्रांचा गट यांच्याकडून सोवियेत संघावर शांततामय धोरणाचा दबाव वाढत होता. या सर्वांची

परिणीती म्हणून मिखाईल गोर्बाचोव्ह यांनी 'ग्लासनोस्त व पेरेस्त्रोईका' हे धोरण अवलंबले. याचा परिणाम म्हणून सोवियत संघ १५ स्वतंत्र देशांमध्ये विभागला गेला व केंद्रीय सत्ता सर्वात मोठा भूभाग म्हणजे रशियाच्या हाती राहिली. रशियाचे विभाजन हे काही समस्यांचे समाधान असले तरी रशियाच्या विभाजनातून काही अंतर्गत समस्या निर्माण झालेल्या होत्या. त्या सोडवण्यात रशियाचे नेतृत्व गुंतले.साम्यवादाचा पाडाव झाला व जागतिक समीकरणे बदलली.परिणामी रशियाचे मित्रराष्ट्र हे आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये पर्यायी परराष्ट्र धोरण अवलंबण्यास बाध्य झाले. त्यापैकी भारत हे एक राष्ट्र होते. अर्थातच भारत व रशिया या दोन्ही देशांना या बदललेल्या समीकरणानुसार आपापल्या धोरणांमध्ये निश्चितच काही परिवर्तन करावे लागले.

शीतयुद्धोत्तरभारत-रशिया संबंध हे प्रामुख्याने दोन टप्प्यात अभ्यासावे लागतील यातील पहिला टप्पा म्हणजे १९९१ ते २००० हा कालावधी तर दुसरा टप्पा म्हणजे २००१ ते २०२१.

**१९९१ ते २००० या कालावधीतील भारत-रशिया संबंध :**

सोवियेत संघाच्या विघटनानंतर दोन्ही देशांनी आपल्यामधील राजनयिक संबंध पूर्वीप्रमाणेच मैत्रीचे व दृढ करण्याचे काही प्रयत्न केले. १९७१ सली भारत-रशिया यांनी केलेला ऐतिहासिक करार हा ऑगस्ट १९९१ मध्ये संपुष्टात येणार होता. याचे पुनरुज्जीवन लांबणीवर पडलेले होते, पुढे प्रेसिडेंट बोरीस एलत्सीन यांच्या भारत दौऱ्यामध्ये १९९३ सालीदोन्ही देशांनी 'ट्रीटी ऑफ फ्रेंडशिप अंड कोऑपरेशन' हा करार केला. तर १९९४ मध्ये 'मिलिटरी - टेक्निकल कोऑपरेशन एग्रीमेंट' केले. आर्थिक दृष्ट्या मोडकळीला आलेल्या रशियाला भारताला शस्त्रास्त्र विकून त्यातून आपले अर्थकारण सुधारणे हे आवश्यक बनले होते व भारताला आशिया खंडातील शस्त्रास्त्र स्पर्धेमध्ये वरचढ राहण्यासाठी रशियाच्या शस्त्रास्त्रांची गरज होती. दोन्ही देशांनी आपापले ध्येय या काळामध्ये साध्य केल्याचे दिसते. परंतु चाळीस वर्षाच्या इतिहासात पहिल्यांदाच भारत-रशिया प्रमाणेच इतर राष्ट्रांनाही शस्त्रास्त्रांसाठी विचारणा करत होता. रशिया ही आपली शस्त्रास्त्रे भारता व्यतिरिक्त चीन व इतर आशियाई देशांना विकण्यास प्राधान्य देत होता. भारत या काळामध्ये रशियासोबत शस्त्रास्त्रांच्या खरेदी पेक्षा तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणावर अधिक भर देत होता. याच काळातील झालेल्या करारांचे फलित म्हणजे दोन देशांनी मिळून तयार केलेली ब्राम्होस हे क्षेपणास्त्र होय.

पुढील चार-पाच वर्षांमध्ये रशियाशी भारताचे असलेले गैरराजनितीक संबंध विशेषतः आर्थिक संबंध हे सात आठ दशकातील सर्वात निम्न स्तरावर जाऊन पोहोचले होते. व्यापार, शिक्षण, सांस्कृतिक देवाण-घेवाण या सर्व आघाड्यांवर भारत-रशिया संबंधांमध्ये कमालीची शिथिलता आलेली होती. याउलट भारत याच काळामध्ये फ्रान्स, ब्रिटन,जर्मनी, इत्यादी पाश्चात्य राष्ट्रां सोबत शस्त्रास्त्र खरेदीसाठी करार करू लागला होता.भारत इस्राईलसोबत संबंध सुधारण्याबरोबरच लूक ईस्ट पॉलीसीवरही काम करू लागलेला होता.

आंतरराष्ट्रीय राजकारणातील घडामोडी बाबतही दोन्ही देशांमध्ये प्रतिक्रियांचा ताळमेळ दिसत नव्हता. या काळातील काही प्रमुख घडामोडी व त्यावरील भारत व रशियाच्या प्रतिक्रिया पुढीलप्रमाणे होत्या.

**अफ़गाणिस्तान व ईराक मधील संघर्ष व रशिया :** १९९२ साली रशियाने अफगाणिस्तानमधून आपले

सैन्य काढून घेतले. यामुळे तेथे दहशतवादी गटांना आपली सत्ता प्रस्थापित करण्यास मोकळीक मिळाली. भारताच्या दृष्टीने रशियाचे हे पाऊल राष्ट्रहिताविरुद्ध होते. यानंतर जॉर्ज बुश सीनियर यांच्या काळात अमेरिकेने आपला मोर्चा तेलाचा प्रचंड साठा असलेल्या आखाती देशांकडे वळवला. रासायनिक शस्त्रास्त्र असल्याच्या कथित संशयावरून अमेरिकेने इराकचा पाडाव केला त्याबरोबरच आखाती देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर आपले सैन्य तैनात केले. यामुळे निश्चितच आशिया खंडाचे सत्ता संतुलन बदलले. अशावेळी रशियाने अमेरिकेचा सक्रीय विरोध करावा अशी धारणा आशिया खंडातील लहान मोठ्या सत्तांची होती. त्यात भारतही होता परंतु दुर्दैवाने रशियाने केवळ शाब्दिक विरोध दर्शवण्या पलीकडे या घटनेवर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. हे ही भारताच्या हिताच्या विरोधात होते. पॅलेस्टाईन हा भारताचा पारंपारिक मित्र होता तर एक ख्रिश्चन राष्ट्र म्हणून अमेरिका इस्राईलच्या मागे उभा होता. यांच्यातील संघर्षाने ही १९९०च्या दशकात अनेक वेळा मध्य आशियातील राजकारण तापवले, परंतु तेव्हाही रशिया फारसा सक्रिय दिसला नाही.

रशियाचे विघटन नंतर पहिल्या दशकात रशिया आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या बाबतीत प्रतिक्रिया देण्यासंदर्भात अधिक सतर्क दिसला. ज्यामुळे रशियाचे मित्रत्व असलेल्या भारतासारख्या अनेक देशांना पर्यायी परराष्ट्र धोरणाची चाचपणी करणे गरजेचे बनले.

**आशिया खंडातील शस्त्रास्त्र स्पर्धा :** १९९०च्या दशकात आशिया खंडातील शस्त्रास्त्र स्पर्धा ही शिगेला पोहोचलेली होती चीन व पाकिस्तान कडून मोठ्या प्रमाणावर अण्वस्त्र निर्मितीची शंका व्यक्त केली जात होती अशा प्रसंगी भारताला नियमित शस्त्रास्त्र पुरवठा करणारा देश म्हणजे रशिया यांच्याकडून भरीव मदतीची अपेक्षा होती. १९९८ साली भारताने पोखरण येथे दुसऱ्यांदा अणुचाचणी केली तेव्हा मात्र रशियाने संयुक्त राष्ट्रसंघाच्या पटलावर भारताची बाजू उचलून धरली. पाठोपाठच पाकिस्ताननेही अणुचाचणी केल्यामुळे पाकिस्तान पूर्वीपासूनच या तयारीत होता हे सिद्ध झाले व भारताच्या अणुचाचणी वरील अण्वस्त्रधारी देशांचे आक्षेप मोडीत निघाले.

**२०००ते २०२१ या कालावधीतील भारत-रशिया संबंध :**

रशिया १९९१ ते २००० या काळात आपली आर्थिक घडी व्यवस्थित करण्यासाठी युरोपियन देशासोबत व अमेरिकेसोबत संबंध चांगले करण्यावर भर देत होता, परंतु रशियाला पाश्चात्य देशांकडून फारशी सन्मानाची वागणूक मिळाली नाही. तसेच भारतालाही १९९८ च्या अणु परीक्षणानंतर निर्बंधांना सामोरे जावे लागले. या दोन कारणांनी पुन्हा एकदा भारत-रशिया संबंध मूळपदावर येण्यास चालना मिळाली. अमेरिकेच्या दबावाखाली पाश्चात्य राष्ट्रांनी भारतावर लादलेले निर्बंध हे अन्यायकारक आहेत अशी भूमिका रशियाने मांडली व भारत-रशिया मैत्रीच्या संबंधांचे दुसरे पर्व सन २००० साली तत्कालीन भारतीय पंतप्रधान श्री अटल बिहारी वाजपेयी व रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतीन यांच्यातील 'डिक्लेरेशन ऑफ स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप' या कराराने सुरू झाले.राष्ट्राध्यक्ष पुतीन यांचे १९९९ साली सत्तेत येणे आणि दीर्घ काळ पंतप्रधान व राष्ट्राध्यक्ष या पदांवर कायम राहणे हे भारत-रशिया संबंधाच्या दृष्टिकोनातून सकारात्मक ठरले आहे असेच म्हणावे लागेल. व्लादिमिर पुतीन हे अतिशय महत्त्वाकांक्षी नेते आहेत. रशियाला पूर्वीप्रमाणे सोवियत संघासारखे स्थान जागतिक राजकारणात मिळवून देणे हे त्यांचे ध्येय आहे.

**भारत–चीन–रशिया यांच्या मैत्रीचा त्रिकोण :** अमेरिकेच्या एकाधिकारशाहीला शह देऊन जगामध्ये बहुध्रुवीय व्यवस्था कायम करण्याकडे त्यांचा कल असतो. यामुळे पुतिन यांच्या प्रयत्नातून रशिया – भारत – चीन यांच्या मैत्रीचा त्रिकोण साकारला गेला. चीनच्या विस्तारीकरणाच्या धोरणामुळे या संकल्पनेला फारसे यश मिळाले नसले तरीही पुन्हा एकदा जागतिक राजकारणात सक्रिय होण्याची रशियाची मानसिकता यातून स्पष्ट झाली. या त्रिकोणामुळे आशिया खंडातील राजकारणाबरोबरच जागतिक राजकारणामध्ये ही अनेक राष्ट्रांना धोरणात्मक बदल करावे लागले. यापैकी अमेरिका हा सर्वात महत्त्वाचा देश होता. याबरोबरच या मैत्रीच्या त्रिकोणा मुळे भारत–चीन यांच्यातील अनेक प्रलंबित वादांचे रूपांतर मोठ्या संघर्षात झाले नाही. गेल्या काही वर्षांमध्ये चीनच्या विस्तारवादी धोरणामुळे जरी भारत–चीन सीमेवर लहान मोठ्या संघर्षाच्या नोंदी घेतल्या गेल्या, तरीही या संघर्षाचे रूपांतर मोठ्या युद्धामध्ये झाले नाही. अशा संघर्षाच्या काळामध्ये देखील या मैत्रीच्या त्रिकोणाच्या वार्षिक व द्विवार्षिक भेटीगाठी चालूच राहिल्या. त्यामुळे अंतर्गत प्रश्न सोडवण्यासाठी दोन देशांना एक व्यासपीठ रशियाने उपलब्ध करून दिले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**अमेरिकेचा अफगाणिस्तानमधील हस्तक्षेप :** २००१ मध्ये झालेल्या वर्ल्ड ट्रेड सेंटर वरील हल्याने अमेरिकेला पुन्हा एकदा आशिया खंडात आपली ताकत आजमवण्याची संधी मिळाली. वर्ल्ड ट्रेड सेंटर वरील अतिरेकी हल्ला हा दहशतवादाने लोकशाहीवर हल्ला केला आहे अशी सैद्धांतिक चौकट देऊन अमेरिकेने आता साम्यवादाऐवजी दहशतवाद हा लोकशाहीचा नवा शत्रू आहे असे घोषित केले. याच सिद्धांताचा आधार घेऊन अमेरिका अफगाणिस्तानमध्ये उतरली व तेथील बिन लादेन पुरस्कृत अल कायदा या दहशतवादी संघटनेचा व तालिबानी शासनाचा बिमोड करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर संघर्षास सुरुवात केली. आता मात्र १९९३ सारखी परिस्थिती नव्हती. चीन आशिया खंडातील एक महत्त्वाची सत्ता म्हणून उदयाला आलेला होता, विघटनानंतर दहा वर्षात रशियनेही आपली काही ताकत पुन्हा मिळवली होती व भारत अण्वस्त्र सज्ज बनला होता. तेव्हा या तीन देशांनी एकत्र येऊन अमेरिकेला मनमानी करण्यापासून रोखण्या ची तयारी दाखवली व पुन्हा भारत व रशिया आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये एकत्र भूमिका निभावू लागले. शीतयुद्धा नंतर मात्र परिस्थिती बदलत होती. आता भारताचा सन्मान पूर्वीपेक्षा अधिक होता. अर्थात हे रशियाच्या मदतीशिवाय शक्य नसले तरी आता तो सोवियत संघ नव्हता. त्यामुळे चीन व रशिया दोघांनाही भारताची एक संतुलन म्हणून आवश्यकता होती.

**भारत–अमेरिका जवळीक व रशियाची प्रतिक्रिया :** साधारणपणे २००२ नंतर भारत–अमेरिका संबंधांमध्ये मैत्रीचे नवे पर्व सुरू झाले होते. २००५–०६ मध्ये मनमोहन सिंग सरकारच्या व जॉर्ज बुश ज्यूनियर यांच्या प्रयत्नाने भारत–अमेरिका अणुकरारचा पाया रचला गेला. यावर रशियाची प्रतिक्रिया कशा पद्धतीची येईल याबाबत शंका व्यक्त होत होती, परंतु रशियाने भारत अमेरिका अणुकराराला अतिशय सकारात्मक रित्या घेऊन या करारातून भारताची ऊर्जेची गरज भविष्यात भागवली जाईल याबाबत आनंद व्यक्त केला. तसेच यापुढे भारत अशाच पद्धती चे करार करतील याबाबत विश्वास व्यक्त केला. यातून पुतिन यांच्या भारता बाबतच्या सकारात्मक धोरणांची जाणीव होते. न्यूक्लियर सप्लायर ग्रुप मध्ये भारताला स्थान मिळवणे, याव्यतिरिक्त जगातील सर्व प्रमुख संघटनांमध्ये भारताचे स्थान निर्माण करणे हा अमेरिकेने यापुढे एक अजेंडा बनवलेला होता.

या अजेंडयाला रशियाने कोठेही विरोध दर्शवला नाही, उलट त्याचे समर्थनच केले.यामुळेही भारत-रशिया यांच्यातील विश्वास व सहकार्याची भावना आजही कायम आहे अशा प्रकारची भावना दोन्ही देशांच्या जनतेमध्ये निर्माण झालेली होती.

**ब्रिक्स :** अमेरिकेची जगावरील एकाधिकारशाही संपवून बहुध्रुवीय जागतिक व्यवस्था निर्माण करण्यासाठी रशिया व चीन अनेक प्रयत्न करत होते. त्यातील एक प्रयत्न म्हणजे २००९ मध्ये झालेली ब्रिक्स ची स्थापना. यात ब्राझील, रशिया, भारत, चीन व दक्षिण आफ्रिका या चार देशांचा समावेश होतो. पूर्वी हाच गट ब्रिक या नावे २००६ पासून ओळखला जात होता, यात २००९ मध्ये दक्षिण आफ्रिकेच्या समावेशाने याला ब्रिक्स असे नाव पडले हे पाच ही देश जगातील सर्वात मोठे विकसनशील देश म्हणून ओळखले जातात यांच्या संघटनांमध्ये व ब्रिक्स संघटनेच्या बैठकीच्या सातत्यमध्ये रशियाची भूमिका ही अतिशय महत्त्वाची आहे. या विकसनशील राष्ट्रांमध्ये आपल्या बाजूने भारताचा समावेश होणे अनिवार्य आहे हे ओळखून पुतिन यांनी २००९ मध्ये तत्कालीन भारताचे पंतप्रधान मनमोहन सिंग यांना या संघटनेसाठी आमंत्रण दिले. नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान पद स्वीकारल्यानंतर या ब्रिक्स संघटनेला त्यांच्या कामकाजाला गती मिळाल्याचे दिसते. या पाच देशांनी मिळून न्यू डेव्हलपमेंट बँक ज्याला आपण ब्रिक्स डेव्हलपमेंट बँक म्हणूनही ओळखतो याची स्थापना २०१४ सली केली. विकसनशील राष्ट्रांची अशी बँक असावी असे मत २०१२ साली तत्कालीन भारतीय पंतप्रधान मनमोहन सिंग यांनीच व्यक्त केले होते. पुढे पंतप्रधान मोदी यांनी हे स्वप्न सत्तेत आल्यानंतर पहिल्याच वर्षी साकारले. सध्या भारत ब्रिक्स बँकेच्या अध्यक्षस्थानी आहे तर ब्रिक्स संघटनेचा २०२१ सालचा निमंत्रित ही भारत आहे. एकूणच ब्रिक्स च्या माध्यमातून भारत-रशिया संबंधांनी इतर देशांना समवेत घेऊन विकसनशील राष्ट्रांचे राजकारण केलेले दिसते.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी चा काळ व भारत रशिया संबंध –** २०१४ साली सत्तेत आलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत-रशिया संबंधांना अतिशय व्यवहारिक असा आयाम देण्याचा प्रयत्न केला. एकाच वेळेला अमेरिकेसोबत ची जवळीक व रशिया सोबतच्या जुन्या संबंधांचे पुनर्जीवन या दोन आघाड्यावर मोदींचे प्रशासन काम करत होते. पुन्हा एकदा रशिया सोबतच्या गैर राजनीतिक संबंधांची पुनर्स्थापना करण्यासाठी भारत व रशिया यांच्यात सांस्कृतिक देवाणघेवाण वाढावी, शिक्षण उद्योग यामध्ये सहकार्य निर्माण व्हावे. भारताच्या पायाभूत सुविधांमध्ये रशियाची गुंतवणूक वाढावी यासाठी मोदी प्रशासन काम करत होते. राष्ट्राध्यक्ष पुतीन यांच्याकडूनही याबाबत अतिशय सकारात्मक पावले उचलली जात होती. भारतानेही रशिया भारता व्यतिरिक्त इतर देशांना विशेषतः पाकिस्तान, उत्तर कोरिया अशा भारत विरोधी देशांना शस्त्रास्त्र विक्री करतो आहे याबाबत फारसा आक्षेप घेतला नाही. याचा परिणाम म्हणून रशियाने आपली अत्याधुनिक अशी संरक्षण प्रणाली (एस ४००) भारताला देण्याचा करार केला. नुकतीच राष्ट्राध्यक्ष पुतीन यांच्या भारत भेटीमध्ये या कराराला अंतिम मान्यता देण्यात आली. २०१४ नंतर तब्बल वीस वर्षानंतर पुन्हा एकदा भारताच्या संरक्षण साहित्य मधील सत्तर टक्के आयात रशियाकडून होण्यास सुरुवात झाली. याबरोबरच याच काळात रशियाच्या तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणाच्या धोरणातून निर्माण झालेल्या अनेक शस्त्रास्त्रांची विक्री भारत इतर देशांना करू लागला. ब्रह्मोस क्षेपणास्त्र हे याचेच एक उदाहरण आहे.

### २.२.३ भारत चीन संबंध :

भारताच्या उत्तरेला जवळपास ३५०० कि. मी. ची सामाईक सीमा असणारा भारतापेक्षा विस्तिर्ण भुभाग असलेला देश, प्राचीन काळापासुन भारतासोबत अतिशय शांततापुर्ण संबंध असलेला देश, भारतासोबत कला, संस्कृती, व्यापार ई. क्षेत्रात सहकार्याचे व सलोख्याचे संबंध असलेला देश म्हणुन चीनची ओळख आहे. भारताला आपल्या इतिहासाचे दाखले देण्यासाठी प्राचिन चीनी प्रवासी वर्णनाचा आधार घ्यावा लागतो.हजारो वर्षापासून चीनमध्ये राजेशाही नांदत होती. या विस्तीर्ण भूभागावर अनेक राजांनी शतकानुशतके आपले साम्राज्य वाढवले व चालवले. या काळात चीनने सांस्कृतिक, शैक्षणिक, वैज्ञानिक व औद्योगिक प्रगतीचा चढता आलेख पाहिला. परंतु प्रत्येक राजकीय व्यवस्थेला उतरती कळा असते, त्याप्रमाणे चीनमध्येही राजेशाहीला १८ व्या शतकापासून उतरती कळा सुरू झाली. अंतर्गत बंडाळी शिवाय रशिया व जपान या दोन देशांसोबत चीनला वारंवार युद्ध करावी लागत होती. यातच चीनमध्ये पाश्चात्त्यांचे आगमन झाले. यापुढचे एक शतक ही चीनमध्ये विविध युद्ध, बंड, उठाव यांचे होते. यात प्रामुख्याने ब्रिटिश चीन यांच्यातील १८३९ ते १८६० च्या दरम्यानचे अफूचे युद्ध, मांचु राजवटीविरुद्ध १८४८ ते १८६५ चे लोकांचे तायपिंग बंड, १८९८ ते १९०० या दरम्यानचे बॉक्सर बंड अशी अनेक उदाहरणे देता येतील. परंतु सरतेशेवटी चीनच्या हजारो वर्षाच्या राजवटींना शेवटचा धक्का दिला तो १९११ साली सन्-यत्-सेन यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या लोकशाही क्रांतीने.

गणतांत्रिक चीनचे सन्-यत्-सेन हे पहिले राष्ट्राध्यक्ष बनले. १९२५ मध्ये त्यांच्या मृत्यूच्या नंतर चीनचे नेतृत्व चँग-काई-शेक यांच्याकडे आले. याच दरम्यान रशियाच्या साम्यवादी विचारसरणीच्या प्रभावाने चीनमध्येही मोठ्या प्रमाणावर साम्यवादी चळवळ विकसित होत होती. पुढे या चळवळीचे नेतृत्व माओत्से तुंग यांनी केले व त्यांच्याच नेतृत्वाखाली १९४९ मध्ये साम्यवादी विचारधारेवर आधारित चिनी गणराज्याची स्थापना झाली. वर्तमान चीनचे शासन हे याच विचारधारेचे शासन आहे. यानंतर चीनमध्ये कोणतीही क्रांती झाली नाही केवळ घटनात्मक परिवर्तने झाली.१५ सप्टेंबर १९५४ रोजी चिनी जनतेच्या सार्वभौम प्रजासत्ताक राज्याच्या संविधानास मान्यता देण्यात आली. १९५४ ते १९७४ या वीस वर्षांत चीनचे प्रशासन या संविधानानुसार चालत होते. १९७४ मध्ये राष्ट्रीय जनता काँग्रेसने नवीन संविधान स्वीकारून त्यास मान्यता दिली. १९५४ चे संविधान व नवे संविधान यांत महत्त्वाचा फरक आहे. जुन्या संविधानात रशियाशी असलेल्या अतूट मैत्रीचा निर्वाळा आहे. मात्र नव्या संविधानात रशियाचा खास उल्लेख नाही. फक्त सर्व समाजवादी राष्ट्रांशी मैत्रीचे संबंध वाढवू, असा मोघम उल्लेख आहे. आंतरराष्ट्रीय क्रांतीच्या अंतिम विजयाचा साम्यवादी आशावादही नव्या संविधानात नमूद केलेला नाही.

हजारो वर्षापासून अतिशय मधूर व शांततेचे संबंध ज्या देशासोबत असतील त्या देशासोबत २०व्या शतकाच्या उत्तरार्धात याच्या विपरीत परिस्थीती निर्माण झाली. २०व्या शतकाच्या शेवटी तर भारताचे संरक्षणमंत्री चीन हा भारताचा सर्वात मोठा शत्रू आहे या निश्कर्षावर येतात. २१ व्या शतकातील भारताचे सर्वात चिंताजनक संबंध चीन सोबतच आहेत. गेल्या दशकभरातर डोकलाम, गलवान, सिक्कीम, अरूणाचल प्रदेश अशा अनेक भागात दोन्ही देशाचे सैन्य आपापसात मर्यादीत युध्द करत आहेत.

चीनसोबतचे हे संबंध आपणास पुढील मुद्द्यांच्या आधारे पहाता येतील -

- १९६२ च्या युद्धापुर्वीचे संबंध
- १९६२ ते २००० सालापर्यंतचे संबंध
- २१ व्या शतकातील संबंध

## २.२.३.१ १९६२ च्या युद्धापुर्वीचे संबंध :

**कोमिन्तंग पक्षाचे शासन व भारत (१९१२ ते १९४९) :** भारत व चीन यांच्यातील स्वातंत्र्य पूर्व काळातील विशेषतः विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात संबंध हे सलोख्याचे होते. सन्-यत्-सेन यांचा भारतातील गांधीजींच्या असहकार चळवळीला पाठिंबा होता. तर भारतीय राष्ट्रीय सभेने नेहमीच चीनच्या साम्राज्यवाद विरोधी भूमिकेचे समर्थन केले होते.विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातही रवींद्रनाथ टागोर, पंडित जवाहरलाल नेहरू, राधाकृष्णन यांनी चीनचे दौरे केले आहेत. तर १९४२ मध्ये चँग काई शेक व त्यांच्या पत्नी यांनी भारताला भेट दिलेली आहे. १९४७ साली भारताने नॅशनॅलिस्ट चीन सोबत आपले राजनैतिक संबंध प्रस्थापित केले.

**साम्यवादी चीनला मान्यता १९४९ :** १९४९ साली भारताने साम्यवादी चीनला मान्यता दिली. चँग काई शेक व माओ त्से तुंग या दोन नेतृत्वात झालेल्या ग्रह युद्धानंतर माओ त्से तुंग यांच्या नेतृत्वामध्ये साम्यवादी चीन ची निर्मिती १९४९ सली झाली. ही एक सशस्त्र साम्यवादी क्रांती होती ज्याला रशियाचे समर्थन होते त्यामुळे साहजिकच अमेरिका प्रणित पाश्चात्य जगाने याला विरोध केलेला होता. अशा परिस्थितीत युनोमध्ये प्रतिनिधित्व कोणत्या चीनला द्यायचे यावरून वादंग सुरू होते. अशा परिस्थितीत भारताने माओ-त्से-तुंग च्या नेतृत्वाखाली निर्माण झालेल्या साम्यवादी चीनला युनोमध्ये मान्यता द्यावी यासाठी समर्थन केले. असे करणारा भारत हा नवस्वतंत्र आफ्रिका- आशिया खंडातील देशांपैकी पहिला देश होता.भविष्यातील परिस्थितीचा अंदाज घेऊन भारताने नव्याने निर्माण झालेल्या शेजाऱ्याला मान्यता देऊन मैत्रीचा हात पुढे करण्याचे हे संकेत होते.

**१९६२ पर्यंतचा मिश्र संबंधाचा काळ :** १९६२ मध्ये चीन भारत युध्द झाले. तत्पूर्वी भारत-चीन यांच्यातील संबंध हे संमिश्र स्वरूपाचे होते.परंतु भारत - चीन यांच्यामध्ये सीमेवरून विसंवाद वारंवार समोर येत होता. एशियन रिलेशन्स कॉन्फरन्स१९४७ यामध्ये व त्यानंतर दिल्ली कॉन्फरन्स ऑन इंडोनेशिया १९४९ या दोन्ही परिसंवादामध्ये जे चीनचे राजनीतिज्ञ भारतामध्ये आले त्यांनी तिबेटच्या नकाशातील स्थानाच्या मुद्द्यावरून तीव्र आक्षेप नोंदवले.या नकाशांमध्ये तिबेटचा भाग स्वतंत्रपणे दर्शवला गेला होता.वसाहतवाद विरोधी भारताने स्वतंत्र झालेल्या तिबेट सारख्या वसाहतींवर कधीही आपला अधिकार गाजवला नाही. उलट या वसाहती स्वतंत्र आहेत हे नकाशा द्वारे दाखवण्याचा प्रयत्न केला. परंतु विस्तारवादी चीनला हे मान्य झाले नाही. सशस्त्र क्रांतीने निर्माण झालेल्या साम्यवादी चिनने तिबेटच्या प्रदेशावरही दमन शक्तीचा वापर करून नियंत्रण मिळवले व तिबेटच्या शासनासोबत करार करून तिबेटची संस्कृती कायम राखत यापुढे तिबेटियन शासन हे चीनच्या साम्यवादी शासनाच्या नियंत्रणात राहून काम करेल असे त्यांच्याकडून मान्य करून घेतले.

तिबेट याप्रसंगी भारताकडे अपेक्षेने पाहत होता. पंडित नेहरूंच्या दृष्टिकोनातून भारताची तिबेट बाबत सहानुभूती नक्कीच होती, परंतु भारत तिबेटच्या सहानुभूती खातर चीन सोबत शत्रुत्व स्विकारण्यास तयार नव्हता. याउलट तिबेटीयन शासनानेही फारसा सशस्त्र प्रतिकार न करता चीन सोबत करार करून मिळेल तेवढी स्वायत्तता पदरात पाडून घ्यावी यातच त्यांचे भले आहे असे नेहरूंचे मत होते. अशा पद्धतीचा १७ मुद्यावर आधारित करार १९५१ मध्ये चीन व तिबेट शासन यांच्यामध्ये झाला.या करारानंतर चीन तिबेटला आपल्या देशाचा अविभाज्य भाग मानत होता.

एप्रिल १९५४ मध्ये तिबेट वरून भारत व चीन यांच्यामध्ये एक करार झाला ज्या द्वारे या प्रदेशातून भारताचे सैन्य माघारी घेऊन या प्रदेशावर पूर्णपणे चीन चे नियंत्रण प्रस्थापित झाले. परंतु या करारामध्ये तिबेट व भारत यांच्यातील सीमारेषेच्या बाबतीत एकमत होऊ शकले नाही. चीनच्या तिबेटवरील नियंत्रणानंतर आता हा वाद तिबेट – भारत न राहता चीन–भारत असा बनला. या सीमावादाच्या सावटाखाली पुढे १९५४ मध्ये भारत चीन यांच्यामध्ये पंचशील करार झाला.याच वेळी भारत – चीनी भाई–भाई हा प्रसिद्ध नारा दोन्ही देशांच्या नेत्यांनी दिलेला होता.

**पंचशील करार १९५४ :**

भारत व चीन या देशांत तिबेटसंबंधी एप्रिल १९५४ मध्ये जो करार झाला, त्याच्या प्रास्ताविकात नमूद केलेली पाच तत्त्वे पंचशील म्हणून प्रसिद्ध पावली. ती तत्त्वे अशी :

= परस्पर देशांच्या प्रादेशिक अखंडतेला व राजकीय सार्वभौमत्वाला मान्यता देणे,

= कोणीही कोणावर आक्रमण न करणे,

= एकमेकांच्या अंतर्गत बाबतींत हस्तक्षेप न करणे,

= एकमेकांविषयी समभाव बाळगणे व परस्परांच्या हिताची जपणूक करणे आणि

= शांततामय सहअस्तित्व.

पंचशील तत्वांचा पुढे १९५५ साली झालेल्या बांडूंग परिषदेमध्ये अनेक राष्ट्रांनी पुरस्कार केला. यात आशिया व अफ्रिका खंडातील नवस्वतंत्र राष्ट्रांचा समावेश होता.

**भारत चीन सीमावाद :** भारत व चीन यांच्यातील संबंध बिघडन्यासाठी मुख्यत: सीमाप्रश्न कारणीभूत आहे. दोन देशांमध्ये जवळपास ३५०० कि. मी. ची सामाईक सीमा आहे आणि चीन व भारत दोन्ही देश हेंरी मॅकमोहन यांनी निश्चीत केलेल्या सीमारेषेबाबत समाधानी नाहीत.

सीमाप्रश्न व भारत –चीन संघर्ष यांच्या दृष्टीने सीमाप्रदेशाचे पुढीलप्रमाणे तीन विभाग केले जातात : (१) पश्चिम विभाग ही सीमारेषाजवळपास१६०० किमी. आहे. यातच अक्साई चीन हा लडाखाचा पूर्वेकडील प्रदेश मोडतो. (२) मध्य विभाग : या सीमेची लांबी जवळपास६५० किमी. आहे. पंजाब, हिमालय व उत्तर प्रदेश तसेच तिबेट यांच्यातील सीमा व सीमाप्रदेश यात अंतर्भूत होतात. (३) पूर्व विभाग : यात संपूर्ण ईशान्य भारतीय प्रदेशाचा समावेश होतो.याभागात अरूणालच प्रदेशचा समावेश होतो.

ही सीमारेषा तयार होताना दोन्ही देश स्वतंत्र नव्हते, तसेच दुर्गम, पहाडी व बर्फाळ भागामुळे विरळ मनुष्यवस्ती असल्या कारणाने सीमारेषा कोणती आहे याबाबत निश्चीतता नाही. यामुळे कायम दोन्ही बाजू एकमेकांवर आपल्या हद्दीत घुसकोरी केल्याचा आरोप करतात.

दोन्ही देश  अफाट लोकसंख्येचे व विस्तीर्ण भूप्रदेशाचे देश आहेत. दोन्ही देश साधारण एकाच  काळात स्वतंत्र झालेले असल्यामुळे दोन्ही देशाचा सुरुवातीचा काही काळ अंतर्गत व्यवस्था निर्माण करणे, ती मजबूत करणे, लोकांच्या प्राथमिक गरजांची पूर्तता करणे यामध्ये गेला. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर साधारण दशकभर तरी दोन्ही देश अशा घुसखोरीच्या बाबतीत आक्षेप नोंदवण्यात पलीकडे काहीही करताना दिसले नाहीत. तरीही पंडित नेहरू सारख्या दृष्ट्या नेत्याला येणाऱ्या काळात हा सीमा वाद शांततेच्या मार्गाने सोडवणे भारतासाठी हीतावह आहे हे समजणे अवघड नव्हते म्हणूनच त्यांनी १९५४ साली चीन सोबत पंचशील करार केला. भारत शांततामय सहजीवन  तसेच परस्पर सार्वभौमत्वाच्या सन्मान या आंतरराष्ट्रीय तत्वांचा पुरस्कार करणारा आहे हे जगाला वारंवार ठासून सांगितले.परंतु पंचशील तत्त्वाचा करार केल्यानंतर अल्पावधीतच चीन ने भारताने प्रकाशित केलेल्या नकाशांवर आक्षेप नोंदवण्यास सुरुवात केली. सर्वप्रथम तिबेटवर आपला ताबा सांगितला भारत एक स्वतंत्र सार्वभौम प्रदेश आहे असे म्हणत होता व त्यानंतर भारत ज्या प्रदेशाला स्वतःचा अविभाज्य भाग समजत होता तो प्रदेश म्हणजे पूर्वेकडील अरुणाचल प्रदेश व त्याच्या सीमेलगतचा भाग याबाबतही चीन विवाद निर्माण करत होता.

**१९५८ ची अक्साई चीन ची समस्या :** १९६२ च्या भारत-चीन लढाई चे मूळ हे भारत-चीन सीमा पैकी पश्चिम विभागामध्ये असलेल्या अक्साई चीन या प्रदेशावरील नियंत्रणात दडलेले आहे. अक्साई चीन चा भाग हा अतिशय दुर्गम भाग आहे. तो लडाखचा ऊत्तर पुर्वेकडील साधारण ३८००० चौरस किलोमीटर चा भाग आहे.या प्रदेशात चीनमधून संचार करणे हे अधिक सोपे आहे. भारतामधून या प्रदेशावर नियंत्रण मिळवण्यासाठी भारताला खूप कष्ट घ्यावी लागत होती. त्यामुळे हा भाग तसा प्रारंभी दुर्लक्षितच होता. त्यामुळे अक्साई चीन च्या काही भागांमध्ये १९५० च्या दशकात चीनने काही रस्त्यांचे बांधकाम केले होते ते भारतीयांच्या निदर्शनास येऊ शकले नाही.१९५१साली सुरु झालेले रस्त्याचे बांधकाम १९५७ साली चीनने पूर्ण केले व या प्रदेशावर आपला ताबा सांगितला. पंडित नेहरूंनी देखील हा प्रदेश भारताचा आहे व याबाबत कसल्याही पद्धतीचे बाह्य आक्रमण स्वीकारले जाणार नाही, अशा पद्धतीची भूमिका घेतली. यामुळे या ठिणगीचे रूपांतर पुढे १९६२ च्या युद्धात झाले.

**१९५९ दलाई लामा यांना राजाश्रय :** चीन ने तिबेटवर ताबा मिळवला परंतु तिबेटमधील स्थानिक लोकांनी विशेषतः दलाई लामा व त्यांच्या अनुयायांनी चीनचे वर्चस्व स्वीकारलेले नव्हते. यावरून माओ-त्से-तुंग यांनी दलाई लामा यांच्या विरोधात आघाडी उघडली. शेवटी दलाई लामा यांना आपला प्रदेश सोडून पळ काढावा लागला. भारताशी असलेल्या पारंपारिक संबंधांमुळे १९५९ साली आपल्या हजारो अनुयायांसह दलाई लामा भारतात आश्रयाला आले. आंतरराष्ट्रीय नैतिकता समोर ठेवून भारताने दलाई लामा यांना आश्रय दिला व चीनची नाराजी ओढवून घेतली.

**नेहरुंचे वाढते वर्चस्व व माओ त्से तुंग यांची महत्त्वाकांक्षा :** १९६० ते १९६२ हा कालावधी आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या बाबतीत शीतयुद्धाच्या संदर्भाने अतिशय घडामोडींचा कालावधी होता यादरम्यान दोन्ही महासत्ता अतिशय तीव्र गतीने अण्वस्त्रांच्या निर्मितीमध्ये गुंतलेल्या होत्या.याच दरम्यान क्युबामध्ये रशियाने अण्वस्त्रतैनात केली. तत्पूर्वी अमेरिकेच्या हेरगिरी करणाऱ्या विमानांना १९६० मध्ये रशियाने आपल्या हद्दीत पाडले. या घटनाक्रमामुळे दोन्ही महासत्ता मधील संबंध यावेळेला अतिशय अविश्वासाचे व स्फोटक असे बनलेले होते. कोणाकडूनही एखादे चुकीचे पाऊल जगाला तिसऱ्या महायुद्ध कडे नेण्यास कारणीभूत ठरणार होते अशावेळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पंडित नेहरूंनी तिसऱ्या जगतातील काही देशांना सोबत घेऊन हा प्रश्न शांततेच्या व चर्चेच्या मार्गातून सोडवण्यासाठी मध्यस्थी केली व दोन्ही महासत्तांमध्ये हॉट लाईनच्या माध्यमातून प्रत्यक्ष संबंध निर्माण केले जेणेकरून कोणत्याही गैरसमजातून कोणत्याही युद्धाला सुरुवात होणार नाही. नेहरूंचा हा शिष्टाचार यशस्वी झाला व आंतरराष्ट्रीय जगतात शांततेचा दूत म्हणून नेहरूंची सर्वत्र ख्याती वाढू लागली. नवस्वतंत्र राष्ट्रांचा नेता चीन स्वतःला समजत होता चीनच्या या समजुतीला नेहरूंच्या वाढत्या महत्त्वामुळे खीळ बसत होता. तेव्हा माओ त्से तुंग देखील नेहरूंना एखाद्या प्रसंगांमध्ये अपमानित करून भारताचे वाढते महत्त्व कमी करण्याच्या प्रतीक्षेत होते. ही संधी त्यांना १९६२ मध्ये मिळाली.

**१९६२ चे युध्द :** १९५० साली चीनने तिबेट सोबत करार करून तिबेट हा चिनचा भाग आहे हे निश्चित केले व त्यानंतर स्वाभाविकपणे भारत व चीन यांच्या सीमा एकमेकांना भिडल्या. या सीमा निश्चित नव्हत्या, परंतु तिबेट सोबत भारताचे संबंध मधुर असल्याने हा प्रश्न उपस्थित झाला नाही. मात्र आता चीन चे स्वामित्व या भागावर आल्याने व चीन वारंवार भारत जो प्रदेश आपला समजत आहे त्यावर अतिक्रमण करू लागल्याने, तिबेटच्या पश्चिम भागातील सीमेवर तणाव वाढत होता. चीन भारतावर दबाव वाढवत होता, परंतु भारत हा दबाव मान्य करत नाही हे कळताच चीनने २० ऑक्टोबर १९६२ पासून या भागामध्ये सैनिकी कारवाया करण्यास सुरुवात केली. या कारवाया २२ नोव्हेंबर १९६२ पर्यंत चालल्या. चिनने ही कार्यवाही आकस्मिकपणे केलेली असल्यामुळे भारत या लढाईला तयार नव्हता. आपण केलेल्या पंचशील कराराच्या अनाक्रमणाच्या कलमानुसार चीन असे कुठलेही पाऊल उचलेल हे नेहरूंना स्वप्नातही वाटले नव्हते.या युद्धात भारताचे हजारो सैनिक मारले गेले, संरक्षणाच्या दृष्टिकोनातून हिमालयातील मोक्याची ठिकाणे चीनच्या ताब्यात गेली, भारताच्या हजारो चौरस मीटर क्षेत्रावर चीनने ताबा मिळवला, युद्धावरील खर्चाने भारताच्या विकास कामांना खीळ बसली, अलिप्ततावादच्या धोरणाने आंतरराष्ट्रीय जगतात भारताचा जो सन्मान वाढत होता त्याला मर्यादा आली.

पुढे मेनन यांच्या जागी यशवंतराव चव्हाण १९६३ साली संरक्षणमंत्री झाले व त्यांनी १९६२ च्या युद्धाच्या संदर्भात चौकशी करण्यासाठी एक समिती नेमली. या समितीने – सैनिकांचे प्रशिक्षण, त्यांची शारीरिक सुदृढता व नेतृत्वक्षमता, युद्ध सामग्री, याव्यतिरिक्त गुप्तवार्ता संकलन व युद्ध कार्यपद्धती व प्रक्रिया इत्यादी बाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले.आजही भारत चीन सीमा वाद मिटलेला नाही. गेल्या दहा वर्षांमध्ये चीने पुन्हा तिन्ही सीमा भागांमध्ये आपली युद्ध क्षमता वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सैनिक तळ निर्मिती, रस्त्यांची निर्मिती, क्षेपणास्त्रांची तैनाती केलेली आहे.

**भारत–चीन सीमाप्रदेश : मध्य विभाग व पूर्व विभाग :**

१९६२ च्या युद्धाचा परिणाम – चीन ने भारतावर केलेले आक्रमण हे भारतीयांना विशेषतः पंडित जवाहरलाल नेहरूंना अतिशय जिव्हारी लागलेले होते. या युद्धातील भारताचा पराभव हे एक भारतीयांच्या दृष्टिकोनातून अतिशय वाईट स्वप्न आहे. या युद्धातील पराभवाची नामुष्की हेदेखील नेहरूंच्या खचण्याचे एक कारण आहे. या युद्धातील चीनच्या विजयाने भारताच्या उत्तरेतील सीमा ह्या कायमच्या असुरक्षित बनल्या. सीमेलगतच्या पूर्वोत्तर राज्यांमध्ये एका प्रकारचे भीती व संशयाचे वातावरण अनेक वर्षे राहिले. आजही आसाम, अरुणाचल प्रदेश व लडाखचा सीमावर्ती भाग हा तणावात असतो. या क्षेत्राच्या रक्षणासाठी भारताला आपल्या संरक्षण खर्चामध्ये फार मोठ्या प्रमाणावर वाढ करावी लागली. अर्थातच याचा परिणाम भारताच्या विकास प्रक्रियेवर झाला.१९६२ च्या युद्धानंतर भारत चीन संबंध आजपर्यंत कधीही निखळ मैत्रीचे होऊ शकले नाहीत.अक्साई चीन च्या संदर्भा मधून पाकिस्तान व चीन एकमेकांच्या जवळ आले. ज्यामुळे यानंतरच्या प्रत्येक भारत–पाकिस्तान लढाई मध्ये चीन पाकिस्तानच्या बाजूने उभा राहिला. यामुळेही भारत–चीन जवळीक होऊ शकली नाही. व नेहरूनी दिलेला 'हिंदी चीनी भाई भाई' हा नारा प्रत्यक्षात येऊ शकला नाही.

## २.२.३.२ १९६२ ते २००० सालापर्यंतचे संबंध :

**१९६५ चे भारत पाक युध्द :** १९६५ साली पाकिस्तानने भारताच्या कच्छ भागामध्ये घुसखोरी केली व यावरून भारत–पाकिस्तान युद्धाला सुरुवात झाली. नुकताच चीन कडून पराभूत झालेला भारत पाकिस्तानच्या आक्रमणाला प्रत्युत्तर देऊ शकणार नाही अशी पाकिस्तानी नेत्याची व लष्कराची धारणा होती जी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या नेतृत्वात भारताने चुकीची ठरवून दाखवली. परंतु चीन ने या युद्धात वस्तुस्थिती समजून न घेता केवळ पाकिस्तान धार्जिणी भूमिका घ्यावी यासाठी भारताचा विरोध व पाकिस्तानचे समर्थन केले.याबरोबरच भारताचे लक्ष युद्धाच्या दरम्यान विचलित करण्यासाठी चीनने आपल्या सीमेवरील डोकलाम व सिक्कीम भागामध्ये मोठ्या प्रमाणावर सैन्याची जमवाजमव केली. केवळ एवढेच नाही तर चीनने पाकिस्तानला युद्धाच्या दरम्यान व युद्धाच्या नंतर राजनयिक समर्थनही केले.युद्धामुळे झालेल्या आर्थिक नुकसानाच्या भरपाईसाठी चीने पाकिस्तानला युद्धानंतर मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदतही केली.

**भारत–चीन पाणीवाटपाचा प्रश्न –** सीमावाद याप्रमाणेच नद्यांच्या पाणीवाटपाचा प्रश्न देखील स्वातंत्र्य पासूनच सोडवण्यास दोन्ही देश अयशस्वी ठरलेले आहेत. हिमालयात उगम पावून तिबेट मार्गे ब्रह्मपुत्रा हिंदी अरुणाचल प्रदेशामध्ये प्रवेशित होते. हे पाणी तेथील जनतेच्या दैनंदिन गरजा, शेती व उद्योगधंद्यांना अतिशय आवश्यक आहे. परंतु अद्यापही दोन्ही देशांमध्ये या नैसर्गिक संसाधनाचे वाटप कोणत्या गुणोत्तराने किंवा प्रमाणात होईल याबाबत कोणताही करार झालेला नाही किंवा हे पाहणारी कोणतीही यंत्रणा अस्तित्वात आलेली नाही. मागील काही दशकापासून चीन भारत आमच्या विकासामध्ये अडथळा आणण्यासाठी म्हणून ब्रह्मपुत्रा नदीवर मोठमोठी धरणे बांधून पाणी आडवू शकतो व अरुणाचल प्रदेशला समस्या निर्माण करू शकतो याबाबत शंका व्यक्त केली जात आहे. ब्रह्मपुत्रा नदी बरोबरच गलवान नदीचे खोरे देखील गेल्या काही वर्षांपासून वादात आहे. या नदीचे पाणीही चीन अडवून नदीचा प्रवाह बदलू पाहत आहे ज्यामुळे अर्थातच

नैसर्गिक सीमेत बदल होणार आहेत. गेल्या काही वर्षापूर्वी गलवान खोऱ्यात जे भारत-चीन मर्यादित युद्ध झाले त्याचे एक कारण दोन्ही देशात पाणीवाटपाचे एक निश्चित प्राधिकरण नाही.

**१९७१ चे भारत पाक युध्द व चीन –** १९७१ चे भारत पाकिस्तान युद्ध हे भारतासाठी अतिशय यशस्वी होते. या युद्धात प्रारंभापासूनच रशियाने भारताचे समर्थन केले तर अमेरिकेने पाकिस्तानचे समर्थन केले. चीन या युद्धात सर्व ताकदीनिशी पाकिस्तानच्या बाजूने उभा होता. १९६० च्या दशकातच चीन व पाकिस्तान यांच्यातील जवळीक कमालीची वाढलेली होती. दोन देशांमध्ये अनेक करार झालेले होते. पाकिस्तान हा चिनी शस्त्रास्त्रांचा फार मोठा खरीददार होता. अशा परिस्थितीत पाकिस्तानचे विघटन होऊन बांगलादेशाची निर्मिती होऊ नये तीही भारताच्या हस्तक्षेपाने हे चीन साठी सकारात्मक नव्हते. म्हणून चीन युद्धापूर्वी, युद्धादरम्यान व युद्ध नंतरही पाकिस्तानच्या बाजूने सक्रिय दिसला. युद्धापूर्वी चीनने पाकिस्तानला फार मोठी शस्त्रास्त्रांची मदत केलेली होती तसेच जेव्हा इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय जनमत पाकिस्तानचे विरोधी बनवत होत्या तेव्हाची नेत्यात अडथळे आणण्याचा प्रयत्न केला. युद्धादरम्यानही जसे १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धात चीनने भारत-चीन सीमेवर सैन्याची जमवाजमव केली होती त्याच पद्धतीने याही वेळेला बांग्लादेशची निर्मिती हे चीनच्या हिताची नाही याचा उहापोह करून पूर्व सीमेवर मोठ्या प्रमाणावर सैन्याची जमवाजमव केली. युद्धानंतर चीनने भारत आंतरराष्ट्रीय करारांचे अनुपालन करत नाही, भारत पाकिस्तानच्या अंतर्गत समस्यांमध्ये ढवळाढवळ करतोय, भारताने हे युद्ध पाकिस्तान वर लादलेले आहे म्हणून सुरक्षा परिषदेने भारताविरुद्ध कठोर भूमिका घ्यावी असे चीनचे मत होते. १९७१च्या युद्धाचा एक परिणाम म्हणजे चीन व अमेरिका हे सर्व हितसंबंधी असल्यामुळे म्हणजेच पाकिस्तानच्या विजयासाठी प्रयत्नशील असल्यामुळे एकमेकांच्या जवळ आले. परिणामी चीन उघड-उघड रशियाचा विरोधक बनला.

**भारताची संरक्षण सिद्धता व चीनची प्रतिक्रिया :** १९६२ साली झालेल्या पराभवापासून धडा घेऊन भारताने संरक्षणाच्या दृष्टिकोनातून प्रथम सक्षम व नंतर स्वयंपूर्ण होणे या उद्देशाने शस्त्रास्त्रांच्या खरेदीबरोबरच संशोधनावरही लक्ष केंद्रित केले. जेव्हा जेव्हा भारत-रशिया अमेरिका किंवा इतर देशांकडून शस्त्रास्त्रांची खरेदी करत होता, तेव्हा तेव्हा चीन, 'भारत आशिया खंडामध्ये शस्त्रास्त्रांची स्पर्धा सुरू करत आहे', अशी ओरड करत होता. नंतर भारताने स्वतःचा क्षेपणास्त्र विकासाचा कार्यक्रम सुरू केला व त्या अनुषंगाने जेव्हा-जेव्हा भारत क्षेपणास्त्रांच्या चाचण्या घेत होता तेव्हा तेव्हा ही क्षेपणास्त्रे आपल्या विरोधी असून याने प्रदेशाचे सामरिक संतुलन बिघडत आहे अशा पद्धतीची तक्रार चीन युनो मध्ये करत होता. १९७४ ची अणुचाचणी असो किंवा १९९८ ची अणुचाचणी असो प्रत्येक वेळी चीनने भारताला विरोध केलेला आहे. भारताला एन एस जी चे सदस्यत्व मिळू नये किंवा त्यासंबंधीच्या सुविधा मिळू नयेत यासाठी चीन आटोकाट प्रयत्न करत आहे.

**भारताची दहशतवादाची समस्या व चीनची भूमिका :** १९९० च्या दशकापासून भारत दहशतवादाच्या समस्येला तोंड देत आहे. भारतातील दहशतवाद हा पाक पुरस्कृत आहे असे भारताचे ठाम मत आहे. इतर देश पाकिस्तानला जी शस्त्रास्त्रांची व आर्थिक मदत करतात त्याचा उपयोग पाकिस्तान भारतात दहशतवादी कारवाया करण्यासाठी करतो, म्हणून भारताने नेहमी अमेरिकेच्या व चीनच्या पाकिस्तानला केलेल्या मदतीवर आक्षेप घेत

आलेला आहे. अनेक दहशतवादी संघटनांना चीनने बंदी घालावी अशी मागणी भारत वारंवार करतो. मात्र चीनकडून अपेक्षेप्रमाणे सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही. २०१६साली ऊरी व त्यानंतर २०१९ मध्ये पुलवामा या ठिकाणी दहशतवादी हल्ले झाल्यानंतर भारताने त्याला ज्याप्रकारे प्रत्युत्तर दिले त्यावरही चीनने तीव्र आक्षेप घेतले होते.

### २.२.३.३ २१ व्या शतकातील भारत चीन संबंध :

**रशिया-भारत-चीन मैत्रिगट :** चार दशकाच्या उघड संघर्षानंतर भारत व चीन यांचे एकविसाव्या शतकातील संबंध हे नवीन जागतिक व्यवस्थेच्या संदर्भात बदलत गेलेले दिसतात.२१ व्या शतकाच्या प्रारंभीच अमेरिकेच्या एकाधिकारशाहीला आव्हान देण्यासाठी बहुध्रुवीय व्यवस्था निर्माण करण्याच्या हेतुने रशियाच्या पुढाकाराने रशिया-भारत-चीन असा मैत्रिगट २००१ साली तयार झाला. परंतु २००५ च्या भारत - अमेरिका अणुकरारानंतर चीनच्या मनात भारतासंदर्भात पुन्हा अविश्वासाचे वारे वाहू लागले, चीनने या कराराला विरोध केला. भारत अमेरिका अणुकरारानंतर भारत बहुध्रुवीय व्यवस्था निर्मीतीसाठी कटीबध्द असला तरी रशिया-भारत-चीन असा मैत्रिगटात फारसा सक्रीय राहिला नाही. आजही या मैत्रिगटाच्या वार्षिक बैठका होतात.

**आर्थिक आघाडीवर सहकार्य :** २१ व्या शतकात एकिकडे भारत चीन यांच्यात राजकिय मुद्द्यावर विरोध दिसत होता तर त्याच वेळेला आर्थिक आघाडीवर सहकार्य दिसत होते. २१ वे शतक हे माहितीतंत्रज्ञानाचे शतक आहे. या क्षेत्रात चीन हार्डवेअर तर भारत सॉफ्टवेअरचा पुरवठादार आहे. चीनला आपल्या उत्पादनासाठी भारताची बाजारपेठ आवश्यक होती, यासाठी या काळात दोन्ही देशांनी आपापल्या आर्थिक धोरणात लवचिकता दाखवलेली दिसते.

**नविन समिकरणे व भारत चीन संबंध :** २००५ च्या भारत अमेरिका अणुकरारानंतर आशिया खंडातील सत्ता समिकरणात बदल झाला. १९७०च्या दशकापासून जे अमेरिका-चीन-पाकिस्तान विरुद्ध भारत-रशिया असे समीकरण बनलेले होते ते रशियाच्या विघटनानंतर अमेरिका विरुद्ध चीन असे बनू लागले आहे. पाकिस्तान व चीन यांची जवळीक वाढत आहे, मात्र त्याच वेळी अमेरिका चीनच्या विरोधात उभी राहताना दिसते. तसेच रशियाच्या अस्तानंतर भारताच्या विरोधाला अमेरिकेकडे दुसरे कारण उरलेले नाही. अशाप्रसंगी चीनच्या सत्तेला शह देण्यासाठी अमेरिका व भारत यांच्यातील जवळीक वाढत आहे. अमेरिकेतील धोरणकर्त्यांना ही भविष्यात चीनपेक्षा भारत हा अमेरिकेच्या हितासाठी अधिक विश्वासू वाटत आहे. या सर्व घटनाक्रमाचा परिणाम म्हणजे अमेरिका व भारत विरुद्ध चीन अशी व्यवस्था निर्माण होत आहे.

एकविसाव्या शतकातला भारत हा १९६० च्या दशकातील भारत नाही. आता भारताची गणना ही एका उदयन्मुख जागतिक सत्ते सारखी होत आहे. याला अमेरिका व युरोपियन देशाचा उघड पाठिंबा मिळत आहे. याच बरोबर भारताने रशिया सोबत ही चांगले संबंध कायम ठेवले आहेत. या सगळ्याचा परिणाम म्हणजे आजही सीमा वाद किंवा पाणीवाटपाचा प्रश्न किंवा आशिया खंडातील महासत्तेची दावेदारी हे सर्व प्रश्न अनुत्तरित असले तरी चीनचे भारता प्रति असलेले धोरण हे बदललेले दिसते.

**चीनचे महत्वाकांक्षी प्रकल्प व भारताची प्रतिक्रीया :** २१ व्या शतकात चीनने अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प हातात घेतले आहेत. पैकी आणि हिंदी महासागरात बंदरांची निर्मीती हे भारतासाठी चिंताजनक आहेत. पैकी सिल्करुट हा प्रकल्प भारताच्या हद्दीतून जातो असे भारताचे म्हणने आहे. एकंदरीत या प्रकल्पांना भारताची फारसे समर्थन नाही.

**अमेरीकेची चीनविरूद्ध मोर्चेबांधनी व भारत :** चीनचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी अमेरीका मोर्चेबांधनी करत आहे, भारताचे याला समर्थन आहे. क्वाडचा भारत सदस्य आहे. हिंद महासागरातील चीनच्या वाढत्या सामर्थ्याला शह देण्यासाठी अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलीया व भारत अशी ही मोर्चेबांधणी आहे.

**मोदी शासनातील भारत-चीन संबंध :** २०१४ साली नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यापासुनच त्यांनी चीन सोबत संबंध चांगले ठेवण्याचे धोरण ठेवले. दोन्ही देशांच्या प्रमुखांनी एकमेकांच्या देशांना भेटी दिल्या, अनेक करार केले परंतू चीनला मोदींचे व पर्यायाने भारताचे वाढते महत्व पुन्हा एकदा खटकत आहे. मोदींचे परराष्ट्र धोरण हे अधिक सक्रिय आहे. भारत एका मोठ्या आंतरराष्ट्रीय समुदायाचे नेतृत्व करू शकतो हे स्वप्न नेहरूंनी दाखवले त्या स्वप्नांची पुर्तता करण्यामध्ये मोदी अग्रेसर दिसतात. अलिप्ततावादा ऐवजी त्यांनी बहुसंलग्नतेचे धोरण अतिशय शिताफीने हाताळलेले आहे. अमेरिकेबरोबर मैत्री करत असतानाच रशियासोबतची जुनी मैत्री कशी कायम राहील याची काळजी घेतली आहे. नरसिंहराव पंतप्रधान असताना ठरलेल्या 'लूक ईस्ट पॉलीसी'ला पुढच्या टप्प्यात नेऊन 'एक्ट ईस्ट पॉलिसी'मध्ये रूपांतरित केले आहे. 'मेक इन इंडिया' या स्वरूपात मोठ्या प्रमाणात भारतात उत्पादने करून भारत एक निर्यातदार म्हणून पुढे येत आहे. आसियान असो ब्रिक्स असो कि विकसित आणि विकसनशील देशांच्या इतर संघटना असोत सर्व ठिकाणी भारताच्या भूमिकेला महत्त्व प्राप्त होत आहे.

पाकिस्तानच्या संदर्भात भारताने आक्रमक परराष्ट्र धोरणाचा पवित्रा घेतलेला आहे. पाकव्याप्त काश्मीर व पाकिस्तानच्या काही भागांमध्ये सैनिकी कारवाया करून यापुढे भारत दहशतवादाला तितक्याच कठोरपणे उत्तर देईल हे दाखवून दिले आहे. याच बरोबर भारताच्या ताब्यात असलेल्या भारत-चीन सीमेलगतच्या भागांमध्ये आता भारताकडून मोठ्या प्रमाणावर संरचनात्मक बांधणी होत आहे. म्हणजेच रस्ते व सैनिकी तळांची निर्मिती गेल्या काही वर्षात लक्षणीय स्वरूपाची आहे. युद्ध साहित्याच्या बाबतीतही भारत आता स्वयंपूर्णतेकडे वाटचाल करत आहे. काही युद्धसाहित्याची उत्पादने भारत निर्यात करत आहे. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे पुन्हा एकदा भारत व चीन यांच्यामध्ये हितसंबंधांचा संघर्ष निर्माण होत आहे. त्यामुळे मागील काही वर्षात चीन उघड-उघड भारताच्या विरोधी भूमिका घेताना दिसत आहे.

**सीमावादाची नव्याने सुरुवात :** चीनने पुन्हा एकदा सीमावाद उकरून काढत डोकलामचा प्रदेश, गलवान खोरे व अरुणाचल प्रदेशमधील काही भागात आपल्या हालचाली वाढवल्या आहेत.

डोकलाम या भागात केलेल्या अधिक्रमणावरून जवळपास तीन महिने भारत-चीन एका मर्यादित युद्धाच्या उंबरठ्यावर उभे होते. सिक्कीमच्या व भुतानच्या दरम्यान असलेल्या डोकलाम या भागात चीनच्या सैनिकांनी

शिरकाव केला. या ठिकाणी रस्ते बांधण्यास सुरुवात केली व त्या प्रदेशावर आपला ताबा सांगितला. भूतान व भारत या दोन्ही देशांनी यावर आक्षेप घेतला व भारताने चीनच्या कारवाया थांबवण्यासाठी म्हणून तेथे आपले काही सैन्य धाडले. १६ जून २०१७ ते २८ ऑगस्ट २०१७ या कालावधीत हा विवाद घडला. शेवटी २८ ऑगस्ट २०१७ रोजी दोन्ही देशांनी आपण या भागातून सैन्य माघार घेत आहोत असे जाहीर केले.

पुढे २०२० मध्ये सिक्कीम लगतच्या गलवान नदीच्या खोऱ्यात सीमारेषेवरून भारत-चीन सैन्यदल एकमेकांच्या विरोधात उभे राहिले. भारताच्या हद्दीत असलेल्या भागात भारत मोठ्या प्रमाणावर रस्त्यांचे काम करत आहे जे यापूर्वीच्या करारांचे उल्लंघन आहे म्हणून चीनने आपले सैन्य या भागात पाठवले १५ व १६ जून २०२० या दरम्यान दोन देशांच्या सैनिकांमध्ये मर्यादित युद्ध झाले. पुढे दोन देशांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये वाटाघाटी होऊन फेब्रुवारी २०२१ मध्ये टप्प्याटप्प्याने दोन्ही देशांनी आपले सैनिक माघारी घेतले.

डिसेंबर २०२१ मध्ये चीनने पुन्हा अरुणाचल प्रदेश च्या सीमेचा मुद्दा उकरून काढला आहे. यात अरुणाचल प्रदेश हा आमचा दक्षिण तिबेटचा भाग असून येथील १५ लहान-मोठ्या ठिकाणांची नव्याने चिनी पद्धतीनुसार नामकरण करण्याची घोषणा चीनने डिसेंबर २०२१ मध्ये केली. भारत व अरुणाचल प्रदेश शासनाने याचा तीव्र विरोध केला आहे.

## २.३ सारांश :

स्वातंत्र्यानंतर भारताला तत्कालीन आंतरराष्ट्रीय व्यवस्थेच्या मर्यादेत राहून आपल्या हितसंबंधांची पूर्तता करण्यासाठी वेळोवेळी महासत्तांशी तडजोडीचे धोरण स्वीकारावे लागले. दुसऱ्या महायुद्धानंतर सुरू झालेल्या शीतयुद्धाचे सावट भारतासारख्या विकसनशील राष्ट्रांवर पडणे क्रमप्राप्त होते. भारतासमोर ही अमेरिकेच्या भांडवलशाही गटात समाविष्ट व्हावे की रशियाच्या साम्यवादी गटात समाविष्ट व्हावे असे दोन पर्याय होते परंतु तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी अतिशय शिताफीने अलिप्ततावादी तिसरा मार्ग स्वीकारून दोन्ही महासत्ता कडून शक्य ती मदत मिळवण्याचा प्रयत्न केला.

शीतयुद्धाच्या दरम्यान भारत अमेरिका संबंध हे फारसे चांगले नव्हते. शीत युद्ध संपल्यानंतर देखील भारत-अमेरिका संबंध चांगले बनण्यासाठी एकविसावे शतक उजाडावे लागले. २००५ भारत-अमेरिका अणुकरार नंतर मात्र दोन्ही देशांमधल्या संबंधांना एक चांगली दिशा मिळालेली दिसते. सध्याचे भारत-अमेरिका संबंध हे गेल्या सात दशकातील सर्वात चांगले संबंध आहेत असे म्हणावे लागेल.

शीत युद्ध कालीन भारत- सोवियेत संघ संबंध हे सर्वात विश्वासाचे व चांगले म्हणावे लागतील. सोवियेत संघाने वेळोवेळी भारताची सर्वतोपरी मदत करून आपण एक चांगला मित्र आहोत हे दाखवून दिले. तर भारताने त्याच्या बदल्यात कितीही टीका झाल्या तरीही १९७१ साली भारत- सोवियत संघ मैत्रीचा करार केला. विघटनानंतर निर्माण झालेल्या रशिया सोबतही भारताने जाणिवपुर्वक पूर्वीप्रमाणेच संबंध ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. विशेषतः एकविसाव्या शतकात एकीकडे अमेरिकेसोबत संबंध सुधारण्यावर भारत लक्ष केंद्रित करत आहे, त्याच वेळेला रशियासोबत पूर्वीप्रमाणेच मधुर संबंध ठेवण्याचीही काळजी घेत आहे.

स्वातंत्र्यानंतर पहिली चार-पाच वर्षे वगळता भारत-चीन संबंध हे कायमच अविश्वास, तणाव व संघर्षाचे राहिले आहेत. आज पर्यंतच्या भारताच्या प्रत्येक युद्धात चीन भारताच्या विरोधी भूमिकेत दिसला आहे. चीन सोबत स्वातंत्र्याच्या वेळेला असलेले सर्व विवादित मुद्दे आजही तसेच आहेत. असे असले तरीही एकविसाव्या शतकात आर्थिक हितसंबंधामधून भारत व चीन यांच्यात काही करार झालेले दिसतात. परंतु मागील चार ते पाच वर्षापासून भारताच्या वाढत्या सामर्थ्याला शह देण्यासाठी चीन पुन्हा भारताच्या सीमेवर अस्वस्थता वाढवत आहे त्यातून वारंवार संघर्ष निर्माण होत आहेत. तेव्हा या संघर्षाचे व्यवस्थापन करणे हे भारतासाठी एक आव्हान आहे.

## २.४ पारिभाषिक शब्द :

**महासत्ता –** आंतरराष्ट्रीय राजकीय व्यवस्थेमध्ये सत्तेच्या उतरंडीत सर्वात शीर्षस्थानी असलेले जे आपल्या राष्ट्र शक्तीच्या जोरावर इतर राष्ट्रांच्या निर्णयांवर प्रभाव टाकू शकते.

**शीत युद्ध –** दुसरे महायुद्ध संपल्यानंतर अमेरिका प्रणित भांडवलशाही राष्ट्रांचा गट व सोवियेत संघ प्रणित साम्यवादी राष्ट्रांचा गट यांच्यामध्ये एक युद्ध सदृश्य परिस्थिती निर्माण झाली. ही परिस्थिती १९४५ पासून १९९१ अशी समजली जाते. दोन्ही महासत्ता प्रत्यक्षात एकमेकांच्या विरोधात युद्धात उतरल्या नाहीत मात्र चुकीच्या भितीचे सावट जगाने अनुभवले.

**बहूध्रुवीय विश्वरचना –** अशी आंतरराष्ट्रीय व्यवस्था ज्यामध्ये सत्तेची केंद्रे दोनपेक्षा अधिक असतात. जेव्हा सत्तेचे एकच केंद्र असते तेव्हा एकध्रुवीय विश्वरचना तर सत्तेची केंद्रे दोनच असतात तेव्हा त्यास व्दिध्रुवीय विश्वरचना असे म्हणतात.

**निशस्त्रीकरण –** १९६० च्या दशकात सुरू झालेली एक प्रक्रिया जीचा उद्देश घातक शस्त्रांस्त्रांना नष्ट करणे हा आहे.

## २.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

### २.६.१ बहुपर्यायी प्रश्न :

१. ------- साली चीनने पंचशील तत्वाचा भंग करून सीमावादाचा प्रश्न उपस्थित केला.

(१९५५, १९५६, १९७२, १९९९)

२. -------- ने अत्याधुनिक अशी संरक्षण प्रणाली (एस-४००) भारताला देण्याचा करार केला.

(फ्रांस, अमेरिका, चीन, रशिया)

३. भारताचे पंतप्रधान ----------- व अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांच्यात भारत अमेरिका अणू सहकार्य करार करण्यात आला.

(इंदिरा गांधी, राजीव गांधी, मनमोहनसिंग, नरेंद्र मोदी)

४. १९९१ मध्ये सोव्हियत रशियाचे विघटन होऊन -------- स्वतंत्र गणराज्याची निर्मिती झाली.

(५०, १५, २०, १०)

५. २३ डिसेंबर २०१५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी --------- राष्ट्राला भेट देवून महत्वपूर्ण सोळा करार केले.

(बांगलादेश, अमेरिका, चीन, रशिया)

६. ----- ---- साली भारत अमेरिका अणू सहकार्य करार करण्यात आला

(२००१, २००५, २०१०, २०११)

७. भारत सोव्हियत संघ ऐतिहासिक करार ----------- साली झाला.

(१९७१, १९६२, १९९८, २००५)

८. भारत चीन युद्ध ---------- साली सुरु झाले.

(१९४७, १९६२, १९७१, १९६५)

९. स्वंतत्र भारताला भेट देण्यासाठी सर्वप्रथम अमेरिकेचे --------- अध्यक्ष आले होते.

(आयसेन ओव्हर, जॉर्ज बुश, ट्रमन, बिल क्लिंटन)

१०. १९७१ च्या भारत -पाक युद्धाच्या वेळी ------- या देशांने भारतावर अणूबाँबच्या वापराची धमकी दिलेली होती.

(सोव्हियत संघ, अमेरिका, चीन, पाकिस्तान)

११. डोकलाम संघर्ष भारत व --------- यांच्या दरम्यान झाला.

(बांगलादेश, अमेरिका, चीन, रशिया)

१२. पंचशील करार --------- दोन देशात झाला.

(भारत - बांगलादेश, भारत - अमेरिका, भारत - चीन, भारत - रशिया)

**२.६.१ टिपा लिहा.**

अ) १९६२ चे भारत चीन युध्द व महासत्तांची भूमिका

ब) १९७१ चे भारत पाकिस्तान युध्द व महासत्तांची भूमिका

क) भारत सोव्हिएत संघ मैत्री करार १९७१

ड) भारत चीन सीमावाद

ई) पंचशील करार १९५४

**२.६.१ सविस्तर उत्तर लिहा.**

अ) शीतयुद्धादरम्यानचे भारत - अमेरीका संबंध स्पष्ट करा.

ब) शीतयुद्धोत्तर भारत - अमेरीका संबंधांचे विश्लेषण करा.

क) शीतयुद्धादरम्यानच्या भारत - सोव्हिएत संघ संबंधांचा आढावा ध्या.

ड) भारत - चीन संबंधातील विवादित मुद्द्यांचे विश्लेषण करा.

ई) २१ व्या शतकातील भारताच्या महासत्तांसोबतच्या संबंधांचे टिकात्मक परिक्षण करा.

## २.७ संदर्भ व अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) व्ही. बी. पाटील : भारताचे परराष्ट्र धोरण, के सागर पब्लिकेशन, पुणे (२०१०)

२) बी. डी. तोडकर : भारत आणि जग, डायमंड पब्लिकेशन, पुणे

३) शैलेंद्र देवळाणकर : भारतीय परराष्ट्र धोरण - सातत्य व स्थित्यंतरे, प्रतिभा प्रकाशन, पुणे (२०१०)

४) नलावडे पंडीत : आंतरराष्ट्रीय संबंध, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद (२०१४)


❍❍❍

घटक ३

# भारत आणि भारताचे शेजारील संबंध

## (India's Relation's with her Negbhors)


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ भारत–पाकिस्तान संबंध (India - Pakistan)
- ३.२.२ स्वयं अध्ययन प्रश्न
- ३.३ भारत–बांग्लादेश संबंध (India - Bangladesh)
- ३.२.२ स्वयं अध्ययन प्रश्न
- ३.४ भारत–श्रीलंका संबंध (India - Shrilanka)
- ३.४.२ स्वयं अध्ययन प्रश्न

३.५ पारिभाषिक शब्द

३.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.७ संदर्भ ग्रंथ / अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्टे :

भारताचे परराष्ट्र धोरण या विषयातील भारत आणि भारताचे शेजारी या घटकाचा अभ्यास करताना आपल्याला,

१) भारत आणि भारताचे शेजारील देश कोणते अभ्यासता येतील.

२) भारत-पाकिस्तान यांच्यातील संबंध समजून घेता येतील.

३) भारत-बांगलादेश यांच्यातील संबंध अभ्यासता येतील.

४) भारत-श्रीलंका यांच्यातील संबंध स्पष्ट करता येतील.

५) भारत-पाकिस्तान, बांग्लादेश आणि श्रीलंका या देशातील वादग्रस्त मुद्दे कोणते हे समजून येतील.

## ३.१ प्रस्तावना :

भारत आणि भारताचे शेजारी म्हणजे प्रामुख्याने हिमालयाच्या दक्षिणेकडील राष्ट्रे होय. यामध्ये पाकिस्तान, नेपाळ, भूतान, बांग्लादेश, श्रीलंका आणि मालदिव या राष्ट्रांचा समावेश होतो. आंतरराष्ट्रीय पातळीवर या राष्ट्रांच्या प्रदेशाला 'दक्षिण आशिया' या नावाने ओळखले जाते. दक्षिण आशिया हा वैभवशाली इतिहासाचा, प्राचीन संस्कृती आणि सभ्यतेचा प्रदेश आहे. या प्रदेशाचा भूभाग भौगोलिकदृष्ट्या विस्तीर्ण आहे. त्यामुळेच या प्रदेशात नैसर्गीक साधनसंपत्तीची समृद्धता आहे. तसेच या प्रदेशातील सामाजिक, सांस्कृतीक वैविध्य असले तरी सामाजिक संरचना, व्यवस्था व मूल्ये या संकल्पना टिकून आहे. देशाचे परराष्ट्र धोरण, अंतर्गत सुरक्षा, राष्ट्राची सर्वांगीन एकात्मता यांचा विचार करताना भारतासमोर सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रातील विविध आव्हानांबरोबर सीमेपलिकडील सीमा संघर्ष, दहशतवाद आणि काश्मीरचा प्रश्न इत्यादी आव्हाने निर्माण झालेली आहेत. एकूणच भारताच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे. त्यादृष्टीने आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करताना भारत-पाकिस्तान, भारत-श्रीलंका, भारत-बांग्लादेश, भुतान आणि चीन संबंधांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## ३.२ विषय-विवेचन :

भौगोलिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक असे समान घटक भारत आणि पाकिस्तान या दोन देशादरम्यान असून सुद्धा भारत द्वेष व धार्मिक विरोधातून किंवा विद्वेषातून १९४७ साली अखंड हिंदुस्थानची फाळणी होऊन अनुक्रमे १४ ऑगस्ट १९४७ व १५ ऑगस्ट १९४७ ला पाकिस्तान व भारत देशाची निर्मिती झाली. भारतीय स्वातंत्र्यापूर्वी भारत व पाकिस्तान हा राजकिय आणि भौगोलिक दृष्ट्या एकच प्रदेश होता. १९४७ साली पाकिस्तानची निर्मिती झाल्यापासून या दोन देशातील संबंध बहुतेक काळ तणावपूर्ण व संघर्षपूर्ण राहिले आहेत. या दोन देशामध्ये फाळणी होताना मालमत्तेच्या हक्कांचा निर्माण झालेला प्रश्न, नदीच्या पाणी वाटपाचा प्रश्न आणि सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे सीमावाद किंवा काश्मीरचा प्रश्न यासारख्या अनेक प्रश्नावरून या दोन्ही देशामध्ये संघर्ष वाढत गेले आहेत. त्यादृष्टीने पाकिस्तानचे भारताशी संबंध कोणत्या प्रकारचे आजपर्यंत राहिले आहेत, त्याची आपण थोडक्यात माहिती घेऊ.

### ३.२.१ भारत–पाकिस्तान संबंध :

भारताच्या वायव्य सिमेवरील दक्षिण आशियातील इस्लामीक राष्ट्र म्हणजे पाकिस्तान होय. पाकिस्तान हे केंद्रीय घटनात्मक प्रजासत्ताक असून पाकिस्तानातील चार सुभे (परगणा) आणि चार केंद्रशासीत प्रदेश आहेत. इंडोनेशिया पाठोपाठ जगात सर्वाधिक मुस्लीम लोकसंख्या पाकिस्तानमध्ये आढळते. इस्लामाबाद ही पाकिस्तानची राजधानी तर कराची हे सर्वात मोठे शहर आहे. अनुक्रमे भारतातील साम्राज्ये दखायनी साम्राज्य, खिलाफत, मोंगल, मुघल, दुराणी साम्राज्य, शीख आणि ब्रिटीशांची सत्ता पाकिस्तानवर होती. इ. स. १९४७ मध्ये द्विराष्ट्र सिद्धांताच्या आधारावर पाकिस्तान या स्वतंत्र राष्ट्राची निर्मिती बॅरीस्टर महमद अलि जीना यांच्या नेतृत्त्वाखाली झाली. भारताच्या वायव्येला पश्चिम पाकिस्तान आणि पूर्वेला पूर्वी पाकिस्तान यांचा मिळून धर्माच्या आधारावर पाकिस्तान राष्ट्राची निर्मिती झाली इ. स. १९६५ च्या पाकिस्तान राज्यघटनेनुसार पाकिस्तान हे इस्लामी प्रजासत्ताक झाले. पाकिस्तानच्या पूर्वेला भारत, वायव्येला अफगाणिस्तान, नैऋत्येला इराण, ईशान्यला चीन आहे. भारत आणि पाकिस्तान सीमा रेषा निश्चित करण्याचे काम सर सिरील रॅडक्लिफ यांच्यावर सोपवण्यात आली होती. त्यांनी तत्कालीन ब्रिटीश इंडियाचे दोन प्रमुख प्रांत पंजाब आणि बंगालमधील जिल्ह्यामध्ये बहुसंख्य लोकसंख्येच्या आधारावर सीमारेषा निश्चित केली. भारत–पाकिस्तान यांच्यामधील सीमारेषा 'रॅडक्लिफ लाईन' महणून ओळखली जाते. पाकिस्तान आणि भारत यांच्यामध्ये आझाद काश्मीर आणि गिलगिट, बाल्टीस्तान, जम्मू आणि काश्मीर आणि पंजाब प्रांत इत्यादींचा समावेश होतो. पाकिस्तान–भारत यांच्यामधील सिमारेषा एकूण २९,००० कि. मी. असून ह्या सिमा भारताच्या गुजराथ, राजस्थान, सिंधप्रांत आणि जम्मू – काश्मीरला लागून आहेत.

भारताची आंतरराष्ट्रीय सीमा एकूण ११ शेजारील राष्ट्रांसोबत जोडली गेलेली आहे. त्यामधील स्थल (जमिन) सीमाही चीन, नेपाळ, भूतान व अफगाणिस्तान या चार देशांदरम्यान आहे. तर सामुद्रिक सीमा पाकिस्तान, बांग्लादेश, म्यानमार थाईलॅड, इंडोनेशिया, श्रीलंका, मालदिव या सात शेजारील राष्ट्रासोबत आहे. भारत आणि पाकिस्तान, बांग्लादेश व म्यानमार असे देश आहेत कि, या तिन्ही देशांमध्ये स्थलीय व सामुद्रिक सिमा अशा दोन सिमा अस्तित्वात आहेत. भारत आणि भारताचे शेजारील राष्ट्र यांचा विचार करता भारताची सर्वांत जास्त लांबीची आंतरराष्ट्रीय सिमा ही भारत–बांग्लादेश (४०९६ कि.मी.) या दोन्ही देशामध्ये आहे. सर्वसाधारण भारताचे एकूण ११ देश शेजारी आहेत. त्यामध्ये पाकिस्तान, अफगाणिस्तान, चीन, नेपाळ, भूतान, बांग्लादेश, म्यानमार, थाईलॅड, इंडोनेशिया व श्रीलंका यांचा समावेश होतो.

पाकिस्तानची निर्मिती ही भारतीय उपखंडातील मुस्लीम समाजाच्या स्वयंनिर्णयाच्या व मुस्लीम समाजाच्या अनुयायांच्याा हितसंबंधाची जपणूक या दोन तत्त्वावर आधारलेली होती. या दोन देशामध्ये प्रथमपासूनच पाण्याचे वाटप, मालमत्तेचा अधिकार आणि काश्मीर समस्या यासारख्या प्रश्नावरून तणाव निर्माण झाले. काश्मीर प्रश्न वगळता इतर प्रश्नांबाबत वाटाघाटीद्वारे मार्ग शोधून काढण्यात या दोन्ही देशांना यश आले असले तरी पाकिस्तानातून निर्माण करणारा दहशतवाद आणि काश्मिर प्रश्न हे आज आग्रहाचे किंवा तणाव कायम ठेवण्याचे मुद्दे आहेत. दोन्ही देश आपली बाजू सोडून चर्चेच्या माध्यमातून प्रश्न सोडविण्याच्या तयारीत नाहीत.

**(अ) काश्मिर प्रश्न – आणि भारत–पाक संबंध :**

भारत–पाकिस्तान या दोन्ही देशामध्ये तणाव निर्माण करणारा सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे 'काश्मिरचा प्रश्न' होय. मालमत्तेचा अधिकार व नद्यांच्या पाणीवाटपाचा प्रश्न या दोन्ही देशांनी तातडीने आपापसात करार करून सोडवण्यात आला आहे. पण भारत–पाक संबंधात काश्मिरचा प्रश्न हा सततचा वादाचा प्रश्न राहिलेला आहे. संयुक्त राष्ट्र संघासमोरही प्रथमपासून हा प्रश्न आहे, पण त्याबाबत आजपर्यंत कोणतीही तडजोड होऊ शकलेली नाही. फाळणीपूर्वी राजा हरिसिंग यांनी भारत किंवा पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांत सामिल न होता काश्मिर संस्थान स्वतंत्र रहावे यासाठी प्रयत्न केला. दोन्ही राष्ट्रांच्या सरकारांशी हरिसिंगांने 'जैसे थे'चा करारही केला. पण मुस्लीम बहुसंख्य असलेला प्रदेश अपेक्षेप्रमाणे पाकिस्तानात न आल्याने आणि भारताचे काश्मिरबाबत ३७० च्या कलमाअंतर्गत विशेष घटक राज्याचा दर्जा देऊन कायदेशीरदृष्ट्या संघराज्यात विलीनीकरण केल्यामुळे आजपर्यंत काश्मिरचा प्रश्न निर्माण झालेला दिसून येतो.

शीतयुद्धाचा फायदा घेऊन पाकिस्तानने बड्या राष्ट्रांच्या लष्करी संघटनेमध्ये सहभागी होऊन अमेरिका, चीन या राष्ट्रांच्याकडून आर्थिक मदतीबरोबरच शस्त्रास्त्रे मिळवली. या शस्त्रास्त्रांच्या बळावर १९६५ साली पाकिस्तानचे राष्ट्रपती आयुब खान यांनी भारतावर आक्रमण व घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला पण त्यांना माघार घ्यावी लागली. इ. स. १९६५ च्या युद्धात पाकिस्तानचा पराभव झाला तेव्हा सोव्हिएत संघामार्फत मध्यस्थी करण्यात येऊन भारत व पाकिस्तान यांच्यात ताश्कंद करार करण्यात आला.

१९६५ च्या युद्धकाळात भारत–पाक शस्त्रसंधीचे आणि ताश्कंद कराराचे पालन पाकिस्तानकडून केले गेले नाही. याच दरम्यान पाकिस्तानमध्ये सीया व सुन्नी या प्रथांच्या नेतृत्त्वावरून बांग्लादेशाचा प्रश्न निर्माण झाला. या पाकिस्तानातील अंतर्गत संघर्षामुळे भारतामध्ये बांग्लादेशी निर्वासितांचा प्रश्न निर्माण झाला. पाकिस्तानने याच काळात म्हणजे १९७१ मध्ये पुन्हा आक्रमण केले. या युद्धातही पाकिस्तानचा दोन्ही आघाड्यावर पराभव झाला व स्वतंत्र बांग्लादेशाची निर्मिती झाली. या युद्धानंतर भारत व पाकिस्तानमध्ये शांतता व सहकार्य नांदावे यासाठी भारताने पुढकार घेऊन पाकिस्तान बरोबर 'सिमला करार' घडवून आणला. भारताने या युद्धात मिळवलेला भूप्रदेश व युद्ध कैदी पाकिस्तानच्या ताब्यात दिले. या कराराने भारत–पाक संबंधात नवा अध्याय सुरू झाला. या करारानुसार या दोन राष्ट्रांमधील प्रश्न परस्परांत वाटाघाटी करून शांततामय मार्गाने सोडवण्याचे मान्य करण्यात आले. दोन्ही राष्ट्रांत शांततामय सहजीवनावर व दुसऱ्या देशाच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करण्याच्या तत्त्वावर विश्वास व्यक्त करण्यात आला. त्यानंतर दळणवळण, सांस्कृतिक, वैज्ञानिक व आर्थिक क्षेत्रात परस्पर सहकार्य करण्याचे अनेक नवीन करार करण्यात आले. सिमला करारामुळे दोन्ही देशातील संबंधामध्ये फारसा फरक पडला नाही. पण पुढील २० वर्षांच्या काळात या दोन्ही देशामध्ये युद्धासारखा प्रसंग उद्‌भवला नाही. म्हणजेच या दरम्यानच्या काळात दोन्ही देशातील तणाव कमी होता.

काश्मिरबाबत आक्रमक धोरण स्विकारण्याची संधी पाकिस्तानला १९९० नंतर मिळाली. कारण या काळात सोव्हिएत रशियाचे विघटन झाले होते. अरब राष्ट्रांनी पाकिस्तानला शस्त्रास्त्र खरेदीसाठी मदत केली, अफगाणिस्तानात पाकिस्तानच्या मदतीने अमेरिककेने तालिबान राजवटीस प्रोत्साहन दिले होते. महत्त्वाचे

म्हणजे काश्मिरमध्ये फारुक अब्दुला सरकार विरोधात निदर्शने केली. या तणावाचा किंवा संघर्षाचा फायदा पाकिस्तानने उठवण्यासाठी प्रयत्न सुरू केला. त्यामध्ये प्रामुख्याने आत्मघातकी व कडव्या दहशतवाद्यांना पाठवून तेथील स्थानिकांमध्ये अस्वस्थता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. काश्मिरमधील फुटीरवादी संघटनांच्या चळवळींना पाठींबा देऊन त्याला शस्त्रास्त्रे पुरविण्यात येवू लागले. अशा संघटनामध्ये आत्मविश्वास निर्माण करून भारत विरोधी गटांना संघटीत करणे. राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या व त्याच्या आधारे काश्मिरी जनतेसाठी जगभरातील लोकांचा व विशेषत: इस्लामी देशातील लोकांचा पाठींबा मिळविणे इत्यादी प्रयत्न पाकिस्तानने सुरू केले. या सर्वांसाठी पाकिस्तानने छुप्या युद्धाचा, दहशतवादाचा, आत्मघातकी हल्ल्याचा व भारतीय अर्थव्यवस्था खच्ची करण्याचा प्रयत्न सुरू केला. थोडक्यात, १९९० नंतर पाकिस्तानने प्रत्यक्ष युद्धाचा प्रयत्न न करता छुप्या युद्धाचा किंवा दहशतवादाचा पाकिस्तान भारताविरुद्ध वापर करीत आहे, केला आहे.

### (ब) दहशतवाद आणि भारत–पाक संबंध :

भारत–पाकिस्तान यांच्यामध्ये उग्र स्वरूप धारण केलेला संबंध किंवा प्रश्न म्हणजे दहशतवाद होय. दहशतवाद म्हणजे अमूलाग्र राजकीय किंवा सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने शासनावर दबाव आणण्यासाठी हिंसाचाराचा अवलंब होय. थोडक्यात, सरळसरळ शस्त्रास्त्र न स्विकारता किंवा सैन्याशी युद्ध न करता सामान्य नागरिकात हल्ले व दहशत पसरवून आपल्या हिताची जोपासना करणारी संघटना किंवा सक्रिय गट म्हणजे दहशतवाद होय. भारत–पाकिस्तान संबंधामध्ये तणाव निर्माण करणारा घटक म्हणजे दहशतवाद होय. धार्मिक मूलतत्त्व वादातून दहशतवाद ही संकल्पना उदयास आली. भारत–पाक यांच्यामध्ये १९६५ व १९७१ साली दोन मोठी युद्ध लढली गेली. या युद्धामध्ये लाखो सैनिक सामील झाले व हजारो सैनिक मृत्यूमुखी पडले. या युद्धातून पाकिस्तानला पराभव पत्करावा लागला. याची सल पाकिस्तानमध्ये होती आणि याचदरम्यान पाकिस्तानमध्ये लष्करांनी आपली सत्ता स्थापन केली होती. त्यातून या पराभवाचा वचपा काढण्यासाठी भारतात दहशतवादी कारवाया करण्यास सुरवात केली. १९९३ मुंबई बॉम्बस्फोट, २००१ मध्ये संसदेवरील दहशतवादी हल्ल्यापर्यंत आणि २००८ च्या ताज हॉटेलवरील हल्ल्यापर्यंत मजल मारली. २००१ मधील अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ल्यामुळे तर जागतिक स्तरावर दहशतवादाचे भयावह रूप जगासमोर आले. पाकिस्तानच्या आय.एस.आय. संघटनेच्या माध्यमातून अनेक दहशतवादी संघटना स्थापून (उदाहरणार्थ, लष्कर–ए–तोएबा, हिजबुल मुज्जाहीद्दीन) भारतामध्ये दहशतवादी कारवायास सुरूवात केली. त्यामुळे भारत–पाकिस्तानमध्ये तणाव किंवा संघर्ष निर्माण होण्यास दहशतवाद कारणीभूत ठरत आहे.

### (क) भारत–पाकिस्तान संबंधात सुधारणा :

१९९० नंतर भारत–पाकिस्तान संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. भारत–पाकिस्तानमध्ये संबंध सुधारण्यासाठी १९९० च्या जुलै महिन्यात इस्लामाबाद येथे भारत–पाक परराष्ट्र सचिवाची बैठक झाली आणि सीमेवरील लष्करी हलचालीबाबत माहिती देण्याचे मान्य करण्यात आले. त्यानंतर वाजपेयी यांनी १९९९ मध्ये लाहोर यात्रा केली. लाहोर बसयात्रा सुरू केली आणि संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. यामध्ये वाजपेयींची भूमिका अशी होती की, या बसयात्रेच्या माध्यमातून भारत–पाकिस्तानातील लोकांच्या मध्ये दळणवळण

वाढेल, त्यांच्यामध्ये संवाद सुरू होईल आणि दोन्ही देशातील जनतेमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण होईल. पण पाकिस्तानने याचा गैरवापर केला आणि कारगीलवर आक्रमण केले. या युद्धात भारताने 'विजय ऑपरेशन'च्या माध्यमातून पाकिस्तानचा पराभाव केला आणि यातून पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. त्यामध्येच पाकिस्तानने कंदहार येथे भारताचे विमान अपहरण केले. त्यामधील प्रवाशांचे प्राण वाचवण्यासाठी काही भयानक दहशतवाद्यांना सोडावे लागले. त्यानंतर भारत-पाक संबंधात तणाव निर्माण झाला.

२००१ नंतर मात्र जगाच्या राजकारणात बदल झाला. २००१ च्या अमेरिकेतील 'दहशतवादी' हल्ल्यानंतर अमेरिकेने दहशतवादाविरुद्ध मोहीम उघडली. त्यामुळे पाकिस्तानसमोर धर्मसंकट उभे राहिले व अमेरिकेकडून पाकिस्तानला मिळणारी मदत कमी झाली आणि भारत-पाक संबंधामध्ये सुधारणा होण्यासाठी अमेरिकेने पाकिस्तानवर दबाव आणण्यास सुरुवात केली. त्यातूनच मुशर्रफ व वाजपेयी यांच्यात आग्रा परिषद झाली. पण ही परिषद अयशस्वी झाली. पुढे वाजपेयी सरकारने जम्मू-काश्मिरमध्ये युद्ध विरामाची घोषणा केली. हुरीयत कॉन्फरन्स या फुटीरवादी संघटनेशी चर्चा करण्याचे धोरण स्वीकारले. २००४ मध्ये डॉ. मनमोहन सिंग सरकारने ही वाजपेयी यांनी शेजाऱ्याची शांतता प्रस्थापित करण्याचे जे धोरण अवलंबिले होते त्या धोरणाचा पाठपुरावा करण्याचे ठरविले. त्यानंतर भारताचे परराष्ट्रमंत्री नटवरसिंग पाकिस्तान दौऱ्यावर गेले. त्यांनी श्रीनगर-मुझफ्फराबाद बससेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला, पण त्याचवेळी काही दहशतवादी संघटनांनी श्रीनगर येथील टुरिस्ट सेंटरवर हल्ला केला. तरीसुद्धा भारतीय पंतप्रधानांनी बससेवा सुरू ठेवली. त्यानंतर सचिव पातळीवर अनेक चर्चेच्या फेऱ्या पार पडल्या. त्यातून शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. तसेच परवेझ मुशर्रफ यांनीही भारत-पाक संबंध सुधारण्यासाठी अनेक पावले उचलली. त्यातूनच मुशर्रफ-मनमोहन सिंग यांच्यात शिखर परिषद झाली. त्याच्यात अनेक विषयावर चर्चा झाली. या चर्चेबाबत दोन्ही नेत्यांनी समाधान व्यक्त केले. त्याचवेळी पाकिस्तानमधून मुशर्रफ यांची पंतप्रधान पदावरून हकालपट्टी करण्यात आली. त्यानंतर भारत-पाक संबंधात काही प्रमाणात सुधारणा झाली. थोडक्यात, मनमोहन सिंग यांनी भारत-पाकिस्तान संबंध सुधारण्याचा व दोन्ही देशात शांतता प्रस्थापित होण्यासाठीचे प्रयत्न केले. पण पाकिस्तानकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद न मिळता दहशतवादी कारवाया सुरू राहिल्या.

**(ड) २०१४ नंतरचे भारत-पाक संबंध :**

भारतात भाजपा सरकार सत्तेवर आल्यापासून भारत-पाकिस्तान संवाद प्रक्रिया पुन्हा सुरू होण्याच्या दृष्टीने सकारात्मक पावले उचलली जात आहेत. या सरकारने सत्ता स्थापन केल्यापासून परराष्ट्र धोरणावर अधिक भर दिला आहे. कारण या सरकारला परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून आर्थिक विकास साधायचा आहे आणि आर्थिक विकास साधताना देशात शांतता व सहकार्य हवे. यामुळे मोदी सरकारने दक्षिण आशियाई देशांशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी या देशांना आपल्या शपथविधी सोहळ्याला आमंत्रित केले होते. त्यावेळी पाकिस्तानचे पंतप्रधान नवाज शरीफ हजर होते. त्यानंतर त्यांनी पाकिस्तानबरोबर संवाद साधून द्विपक्षीय समस्या सोडवण्याचे पाकिस्तानला आवाहन केले होते. त्या आवाहानानुसार पहिली सचिव पातळीवरील बैठक आयोजित केली होती, पण ती निष्फळ ठरली. सुषमा स्वराज यांनीही पाकिस्मान दौऱ्यावर जाऊन अनेक

बाबतीत करार करून संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. शरीफ व मोदी यांची सार्क परिषद, पॅरिस परिषद या माध्यमातून भेट होत आहे. त्यातून संवाद साधण्याचे व भारत-पाक संबंध सुधारण्यावर भर देत आहेत. एकूणच दोन्ही देशामध्ये सकारात्मक चर्चा होत आहे. येत्या काळात दोन्ही देशा दरम्यान पुन्हा संवाद प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे आणि ते आवश्यकताही आहे. कारण हे दोन्ही देश अण्वस्त्रधारी आहेत तसेच दोन्ही देशांच्या सीमा परस्परांना लागून आहेत, अशा स्थितीत परस्परांशी संवाद नसणे या दोन देशासाठी नव्हे तर दक्षिण आशिया देशासाठी धोकादायक आहे.

**नरेंद्र मोदींचे परराष्ट्र धोरण आणि पाकिस्तान संबंध :**

सन २०१४ मध्ये भारतीय जनता पार्टीचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार स्थापन झाल्यापासून शेजारी देशाबरोबर संबंध वाढवण्यावर जास्त भर दिला. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे अनेक मित्र असावेत हा त्यामागचा हेतू होता. पंतप्रधान पदाच्या शपथविधीसाठी शेजारी देशाच्या (सार्क संघटनेचे सदस्य राष्ट्रे) प्रमुखांना निमंत्रीत करून मोदींनी आपल्या मैत्री मोहीमेची सुरवात केली. पूर्व आणि आग्नेय आशियातील देशांशी संबंध सुधारण्यासाठी पूर्वीच्या सरकारच्या लुकईस्ट पॉलीसीच्या पुढे जाऊन 'ॲक्ट ईस्ट' धोरण स्विकारले. 'नेबरहूड फस्ट' म्हणजेच 'शेजारी पहिले' या परराष्ट्र धोरणाचा पुरस्कार करून सरकारने पाकिस्तान, बांग्लादेश, श्रीलंका, म्यानमार इत्यादी शेजारी देशांशी मैत्री मोहीमेची सुरवात केली. पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील कार-को-र्दिया बेटाचा विचार केला तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगातील राष्ट्रसोबत संघर्ष टाळून शांतीप्रक्रियेची सुरुवात केली. वेगवेगळ्या देशांसोबत मैत्री करार करून आशियात आणि आशियाबाहेर संपूर्ण जगात मैत्री करण्यासाठी हात पुढे करत भारत देश एक उदयोन्मुख शक्ती म्हणून पुढे येत आहे, असे दिसते.

डिसेंबर २०१५ मध्ये भारतीय परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज्य यांनी शांततामय शेजार हा भारताच्या धोरणाचा भाग असल्याचे सांगून पाकिस्तान दौरा केला. या दौऱ्यामध्ये भारत-पाकिस्तान यांच्यात संवादाची प्रक्रिया पुन्हा सुरू करण्याची मान्यता दिली. दहशतवादाशी संबंधित मुद्दे दोन्ही देशांशी चिंतेचा विषय असून दहशतवाद मुद्द्यासह सर्व प्रलंबित मुद्दे निकालात काढण्याचा प्रयत्न करण्यासाठी संवाद हाच मार्ग असल्याची भारताची भूमिका आहे. पण पाकिस्तान त्याला प्रतिसाद न देता कायमपणे कुरघोडी करताना दिसतो. त्यातील महत्त्वाचा हल्ला म्हणजे 'पठाणकोठ हल्ला' होय. २०१६ च्या सुरवातीलाच पाकिस्तानने पठाणकोटमधील हवाई दलाच्या तळावर दहशतवादी हल्ला करून भारत-पाकिस्तान यांच्यातील संवादाला खिळ घातल्याचे दिसून येते. २ जानेवारी २०१६ रोजी पहाटे ३.३० वाजता पठाणकोटच्या भारतीय हवाई स्टेशनवर पाकिस्तान दहशतवाद्यांनी हल्ला केला. या हल्ल्यामध्ये भारताचे २ जवान मारले गेले. या हल्ल्याची जबाबदारी जैश-ए-मोहम्मद या दहशतवाद्यांनी घेतली. या हल्ल्याचा परिणाम म्हणजे भारताच्या पंतप्रधानांनी याची निंदा करून पाकिस्तान भारताच्या विकासाला खीळ घातल्याचा उच्चार केला आणि १५ जानेवारी २०१६ ला विदेशी सचिव पातळीवरील वार्ता/चर्चा रद्द केली आणि पाकिस्तानने या दहशतवादी संघटनेवर बंदी घालावी, दहशतवाद संपवण्यासाठी पाकिस्तानने मदत करावी, अशी आशा व्यक्त केली. इंटरपोलने जैश-ए-मोहम्मद या प्रतिबंधीत दहशतवादी संघटनेचा म्होरक्या मसूद अझहर आणि त्याचा भाऊ अब्दुल रऊफ यांच्या विरोधात नव्याने रेड कॉर्नर नोटीस बजावली.

३ मार्च २०१६ रोजी भारतीय नौदलाचा अधिकारी कुलभूषण जाधव यांना पाकिस्तानच्या सुरक्षा यंत्रणांनी गुप्तहेर आणि दहशतवादी कारवायाच्या आरोपाखाली अटक केली होती. त्यानंतर पाकिस्तान कोर्टाने जाधव यांना मृत्यूदंडाची शिक्षा दिली होती. यासाठी भारताने या दाव्याचा विरोध करून त्याच्या सुटकेसाठी प्रयत्न केले. जम्मू-काश्मीर संदर्भात अनुच्छेद ३७० आणि कलम ३५ रद्द केल्यानंतर काश्मीरच्या संभाव्य प्रादेशिक पुनर्रचनेमुळे भारत-पाकिस्तान उभय देशांमधील संघर्ष किंवा वैरभाव शिगेला पोहचला. २०१९ मध्ये ५१३३ वेळा पाकिस्तानने शस्त्रसंधीचे उल्लंघन केले असून यामध्ये ४६ जवानांचा मृत्यू झाला होता आणि २०२१ मध्ये फेब्रुवारी अखेर या देशाने २९९ वेळा शस्त्रसंधीचे उल्लंघन केले. त्यामुळे फसवणूक हा पाकिस्तानच्या परराष्ट्र धोरणाचा भाग असल्याचे दिसून येते.

नरेंद्र मोदी सरकार यांनी शेजारील देशाबरोबर कायमच विकास आणि शांततेसाठी सक्षम वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी घेवून कार्य केले, पण पाकिस्तान आणि पाकिस्तानातील सरकार शाश्वत शांततेच्या दिशेने पाऊल उचलताही उचलत नाही. तरीसुद्धा भारत-पाकिस्तान देशादरम्यान सचिव पातळीवर चर्चा करून शस्त्रसंधी, दहशतवादी कारवाया, व्यापार आणि शांतता पाऊले उचलत आहे. पण हे प्रयत्न अल्पायुषी ठरत आहेत. उरी येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर सिमेपलीकडे सर्जीकल स्ट्राईक (२०१६ मध्ये उरीमधील दहशतवादी हमल्यानंतर सर्जीकल स्टाईक, फेब्रुवारी २०१९ मधील पुलवामा दहशतवादी हल्ल्यानंतर एअर स्ट्राईक आणि २०२० मध्ये भारतीय तोफांचा सर्जीकल स्ट्राईक) करून आणि दोन वर्षापूर्वी झालेल्या पुलवामा दहशतवादी हल्ल्यानंतर बालाकोटवर हवाई हल्ले चढवून पाकिस्तानबरोबर कठोर नीती अवलंबली आहे. चर्चा आणि दहशतवाद एकत्र नांदू शकत नाहीत, हे स्पष्ट करत भारताने त्यावर लाल रेष ओढली आहे आणि प्रत्यक्ष हल्ला चढवीत भारताने नवा दृष्टिकोन अवलंबला आहे.

शत्रूकडून संभाव्य दहशतीचा धोका निर्माण झाला तर शत्रुच्या हल्ल्याचा धोका ओळखून भारत शत्रूवर पूर्वोक्ष हल्ला (प्री-इम्प्रूव्हल स्ट्राईक) चढवण्यास मागेपुढे बघणार नाही. प्रत्युत्तदाखल भारत केवळ जमिनीवरून नाही तर हवाई हल्ले करेल, असा स्पष्ट संकेत भारताने पाकला दिला आहे. भारताकडून दहशतवादी हल्ले रिचवले जातात, प्रत्युत्तर दिले जात नाही, याची पाकिस्तानला सवय झाली होती. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ही खेळी पुरती उलटली. भारत स्टार्ट अप इंडिया, मेक इन इंडियाच्या माध्यमातून देशाचा विकास साधण्यासाठी प्रयत्न करत आहे. त्याचाच भाग म्हणून 'शेजारी पहिले' हा धोरणाचा मुख्य मुद्दा समोर ठेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तान सोबत मैत्री आणि शस्त्रसंधी करून सीमा भागात शांतता प्रस्थापित करीत आहेत. पण पाकिस्तानकडून तशा प्रकारचा प्रतिसाद मिळत नाही. फक्त दहशतवादी हल्ले आणि शस्त्रसंधीचे उल्लंघन होत असते, म्हणून मोदी सरकारने जशास तसे उत्तर देवून एका बाजूला सचिव पातळीवर द्विपक्षीय वाटाघाटी तर दुसऱ्या बाजूला लष्करी कारवाईचे धोरण अवलंबिले आहे. असे असले तरी मोदींच्या मते, 'शाश्वत विकासासाठी देशात आणि सिमावर्ती भागात आणि शेजारी देशादरम्यान शांतता, सहकार्य आणि विश्वास या त्रिसूत्रीची गरज आहे.'

### ३.२.२ स्वयं अध्ययन प्रश्न :

**(अ) गाळलेल्या जागा भरा.**

१. पाकिस्तानची निर्मिती .......... साली झाली.

२. भारत-पाकिस्तान सीमारेषा निश्चित करणाऱ्या रेषेला .......... म्हणतात.

३. भारत व पाकिस्तान यांच्यातील .......... हे वादग्रस्त मुद्दे आहेत.

४. .......... साली पाकिस्तानने भारतावर सर्वप्रथम आक्रमण केले.

५. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथविधीला .......... हे पाकचे पंतप्रधान आले होते.

६. सध्या .......... हे पाकिस्तानचे पंतप्रधान आहेत.

### ३.२.२ भारत-बांग्लादेश संबंध (India - Bangladesh) :

भारताचा दक्षिण आशियातील दुसरा महत्त्वाचा शेजारी देश म्हणजे बांग्लादेश होय. भारत-बांग्लादेश सीमा ही स्थानिक सीमा आंतरराष्ट्रीय सीमा (खइ) म्हणून ओळखली जाते. भारत-बांग्लादेश यांच्यात असणारी आंतरराष्ट्रीय सीमा ही बांग्लादेश आणि भारतीय राज्यांच्या आठ (८) राज्यांची सिमा ठरविते. भारत बांग्लादेश या दोन्ही देशामधील सीमा ही भारताच्या दक्षिण आशियातील शेजारी देशांच्या पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ, म्यानमार, भुतान या राष्ट्रांच्यापेक्षा अधिक लांबीची आहे. बांग्लादेश आणि भारत यांच्यातील सीमा ४०९६ कलोमीटर लांबीची (२५४५ मैल) असून जगातील देशाच्या वेगवेगळ्या देशांच्या सिमांचा विचार करता भारत-बांग्लादेश सीमा ही जगातील पाचवी सर्वांत मोठी सीमा आहे. त्यामध्ये २६२ कि. मी. आसाम, ५८६ कि. मी. त्रिपुरा, ३१८ कि. मी. मिझोराम ४४३ कि. मी., मेघालय आणि २२१७ कि. मी. पश्चिम बंगालच्या राज्यसीमांचा समावेश आहे. बांग्लादेशाच्या राज्यांचा विचार करता मय्यमसिंग, खलना, राजशाही, रंगपूर, सिलेहट आणि पाटगाव या राज्याच्या सिमा भारताला लागून आहेत. या दोन्ही देशांच्या सीमा लोखंडी कुंपनांनी बंदिस्त केलेल्या आहेत. द्विराष्ट्र सिद्धांताच्या आधारावर १४ ऑगस्ट १९४७ रोजी पाकिस्तानची निर्मिती झाली. पाकिस्तानचा पूर्व विभाग म्हणजेच १९७१ ला स्वतंत्र झालेला 'बांग्लादेश' देश होय. १ ऑगस्ट १९४७ रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यात विभाजन ठरल्यानंतर सर सिरील रॅडक्लिफ यांनी या दोन्ही देशांमधील सीमा सीमांकन केले म्हणून या सीमारेषेला रॅडक्लीफ लाईन म्हटले जाते. त्याच नावाने भारत-बांग्लादेश सीमा ओळखली जाते.

#### (अ) बांग्लादेश निर्मिती आणि भारत :

१९४७ पासून पाकिस्तानचा एक प्रांत व पुढे स्वतंत्र बांग्लादेशाच्या १९७१ मधील उदयापर्यंतचा इतिहास हा पाकिस्तान मधील धार्मिक असंतोषाचा एक इतिहास आहे. १९४७ ला स्वातंत्र्य झालेल्या पाकिस्तानमध्ये पूर्व आणि पश्चिम पाकिस्तान अशी विभागणी होती. या दोन्ही विभागामध्ये धार्मिक समानतेशिवाय कोणताही दुवा नव्हता. १९४७ नंतरचा पाकिस्तान हा एका अर्थाने कृत्रीम देश होता. कारण त्यामध्ये पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान अशी अंतर्गत धगधगती आग होती. या असंतोषाच्या मुळाशी बांग्लादेशाच्या सांस्कृतिक परंपरा, रूढी, श्रद्धा, न्याय आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे राजकिय आकांक्षाची पाकिस्तानी राज्यकर्त्यांनी केलेली अपेक्षाच दिसत होती. प्रथमपासून पाकिस्तानचे नेतृत्त्व येथील उच्चभ्रू, उच्चवर्णीय आणि प्राय पश्चिम

आशियातील मुसलमानाचे वंशज असल्याचा दावा करणाऱ्या सीमा मुस्लीम अशरफाकडे वर्षानुवर्ष नेतृत्त्व होते. तत्कालीन पूर्व पाकिस्तानची भाषा बंगाली तर पश्चिम पाकिस्तानची उर्दू भाषा होती. 'भाषा' हा घटकही पूर्व व पश्चिम पाकिस्तान यांच्यातील संघर्षासाठी एक महत्त्वाचा मुद्दा होता. १९४६ च्या सुरवातीला पाकिस्तानमध्ये निवडणुका झाल्या. यावेळी देशात फक्त सुशिक्षित व जमीनदार असणाऱ्या १५ टक्के लोकांनाच मतदानाचा अधिकार होता. त्यामुळे उच्चशिक्षित व जमीनदार असणाऱ्या अशरफ मुस्लीमांचाच प्रभाव राजकारणावर होता. पाकिस्तानावर जीनांची पकड घट्ट असल्यामुळे निवडणुकात मुस्लीम लिगला नेत्रदिपक यश मिळाले.

१९४६ च्या यशानंतर दिल्लीतील खास अधिवेशनात जीनांच्या सुचनेवरून सुहरावर्दी या बंगाली नेत्याने १९४० चा लाहोर ठराव दुरुस्त करून दोन पाकिस्तान ऐवजी एक पाकिस्तानचा सिद्धांत मांडला आणि पूर्वनियोजित प्रकारे बंगाली मुस्लीम जनतेला आंधारात ठेवून पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान असे एक संयुक्त पाकिस्तान जीनांनी साकार केले. अखंड पाकिस्तानात ५६ टक्के एवढी विशाल संख्या असणाऱ्या पूर्व पाकिस्तानी नेत्यांनी पूर्व बंगाली पाकिस्तानींना राष्ट्रीय प्रवाहात सामिल करून घेण्याऐवजी द्वेष, अन्याय, अत्याचार करण्यास सुरवात केली. भाषेच्या माध्यमातून प्रथम असंतोष निर्माण झाला. बंगाली भाषेला अधिकृत राजभाषा म्हणून मान्यता मिळावी म्हणून ६ वर्षे लढाई केल्यावर १९५४ ला बंगालीला राजभाषेचा दर्जा मिळाला. पुढे १९५५ मध्ये पूर्व व पश्चिम अशी पाकिस्तानची पुनर्रचना होवून पाकिस्तानच्या राष्ट्रीय विधान सभेत समान प्रतिनिधित्व देण्यात आले. तरीही असंतोष कमी झाला नाही. बंगाली चळवळीचे नेतृत्त्व शेख मजबुर रहमान यांच्या अवामी लिगने केले आणि त्यांनी बंगाली स्वातंत्रतेची मागणी केली. डिसेंबर १९७० मधील राष्ट्रीय निवडणूकात राष्ट्रीय विधानसभेत अवामी लिग या पक्षाला बहुमत प्राप्त झाले. त्यानुसार पाकिस्तानचे पंतप्रधान या पक्षाचे शेख मजबुर रहमान यांना मिळावयास हवे होते, पण त्यावेळचे राष्ट्राध्यक्ष जनरल आयुबखान यांनी भुट्टो यांना पंतप्रधान बनवण्याचा प्रयत्न केला. शेख रहमान यांना पंतप्रधान पदापासून या दोघांनी रोखले आणि पूर्व पाकिस्तानात दडपशाही सुरू केली. पाकिस्तानच्या या दडपशाही विरुद्ध वंगभंग या बंधुनी मुक्तीवाहीनीच्या माध्यमातून बांग्लादेशाचा स्वातंत्र्य लढा मानून जिद्दीने पेटलेल्या बंगाली लोकांनी स्वातंत्र्य मिळवले. भारताची भूमिका बांग्लादेशाच्या स्वातंत्र्यात महत्त्वाची राहिल्याने सहाजिकच बांग्ला देशाच्या रूपाने नविन राष्ट्र अस्तित्वात आल्यानंतर दोन्ही देशामधील संबंध मैत्रिपूर्ण, सहकार्याचे राहिले आहेत. १९७१ ला बांग्लादेशाला एक राष्ट्र म्हणून मान्यता देणारे पहिले राष्ट्र म्हणजे भारत होय. आणि त्या राष्ट्रासोबत राजनैतिक संबंध प्रस्थापित करणारे राष्ट्र म्हणून भारताचा उल्लेख केला जातो. बांग्लादेशाला भारत नेहमी हा आपला नैसर्गिक मित्र वाटत आला आहे. उभय देशांच्या मैत्रीचा आधार, विश्वास आहे आणि त्यामुळेच दोन्ही देशातील संबंध अतिशय जवळचे आहेत.

भारत आणि बांग्लादेश यांच्यातील संबंध हे दक्षिण आशियातील इतर राष्ट्राप्रमाणे सभ्यता, संस्कृती, सामाजिक आणि आर्थिक विषयासंदर्भात आहेत. याच्या व्यतिरिक्त दोन्ही देशामध्ये संबंध दृढ करण्यास पुढील गोष्टी महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे दोन्ही देश एका सूत्रात बांधले गेले आहेत. पहिले सूत्र म्हणजे देशाचा इतिहास, एक विरासत भाषा, संस्कृती यांचा संबंध, संगीत आणि कला बाबत दोन्ही देशातील लोकांचे प्रेम,

स्वातंत्र्यता संग्राम आणि मुक्तीसाठी भारताने दिलेले योगदान या सर्व दृष्टिकोनातून भारत-बांग्लादेश आंतरिक-भावनिक मातृभाव/भातृवत भावानुसार स्वत:ला अनुभव करत आहेत. या दोन्ही देशामध्ये कायमस्वरूपी वेगवेगळ्या स्तरावर संबंध प्रस्थापित झालेले दिसून येतात. उच्चस्तरीय आदान प्रदान, यात्रा, सांस्कृतिक कार्यक्रम, योजना आणि व्यापार नियमित चालू आहे. याचबरोबर भारत-बांग्लादेश या दोन्ही देशातील व्यक्ती-व्यक्तीच्या संबंधात व्यापक स्वरूपात आंतरक्रिया किंवा संबंध असल्याचे दिसून येते. १९७१ पासून ते आजपर्यंत गेल्या पन्नास वर्षात भारतीय मिशन अंतर्गत शिक्षण, आरोग्य, उद्योगधंदे, व्यापार इत्यादी क्षेत्रात या दोन्ही देशामध्ये सहकार्याचे संबंध राहिले आहेत. याचा अर्थ असा नव्हे कि दोन्ही देशात कधीच तणाव निर्माण झाले नाहीत किंवा मतभेद निर्माण झाले नाहीत. बऱ्याचदा तणाव निर्माण झाले आहेत आणि त्यातून मार्गही काढण्यात आले आहेत. बांग्लादेशाच्या पंतप्रधान शेख हसिना आणि त्यांचा अवामी लीगशी भारताचे खूप जुने संबंध आहेत. त्यामुळे बांग्लादेशात अवामी लीग सत्तेवर असणे भारताच्या दृष्टीने महत्त्वाचं आहे. माजी पंतप्रधान खालेदा जिया आणि त्यांचा पक्ष बांगलादेश नॅशनॅलीस्ट पार्टी (इछझ) जमात-ए-इस्लामी कट्टर धार्मिक पक्षाची मदत घेऊन अधून मधून भारताच्या विरोधात लोकांना भडकवण्याचा प्रयत्न करतात.

**(अ) उच्चस्तरीय संबंध :**

१९७१ च्या बांग्लादेश निर्मितीपासून अवामी लीगने कायदेभंगाची चळवळ सुरू केली. परिणामत: शेख मुजबीर रहमान आणि इतर नेत्यांना अटक करण्यात आली. लक्षावधी बंगाली मुसलमानावर अन्याय, अत्याचार सुरू केला. त्यामुळे त्या काळात लक्षावधी हिंदु-मुसलमान निर्वासित पाकिस्तानातून भारतात आश्रयाला आले. त्यावेळी भारताच्या पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांनी मानवतेच्या दृष्टिकोनातून या प्रश्नाकडे जाणिवपूर्वक लक्ष दिले. पाकिस्तानातील भारतात आलेली निर्वासित व पाकिस्तानातील होणारी दडपशाही पाहून भारताने या मुक्तीसंग्रामाला मदत करणे भाग पडले आणि शेवटी भारताने आपली शांतीसेना पाठवून युद्धाला सुरवात केली. शेवटी या युद्धात भारताचा विजय झाला. पाकिस्तानच्या सैन्यानी शरणागती पत्करली. २६ मार्च १९७१ रोजी स्वतंत्र बांग्लादेश प्रजासत्ताकाची घोषणा करण्यात आली. जानेवारी १९७२ ला पाकिस्तानचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष भुट्टो यांनी शेख मुजीव रहमान यांची मुक्तता केली आणि बांग्लादेशाचे पहिले पंतप्रधान म्हणून शेख मुजीब रहमान सत्तारूढ झाले. बांग्लादेशी युद्धात आपल्या शांतीसेनेच्या माध्यमातून ३ ते १६ डिसेंबर १९७१ दरम्यान धडक कारवाईने पाकिस्तान पराभूत झाले. प्रतिकूल लष्करी आणि आर्थिक स्थिती असतानाही आपत्तीवर मात करून भारताने इंदिरा गांधींच्या नेतृत्त्वाखाली परराष्ट्र धोरणाचे कसब दाखवत बांग्लादेश या स्वतंत्र राष्ट्राची मुहुर्तमेंढ केली. जगाच्या इतिहासातील मोठी शरणागती पाकिस्तानच्या नावे नोंदली गेली. या युद्धात भारतीय सैन्याच्या पॅराशूट रेजिमेंटने आणि मराठा रेजिमेंटने सहभाग घेतला होता. या लढाईचे नेतृत्त्व मेजर कुलदिपसिंग चांदपुरी यांनी केले होते.

**(ब) भारत-बांग्लादेश राजकीय संबंध :**

बांग्लादेश हे भारताच्या पूर्वेला असलेले बंगाली भाषिक मुस्लीम बहुल राष्ट्र आहे. १९४७ सालच्या अखंड भारताच्या फाळणीत पूर्व आणि पश्चिम अशा दोन भागांत पाकिस्तानची निर्मिती झाली. त्याचा पूर्व भाग

हा आजचा बांग्लादेश म्हणून ओळखला जातो. बांग्लादेशाच्या निर्मितीमध्ये बंगवधु मुजुबूर रहमान, इंदिरा गांधी आणि फिल्ड मार्शल यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. मुजुबुर रहमान यांच्या नेतृत्त्वाखाली पूर्व पाकिस्तानात सुरू असलेले स्वातंत्र्य आंदोलन आणि त्यांना मिळालेली इंदिरा गांधींची मदत यामुळे अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्राच्या सहकार्यानेसुद्धा पाकिस्तानला बंगाली लोकांचे आंदोलन रोखता आले नाही. जवळपास तीस लाख लोकांची हत्या करण्यात आली आणि दोन लाख बलात्कार अशी मोठी किंमत बांग्लादेशाला मोजावी लागली. आजपर्यंत गेल्या ५० वर्षांत भारत-बांगला देश संबंधात परराष्ट्र मंत्रालय स्तरावर मैत्रीपूर्ण आणि सहकार्याचे संबंध राहिले आहेत. प्रत्येक वर्षी भारत-बांगलादेश यांच्यामधील राजकिय, सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्टिकोनातून आदान प्रदान करण्यासाठी किंवा कार्यक्रम व योजनांच्या नियोजनासाठी उच्चस्तरीय सचिव पातळीवर आणि परराष्ट्र मंत्रालय पातळीवर नियमित बैठका होत असतात आणि कायमस्वरूपी दोन्ही देशाचे राष्ट्रीय हित लक्षात घेवून निर्णय घेतले जात असतात. त्यामध्ये प्रामुख्याने बांग्लादेशाच्या पंतप्रधान श्रीमती शेख हसिना यांच्या नेतृत्त्वाखाली १० ते १३ जानेवारी २०१० रोजी झालेली १२३ सदसिय प्रतिनिधी मंडळ यामध्ये शेख हसिना यांना २००९ चा 'इंदिरा गांधी शांती-निशस्त्रीकरण आणि विकास' पुरस्कार देण्यात आला. तसेच दोन्ही देशामध्ये आर्थिक वृद्धीकरण होण्यासाठी वेगवेगळे करार करण्यात आले. गुन्हेगार संबंधात परस्पर कायद्याचे सहकार्य, शिक्षा झालेल्या व्यक्तीचे हस्तांतरण, दहशतवादाचा सामना, अवैध्य औषधांची तस्करी, अपराधी कायदे आणि उर्जा व सांस्कृतिक क्षेत्रातील आदान प्रदानाबाबत व्यापक सहकार्य करार करण्यात आले. ७ ऑगस्ट २०१० ला भारताचे वित्तमंत्री, प्रणव मुखर्जींनी ढाक्याच्या भेटीत बँक संदर्भात वेगवेगळे करार केले. नोव्हेंबर २०१० मध्ये नवी दिल्लीत पंतप्रधान स्तरावर बैठक होऊन ऊर्जा, शिक्षण आणि दळणवळण या तिन्ही क्षेत्रातील करारावर समझोता झाला. विकासाचे काही करार करण्यात आले. त्याच्या अगोदर २००९ ची कॉंग्रेस सरकार अंतर्गत व्यापार द्विपक्षीय, आयात निर्यात, गुंतवणूक आणि संरक्षण सहकार्य करार, डॉ. मनमोहन सिंग व शेख हसीना २०१० ची द्विपक्षीय बैठक अशा वेगवेगळ्या बैठकांच्या आधारे भारत-बांग्लादेश यांच्यातील सामाजिक, राजकिय, आर्थिक, संरक्षण आणि व्यापार याबाबत निर्णय घेऊन संबंध प्रस्थापित केल्याचे दिसून येते.

**द्विपक्षीय व्यापार :**

बांग्लादेश दक्षिण आशियातील भारताचा सर्वांत मोठा व्यापारी सहकारी आहे. सर्वसाधारणपणे १९७१ पासून ते आजपर्यंतचा व्यापार आयात निर्यातचा विचार करता भारत-बांग्लादेश यांच्यातील व्यापारी संबंध अधिक मजबूत होते आणि आजदेखील आहेत, असे दिसून येते. भारत-बांग्लादेश यांच्यातील वस्तूंचा व्यापार २००४-०५ मध्ये निर्यात १४४.२० मिलीयन अमेरिकन डॉलर. आयात २०३०.०० मिलीयन अमेरिकी डॉलर २००५-०६ - २४१.९६ निर्यात, १८६४.७० आयात, २००६-०७ - २८९.४२ निर्यात २२६८ आयात, २००७-०८ - ३८८.०८ नियात, ३३६४.०० आयात, २००८-०९ - २७६.५८ निर्यात, २८४१.०६ आयात, २००९ - १०-३०४.६३ निर्यात ३२०२.१ आयात, २०१०-११ - १७४.५७ निर्यात १२४.९ आयात झालेली आपल्याला दिसून येते. (हे सर्व आकडे मिलीयन अमेरिकन डॉलरमध्ये आहेत.) यावरून आपल्याला भारत-बांग्लादेश यांच्यामधील किती मोठी व्यापारी भागिदारी आहे, हे दिसून येते. मागच्या दहा

वर्षाचा विचार करता दोन्ही देशातील व्यापारी क्षेत्रात खूप मोठी प्रगती झालेली दिसून येते. वित्तीय वर्ष २०१८-१९ मधील वर्षाचा विचार करता भारताकडून बांगलादेशाला ९.२१ लाख डॉलरची निर्यात झाली. तर १.२२ अरब डॉलरची आयात झाली आहे. भारत-बांग्लादेश यांच्यातील व्यापार सोयीस्कररित्या व्हावा, विनाअडथळा व्हावा यासाठी या दोन्ही देशांनी आशिया प्रांतात व्यापार करार (खऊढअ), सार्क अंतर्गत व्यापार करार, (डअझढअ) दक्षिण आशिया मुक्त व्यापार करार (डअऋढअ) यासारखे करार करून व्यापार वृद्धीसाठी प्रयत्न केलेला आहे. भारतातून बांग्लादेशामध्ये सकल प्रत्यक्ष विदेशी गुंतवणूक २०१४ मधील २४३.९१ मिलीयन अमेरिकी डॉलर वरून २०१८ मध्ये ती ५७०.११ मिलीयन अमेरिकन डॉलर झाली आहे यावरून भारत-बांग्लादेश व्यापारी संबंध कशा प्रकारचे होते हे दिसून येते. स्टार्टअप अंतर्गत बांग्लादेशानेही भारतामध्ये आपली गुंतवणूक वाढवली आहे. यामध्ये महिंद्रा आणि अदानी पोर्टचा समावेश आहे. भारतातल्या दूरसंचार, फार्मा, एफएमजीसी आणि अटोमोबाईल या क्षेत्रातील कंपन्यांनी बांग्लादेशात गुंतवणूक केली आहे. गेल्या आठ वर्षात भारताने आठ (८) अरब डॉलर चे कर्ज बांग्लादेशाला दिले आहे. याचबरोबर रेल्वे संपर्क, नद्यांचे विस्तारीकरण, पाईपलाईन, शिक्षण, आरोग्य, पाणी, संस्कृती, शहरी विकास करकालीन मदत आणि सामुदायिक विकास इत्यादीसाठी भारत-बांग्लादेशाला आर्थिक मदत करत आहे. थोडक्यात, वर्तमान काळात बांग्लादेश भारताचा सर्वात मोठा विकासाचा भागिदार आहे.

**(क) भारत-बांग्लादेश संघर्षाचे मुद्दे :**

इ. स. १९७१ मध्ये बांग्लादेशाची झालेली निर्मिती ही एकीकडे पाकिस्तानच्या द्विराष्ट्र सिद्धांताचा पराभव होता, तर दुसरीकडे भारताचा राजनैतिक विजय होता. अशा पार्श्वभूमीवर बांग्लादेशाची झालेली निर्मिती दक्षिण आशियाच्या राजकारणाच्या दृष्टीने किंवा भारतीय उपखंडाच्या राजकारणाच्या दृष्टीने दुरगामी परिणाम करणारी होती. पूर्व बंगलामध्ये भारताने सुरू केलेली लष्करी मोहीम अखंडपणे १५ दिवस चालली. या मोहीमेला यश येवून डिसेंबर १९७१ मध्ये स्वतंत्र बांग्लादेशाची निर्मिती झाली. बांग्लादेशाला एक स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र म्हणून मान्यता देणारा भारत पहिला देश आहे. एवढेच नाही तर बांग्लादेशाला संयुक्त राष्ट्रसंघटनेचे सदस्यत्व मिळावे, यासाठी भारताने प्रयत्न केले. स्वतंत्र बांग्लादेशाच्या निर्मितीनंतर १९७२ मध्ये भारत-बांग्लादेश दरम्यान २५ वर्षासाठीचा दिर्घकालीन असा १२ कलमांचा समावेश असलेला सहकार्य, मैत्री, व्यापार, दळणवळण आणि शांतता करार झाला. या कलामांतर्गत दक्षिण आशियामध्ये शांतता निर्माण करण्यासाठी परस्पर स्वातंत्र्य, सार्वभौमत्वाचा आदर, परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करण्याविषयीच्या तरतूदी होत्या. असे असले तरी भारत-बांग्लादेश यांच्यात अनेक प्रश्नावर वाद होते आणि अजूनही आहेत. पहिला वाद म्हणजे सिमारेषा निश्चित करणे किंवा सिमावाद. भारत आणि बांग्लादेश दरम्यान जवळजवळ ४००० कि. मी. पेक्षा अधिक लांबीची सिमारेषा आहे. ही सिमारेषा भारतातील त्रिपुरा, आसाम आणि मिझोराम या राज्यांना भिडलेली आहे. त्यामुळे भारत-बांग्लादेश यांच्या सिमारेषा अधोरेखीत करणे अवघड आहे. तसेच भारत आणि बांग्लादेश यांच्यातील सिमारेषा करारावर आसाम, मेघालय, मणीपूर, नागालॅण्ड, त्रिपुरा व पं. बंगाल राज्य सरकारांची मान्यता लागणार आहे. त्यामुळे उभय राष्ट्रामधील सिमारेषा ही एक मुख्य समस्या होती.

भारत-बांग्लादेश यांच्यातील आणखी एक वादग्रस्त प्रश्न म्हणजे गेल्या पन्नास (५०) वर्षात बांग्लादेशातून किंवा बांग्लोशाची सिमा ओलांडून आसाम, मेघालय व भारताच्या इतर राज्यात बेकायदेशीरपणे आलेल्या लोकांची संख्या लाखावर जाणारी आहे. १९७१ च्या दरम्यान बांग्लादेश निर्मितीच्या वेळी पाकिस्तानी लष्कराच्या अन्याय-अत्याचाराच्या भितीने बांगला नागरिक आत्मरक्षणासाठी मोठ्या संख्येने भारतात आले. त्यांना निर्वासित म्हटले जाते. ती एक समस्या भारत-बांग्लादेश यांच्यापुढे आहे. बांग्लादेश निर्मितीच्या वेळी आलेल्या निर्वासितांना भारत सरकारने मानवतावादी दृष्टिकोनातून देशात आश्रय दिला. पण नंतरही बांग्लादेशाच्या शासनाकडून अल्पसंख्याकांना मिळणारी वागणूक, त्यांच्यावरील अत्याचार, अन्याय, दारिद्र्य आणि बेकारीमुळे हे निर्वासित भारतात येत आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने 'चकमा' जातीच्या निर्वासितांचा समावेश आहे. पं. बंगालमध्ये अशा निर्वासितांची संख्या खूप आहे. सिमा निश्चित नसणे, असलेल्या तात्पुरत्या व्यवस्थेवरील चौक्या याचा गैरफायदा घेऊन बेकायदेशीर निर्वासित भारतात आश्रयाला येत आहेत. त्यामुळे निर्वासितांचा प्रश्न दोन्ही देशामध्ये तणाव निर्माण करीत आहे.

फराक्का धरणाचा प्रश्न हा बांग्लादेश निर्मितीच्याही पूर्वीपासून वादाचा असलेला प्रश्न. गंगा नदीच्या पाणी वाटपाचा वाद म्हणजे फराक्का धरणाचा वाद होय. पूर्वी तो पाकिस्तान आणि भारत यांच्यातील वाद होता. नंतर बांग्लादेशाच्या निर्मितीनंतर भारत-बांग्लादेश यांच्यामधील वाद बनबला. हा वाद मिटवण्यासाठी एका संयुक्त नदी आयोगाची स्थापना करून १९७५ रोजी एक करार झाला. या करारानुसार निश्चित प्रमणात पाणी वाटप झाले, पण नंतरच्या काळातील लष्करी सतेच्या स्थापनेनंतर हा करार बांग्लादेशाच्या हितसंबंधाविरोधी ठरवून अमान्य ठरवून तो प्रश्न  संयुक्त राष्ट्रसंघात नेण्याचा प्रयत्न केला. १९७७ ला परत या सांदर्भात चर्चेतून प्रश्न सोडवण्यासाठी एक करार केला. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी संयुक्त आयोग नेमला. या आयोगालाही फराक्का धरण आणि गंगा पाणी वाटाचा प्रश्न सोडवता आला नाही. तो तसाच राहिला होता.

बंगालच्या उपसागरात गंगा नदीच्या तोंडाशी १९७० मध्ये नैसर्गिक चक्रीवादळाने 'मूट' नावाचे बेट तयार झाले. हे बेट भारताच्या किनाऱ्यापासून ५.२ कि. मी. व बांगला देशाच्या किनाऱ्यापासून ७.६ कि. मी. अंतरावर आहे. 'मूट' नावाच्या या १.४ चौरस कि. मी. असणाऱ्या बेटावर १९८० मध्ये दोन्ही देशांनी हक्क सांगितला. त्यामुळे भारत-बांग्लादेशात या बेटाच्या मालकी हक्कावरून वाद सुरू झाला. हा वाद इतका चिघळला कि इ. स. १९८०-८१ मध्ये तो नाविक दलाच्या संघर्षात निर्माण होण्याची स्थिती निर्माण झाली होती. अर्थात, यावेळी प्रत्यक्षात कोणताही संघर्ष न होता दोन्ही देशांनी हा प्रश्न सामोपचाराने सोडवण्याचे मान्य केले.

तिस्ता नदीच्या पाण्याच्या वापराचा प्रश्नही भारत-बांग्लादेश यांच्या संदर्भात अस्तित्वात होता. गंगा, ब्रह्मपुत्रा आणि मेघना नदीनंतर तिस्ता नदी भारत व बांग्लादेश यांच्यातून वाहणारी चौथी मोठी नदी आहे. सिक्कीम मधून वाहात जाऊन ती बांग्लादेशात पोहचते. याची लांबी १२१ कि. मी. आहे. या नदीवर बांग्लादेशाची १४% जलसिंचन योजना अवलंबून आहे. या नदीच्या पाणीवाटपाबाबत तोडगा काढण्याचा प्रयत्न दोन्ही देशांनी केला. पण पं. बंगाल सरकारने तिस्ता नदीच्या पाणी वाटपामुळे बंगालच्या शेतकऱ्याचे

खूप नुकसान होणार आहे. उत्तर बंगालचे शेतकरी या नदीवरच आपली उपजीविका करतात. जर त्यांना पाणी कमी पडले तर प. बंगालमधील शेतकऱ्यांची तबाई होईल, असा इशारा देऊन या पाणीवाटपाला विरोध केला होता. थोडक्यात, तिस्ता नदीच्या पाणी वाटपाचा प्रश्नही भारत-बांग्लादेशात अस्तिवात होता.

**(ड) भारत-बांग्लादेश संबंध :**

वास्तविक बांग्लादेशाची निर्मितीच भारताच्या मदतीने व इंदिरा गांधीच्या पुढाकाराने झाली. त्या देशाच्या मनात याविषयी कृतज्ञेची भावना असणे अपेक्षित होते आणि तसे असल्याचे दिसून येते. १२ जानेवारी १९७२ ला शेख मुजुबुर रेहमान यांनी बांग्लादेशाची पंतप्रधान म्हणून सत्ता हाती घेतल्यानंतर १७ मार्च १९७२ रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी ढाका येथे शेख रेहमान यांची भेट घेतली. या भेटीत भारत-बांग्लादेश यांच्यात २५ वर्षाचा दीर्घ मुदतीचा मैत्री, सहकार्य, संरक्षण आणि शांतता करार झाला. आणि खऱ्या अर्थाने भारत-बांग्लादेश या देशा दरम्यान मैत्री संबंधाला किंवा राजनैतिक संबंधाला सुरवात झाली. इ. स. १९७२ ते १९७५ पर्यंतचा (बांग्लादेश) कालखंड हा बांग्लादेशाच्या उभारणीचा कालखंड धरला तर या कालखंडात भारत-बांग्ला देश यांच्यातील संबंध हे विविध क्षेत्रात सहकार्याचे व शांततेच्या स्वरूपाचे होते. यामध्ये ५ जुलै १९७३ चा व्यापार करार, १० जून १९७२ चा अवकाश व अणुसंशोधन उपयोग करार, २७ ऑगस्ट १९७३ चा माहीती देवाणघेवाण करार, २७ सप्टेंबर १९७४ चा संस्कृती, शिक्षण, माहिती व क्रिडा करार इत्यादी करारांचा समावेश होतो.

भारत व बांग्लादेश यांच्यातील सहकार्य, मैत्री व शांततेच्या वरील करारानंतर दोन्ही देशामध्ये अतिशय घनिष्ठ व निकटचे संबंध प्रस्थापित झालेले होते. १९ मे १९७४ ला दोन्ही देशात सीमा करार करण्यात आला. या करारान्वये दोन्ही देशातील सरहद्दी निर्णायक वादावर तोडगा काढण्यात आला. पुढे याच सुमारास बांग्लादेशामध्ये (अंतर्गत) प्रशासनातील भ्रष्टाचार, अकार्यक्षम प्रशासन आणि लष्कराचा राजकारणातील प्रवेश इत्यादी कारणामुळे अंतर्गत उठाव झाला. १९७५ ला मजुबुर रेहमान व त्यांच्या कुटुंबातील अनेक सदस्यांची हत्या करण्यात आली. त्यानंतर लष्करी राजवटी अस्तित्वात आल्या. पण दोन्ही देशादरम्यान राजकिय संघर्ष झाले नाहीत. १९७५ ते १९९० पर्यंत लष्करी राजवटी, शेख हसीना वाजेद यांच्या नेतृत्वाखाली आणि बेगम झिया यांच्या नेतृत्त्वाखाली वेगवेगळ्या राजकिय पक्षांची सरकारे स्थापन झाली. या काळात बांग्लादेश-भारत संबंधात तणाव निर्माण झाले नाहीत.

बेगम खालीदा झिया यांच्या भारतविरोधी भूमिकेमुळे १९९१ ते १९९६ या काळात पाणी वाटप, चकमा निर्वासित, लोकसंख्येचे बेकायदेशीर स्थलांतर, सरहद्दीचा ताबा इत्यादी अनेक प्रश्नांवर चर्चा झाली. द्विपक्षीय वाटाघाटी झाल्या. पंतप्रधान पातळीवर बैठका झाल्या पण कोणत्याही वादावर दोन्ही राष्ट्रांना मान्य होईल, असा तोडगा निघू शकला नाही. १९९६ च्या बांग्लादेश निवडणूकीत शेख हसिना वाजेद यांच्या अवामी लिग पक्षाने २१ वर्षाच्या कालखंडानंतर पुन्हा सत्तेवर बसण्याची संधी मिळवली. बांग्लोशमध्ये झालेले सत्तांतर भारताच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण ठरले. बांग्लादेशाच्या निर्मितीपासून भारत-बांग्लादेश यांच्यात मित्रत्वाचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापित व्हावेत अशी त्या पक्षाची भूमिका होती. त्यामुळे शेख हसीना वाजेद यांच्या बांग्लादेशाच्या

प्रधानमंत्री विराजमान झाल्यानंतर दोन्ही देशातील संबंधात सुधारणा घडवून आणण्यासाठी सकारात्मक पावले उचलली गेली.

२०११ मध्ये डॉ. मनमोहन सिंग यांनी दोन दिवसांचा बांग्लादेश दौरा केला. या भेटीत दोन्ही देशादरम्यान महत्त्वाच्या आणि कमी वादाच्या मुद्द्यावर उभय देशात सहमती झाली, या भेटीमध्ये भारत–बांग्लादेश यांच्यात विकासाबाबत सहकार्य कराराबरोबरच १९७४ च्या करारापासून प्रलंबीत असलेल्या दोन्ही देशातील सीमा निश्चितीच्या ऐतिहासिक कराराबरोबर इतर सात करार या भेटीत करण्यात आले. रेल्वेमार्ग, वाहतूक, तिनबिघा कॉरिडॉर प्रवेश, जलऊर्जा, टी.व्ही–दूरदर्शन आदानप्रदान, ढाका आणि जवाहरलाल नेहरू विद्यापीठ सहकार्य, मत्स्यपालन टेक्नॉलॉजी सहकार्य, कापडावरील शुल्क माफी आणि वाघांचे जतन याबाबत चर्चा होऊन करार झाले. अशा प्रकारे शेख हसिना यांच्या नेतृत्तखाली आवामी लिगने भारताच्या सहकार्याने बांग्लादेशाला स्थिर, सक्षम आणि शांततामय बनवण्याचा प्रयत्न केला.

**(ई) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळातील भारत–बांग्लादेश संबंध :**

२०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरकार स्थापन झाल्यापाससून शेजाऱ्यांबरोबरच अनेक महत्त्वाच्या देशाशी संबंध वाढवण्यावर जास्त भर दिला. आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक मित्र असावेत, या दृष्टिकोनातून पंतप्रधान पदाच्या शपथवीधीसाठी शेजारी देशांच्या प्रमुखांना निमंत्रित करून मोदींनी आपल्याा मैत्री मोहीमेची सुरवात केली. यामध्ये बांग्लादेशाच्या राष्ट्रप्रुखांचा देखील समावेश होता. मोदींच्या परराष्ट्र धोरणामध्ये 'नेबरहूड फस्ट' (शेजारी पहिले) आणि पूर्व आग्नेय आशियातील संबंध सुधारण्यासाठी पूर्वीच्या सरकारच्या 'लुक इस्ट' पॉलीसीच्या पढे जाऊन ॲक्ट–ईस्ट धोरणणाचा समावेश आहे. वरील धोरणाच्या अंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारत–बांग्लादेश यांच्यातील वाद, संघर्ष संपुष्टात आणून, विकासाच्या योजना राबवून भारत–बांग्लादेश या दोन्ही राष्ट्रांत मैत्रीचे नवे युग सुरू केल्याचे दिसून येते.

सत्ता स्थापन झाल्यानंतर २०१५ मध्ये नरेंद्र मोदी यांनी बांग्लादेश दौरा केला. या दौऱ्यामध्ये पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, परराष्ट्र सचिव आणि इतर काही प्रशासकिय अधिकाऱ्यांचा समावेश होतो. नरेंद्र मोदी आणि बांग्लादेशाच्या पंतप्रधान शेख हसीना यांच्यामध्ये सविस्तर चर्चा झाल्यावर या दोन्ही राष्ट्रांनी २२ करारावर सह्या केल्या. यामध्ये प्रामुख्याने सामुद्रिक सुरक्षा, मानवी तस्करी आणि भारतीय बनावट नोटा प्रतिबंधासाठी कायदा आणि दहशतवाद रोखण्याचा करार यांचा समावेश होता. नरेंद्र मोदी बांग्लादेश दौऱ्याच्या पहिल्याच दिवशी भारत–बांग्लादेश यांच्यातील ४१ वर्षापूर्वी पासूनचा सीमावाद संपुष्टात आला. दोन्ही देशांनी 'ऐतिहासिक भूमी सीमा सामंजस्य' (एलबीए) करार करून त्याचे आदान प्रदान केले. भारत–बांग्लादेशाच्या इतिहासातील महत्त्वाचा करार मानला जातो. या कारारामुळे दोन्ही देशांच्या सीमा अधिक स्थिर व सुरक्षित होणार आहेत. तसेच सीमावर्ती लोकांचे जनजीवन अधिक सुरक्षित होणार आहे.

दोन्ही देशांनी संपर्क वाढवण्यासाठी दोन बससेवा सुरू करण्यात आल्या. ही बससेवा कोलकत्ता, ढाका, अगरतला आणि ढाका–शिलांग–गुवाहटी मार्ग धावणार आहे. त्याचबरोबर सामुद्रीक मालवाहतूक व्यापार, गुंतवणूक, आंतरिक्ष तंत्रज्ञान, सामुद्रीक सहकार्य, वीज पुरवठा करार इत्यादी वेगवेगळे करार करून भारत–

बांग्लादेश संबंध अधिक मजबूत करण्यात आले. या दौऱ्याचे महत्त्व म्हणजे ४१ वर्षे वादग्रस्त असलेला सीमावाद संपुष्टात आला. या एलबीए करारामुळे १११ सीमावर्ती एंक्वेव सीमा भूप्रदेश बांग्लादेशाला तर ५१ एंक्वेव भूप्रदेश भारताला मिळणार आहे. २०१५ या नरेंद्र मोदींच्या दौऱ्यात खऱ्या अर्थाने ज्यातून वाद किंवा असंतोष निर्माण होऊ शकतात, अशा मुद्द्यावर तोडगा काढून बांग्लादेशाला १ अब्ज डॉलरची मदत केली आणि बांग्लादेशातून आयात करण्यात येणाऱ्या वस्तूंवर आयात कर कमी करण्याचा निर्णय घेतला.

यानंतर ३ ते ६ ऑक्टोबर २०१९ दरम्यान बांग्लादेशाच्या पंतप्रधान शेख हसीना भारताच्या दौऱ्यावर आल्या होत्या. भारत आणि बांग्लादेश मित्र आहेत. त्यामुळे या दोन देशामधील विशेष नाते अधोरेखित करण्यावर या दौऱ्यात भर दिसून आला. 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम' तर्फे 'इंडिया इकॉनॉमिक फोरम' नावाची परिषद ३ व ४ ऑक्टोबर रोजी दिल्लीत भरवण्यात आली होती. त्यातही शेख हसिना यांनी भाग घेतला होता. दौऱ्यादरम्यान विविध विषयावर चर्चा होऊन संयुक्त निवेदन करण्यात आले. यापुढील भारत-बांग्लादेश संबंध कशा प्रकारचे असतील आणि दोन्ही देशातील परस्पर सहकार्य वृद्धींगत करण्यासाठी कोणत्या क्षेत्रांना प्राधान्य देण्यात आले, याचा उल्लेख आहे. यामध्ये सीमा-सुरक्षा आणि प्रबंधन, जल आणि आकाशमार्गे दळणवळणाच्या साधनांचा विकास, राष्ट्रीय सुरक्षा सहकार्य, परस्पर पूरक विकासनिती, उर्जा क्षेत्रात सहकार्य, महात्मा गांधी जयंती समारोह, (२०२०) वंगबंधू शेख मजबूर रहमान यांची जयंती समारोह (२०२०) व बांग्लादेश मुक्ती युद्धाची सुवर्ण जयंती (२०२१) इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करून सांस्कृतिक सहकार्य वृद्धींगत करणे इत्यादींचा समावेश होता. दळणवळण, संपर्क, विविध क्षमता वाढवणे, संस्कृती इत्यादीच्या संबंधाने ७ करार या दौऱ्यात करण्यात आले. चटोग्राम व मोंगला बंदर विकास, फेनी नदीचा पाणी वाटप प्रश्न, विद्यापीठ परस्पर सहकार्य, युवकांचे परस्पर सहकार्य सांस्कृतिक पुनरुज्जीवन इत्यादी बाबत देखील करार करण्यात आले. या शिवाय ३ प्रकल्पांचे उद्‌घाटनही झाले. यामध्ये द्रवरूप पेट्रोलियमन आयात प्रकल्प, ढाक्यातील विवेकानंद भवन आणि इन्स्टीट्यूट ऑफ डिप्लोमा इंजिनिअर्स या प्रकल्पांचा समावेश आहे. भारत-बांग्लादेश यांच्यातील संबंध दृढ करण्याच्या निमीत्ताने शेख हसीना यांचा दौरा महत्त्वाचा वाटतो.

बांग्लादेशाच्या स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव आणि बंगबंधु शेख मुजबीर यांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २६ मार्च व २७ मार्च २०२१ रोजी बांग्लादेश दौरा केला. कोरोना महामारीच्या काळत पंतप्रधान नरेंद्र मोदींचा हा पहिलाच दौरा होता. बांग्लादेशाच्या मुक्तीलढ्यामध्ये आमच्या जवानांनीही रक्त सांडले होते. दोन्ही देशामधील रक्ताचे हेच नाते अत्यंत मजबूत अशा द्विपक्षीय संबंधांना जन्म देईल, असा विश्वास नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आणि बांग्लादेशाच्या राष्ट्रीय दिनानिमित्त नॅशनल परेड स्क्वेअरमध्ये भाग घेतला आणि आपल्या भाषणात इंदिरा गांधी, बंगबंधु, अटलजी यांच्या कार्य कर्तृत्वाचे व भूमिकांचे कौतुक केले आणि बांग्लादेशाच्या मुक्ती संग्रामाच्या सुवर्ण मोहत्सवानिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या. या दौऱ्यात नरेंद्र मोदींनी 'नेबरहुड फर्स्ट' नारा देत बांग्लादेशाला १०९ रुग्णवाहिका आणि कोरोना लसीचे १२ लाख डोस सोपवले. यावेळी नरेंद्र मोदींनी वेगवेगळ्या धार्मिक स्थळांना आणि राष्ट्रीय हुतात्मा स्मारकांना भेटी दिल्या. यावेळी २०२० गांधी शांतता पुरस्कार (शेख मुजीबुर रहेमान यांना मिळालेला) रहमान यांच्या कन्या शेख हसिना यांच्याकडे सुपुर्द केला. बांग्लादेशी तरुण तरुणींसाठी स्वर्ण जयंती शिष्यवृत्ती योजना जाहीर केली आणि

५० बांग्लादेशी उद्योजकांना भारतात गुंतवणूक करण्याचे निमंत्रण दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बांग्लादेशी भेटीत दोन्ही देशादरम्यान पाच द्विपक्षीय करार करण्यात आले. दळणवळण, वाणिज्य, माहिती तंत्रज्ञान आणि क्रीडा या क्षेत्रांचा समावेश असलेल्या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. मोदींनी सर्वप्रथम बांग्लादेशाच्या पंतप्रधान शेख हसीना यांच्याशी चर्चा केली आणि नंतर शिष्टमंडळ स्तरावर चर्चा झाली. अशा प्रकारे १९७१ ते आजपर्यंत भारत-बांग्लादेश यांच्यात मैत्रिचे, सलोख्याचे आणि सहकार्याचे संबंध आपल्याला पाहायला मिळतात.

### ३.२.२ स्वयं अध्ययन प्रश्न :

**(अ) गाळलेल्या जागा भरा.**

१. ............ साली बांग्लादेशाची निर्मिती झाली.
२. बांग्ला मुक्ती चळवळीचे नेतत्त्व .......... यांनी केले होते.
३. बांग्लादेश मुक्ती चळवळीला .......... या देशाने मदत केली.
४. मटुबा समुदाय .......... येथे आहे.
५. बांग्लादेशाची निर्मिती .......... देशातून फुटून झाली.
६. अवामी लिग हा पक्ष .......... देशात आहे.
७. तिस्ता नदी पाणीवाटप हा वाद .......... देशादरम्यान आहे.
८. चकमा निर्वासित हा प्रश्न .......... देशादरम्यान आहे.
९. दक्षिण आशियातील सर्वांत जास्त लांबीची सीमा .......... या देशादरम्यान आहे.
१०. भारत-बांग्लादेश यांच्यातील सिमावाद २०१५ मध्ये .......... या दोन्ही नेत्यांच्या सहकार्याने सुटला.

## ३.४ भारत-श्रीलंका संबंध (India - Shrilanka Relation) :

दक्षिण आशियातील भारताच्या शेजारी असलेले दुसरे राष्ट्र म्हणजे श्रीलंका होय. हिंदी महासागरात भारतीय उपखंडाच्या दक्षिणेस वसलेला द्विप किंवा बेट म्हणजे श्रीलंका होय. श्रीलंका व भारताच्या दक्षिण किनाऱ्या दरम्यान ३१ कि. मी. रुंदीची पाष्कची समुद्रध्वनी पसरली आहे. इ. स. १९४८ मध्ये राष्ट्रकुलमंडळाचा सदस्य या नात्याने स्वतंत्र झाला. या ठिकाणची मुख्य भाषा सिंहली आहे. प्राचीन काळी हा देश 'सिंहल' या नावाने ओळखला जात होता. ब्रिटीश वसाहती राजवटीमध्ये याला 'सिलोन' असे नाव पडले. इ. स. १९७२ पर्यंत हा देश 'सिलोन' या नावानेच ओळखला जात होता. नंतर याचे नाव श्रीलंका असे ठेवण्यात आले. इ. स. १९७८ या वर्षी याचे नाव श्रीलंकेचे समाजवादी लोकशाही प्रजासत्ताक असे ठेवले गेले. भारतीय साहित्यात या देशाला 'लंका' असेही म्हटले जाई. देशातील ७० टक्के जनता ही बौद्ध १२ टक्के जनता ही हिंदू, ९ टक्के जनता मुस्लीम आणि ७ टक्के जनता खिश्चन आहे. प्राचीन काळापासून भारत आणि

श्रीलंकेचे धार्मिक, व्यापारी आणि राजकिय संबंध आहेत. या दोन्ही देशात सर्वसाधारण एकूण ३००० हजार वर्षाचा इतिहास आहे.

इ. स. पूर्व २५० पासून मौर्य सम्राट अशोकाने आपला मुलगा महेंद्र आणि मुलगी संघमित्रा यास बौद्ध धर्माचा प्रसाराकरिता श्रीलंकेत पाठविले होते आणि तेथूनच श्रीलंकेत बौद्ध धर्म व संस्कृतीचा प्रचार होण्यास सुरवात झाली. गौतम बुद्धांना ज्या बोधीवृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली त्याची फांदी या दोन भाऊ-बहिनीने या देशात आल्याबरोबर ती रोवली. आज हा बोधिवृक्ष जगातील प्राचीन वृक्ष समजला जातो. त्यानंतर अशोक सम्राटाने पाठवलेले बौद्ध भिक्क्षू यांनी देखील श्रीलंकेत बौद्ध धर्माची सुरवात केली. त्याबरोबर भारत-श्रीलंका यांच्यात रामायण यातील धार्मिक सांस्कृतिक संबंध सापडतात. म्हणजेच या दोन्ही देशामध्ये फार प्राचीन काळापासून धार्मिक, सांस्कृतिक संबंध पाहायला मिळतात. १७९५ मध्ये ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीने पहिल्यांदा श्रीलंकेतील त्रिंकोमाली घेतले आणि म्यानमार पर्यंत जाऊन श्रीलंका ताब्यात घेतले. १८०२ मध्ये हा वसाहतिक प्रदेश ब्रिटीश शासनाच्या अधिपत्याखाली आला. १८०२ ते १९४८ पर्यंत हा प्रदेश ब्रिटिश शासनाच्या राजवटीखाली होता. सॉलबरी कमिशनच्या शिफारशीनुसार १९४७ च्या संविधानानुसार श्रीलंकेत प्रातिनिधीक शासनपद्धती अमलात आली. याच वर्षी ब्रिटीशांनी या वसाहततीला अंतर्गत स्वायत्तता दिली व ४ फेब्रुवारी १९४८ रोजी श्रीलंकेला स्वातंत्र मिळाले. स्वातंत्र्यानंतर युनायटेड नॅशनल पार्टीचे अध्यक्ष डॉन स्टिफन सेनानायके हे श्रीलंकेचे पहिले पंतप्रधान बनले. यावेळी श्रीलंकेने संसदीय शासन पद्धतीचा स्विकार केला होता. त्यानंतर सत्तेवर आलेल्या सिरीयाओ बंदरनायके यांच्या संयुक्त आघाडीने १९७२ मध्ये प्रजासत्ताक पद्धतीचे दुसरे संविधान स्विकारले. देशाचे 'रिपब्लीक ऑफ श्रीलंका' असे नामांतर करून संसदेचे कायदे करण्याचे अधिकार काढून घेवून कार्यकारी मंडळाला सर्वसत्ताधिश बनवले. पुढे १९७८ मध्ये जयवर्धने शासनाने या देशात अध्यक्षीय शासनपद्धती असलेले नविन संविधान स्विकारले. देशाचे पुन्हा 'डेमॉक्रटीक सोशॅलिस्ट रिपब्लिक ऑफ श्रीलंका' असे नामांतर करण्यात आले. जे. आर. जयवर्धने हे श्रीलंकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष झाले आणि श्रीलंकेच्या लोकशाही शासनाच्या नव्या प्रयोगाला सुरवात केली. भारत आणि श्रीलंकामध्ये समृद्ध असा धार्मिक, सांस्कृतिक वारसा असल्याने आणि भारताला दक्षिण आशियात शांतता राखून क्षेत्रीय विभागाचा विकास हा दृष्टिकोन असल्यामुळे पहिल्यापासून ते आजतागायत भारत-श्रीलंका संबंध हे सहकार्याचे, सौहादर्याचे, परस्पर विकासास पूरक असेच असल्याचे दिसून येतात.

**(अ) भारत-श्रीलंका संबंध :**

दोन्ही देशांच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत-श्रीलंका यांच्यात सहकार्याचे आणि सलोख्याचे संबंध होते. भारत-श्रीलंका यांच्यातील सहकार्याच्या पाठीमागे दोन्ही देशांचा व्यापार हेतू असलेला आपल्याला दिसतो. श्रीलंकेसाठी भारत हा संरक्षक आधार आहे तर भारतासाठी हिंदी महासागर व सीमा सुरक्षा या महत्त्वाच्या आहेत. या दृष्टिकोनातून भारताला दक्षिण आशियात सत्ता समतोल आणि सामुहिक सुरक्षा या दोन्हींना आयाम द्यावयाचा होता. या कारणास्तव या दोन्ही देशादरम्यान सामाजिक, राजकिय, आर्थिक, सांस्कृतिक आणि संरक्षणात्मक करार झालेले आपल्याला पाहायला मिळतात.

भारत व श्रीलंका या दोन्ही देशांनी अलिप्ततावाद धोरणाचा स्विकार केला आहे. अलिप्तता वाद हे या दोन्ही देशांच्या परराष्ट्र धोरणाचे वैशिष्ट्य राहिले आहे. या दोन्ही देशांनी कोणत्याही लष्करी गटात सहभागी न होता शीतयुद्धाच्या काळात अमेरिका व सोव्हिएत युनियन या दोन्ही महासत्तापासून अलिप्त राहण्याचे धोरण स्विकारले होते. साम्राज्यवाद व वसाहतवाद यांना विरोध हा भारत-श्रीलंका यांच्यातील परराष्ट्र धोरणाचा सहमतीचा मुद्दा होता. तसेच या दोन्ही देशांनी आंतरराष्ट्रीय राजकारणात पंचशील तत्त्वाचा पुरस्कार केला होता. अशाप्रकारे विकासाच्या दृष्टिकोणातून परस्पर सहाकार्यावर भारत-श्रीलंका संबंध आधारित होते. असे असले तरी कांही मुद्द्यांबाबत दोन्ही देशामध्ये वाद असल्याचे दिसून येतात.

**(ब) भारत-श्रीलंका यांच्यातील वादग्रस्त मुद्दे :**

भारत व श्रीलंका यांच्यातील वादाचा किंवा मततभेदाचा मुद्दा म्हणून श्रीलंकेतील तमीळ वंशांच्या लोकांच्या प्रश्नाकडे पाहता येईल. भारत व श्रीलंका हे दोन्ही देश ब्रिटीश राजवटीखाली असताना ब्रिटिशांनी श्रीलंकेत चहाच्या व रबराच्या मळ्यात काम करण्यासाठी मजूर म्हणून आणले, पण श्रीलंकेला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तेथील भारतीय तमिळी वंशाच्या लोकांच्या भवितव्याचा प्रश्न पुढे आला. त्यावेळच्या श्रीलंकन सरकारने तमिळी किंवा भारतीय वंशाच्या लोकांना नागरिक म्हणून मान्यता दिली नाही. त्यांना राज्यविहीन व्यक्तीचा दर्जा देण्यात आला. अशा राज्यविहीन लोकांना भारत सरकारने आपल्या देशात सामावून घ्यावे, असा आग्रह श्रीलंका सरकारचा होता. या उलट ते श्रीलंकेचे रहवाशी आहेत. त्यामुळे त्यांना नागरिकत्व देवून त्या व्यक्तीच्या भवितव्याचा प्रश्न निकलात काढावा, असे भारताचे मत होते. तमिळी लोकांचा नागरिकत्वाचा प्रश्न हा भारत-श्रीलंका यांच्यातील पहिला वादाचा मुद्दा होता.

दुसरा मुद्दा म्हणजे श्रीलंकेतील अंतर्गत वादामुळे निर्माण झालेली 'लिबरेशन टायगर ऑल तमिळी इलम' संघटना व चळवळ होय. तमिळी वंशाच्या लोकांना नागरिकत्व देण्याच्या किंवा त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ठ करण्याकडे श्रीलंकेतील बहुतांश जबाबदार सरकारनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. परिणामी, तमिळी वंशाच्या लोकांत मोठ्या प्रमाणात असंतोष पसरला. काही राजकिय पक्षांच्या प्रेरणेने सिंहली लोकांनी तमिळी लोकांच्या विरुद्ध हिंसक आंदोलने केली. यामध्ये बहुसंख्य तमिळी वंशाच्या लोकांचा मृत्यू झाला. या सर्व घडामोडींचा नकारात्मक परिणाम होवून श्रीलंकेतील तमिळी लोकांतत असुरक्षिततेची भावना उत्पन्न झाली. त्यातूनच श्रीलंका विरोधी प्रतिकाराची ज्वाला भडकली आणि त्यांनी संघटीत होऊन सशस्त्र प्रतिकाराचा मार्ग स्विकारला. 'लिबरेशन टायगर्स ऑफ तमिळी इलम' नावाची संघटना स्थापन करून या अस्वस्थ तमिळींनी सरकारलाच आव्हान दिले आणि तमिळी वंशाच्या लोकांचे स्वतंत्र राज्य स्थापन करण्याची मागणी केली. या मागणीसाठी या संघटनेने अनेक हिंसक चळवळी केल्या. दहशतवादी मार्गांचा अवलंब केला. सामान्य लोकांचे जीवन असुरक्षित करून टाकले. अशा या संघटनेला भारतातील तमिळी नेत्यांचा व भारत सरकारचा पाठिंबा आहे, अशी शंका श्रीलंका सरकारला होती. त्यामुळे भारत-श्रीलंका संबंध थोडे संघर्षमय होते.

या दोन्ही प्रश्नाबरोबरच कच्छद्विप बेटाचा प्रश्नही महत्त्वाचा मानला जातो. हिंदी महासागरातील या

द्विपाच्या आसपास नैसर्गिक तेलाचे विशाल भांडार अस्तित्वात आहे. भारत–श्रीलंका हे दोन्ही देश या द्विपावर (दोन्ही) आपला अधिकार सांगतात. त्यामुळे या दोन्ही देशात तणावाचे वातावरण असल्याचे दिसून येते. या ठिकाणी जर चीन व अन्य देशांनी शिरकाव केला तर भारताच्या सामुद्रिक शांततेला व दोन्ही देशाच्या विकासाला धोका उत्पन्न होऊ शकतो. त्यामुळे 'कच्छद्वीप' हा मुद्दा भारत–श्रीलंका संबंधात वादग्रस्त मानला जातो.

**(क) भारत–श्रीलंका संबंध :**

श्रीलंकेचे भारताबरोबर असलेले संबंध हे श्रीलंकेच्या वांशिक विभाजन व न सुटलेला संघर्ष यावर आधारित आहेत. भारताने श्रीलंका सोबत सहकार्य करण्यापाठीमागची भूमिका म्हणजे श्रीलंकेतील तमिळी लोकांशशी असलेले भावनिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक संबंध होय. तामिळनाडूमधील लोकांनाही श्रीलंकेतील तमिळी लोकांविषयी सहानुभूती वाटते. त्यामुळे जो श्रीलंकेतील सिंहली व तमिळी यांच्यातील वर्षानुवर्षे चालेलला संघर्ष मिटवण्यासाठी पंतप्रधान पंडित नेहरू यांनी काळजीपूर्वक प्रयत्न केला. कारण हाच संघर्ष भारत–श्रीलंका मध्ये होता. श्रीलंका तमिळी लोकांना नागरिकत्व देण्यास तयार होत नाही म्हटल्यावर नेहरूंनी तमळी लोक भारताच्या घटनेने भारतीय ठरतील व त्यांना परत घेण्याचे कबूल केले. त्या पार्श्वभूमीवर श्रीलंकेचे पंतप्रधान सर जॉन काटेला वाला आणि पंडीत नेहरू यांच्यात ५ जानेवारी १९५४ ला वाटाघाटी होवून एक करार करण्यात आला. तो नेहरू काटेलावाला करार म्हणून ओळखला जातो. या करारानुसार तमिळी लोकांना नागरिकत्व श्रीलंकेने द्यावे, असे ठरविण्यात आले. पण प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी श्रीलंका सरकारने केली नाही.

पंतप्रधान लालबहादुर शास्त्री व इंदिरा गांधी यांनी द्विपक्षीय करारावर अनुक्रमे १९६४ आणि १९७४ मध्ये श्रीलंकेबरोबर सह्या केल्या. या करारानुसार भारतीय तमिळांची जबाबदारी श्रीलंका व भारत या दोघांचीही आहे. काही तमिळी भारतात घेतले जातील, असेही या करारात ठरविण्यात आले. या करारामुळे भारत–श्रीलंका संबंधाततील तिढा थोडा कमी झाला परंतु पूर्णपणे सुटला नाही. तमिळी प्रश्नावर दोन्ही देशात मतभेद असले तरी बाकी अन्य प्रश्नाबाबत भारत–श्रीलंका संबंध सहकार्याचे होते. सप्टेंबर १९६५ च्या भारत–पाक युद्धात श्रीलंकेने तटस्थता स्विकारली होती. पुढे १९६७ मध्ये पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी श्रीलंकेला सदिच्छा भेट दिली. या वर्षी त्या देशाचे राष्ट्रपती भारताच्या दौऱ्यावर आले. १९६८ मध्ये पंतप्रधान सेनानायके भारतामध्ये आले असताना दोन्ही देशादरम्यान कच्छातिक बेटाच्या मालकीबद्दल अत्यंत सलोख्याच्या वातावरणात वाटाघाटी झाल्या. १९७० मध्ये श्रीलंका पंतप्रधान बंदरनायके यांनी पुन्हा भारतास भेट दिली. पुढे १९७१ मधील बांग्लादेशाच्या स्वातंत्र्यामुळे अनेक श्रीलंकन तमिळी नेत्याच्याही भावना निर्माण झाल्या कि बांग्लादेशाच्या धर्तीवर तमिळी लोकांचे स्वतंत्र राष्ट्र निर्माण होईल. यासाठी तमिळी लोकांना स्वतंत्र करण्यासाठी भारत प्रयत्न करेल, असा आशावाद बाळगून उठावाला सुरवात केली. तर दुसऱ्या बाजूला जनता विमुक्ती पेटामारा या सिंहली जहालवादी संघटनेने भीषण हिंसाचार केला. मोठ्या प्रमाणात दंगली झाल्या. त्या आटोक्यात आणण्यासाठी श्रीलंकन पंतप्रधान बंदरनायके यांनी भारताकडे तातडीची मदत मागितली. तेव्हा भारताने

नौदलाची ४ जहाजे, सहा हेलिकॉप्टर, पायदळी हलकी शस्त्रे व दारुगोळा सह २५०० सैन्य पाठवले. या मदतीमुळे सिंहलींचा जहालवादी हिंसाचार नियंत्रणात आला व तेथे शांतता व कायद्याचे राज्य स्थापन झाले. या कारवाईनंतर श्रीलंकेतील शांतता आणि स्थैर्याचा भारत हा समर्थ आधार बनला.

१९८० नंतर भारताने इंदिरा गांधींच्या नेतृत्त्वाखाली जे धोरण स्वीकारले ते श्रीलंकेततील तमिळी राजकिय प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने होते. १९८२ ला श्रीलंका सरकारने 'आतंकवादी विधेयक'' मंजूर केले. या कायद्याविरुद्ध भयंकर दंगली झाल्या. अनेकांची घरे, दुकाने पेटवली गेली. सार्वजनिक राष्ट्रीय संपत्तीचे आतोनात नुकसान केले. त्यावेळी ऑगस्ट १९८३ मध्ये राष्ट्राध्यक्ष जयवर्धने यांच्यातर्फे एन. डब्ल्यू. यांनी इंदिरा गांधींची भेट घेतली व मदतीचे आवाहन केले. त्यावेळी जयवर्धने आणि इंदिरा गांधी यांच्यात सहकार्याचा करार झाला.

१९८३ मध्ये आलेला श्रीलंकेतील सिंहलीचा हिंसाचार मोठ्या प्रमाणात हत्या करणारा ठरला. या दंगलीचा परिणाम जवळजवळ ४५ हजार तमिळी निर्वासीत भारतात आले. २४ सप्टेंबर १९८४ ला श्रीलंकेने हा प्रश्न संयुक्त राष्ट्रात नेला. पुढे या तमिळी निर्वासितांच्या संदर्भात जून १९८५, जानेवारी १९८६ आणि जून १९८७ असे संयुक्त करार केले. भारताचे पंतप्रधान राजीव गांधी आणि श्रीलंकेचे राष्ट्रपती जयवर्धने यांनी तमिळी लोकांचा प्रश्न जाणिवपूर्वक सोडवण्याचा प्रयत्न केला. मात्र समस्या सुटली नाही. २९ जुलै १९८७ ला भारत-श्रीलंका करारातील सहकार्य, शांतता आणि सार्वभौमत्तत्वाचे संरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी भारताने शांततारक्षक दल पाठविले. या सैन्यदलात सुमारे ५००० सैनिक, १ नौदल तुकडी आणि राष्ट्राध्यक्ष जयवर्धने यांच्या वैयक्तिक रक्षणासाठी १५० कमांडोची तुकडी पंतप्रधान राजीव गांधी सरकारने पाठवली. शांतीसेनीची भूमिका ही देशात शांतता राखणे व तमिळी लोकांचे रक्षण करणे, ही होती. एल. टी. टी. ई. व्यतिरिक्त इतर संघटनांनी भारतीय सैन्यासमोर शरणागती पत्करली. आत्मसमर्पण केले. भारताचे रक्षक तमिळांचे रक्षण करू शकणार नाहीत, अशी एल. टी. टी. ई. ची भावना झाली आणि त्यांनी पुन्हा सशस्त्र संघर्षाला सुरवात केली. ऑक्टोबरमध्ये शांती दलाने एल. टी. टी. ई. विरोधातत प्रखर कारवाई सुरू केली. १९८७ ते १९९० या कालखंडात या कारवाईत भारताचे जवळजवळ १००० सैनिक मारले गेले. शेवटी या शांतता स्थापनेच्या कारवाईत भारतीय सैन्याला अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नाही व शांतीसेना परत भारतात परतली. शांतीसेना आणि एल. टी. टी. ई. यांच्यात सुरू असलेली लष्करी कारवाई १ वर्ष ११ महिने चालली. या कारवाईत भारताची प्रचंड प्रमाणावर मनुष्यबळाची व संपत्तीची हानी झाली आणि याचा शेवट 'राजीव गांधी' यांच्या हत्यामध्ये झाला, असे मानले जाते. नंतर आलेल्या श्रीलंकेतील सरकारांनी या जहालवादी संघटनावर कारवाई करून शांतता प्रस्थापित केल्याचे दिसून येते. राजीव गांधी यांची हत्या करण्यामध्ये एल. टी. टी. ई. हा गुन्हेगार असल्याचा आरोप करून भारताने १९९२ मध्ये एल. टी. टी. ई. ला दहशतवादी संघटना म्हणून घोषित केले. १९९० पासून आजपर्यंत दोन्ही देशाचे द्विपक्षीय संबंध सुधारले.

श्रीलंकेच्या विकास कार्याच्या क्षेत्रामध्ये भारत सक्रिय असल्याचे दिसून येते. दक्षिण आशियातील एकूण दिलेल्या आर्थिक सहकार्यापैकी किंवा गुंतवणूक व कर्जापैकी १/३ रक्कम ही श्रीलंकेला उपलब्ध करून दिल्याचे

दिसते. अलीकडील काळात भारत तीन गोष्टीच्या माध्यमातून पतपुरवठा करत आहे. त्यामध्ये भांडवली वस्तू, ग्राहक टिकाऊ वस्तू, सल्लागार सेवा आणि खाद्य पदार्थासाठी १०० दशलक्ष डॉलर, त्याचबरोबर गहू खरेदीसाठी, पेट्रोलियम खरेदीसाठी पतधोरणानुसार पैशाची वाटणी करून श्रीलंकेला मदत केली आहे. जानेवारी २०११ रोजी भारतीय मच्छीमारावर श्रीलंका सैनिकांनी हल्ला केला. त्यावेळी भारताने श्रीलंकेच्या नौदलाविरुद्ध अधिकृत निषेध व्यक्त केला. वायको आणि जयललीता या तामिळनाडूच्या राजकारण्यांनी भारतीय तामिळी मच्छीमारांच्या हत्या रोखण्यासाठी प्रयत्न केले आणि सामारिक सहकार्यावर भर दिला.

**भारत–श्रीलंका आर्थिक संबंध :**

श्रीलंका–भारत या दोन देशातील राजकिय, सामाजिक, सांस्कृतिक संबंधाबरोबर आर्थिक संबंधही समृद्ध आहेत. १९४८ पासून ते १९६७ पर्यंत संसारउपयोगी वस्तू, खाद्य पदार्थ इत्यादी खरेदीसाठी भारताने श्रीलंकेला १७ कोटी रुपयांची मदत केली. ऑक्टोबर १८६८ मध्ये श्रीलंकेने शेती सहकार्य वाढवण्याच्या दृष्टिकोणातून 'संयुक्त चहा संघ' स्थापन केला. आर्थिक सहकार्याकरिता दोन्ही देशामध्ये जाईट कमिटी ऑन इकॉनॉमिक्स को–ऑपरेशन आहेत. भारतात सिलोन बँक आणि पिपल बँक काढण्याची परवानगी श्रीलंकेने दिले. १९७३ ला इंदिरा गांधी यांनी श्रीलंकेला आंतरराष्ट्रीय स्थितीचा विचार करून विकास योजनावर खर्च करण्यासाठी १ कोटी रुपये दिले. सार्क अंतर्गत श्रीलंका भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागिदार आहे. मार्च २००० मध्ये भारत–श्रीलंका मुक्त व्यापार करार झाल्यावर दोन्ही देशामध्ये व्यापार वाढल्याचे दिसून येते. वर्ष २०१५–१७ च्या दरम्यान श्रीलंकेतील भारताची निर्यात ५:३ बिलीयन डॉलर होती तर भारताची आयात ७४३ मिलीयन डॉलर होती. भारत सरकार आणि भारतीय कंपन्यांनी पेट्रोलीयम, आयटी, वित्तीय सेवा, दुरसंचार, पर्यटन, बँकिंग, रेल्वे इत्यादीमध्ये १ बिलीयन अमेरिकन डॉलर गुंतवणूक केली आहे. श्रीलंकेच्या पर्यटन उद्योगामध्ये भारतीय पर्यटकांचा महत्त्वाचा वाटा आाहे.

**(ड) नरेंद्र मोदीच्या काळातील भारत–श्रीलंका संबंध :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'शेजारी पहिले' या परराष्ट्र धोरणानुसार पंतप्रधान पदाची शपथ घेतल्यानंतर १३ आणि १४ मार्च २०१५ रोजी श्रीलंका दौर केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मागील २८ वर्षानंतर श्रीलंका दौरा करणारे ते पहिले पंतप्रधान होते. तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधींच्या श्रीलंका दौऱ्यानंतर भारतातील कोणत्याही पंतप्रधानांनी त्या देशाचा दौरा केला नव्हता. या दोन्ही देशामधील वाटाघाटी या सचिव व मंत्री पातळीवर होत होत्या. पण नरेंद्र मोदी यांनी श्रीलंका दौरा काढून पंतप्रधान पातळीवरील द्विसंबंधाच्या चर्चेला सुरवात केली. नरेंद्र मोदी यांनी श्रीलंका राष्ट्रपती मैत्रीपाला सिरीसेना यांच्या सोबत शिखर वार्ता केली. त्यानंतर पंतप्रधान रानिल विक्रमसिंघे यांच्यासोबत द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यासाठी वेगळे प्रस्ताव ठेवले. यामध्ये दोन्ही देशादरम्यान राजकिय, आर्थिक, सांस्कृतिक संबंध मजबूत करण्यावर भर दिला. या दौऱ्या दरम्यान भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी श्रीलंका संसदेला संबोधित करून आशिया खंडातील आपली मैत्री किती महत्त्वपूर्ण आहे. यासंबंधी मार्गदर्शन केले. या दौऱ्यात जाफनामध्ये निर्माण होत असलेल्या २० हजार निवासी घरासाठीचा 'सहयोग परीयो जना कराराला' पृष्ठी देऊन जाफना येथील या विभागाला भेट दिली. नरेंद्र मोदी

यांनी  या दौऱ्यात काही वर्षात व्यापाराच्या प्रभावी वाढीची नोंद केली आणि भारत-श्रीलंका व्यापार अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. या काळात महाबोध सोसायटीला भेट दिली. कोलंबो बौद्ध भिक्षूकाबरोबर संवाद साधला. या दौऱ्यात दोन्ही देशात दळणवळण आणि व्यापार सुलभ होण्यासाठी व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, विचारधारा आणि सहजरित्या सीमा पार योजना इत्यादी संदर्भात करार केले. सिलोन चेंम्बर  ऑफ कॉमर्सला संबोधीत करून भारताची श्रीलंकेतील - इंन्फ्रास्टक्चचर, ऊर्जा, पारंपरिक हस्तकला, आधुनिक उत्पादक वस्तू आणि पर्यटन याबाबतीतील भारताची भूमिका मांडली.

यानंतर नियमित अंतराने २०१५ पासून श्रीलंकेचे राष्ट्रपती, पंतप्रधान यांनी भारत दौरे केले. फेब्रुवारी २०१५ मध्ये राष्ट्रपती सिरीसेना यांनी चार दिवसांचा दौरा केला. पुढे मे २०१६ मध्ये परत त्यांनी भारतीय दौरा केला. या भेटी दरम्यान त्यांनी दिल्ली, उज्जैन आणि सांचीला भेट दिली. त्यानंतर २०१६ मध्ये ब्रिक्स आणि बिमस्टेक परिषदेसाठी राष्ट्राध्यक्ष सिरीसेना भारत दौऱ्यावर होत्या. आरोग्य संघटनेच्या तंबाखू विरोधी नियंत्रण परिषदेसाठी २०१६ मध्ये पंतप्रधान विक्रमसिंगे भारत दौऱ्यावर आले होते. अशा विविध नियमित दौऱ्यामध्ये विविध प्रकारच्या आर्थिक प्रकल्पामध्ये सहकार्याबाबत सामंजस्य करार करण्यात आले. राजकिय दृष्ट्या नरेंद्र मोदी सरकारच्या काळात भारत-श्रीलंका यांच्यामधील संबंध हे सहकार्याचे आणि सौहार्याचे होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून श्रीलंकेचे पंतप्रधान महिंद्रा राजपक्षे यांनी ८ ते ११ फेब्रुवारी २०२० या दरम्यान भारत दौरा केला. या दौऱ्यामध्ये श्रीलंकेच्या पंतप्रधानांनी वाराणसीमधील विश्वनाथ मंदिर महाबोधी मंदिर आणि तिरुपती मंदिराला भेट दिली. पंतप्रधान राजपक्षे यांच्या दौऱ्या दरम्यान तमिळी मुद्दा मिटवण्यासाठी आणि श्रीलंकेतील तमिळी लोकांना समानता, न्याय, शांती आणि सन्मान द्यावा याबाबत समझोता होण्याची अशा व्यक्त केली. क्षेत्रीय जल समस्या, त्यामध्ये प्रामुख्याने मच्छीमारांचा प्रश्न आणि त्यांचा रोजगार यासंबंधी व्यवहारिक व्यवस्था निर्माण करण्यावर सहमती झाली. दोन्ही देशामध्ये 'संयुक्त समुद्री संसाधन प्राधिकरण' स्थापन करण्याचा प्रस्ताव सादर केला. तसेच सागर क्षेत्रात सर्वांसाठी सुरक्षा आणि समृद्धी स्थापन करण्यावर भर देण्यात आला. तसेच 'दहशतवाद विरोधी कारवाईसाठी संयुक्त फोर्स' निर्माण करण्यावर भर देण्यात आला.

गेल्या काही वर्षात भारतीय परराष्ट्र धोरणात बदल झालेले आहेत. विशेषत: जेव्हापासून चीनचा भारतीय उपखंडातील हस्तपेक्ष वाढला आहे तेंव्हापासून नरेंद्र मोदींनी 'नेबरहुड फर्स्ट' धोरणाचा स्विकार केला आणि भारताने पाकिस्तान, श्रीलंका आणि बांग्लादेश यांच्यासोबत मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. त्याचाच भाग म्हणजे भारत-श्रीलंका संबंध होय. २०१९ मध्ये भारताच्या दक्षिणेचा प्रमुख देश असलेल्या श्रीलंकेच्या राष्ट्राध्यक्ष निवडणूकीत गोरबाया राजपक्षे हे निवडून आले. राजपक्षे यांची कारकिर्द पाहिली असता हा नेता भारत विरोधी म्हणून ओळखला जातो. या पार्श्वभूमीवर भारताने जुनेकाही विसरून भारताचे विद्यमान परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी तातडीने श्रीलंकेचा दौरा करून नव्या अध्यक्षांना शुभेच्छा दिल्या व भारत भेटीचे निमंत्रण दिले. भारताने आदरपूर्वक दिलेल्या निमंत्रणाचा स्विकार करून नवे अध्यक्ष मोरबया राजपक्षे यांनी (दौरा) भारताचा दौरा केला. या दौऱ्यामुळे दोन्ही देशामध्ये वेगवेगळ्या विषयावर चर्चा झाली. द्विपक्षीय पातळीवर आर्थिक संबंध

वाढवण्यावर भर देण्यात आला. हैद्रबाद हाऊसमध्ये झालेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गोरबाया यांच्या द्विपक्षीय बैठकित सामुहिक विकासावर भर देण्यात आला. या बैठकित ४५ करोड डॉलर रुपये श्रीलंकेला विकासासाठी देण्यात आले. द्विपक्षीय बैठकित दहशतवाद, तमिळमुद्दे, मच्छीमारी समस्या, अंतर्गत विकास इत्यादी विषयावर सकारात्मक चर्चा झाली. श्रीलंका विकास कार्यासाठी स्थिर, सुरक्षित आणि विकसित श्रीलंका भारतासाठीच महत्त्वाची नाही तर हिंदी महासागरात शांता राखण्यासाठी महत्त्वाचे आहे, असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडले. 'सागरी-डॉक्टरीन' या दोन्ही देशामध्ये महत्त्वाचा मुद्दा असून त्याच्या सुरक्षिततेसाठी दोन्ही देशांनी प्रयत्न करणे गरजेचे अहे, असे मत मांडले. या पुढील काळात भारत श्रीलंकेच्या शाश्वत विकासासाठी कायम प्रयत्न करील, असे आश्वासित करून पंतप्रधान मोदी यांनी भारत-श्रीलंका यांच्यातील संबंध अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केला. दोन्ही देशाची सुरक्षा हा द्विपक्षीय मुद्दा महत्त्वाचा मानून श्रीलंका पोलीस अधिकाऱ्यांना काऊंटस टेरीरीस्ट ट्रेनिंगची व्याप्ती वाढण्याची घोषणा मोदी यांनी केली. अशा प्रकारे भारत-श्रीलंका या दोन्ही देशामध्ये काही वादग्रस्त मुद्दे असले तरी दोन्ही देशातील संबंध सलोख्याचे व सहकार्याचे राहिलेले दिसून येतात. प्रत्येक संकटाच्या वेळी भारताने श्रीलंकेला मदत केलेली आहे. याची जाणीव श्रीलंकेला असल्या कारणाने दोन्ही देश एकमेकांच्या सहकार्याने वाटचाल करताना दिसतात.

### ३.४.२ स्वयं अध्ययन प्रश्न :

**(अ) गाळलेल्या जागा भरा.**

१. ............ साली श्रीलंका एक राष्ट्र म्हणून स्वतंत्र झाले.

२. .......... यांनी श्रीलंकेचे पहिले पंतप्रधान म्हणून शपत घेतली.

३. .......... साली श्रीलंकेत अध्यक्षीय शासन पद्धतीचा स्विकार केला.

४. अध्यक्षीय शासन पद्धतीनुसार श्रीलंकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष .......... होते.

५. श्रीलंकेत .......... या जातीमध्ये संघर्ष आहे.

६. .......... जातीला श्रीलंकेत नागरिकत्व देण्यास नकार दिला.

७. एल. टी.टी. ई. ही जहालवादी संघटना .......... देशात होती.

८. .......... या पंतप्रधानाच्या काळात श्रीलंकेत शांतीसेना पाठवण्यात आली.

९. .......... हे सर्व श्रीलंकेचे अध्यक्ष महिद्रा राजपक्षे यांनी महाविषयाचे वर्ष म्हणून घोषित केले. (२००१)

१०. ब्रिटीश वसाहततीक कालखंडात श्रीलंकेला .......... असे म्हटले जात होते.

### ४.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

**१) दहशतवाद :** आपल्या राजकिय मागण्या जबदरस्तीने मान्य करून घेण्यासाठी विशिष्ठ समुहात

आत्यंतिक भीती निर्माण करण्याच्या हेतूने एखादी व्यक्ती किंवा गट यांनी प्रस्थापित बाजूने किंवा विरोधात चालवलेला हिंसाचार किंवा निर्माण केलेला धाक म्हणजे दहशतवाद होय.

२) निर्वासित : मूळ वस्ती किंवा देश सोडून दुसऱ्या ठिकाणी आश्रयास आलेला आश्रयार्थी.

३) चमका : बांग्लादेशातील अल्पसंख्याक जात जी निवासित म्हणून भारतात येते.

४) एल. टी. टी. ई. : लिब्रेशन टायगर ऑफ तमिळी इलम ही श्रीलंकेमधील जहालवादी संघटना आहे.

५) हिजबु मुजाहिद्दीन : पाकस्थित दहशतववादी संघटना.

## ४.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**३.२.२ (अ)** १) १४ ऑगस्ट १९४७, २) रॅडक्लीफ, ३) काश्मीर व दहशतवाद, ४) १९६५, ५) नवाज शरीफ.

**३.२.२ (ब)** १) १९७१, २) शेख मजबूर रहसान, ३) भारत, ४) बांग्लादेश, ५) पाकिस्तान, ६) बांग्लादेश, ७) भारत-बांग्लादेश, ८) भारत-बांग्लादेश, ९) बांग्लादेश, १०) नरेंद्र मोदी व हमीना जावेद.

**४.४.२ (अ)** १) १९४८, २) डॉन स्टीफन सेनानायके, ३) १९७८, ४) जयवर्धने, ५) तमिळ व सिंहली ६) तमिळी, ७) बांग्लादेश, ८) राजीव गांधी, ९) २००९, १०) सिलोन.

## ४.७ सारावासाठी स्वाध्याय :

**(अ) टिपा लिहा.**

१. काश्मीर प्रश्न

२. दहशवाद आणि भारत

३. एल. टी. टी. ई. संघटना

४. निर्वासितांचा प्रश्न

५. भारत-श्रीलंका वादाचे मुद्दे

**(ब) सविस्तर उत्तरे लिहा.**

१. भारत आणि पाकिस्तान यांचे संबंध स्पष्ट करा.

२. भारत - पाकिस्तान यांच्यातील वादग्रस्त मुद्द्याची चर्चा..

३. भारत - बांग्लादेश यांच्यातील संबंध स्पष्ट करा.

४. भारत - श्रीलंका या दोन्ही देशातील संबंध स्पष्ट करा.

५. भारत आणि भारताचे शेजारी यावर एक निबंध लिहा.

## ४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके :


| | | |
|---|---|---|
| १) Pamar & Parkins | : | 'International Relation' |
| २) डॉ. शैलेंद्र देवळाणकर | : | आंतरराष्ट्रीय संबंध |
| ३) डॉ. विजय खरे | : | जागतिक राजकारण भारत |
| ४) मनिष्का टिकेकर (सपा.) | : | भारत आणि भारताचे शेजारी |
| ५) डॉ. वा. भा पाटील | : | भारताचे परराष्ट्र धोरण |
| ६) वसंत रायपुरकर | : | आंतरराष्ट्रीय संबंध |
| ७) डॉ. शैलेंद्र देवळाणकर | : | समकालीन जागतिक राजकारण व भारताचे परराष्ट्र धोरण |
| ८) राजीव सीकरी | : | भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पुनर्विचार |
| ९) प्रा. वराडकर | : | आंतरराष्ट्रीय राजकारण आणि संबंध |

१०) समाजप्रबोधन पत्रिका, (जुलै-सप्टेंबर २०१२)

११) प्रबोधन प्रकाशन ज्योती, (मे २००५ व जानेवारी २००७).


❍❍❍

घटक ४

# भारताच्या परराष्ट्र धोरणातील सातत्य आणि बदल

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रस्तावना

४.३ विषय विवेचन

४.३.१ शीतयुद्ध कालीन भारताचे परराष्ट्र धोरण ( १९४७–१९९०)

- अलिप्ततावादी धोरण – वैशिष्टे – परिणाम
- पंचशील धोरण आणि परिणाम .
- १९६८– अण्वस्त्र प्रसार बंदी करार आणि भारताची भूमिका
- शीत युद्धकालीन भारत– अमेरिका संबंध
- शीत युद्धकालीन भारत– रशिया संबंध ( मैत्री करार)
- हिन्दी महासागर आणि भारताची भूमिका
- आंतरराष्ट्रीय सहजीवनातून राष्ट्रीय हिताकडे

४.३.२ शीतयुद्धोत्तर कालीन भारताचे परराष्ट्र धोरण

- आर्थिक सहयोग संघटनांवर भर
- लुक ईस्ट धोरण
- जी–४ ची निर्मिती
- शीतयुद्धोत्तर कालीन अमेरिका संबंध
- शीतयुद्धोत्तर कालीन रशिया संबंध
- सीटीबीटी करार आणि बदलते अण्वस्त्र धोरण
- काश्मीर धोरणातील परिवर्तन आणि ३७० कलम रद्द
- चीनी वर्चस्वाला आव्हान
- कोरोना ( कोव्हिड१९) डिप्लोमसी
- अरब–इस्राइल धोरणातील परिवर्तन

४.४ **सारांश**

४.५ **पारिभाषिक शब्द आणि संकल्पना**

४.६ **स्वाध्याय**

४.७ **अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ**

## ४.१ उद्दिष्टे :

१) जागतिक शांततेसंदर्भात भारताची प्रतिबद्धता अभ्यासने .

२) अलिप्तवादी धोरणाचे जागतिक परिणाम यांचा अभ्यास

३) नि:शस्त्रीकरणविषयी भारताची भूमिका आणि भारताचे आण्विक धोरण यांचा अभ्यास करणे .

४) राष्ट्रीय हित आणि आंतरराष्ट्रीय शांततामय सहजीवन यांचा भारताच्या परराष्ट्र धोरणातील मिलाफ यांचा अभ्यास करणे .

५) भारताच्या परराष्ट्र धोरणातील स्थित्यंतरे यांचा अभ्यास करणे.

६) जागतिक राजकारणाच्या केंद्रस्थानी भारतीय परराष्ट्र धोरण

## ४.२ प्रस्तावना :

प्रत्येक राष्ट्राने जागतिक घडामोडीकडे बघण्याचा एक दृष्टिकोण विकसित केलेला असतो. हा दृष्टिकोण राष्ट्रीय हिताला डोळ्यासमोर ठेवून तयार होत असतो. हा दृष्टिकोण परिस्थिति सापेक्ष असतो. कारण प्रत्येक राष्ट्राचे राष्ट्रीय हित हे गतिशील स्वरूपाचे असते. मात्र या दृष्टिकोणाची मांडणी करत असताना त्या राष्ट्राने स्वीकारलेली मूल्ये, त्या राष्ट्राची भौगोलिक स्थिती, इतिहास, संस्कृती, अर्थव्यवस्था, राज्यव्यववस्था, विचारप्रणाली, नेतृत्व, तंत्रज्ञान या सर्व घटकांनी प्रभावित झालेले आहे . यालाच राज्यशास्त्रीय भाषेत परराष्ट्र धोरण असे म्हणतात. आणि हे परराष्ट्र धोरण सत्ता या घटकाच्या केंद्रस्थानी फिरताना दिसते. त्यातूनच जागतिक राजकारणामध्ये केंद्र-परीघ संबंध संघर्षाच्या उबरठ्यावर येऊन जागतिक राजकरणात शह - कटशहाचे राजकारण जन्म घेते. अशा या कटशहाचे जागतिक राजकरणाने अखिल मानव जातीला दोन महायुद्धाच्या माध्यमातून संकटाच्या खाईत लोटल. या संघर्षमय जागतिक पटलावर भारताची विदेश नीती अखिल मानव जातीच्या शांततामय सहअस्तीत्वासाठी एक आशेचा किरण ठरली आहे हे जगमान्य झाले आहे. म्हणून आपण प्रस्तुत पाठात भारताच्या परराष्ट्र धोरणाचा आढावा घेणार आहोत .

## ४.३ विषय-विवेचन :

भारताच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करत असताना प्राचीन कालखंडाचा विचार करता कौटिल्याने अर्थ शास्त्रात राज्याच्या परराष्ट्र धोरणाची सहा तत्वे सांगितली आहेत. महाभारताच्या शांति पर्वात विदेश नीतीचा

उल्लेख आल्याचा दिसतो आहे. सम्राट अशोक आणि चंद्र गुप्त मौर्य यांच्या काळात त्यांनी विदेशनीतीचा अवलंब करून अतिपूर्वेकडील देशांशी आपले संबंध प्रस्थापित केल्याचे उल्लेख आढळतात. तर गौतम बुद्ध आणि वर्धमान महावीर यांच्या तत्वज्ञानाच्या आणि महात्मा गांधी यांच्या अध्यात्मवादी तत्वचिंतनाचा भारताच्या विदेश नीतीवर विशेष प्रभाव दिसून येतो आहे. आणि म्हणूनच भारताची विदेश नीती आंतरराष्ट्रीयवादाचे एक प्रतीक बनले आहे. भारताच्या या विदेश नीतीला पंडित जवाहरलाल नेहरू यांनी खऱ्या अर्थाने मूर्त रूप देण्याचे काम केले म्हणून त्यांना भारतीय विदेश नीतीचे शिल्पकार म्हटले जाते. भारताच्या विदेश नीतीचा इतिहास पाहिला तर स्वातंत्र पूर्व कालखंडात भारताला स्वताची अशी विदेश नीती अस्तित्वात नव्हती. तरी १८८५ ला स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभा आपली जागतिक राजकरणाविषयी मते प्रकट करीत होती. १९३८ च्या हरीपुर काँग्रेस अधिवेशनात एक ठराव करून असे जाहीर करन्यात आले की, भारत ही शेजारील राष्ट्रांबरोबर आणि जगातील इतर राष्ट्रांबरोबर मैत्री आणि शांततपूर्वक संबंध ठेऊ इच्छितो आहे. भारताच्या स्वातंत्र्याबरोबर जगातील अनेक राष्ट्रांच्या स्वातंत्र चळवळीचे भारत शांततपूर्वक आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या भावनेने मदत करेल. इथून खऱ्या अर्थाने भारताच्या विदेश नीतीची पायाभरणी झालेली दिसते. याच दरम्यान जपानने चीनवर केलेल्या हल्ल्याची निंदा करून आपली वैद्यकीय शिष्टमंडळ चीनच्या मदतीला पाठऊन दिली. जनरल फ्रँको च्या विरोधात प्रजासत्ताक स्पेन ला आपले समर्थन जाहीर केले.

७ सप्टेंबर १९४६ रोजी पंडित नेहरू यांनी ऑल इंडिया रेडीओवरुन भारताचे पहिले अधिकृत परराष्ट्र धोरण जाहीर करताना स्पष्ट सांगितले की, ''आजपासून आम्ही जागतिक परिषदामध्ये एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून पूर्ण क्षमतेने भाग घेऊन आमची धोरणे आम्ही ठरवू . आम्ही कोणत्याही राष्ट्राचे एक मात्र उपग्रह राहिलेलो नाही. आम्हाला अशा आहे जगामधील सर्व राष्ट्रे आम्हाला सहकार्य करतील. जागतिक लष्करी गटबाजीच्या पुढे जाऊन आम्हाला शांततामय सहजीवन निर्माण करून जागतिक शांततेसाठी वचनबद्ध राहू.'' हे पंडित नेहरूंचे भाषण म्हणजेच भारताच्या परराष्ट्र धोरणाचा पाया ठरला म्हणूनच जागतिक शांततेचे संवैधानिक बंधन (कलम ५१) स्वतावर घालून घेणारा भारत जगातील पहिला आणि शेवटचा देश आहे. प्रस्तुत प्रकरणात १९४६ पासून आज पर्यंतच्या भारताच्या परराष्ट्र धोरणातील सातत्य आणि बदल, शीतयुद्ध कालीन भारताचे पराराष्ट धोरण, शीतयुद्धोत्तर भारताचे परराष्ट्र धोरण अशा वेगेवेगळ्या उपघटकांची चिकित्सा करून भारताच्या परराष्ट्र धोरणाचा आढावा घेण्यात आला आहे.

### ४.३.१ शीतयुद्ध कालीन भारताचे परराष्ट्र धोरण (१९४७–१९९०) :

**अलिप्ततावादी धोरण वैशिष्टे परिणाम :**

दुसऱ्या महायुद्धाने युरोप खंडाला एक प्रकारे युद्ध भूमीचे स्वरूप प्राप्त झाले होते. आक्रमक राष्ट्रवादाने मानवाच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला होता. ही दुसऱ्या महायुद्धाची राख विझते ना विझते तोच जागतिक राजकारणाच्या पटलावर शीतयुद्धाचा भडका उडाला जगाची विभागणी दोन गटात झाली. भांडवलशाही वर आधारित लोकशाहीचे समर्थन करणारा अमेरिकेचा नाटो गट तर साम्यवादाचे समर्थन करणारा सोव्हियत

रशिया चा वार्सा गट या दोन गटातील सत्ता संघर्ष आक्रमक होत असताना पंडित नेहरूंनी भारताच्या परराष्ट्र धोरणाला आलिप्तवादी धोरणाचा एक वेगळा वैचारिक आधार प्राप्त करून दिला. राष्ट्र – राज्य व्यवस्थेच्या समस्येचे समाधान सत्तेच्या आणि संघर्षाच्या माध्यमातून शोधणाऱ्या युरोपीय राष्ट्रांपेक्षा सहकार्य , शांतता आणि सहजीवनाच्या माध्यमातून. राष्ट्र – राज्य व्यवस्थेच्या समस्येचे समाधान शोधता येईल हा विचार अलिप्तवादी परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून भारताने जगाला एक नवीन मार्ग दाखवला. आणि जगामधील नव्याने स्वातंत्र झालेली राष्ट्रे ही भारताच्या परराष्ट्र धोरणाची भाग बनली आणि १९६० च्या दशकामध्ये अलिप्तवादी चळवळीचे तिसरे जग निर्माण करण्यात भारतीय परराष्ट्र धोरणाला यश आले.

**भारताच्या अलिप्तवादी परराष्ट्र धोरणाची वैशिष्टे खालील प्रमाणे सांगता येतील.**

१) कोणत्याही लष्करी गटात सामील न होता आपले परराष्ट्र धोरण स्वतंत्र्य पणे तयार करणे.

२) भारताचे हे परराष्ट्र धोरण अमेरिकेचे खाजगी व्यापार तत्व किंवा सोव्हियत संघाचा राजकीय समाजवादाचा पुर्णपणे स्वीकार करत नाही.

३) भारताचे हे धोरण आपल्या आर्थिक विकासासाठी दोन्ही गटाकडून आवश्यक मदत स्वीकारते परंतु त्या बदल्यात महासत्ताक राष्ट्रांच्या अटी आणि शर्ती मान्य करीत नाही. उदा. भारताने बोकारो स्टील फॅक्टरी साठी अमेरिकेची मदत मागितली मात्र अमेरिकेने ती नाकारताच ती मदत सोव्हियत रशियाकडून मिळवली.

४) भारताने स्वीकारलेल्या अलिप्तवादाचे विश्लेषण करताना नेहरूंनी स्पस्ट केले की, अलिप्तता म्हणजे तटस्थता नव्हे. आमच्या अस्तित्वाला धोका निर्माण होईल अशा वेळी आम्ही तटस्थ राहणार नाही. म्हणूनच अलिप्तता म्हणजे निष्क्रिय स्वरूपाची तटस्थता नाही तर सत्ता संघर्षाच्या आण्विक जगात निर्माण झालेल्या भीतीदायक वातावरणात भारत एक शांतता क्षेत्र म्हणून मानवतावादाची आणि सहजीवनाची हमी देणारे राष्ट्र म्हणून काम करेल.

५) भारताचे अलिप्ततावादाचे धोरण हे केवळ तिसऱ्या जगातील राष्ट्रांना महासत्तांच्या लष्करी कराराच्या कचाट्यातून अलिप्त ठेवण्याच्या संकुचित उद्देशावर आधारलेले नव्हते तर ते न्याय विश्वरचनेचा एक व्यापक स्वरूपाचा भाग होता. की ज्यामध्ये तिसऱ्या जगातील गरीब, अविकसित आणि विकसनशील राष्ट्रांना राजकीय सन्मान, सार्वभौमत्वाची हमी, आर्थिक आणि सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी निर्माण झालेली एक विचारधारा आहे.

६) भारताच्या अलिप्तवादी धोरणाने जगाला विचारधारा, भांडवलवाद आणि समाजवादाच्या संकुचित संकल्पना मधून बाहेर काढून जागतिक कल्याण, विश्वबंधुत्वाकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न केला आहे.

७) भारताचे अलिप्ततावादाचे धोरण 'जगा आणि जगू द्या' या अध्यात्मवादी विचारला चालना देणारे आहे.

८) भारताच्या अलिप्तवादी धोरणाचा नेहमी हाच प्रयत्न राहिला आहे की, जगात समताधिष्टीत, लोकतांत्रिक आणि शोषण विरहित जागतिक समाज निर्माण व्हावा. आणि संघर्ष मुक्त विश्वाची निर्मिती व्हावी.

९) भारताचे अलिप्ततावादी परराष्ट्र धोरण म्हणजे तत्कालीन भारताच्या भूराजकीय मजबूरीतून निर्माण झालेले धोरण होते अशी टीका केली जाते. कारण या कालखंडात भारत जर अमेरिकेच्या गटात सामील झाला असता तर साम्यवादी चीन च्या माध्यमातून शीतयुद्ध हे भारताच्या दारात आले असते आणि भारत जर रशियाच्या गटात सहभागी झाला असता तर पाकिस्तान सीयटो आणि सेंटो गटात सहभागी असल्याने अमेरिकेने भारतच्या विरोधात पाकिस्तान चा लष्करी तळ म्हणून वापर करून भारताला अडचणीत आणले असते हे नेहरूंनी ओळखले होते म्हणून त्यांनी अलिप्ततावादी धोरणाचा अंगीकार केला.

**भारताच्या अलिप्तवादी धोरणाचे परिणाम :**

१) शीतयुद्ध काळातील दोन महासत्ता मधील तणाव कमी करण्याचे काम या अलिप्ततावादी चळवळीने केले आहे म्हणजेच एक प्रकारे तणाव शिथिलाचे काम केले.

२) स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारताने औद्योगिक, कृषि आणि आर्थिक विकासासाठी बड्या राष्ट्रांकडून विशेषत: अमेरिका, ब्रिटन, रशिया, फ्रांस यांच्याकडून सहकार्य मिळवले.

३) संयुक्त राष्ट्र संघाच्या मंचावर अलिप्त राष्ट्र गटाचे नेतृत्व करून जागतिक राजकरणात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.

४) जागतिक स्तरावर शांततेचा एक मध्यम मार्ग दाखवला असला तरी या धोरणाने भारताला शीत युद्ध कालखंडात आपला शाश्वत स्वरूपाचा मित्र मिळवण्यात अपयश आलेले दिसून येते.

५) १९६० च्या दशकात अमेरिका समार्थित सीयटो आणि सेण्टो या दोन लष्करी गटात पाकिस्तान सहभागी झाल्यामुळे पाकिस्तानला अमेरिकेकडून मोठी लष्करी मदत मिळू लागली होती तर दुसरीकडे चीन आपली आण्विक क्षमता वाढवत असताना भारताने अलिप्ततावादी धोरण स्वीकारून आत्मघात करून घेतला अशी टीका केली जाते.

६) १९६२ ला चीन ने पुकारलेल्या एकतर्फी युद्धात भारताला फार मोठी किमत मोजावी लागली भारताचा नेफा आणि लडाख चा २५ हजार चौ. मैल भाग गमवावा लागला आणि भारताचे अलिप्ततवादी धोरण एक आत्मघात ठरले अशी टीका होऊ लागली . स्वत: पंडित नेहरू संसदेत म्हणाले, आम्ही स्वता:च निर्माण केलेल्या स्वप्नाळू जगात जगत होतो. आता आमचे डोळे उघडले आहेत. आमची ताकद चीन पेक्षा कमी पडली. या युद्धात अमेरिका आणि ब्रिटन ने भारतला मदत केली असली तरी पुढच्या काळात ही भारताने आपल्या भूमीवर कोणत्याही महासत्तेला लष्करी तळ उभा करू दिला नाही हे ही खरेच आहे.

७) १९४८ ला काश्मीर प्रश्न संयुक्त राष्ट्राच्या मंचावर उपस्थित झाल्यावर भारताला कोणत्याही शाश्वत मित्राची साथ लाभली नाही उलट अमेरिकेने पाकिस्तानचे समर्थन करून काश्मीर मुद्दा वादाचा बनविला.

८) १९७१ च्या भारत – पाक युद्धात श्रीमती इंदिरा गांधी यांनी वेळीच सावध भूमिका घेतली त्यामुळे

बंगालच्या उपसागरातून अमेरिकेच्या हल्ल्याचा आपण बचाव करू शकलो. पर्यायाने या युद्धात आपला विजय झाला आणि अमेरिका, चीन, पाकिस्तान यांच्या कथित करवाईला भारताने चोख उत्तर दिले.

९) १९६२ ला चीन ने आपल्यावर आक्रमण केलेले असताना सुद्धा सुरक्षा परिषदेत चीनला स्थायी सदस्यत्वासाठी आलेल्या ठरावचे भारताने समर्थन केले. ही भारताच्या अलिप्तवादी धोरणाची फार मोठी चूक होती अशी टीका केली जाते.

१०) १९९६ मध्ये अलिप्तवादी राष्ट्रांनीच भारताचा विश्वासघात केला सुरक्षा परिषदेच्या हंगामी सदस्यत्वासाठी झालेल्या निवडणुकीमध्ये अलिप्तवादी राष्ट्रांनीच जपानच्या बाजूने आणि भारताच्या विरोधात मतदान केले त्यामुळे भारताच्या अलिप्तवादी धोरणाला तगडा झटका बसला.

११) भारताच्या या अलिप्तवादी धोरणाने निर्माण झालेली नाम चळवळच आपापसातील संघर्षाचे अड्डे झालेले दिसून येतात. इराण- इराक संघर्ष, इथियोपिया-सोमालीया संघर्ष, भारत-पाकिस्तान संघर्ष इ.

१२) संघर्षाचे आणि सत्तेचे केंद्रबिंदू युरोप खंडाकडून आशिया आणि आफ्रिका खंडाकडे संक्रमित होत असताना भारताने अलिप्ततावादी धोरण स्वीकारणे कितपत योग्य होते असे प्रश्न ही उपस्थित केले जातात.

असे काही चढ उतार भारताच्या अलिप्तवादी धोरणात समिश्र स्वरूपाचे यश आणि अपयश देणारे असले तरी १९४७ ते १९९० पर्यन्त जी सरकारे सत्तेवर आली त्यांनी अलिप्तवादी धोरणाचा अंगीकार केलेला दिसून येतो. अगदी १९७७ ला स्थापन झालेले मोरारजी देसाई यांच्या जनता पक्षाच्या सरकरनेही हे धोरण पुढे चालू ठेवलेले दिसते. कारण यापूर्वी काँग्रेस सत्तेत असताना अटल बिहारी वाजपेयी विरोधी पक्षनेते असताना त्यांनी भारत-रशिया संबंधावर भरपूर टीका केली होती पण जनता राजवटीत मागील सरकरचेच परराष्ट्र धोरण पुढे चालू राहील याची ग्वाही दिली.

● **पंचशील धोरण आणि परिणाम :**

१८४६ मध्ये ब्रिटिश साम्राजाने जम्मू काश्मीरला आपल्या विस्तारात सहभागी केल्यापासुन ब्रिटिश सरकार काश्मीरच्या सीमारेषा निश्चित करत होते १९१४ ला सिमला येथे भरलेल्या परिषदेत ब्रिटीशांनी भारत-चीन यांच्यामधील मॅकमोहन नियंत्रण रेषा तयार केली होती. १९४७ भारत स्वतंत्र झाल्यानंतर आणि चीन मध्ये साम्यवादी सरकार आल्यानंतर नियंत्रण रेषा ही सीमारेषा व्हावी आणि शांततामय सहजीवनासाठी सांस्कृतिक एकतेचा हवाला देत आणि 'हिन्दी-चीनी भाई-भाई'चा नारा देत भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू आणि चीन चे पंतप्रधान चाऊ-एन लाय यांनी ६ एप्रिल १९५४ रोजी तिबेट बाबत करार होऊन जी पंचशील तत्वे स्वीकारण्यात आली ती खालील प्रमाणे सांगता येतील.

१) परस्परांच्या प्रादेशिक एकात्मतेविषयी आणि सार्वभौमत्वाविषयी आदर बाळगणे.

२) परस्परांच्या प्रदेशावर आक्रमण न करणे.

३) परस्परांच्या अंतर्गत कारभारत हस्तक्षेप न करणे.

४) राष्ट्रीय समता आणि परस्परांचे हित सांभाळणे.

५) शांततामय सहजीवन आणि आर्थिक सहकार्य या तत्वांचा स्वीकार करणे.

वरील तत्वे दोन्ही देशांनी मान्य केली. १९५५ च्या बाडुंग परिषदेत आशिया आणि आफ्रिका खंडातील नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांनी देखील स्वीकारली आणि त्याचे समर्थन केले. त्यामुळे पंचशील तत्वांना जागतिक मान्यता मिळाल्याचे चित्र निर्माण झाले. मात्र १९५८ मध्ये चीनने अक्साई चीनच्या प्रदेशातून सिकीयांग ते पश्चिम तिबेट दरम्यान रस्ता बांधून त्याचे उद्घाटन करून १९६० ला चीन चे पंतप्रधान चाऊ-एन लाय भारताच्या भेटीला आले. दोन्ही राष्ट्रांमध्ये सीमावादावर चर्चा झाली त्यामध्ये चाऊ-एन लाय यांनी अक्साई चीनचा प्रदेश जो चीनच्या ताब्यात आहे तो भारताने चीनचा म्हणून मान्य करावा त्या बदल्यात चीन मॅकमोहन नियंत्रण रेषा मान्य करेल अशा आशयाचा प्रस्ताव ठेवला परंतु तो भारताने अमान्य केला म्हणून १९६२ ला चीन ने एक तर्फी युद्ध पुकारून भारताच्या लडाख आणि नेफा या दोन प्रदेशाचा २५ हजार चौ. मैल भूभाग बळकावला आणि इथेच भारताच्या आदर्शवादी पंचशील तत्वांना तडा गेला. तेव्हा स्वत: पंडित नेहरू संसदेत म्हणाले, आम्ही स्वता:च निर्माण केलेल्या स्वप्नाळू जगात जगत होतो. आता आमचे डोळे उघडले आहेत. आमची ताकद चीन पेक्षा कमी पडली. खर तर हा पंचशील करार म्हणून ओळखला जात असला तरी भारत आणि चीन यांची तिबेट बाबत झालेला तो एक व्यापारी करार होता. या कराराने तिबेट चीनचा अविभाज्य घटक आहे हे भारताने मान्य केले कारण तिबेट या स्वायत्त प्रदेशाची स्वायत्तता लष्करी बळावर आपण टिकऊन ठेऊ शकत नाही हे भारताच्या नेतृत्वाने जसे ओळखले होते तसे भारताची ही मजबूरी चीनी नेतृत्वानेही ओळखली आणि इथेच भारताचा आत्मघात झाला असेच या पंचशील तत्वाचे वर्णन करावे लागेल.

- **भारताचे अण्वस्त्र धोरण आणि अण्वस्त्र प्रसार बंदी करार - १९६८ :**

स्वातंत्र्यानंतर भारताने आपले अण्वस्त्र धोरण जाहीर करताना स्पष्ट केले होते की, भारत अणुशक्तीचा वापर शांततेसाठी आणि विधायक कामासाठीच केला जाईल. भारताने अण्वस्त्र बनवण्याचा कोणताही नियोजित कार्यक्रम आखलेला नाही. पंडित नेहरू यांनी जगासमोर आपली भूमिका मांडली कारण भारत नेहमीच अण्वस्त्र मुक्त जगाची कामना करणारे राष्ट्र आहे. त्या दृष्टीने निर्माण होणाऱ्या यूनो च्या प्रयत्नांना भारताने नेहमीच सकरत्मक प्रतिसाद दिलेला होता. १९ नोव्हेंबर १९६५ ला संयुक्त राष्ट्राच्या आम सभेत अण्वस्त्रच्या समूळ उच्चाटनाचा निर्णय घेण्यात आला आम सभेने घेतलेल्या निर्णयाशी भारत पुर्णपणे सहमत होता याच आधारावर १९६८ ला अण्वस्त्र प्रसार बंदी करार करण्यात आला. मात्र भारताने या करारावर स्वाक्षरी करण्याचे नाकारले कारण या करारातील तरतुदी खालील प्रमाणे होत्या.

१) अण्वस्त्रे फक्त बड्या अण्वस्त्रधारी राष्ट्रांकडेच राहतील.

२) अण्वस्त्रविहीन राष्ट्रांना यापुढे अण्वस्त्र बनविता येणार नाही.

३) अण्वस्त्रविहीन राष्ट्रांना यापुढे अण्वस्त्रसाठी लागणारी मदत बंद केली जाईल.

४) अण्वस्त्र परीक्षणावर आंतरराष्ट्रीय नियंत्रण राहील.

या पक्षपाती करारवर आक्षेप नोंदवत भारताने स्पष्ट केले की, या कराराने अण्वस्त्रे असलेले देश आणि अण्वस्त्रे नसणारे देश अशी जगाची अनैसर्गिक पद्धतीने विभाजन केले आहे ते भारताला मान्य नाही. जागतिक शांततेसाठी नि:शस्त्रीकरण करण्याची जागतिक समूहाची प्रामाणिक इच्छा असेल तर अण्वस्त्र धारी राष्ट्रांनी एका निश्चित कालमर्यादेत आपली अण्वस्त्र नष्ट करावी आणि संपूर्ण नि:शस्त्रीकरण व्हावे . परंतु भारताची ही मागणी फेटाळण्यात आली त्यामुळे भारताने या कराराद्वारे आपले हात बांधून घेण्यास नकार दिला आणि अणूचा वापर भारत शांततेसाठी करेल अशी भूमिका मांडून १९७४ ला भारताने इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली पोखरण याठिकाणी पहिली आण्विक चाचणी घेतली. ही चाचणी भारताच्या अण्वस्त्र धोरणामध्ये झालेल्या बदलाचे संकेत होते. कारण पाकिस्तानने आपला अण्वस्त्र विकास कार्यक्रम चीन आणि उत्तर कोरियाच्या मदतीने १९७२ लाच गुप्तपणे सुरू केला होता याची कल्पना भारतीय नेतृत्वाला आली होती. म्हणून अण्वस्त्रबाबत नेहरूंची असणारी आदर्शवादी संकल्पना भारतीय नेतृत्वाने सोडून दिली. या एकूणच घटनाक्रमाने अमेरिकेने भारताला आण्विक पुरवठादार देशांमधून बहिष्कृत करून भारतावर आर्थिक निर्बंध लादले परंतु भारताने आपले आण्विक धोरण मजबुतीने पुढे नेले.

**● शीत युद्धकालीन भारत– अमेरिका संबंध :**

१९५४ ला अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष आयसेनहॉवर यांनी पंडित नेहरूंना एक व्यक्तीगत पत्र लिहून अलिप्तवादी धोरणाचा नव्याने विचार करावा कारण अमेरिका भारताला आर्थिक आणि लष्करी मदत करण्यासाठी तयार आहे अशी विनवणी केली मात्र नेहरूंनी अशी मदत घेण्यास नकार दिला त्यामुळे अमेरिकेने पाकिस्तान बरोबर मे १९५४ ला एक संरक्षण करार केला आणि दक्षिण आशियात अमेरिकेच्या साम्यवादी विरोधी धोरणाचे प्रतिनिधित्व करून अमेरिकेला सर्वोपरी सहकार्य केले. याच कारणाने शीतयुद्ध काळात भारत– अमेरिका संबंध ताणले गेल्याचे दिसते. म्हणजेच अमेरिका आणि भारत यांचा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा भिन्न दृष्टिकोण यामुळे या दोन देशांमधील संबंध हे तणावपूर्ण राहिले. ते खालील मुद्यांच्या आधारे पाहता येते.

**१) काश्मीर प्रश्न :** अमेरिकेने काश्मीर हा भारताचा अविभाज्य हिस्सा आहे असे कधीही मानले नाही. उलट पाकिस्तानने मांडलेल्या मुद्यांचे समर्थन करीत राहिला आणि पाकिस्तानला लष्करी मदत देत राहिला. १९४८ ला भारताने काश्मीर प्रश्न युनोच्या सुरक्षा परिषदेसमोर ठेवला परंतु हा मुद्दा जास्त चिघळत ठेवण्यात अमेरिकेने स्वारस्य दाखवले. कारण काश्मीरचे सामरिक महत्व लक्षात घेता स्वतंत्र काश्मीरच्या धोरणाला अमेरिकेचे छुपे समर्थन होते हे भारताने ओळखले होते. १९६५ च्या युद्धात पाकिस्तानला शस्त्रसाठा पुरवून सरळ भारत विरोधी भूमिका घेतली. १९७१ च्या युद्धात आपली युद्ध नौका बंगालच्या उपसागरच्या दिशेने तैनात करून भारतावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला.

**२) साम्यवादी चीनला मान्यता :** १९४९ साली चीनमध्ये झालेल्या साम्यवादी क्रांति नंतर भारताने साम्यवादी चीनला सार्वभौम राष्ट्र म्हणून दिलेली मान्यता अमेरिकेच्या पचणी पडली नाही. त्यामुळे त्याचे परिणाम काश्मीर धोरणावर ही दिसून येतात.

**३) कोरिया संकट :** १९५० ला कोरिया प्रश्न शीतयुद्धाचा शिकार झाला, उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरिया यांच्यात यादवी सुरू झाली होती. उत्तर कोरियाच्या बाजूने रशिया तर दक्षिण कोरियाच्या बाजूने अमेरिका युद्धात उतरली. दक्षिण कोरियाच्या पर्यायाने अमेरिकेच्या युद्धखोर प्रवृतीचा भारताने निषेध नोंदवला. त्यामुळे दोन्ही राष्ट्रातील संबंध अधिकच दुरावले.

**४) गोवा प्रश्न :** भारताने १९६१ ला पोर्तुगीजांच्या ताब्यातील गोव्यावर पोलिस कार्यवाही करून गोवा मुक्त केला मात्र गोवा प्रश्नावर ही अमेरिकेने चुकीचे धोरण स्वीकारले. गोवा हा प्रदेश भारताचा भाग आहे हे माहीत असूनही संयुक्त राष्ट्र सभेपूढे गोवा हा प्रश्न पोर्तुगीजांच्या बाजूने मांडून भारताच्या भूमिकेचा विरोध केला.

**५) क्युबा संकट :** १९६२ ला अमेरिकेच्या बाजूला असणाऱ्या क्युबा मध्ये फिडेल कॅस्ट्रो यांच्या नेतृत्वाखाली साम्यवादी शासन तयार झाले. या साम्यवादी सरकारला उलटून टाकण्यासाठी अमेरिकेने प्रयत्न केले. भारताने या अमेरिकेच्या हस्तक्षेपाचा निषेध केला. कारण क्युबा हे एक अलिप्तवादी चळवळीचे अंग होते. भारताचा हा निषेध अमेरिकेला आवडला नाही. त्यामुळे भारत – अमेरिका संबंधात दुरावा निर्माण झाला होता.

**६) दिगो गर्दीया बेट :** हिंदी महासागराच्या मध्यभागी असणाऱ्या या बेटावर १९८० मध्ये अमेरिकेची नजर पडली. या बेटावर अमेरिकेने आपले लष्करी तळ निर्माण करण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे भारतासह किनारपट्टीलगत असणाऱ्या राष्ट्रांची सुरक्षितता धोक्यात आली होती म्हणून हे बेट शांतता क्षेत्र म्हणून जाहीर करावे अशी अमेरिकेकडे मागणी केली परंतु अमेरिकेने त्याकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले .

**७) अफगाणिस्तान संकट :** अफगाणिस्तानातील अंतर्गत यादवीमध्ये रशियाचा वाढता हस्तक्षेप पाहता पाकिस्तान च्या सुरक्षेततेचे कारण देत पाकिस्तानला अतिशय मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे आणि युद्ध साहित्याचा पुरवठा अमेरिकेकडून केला गेल्यामुळे दक्षिण आशियातील शांतता अमेरिका भंग करतो आहे अशी टीका भारताने केल्यामुळे दोन्ही राष्ट्रातील संबंधामध्ये अधिकच दुरावा निर्माण झाला.

**८) इराक युद्ध :** इराक या राष्ट्राची वाटचाल जागतिक शांततेला धोकादायक रासायनिक आणि जैविक हत्यारे बनवण्याकडे सुरू असून इराकची ही कृती म्हणजे जागतिक शांततेवरील संकट आहे हे कारण पुढे करत अमेरिकेने इराकवर आक्रमण करून भारताला मदत मागितली. परंतु भारताने त्याकडे दुर्लक्ष केले त्यामुळेही भारत–अमेरिका संबंध अधिकच दुरावले.

**९) साम्यवादी रशियाकडे भारताचा कल :** १९६० ते ७० च्या दशकात भारताचे परराष्ट्र धोरण हे साम्यवादी रशियाकडे झुकलेले होते. अमेरिकेच्या लष्करी गटात सहभागी होण्यास स्पस्ट शब्दात नकार देणारे पंडित नेहरू यांनी १९५५ मध्येच सोव्हियट रशिया सोबत मैत्री आणि सहकार्याचा करार केला होता. त्यामध्ये भर पडली ती १९७१ च्या भारत–रशिया मैत्री कराराने म्हणून अमेरिकन नेतृत्व भारताकडे एक शत्रू राष्ट्र म्हणून पाहत होते.

**१०) भारताच्या आण्विक कार्यक्रमावर नाराजी :** पंडित नेहरूंनी मांडलेल्या अण्वस्त्र धोरणामध्ये इंदिरा

गांधी पंतप्रधान झाल्यापासून फार मोठे परिवर्तन झाले होते. भारताने एनपीटी कराराला कडाडून विरोध करून आपला आण्विक कार्यक्रम अण्वस्त्रे बनविण्याकडे वळवला आणि १७७४ ला पोखरण या ठिकाणी पहिली अण्वस्त्राची चाचणी घेतली (परंतु अण्वस्त्रे बनवली नाहीत) त्यामुळे भारत – अमेरिका संबंध बिघडले.

एकूणच शीतयुद्धकालीन भारत अमेरिका संबंध हे १९६२ चा भारत – चीन युद्धाचा अपवाद सोडला तर तणावपूर्ण राहिलेले दिसतात. कारण दक्षिण आशियात साम्यवाद रोखण्यासाठी अमेरिकेला भारताची गरज असताना भारताने स्वीकारलेले अलिप्ततावादाचे धोरण अमेरिकेला रुचले नाही. १९८० च्या दशकात राजीव गांधींनी भारत – अमेरिका संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. परंतु तेही अलिप्तवादाच्या चौकटमधून बाहेर पडू शकले नाहीत.

● **शीत युद्धकालीन भारत– रशिया संबंध (१९७१ मैत्री करार) :**

शीतयुद्ध काळात भारताने जरी अलिप्ततावादी धोरण स्वीकारलेले असले तरी सुद्धा शीतयुद्धकाळापासूनच भारत–रशिया संबंध हे मैत्रीपूर्ण राहिले आहेत. १९४७ मध्ये भारताने श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांना रशियाचे राजदूत म्हणून नियुक्ती केली. तर १९४८ मध्ये रशियाने आपला राजदूत दिल्ली मध्ये नियुक्त करून भारत रशिया संबंधाची मुहुर्तमेढ रोवली गेली. १९५२ मध्ये भारताने डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांना रशियाचे राजदूत नियुक्त केले. यादरम्यान डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन आणि स्टॅलिन यांची चर्चा होवून भारत – रशिया संबंध अधिक मजबूत केले. शीतयुद्धकाळात जितके भारताचे पंतप्रधान झाले त्यांनी रशिया बरोबरील संबंधांना अग्रक्रम दिल्याचे दिसून येते. अमेरिकेच्या लष्करी गटात सहभागी होण्यास स्पस्ट शब्दात नकार देणारे पंडित नेहरू यांनी १९५५ मध्येच सोव्हियट रशिया सोबत मैत्री आणि सहकार्याचा करार केला होता. तर १९५६ साली बुल्गानिन आणि क्रुश्चेव्ह यांनी भारताला भेटी दिल्या. काश्मीर प्रश्न ज्या–ज्या वेळेस संयुक्त राष्ट्राच्या समोर चर्चेला आणला गेला त्या–त्या वेळेस रशियाने भारताला समर्थन देऊन भारताला सहकार्य केले होते. १९६० साली तत्कालीन राष्ट्राध्यक्ष निकिता ख्रुश्चेव्ह यांनी रशिया कायम भारताच्या पाठीशी उभा असेल अशी घोषणा केली होती. काश्मीरला भारतापासून तोडण्यापासून कुणी प्रयत्न केले, तर रशिया भारताच्या पाठीशी उभा असेल असेही त्यांनी जाहीर केले होते. १९६५ भारत पाकिस्तान युद्धात भारताला लष्करी मदत तर दिलीच परंतु हे युद्ध थांबवण्यासाठी ताश्कंद करार घडवून आणला. १९६६ मध्ये इंदिरा गांधी यांनी रशियाला भेट दिली तर १९६८ मध्ये रशियन पंतप्रधान कोसीजीन यांनी भारताला भेट देऊन भारत– रशिया संबंधात अधिक गोडवा निर्माण करण्याचे काम केले.

१९७० च्या उत्तरार्धात उजव्या विचारसरणीच्या जनता पक्ष्याच्या सरकारच्या काळात सोव्हिएत संघ आणि भारत यांच्यातील संबंधांना फारसा त्रास झाला नाही, जरी पाश्चात्य देशांशी चांगले आर्थिक आणि लष्करी संबंध प्रस्थापित करण्यासाठी भारताने हालचाली केल्या असल्या तरी. आपल्या संबंधांना विविधता आणण्याच्या भारताच्या या प्रयत्नांचा प्रतिकार करण्यासाठी सोव्हिएत संघाने भारताला अतिरिक्त शस्त्रे आणि आर्थिक सहाय्य केले. मे १९७४ मध्ये भारताने घेतलेल्या पहिल्या अणुचाचणी नंतर अमेरिकेच्या बहिष्कारानंतर

कॅनडा आणि फ्रान्स नेही भारतावर बहिष्कार घालून आण्विक वीजनिर्मिती साठी आवश्यक जड पाणी देण्यास नकार दिल्यानंतर ही मदत भारताने रशियाकडून मिळवली. म्हणूनच १९७९ साली रशियाने अफगाणिस्तान मध्ये केलेल्या हस्तक्षेपाला जगातील बहुतांश लोकशाही राष्ट्रांनी विरोध केलेला असताना भारताने विरोध केला नाही. हे भारताच्या मूळ धोरणाशी विसंगती दर्शवणारे असले तरी राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने घेतलेला योग्य निर्णय होता. भारताच्या अवकाश विकास कार्यक्रमालाही रशियाची मदत झालेली दिसून येते. यामध्ये भारताने १९८८ साली आर.एस -१ (ए) आणि इन्सॅट- २ (बी) हे उपग्रह रशियाच्या मदतीने अवकाशात सोडले. पृथ्वी, त्रिशूल, अग्नि, आकाश अशा प्रकारची क्षेपणास्त्र विकसित करण्यामध्ये भारताला सहकार्य केले. १९८२ मध्ये रशियाने भारताला आय. एन. एस. चक्र ही आण्विक शक्तिवर चालणारी पाणबुडी देऊन भारताच्या नाविक दलाचे मजबुतीकरण करण्यात महत्वपूर्ण भूमिका निभावली. तसेच भारताला मिग-२९, मिग ३९, सुखोई - ३० अशी आधुनिक तंत्रज्ञानवर आधारलेली प्रचंड मोठी मारक क्षमता असणारी विमाने देऊन भारताचे हवाई दल मजबूत केले. रशियाने भारताला संरक्षण क्षेत्रात बळकट होण्यासाठी नेहमीच मदत केली आहे. जगात चर्चेचा विषय ठरलेले ब्राम्होस क्षेपणास्त्रचे तंत्र रशियानेच भारताला दिले आहे. भारत-रशिया यांच्या संयुक्त माध्यमातून हे क्षेपणास्त्र विकसित करण्यात आलेले आहे.

मे १९८५ मध्ये राजीव गांधींनी सोव्हिएत युनियनला भेट दिली आणि सोव्हिएत युनियनबरोबर दोन अतिशय महत्वपूर्ण आर्थिक करारावर स्वाक्षरी केली. १९८६ च्या उत्तरार्धात गोर्बाचेव्ह -राजीव गांधी भेट नवी दिल्ली येथे पार पडली. त्यामुळे भारत-रशिया मैत्री संबंध अधिकच मजबूत झाले. या भारत-रशिया संबधाचा गोडवा १९७१ ला सर्वोच्च शिखरावर पोहचला होता. तो खालील प्रमाणे -

- **१९७१ - भारत-रशिया शांतता, मैत्री आणि सहकार्याचा करार :**

१९७० ते ८० च्या दशकात आशिया खंडातील आंतरराष्ट्रीय राजकरणात अनेक स्थित्यंतरे घडून येत होती. भारताच्या विरोधात अमेरिका-चीन-आणि पाकिस्तान यांची नवी आघाडी तयार झाली होती. त्यामुळे भारताच्या सुरक्षेतेला धोका निर्माण झाला आहे हे ओळखून श्रीमती इंदिरा गांधी यांनी ९ ऑगस्ट १९७१ रोजी भारत-रशिया मध्ये वीस वर्षाचा शांतता, मैत्री आणि सहकार्याचा करार झाला.

१) उभय राष्ट्रे एकमेकांच्या स्वातंत्र्याचे, सार्वभौमत्वाचे व प्रादेशिक अखंडतेचा सन्मान करतील आणि एकमेकांच्या कारभारत हस्तक्षेप करणार नाहीत.

२) उभय राष्ट्रे आंतरराष्ट्रीय शांतता, सहजीवन आणि सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी शस्त्र स्पर्धेला घाला घालण्याचा आणि नि:शस्त्रीकरणासाठी प्रयत्न करेल.

३) रशिया भारताच्या अलिप्तवादी धोरणाचा आदर करेल तर भारत ही रशियाच्या शांततावादी धोरणाचा आदर आणि सन्मान करेल.

४) उभय राष्ट्रे वसाहतवाद आणि वंशवादाचा विरोध करून या समस्येचे समूळ उच्चाटन करण्याचा प्रयत्न करतील.

५) भारत आणि रशिया ही दोन्ही राष्ट्रे आपल्या हितसंबंधाला बाधा निर्माण करणाऱ्या घटकांवर लक्ष ठेऊन परस्परात चर्चा विचरविनिमय करून त्याची सोडवणूक करतील .

६) भारत आणि रशिया ही दोन उभय राष्ट्रे अन्य कोणत्याही देशांच्या लष्करी गटात सामील होणार नाहीत.

७) उभय राष्ट्रे आर्थिक, व्यापार, दळणवळण विषयक क्षेत्रात एकमेकांना सहकार्य करतील .

८) दोन्ही देश विज्ञान तंत्रज्ञान, कला ,शिक्षण साहित्य, आरोग्य, आकाशवाणी, वृत्तपत्रे, आणि दूरदर्शन सेवा यांचा विकास करतील .

९) या कराराची मुदत २० वर्षापर्यंत असेल प्रत्येक पाच वर्षांनी त्याची मुदत आपोआपच वाढवली जाईल. दोन्ही देशात मतभेद झाले तर आपापसात सामंजस्याने सोडवले जातील. या कराराने भारताचे अलिप्तवादी धोरण धोक्यात आले होते अशी टीका होत असली तरी या कराराने शीतयुद्धकालीन आशिया खंडातील १९७० च्या दशकत उदयाला आलेली अमेरिका-चीन-पाकिस्तान या अभद्र आघाडीला फक्त शहच दिला नाही तर आशिया खंडात सत्ता संतुलन निर्माण होण्यास मदत झाली. म्हणूनच भारत १९७१ ला अमेरिकेच्या हल्ल्यापासून स्वत:चा बचाव करून बांग्लादेशाची निर्मिती करू शकला.

● **संयुक्त राष्ट्रसंघ आणि भारताची भूमिका :**

संयुक्त राष्ट्रसंघाचा संस्थापक सदस्य असणाऱ्या भारताने यूएन च्या धोरणाचे सातत्यपूर्ण समर्थन करून जागतिक शांततेची आपली वचनबद्धता पूर्ण केलेली दिसून येते. अगदी सुरुवातीलाच संविधानाच्या कलम ५१ नुसार स्वत:वर बंधन घालून घेतले. मानवी हक्काच्या रक्षणासाठी १० डिसेंबर १९४८ ला जाहीर केलेला मानवी हक्काचा जाहीरनाम्याचे पालन करीत आपल्या नागरिकांना मूलभूत हक्क बहाल करून जगासमोर एक आदर्श निर्माण केला होता. १९४८ ला निर्माण झालेला काश्मीर मुद्दा भारत लष्करी बळावर सोडवण्याची ताकद असतांनाही भारताने तो प्रश्न यूनो मध्ये उपस्थित करून यूनो वर आपला विश्वास प्रकट केला. १९५४ मध्ये भारताने अणुचाचणी बंदी संदर्भात आंतरराष्ट्रीय समूहाला सूचित केले होते. १९६५ मध्ये यूनो मध्ये मांडलेल्या संपूर्ण नि:शस्त्रीकरणाचे भारताने समर्थन केले. परंतु महासत्ता राष्ट्रांनी संपूर्ण नि:शस्त्रीकरणाला विरोध करून एनपीटी सारखा अन्यायकारक करार १९६८ ला मांडला, त्याला भारताने विरोध केला. १९७८ साली यूनोच्या महासभेत नि:शस्त्रीकरणविषयी चार कलमी कार्यक्रम मांडलेला होता. १९८७ मध्ये श्रीलंकेत आपली शांतिसेना पाठवून श्रीलंकेचे सार्वभौमत्व टिकवण्यासाठी फार मोठी किंमत मोजली आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या ठरवा विरोधात अमेरिकेने इराक वर केलेल्या लष्करी करवाई साठी अमेरिकेने भारताकडे लष्करी मदत मागितली परंतु ती भारताने नाकारली कारण अमेरिकेने यूनो च्या ठरवाचा अवमान केला होता. याशिवाय भारताने निर्वसाहतीकरणाच्या प्रक्रियेत, मानवाधिकाराच्या संरक्षणात, वंशवादाच्या निर्मूलनात आणि संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शांतिसैनिक मोहिमांमध्ये भारताच्या ५० हजार सैनिकांनी वेगवेगळ्या मोहिमामध्ये भाग घेऊन शांतता निर्मितीचे काम केले आहे. याशिवाय या संघटनेला यशस्वी करण्यासाठी अनेक भारतीयांनी आपले बहुमोल योगदान दिले आहे.

यामध्ये १९५३ मध्ये श्रीमती विजयालक्ष्मी पंडित आमसभेच्या अध्यक्षपदी निवड झाली होती. श्रीमती राजकुमारी अमृत कौर, व्ही. आर. सेन, राजेश्वर दयाळ, नरेश कुमार ठाकुर आणि शशी थरूर यांनी आपल्या कार्याने यूनो ला शांतता प्रक्रियेत आपले मोलाचे योगदान दिले. म्हणून शशी थरूर भारताच्या योगदांनाविषयी म्हणतात. 'India is a leading donor to the United Nations democracy Fund, which provides assistance for building democracy, India has established a Pease building Commission to help Countries transition from war to durable peace.

- **हिंदी महासागर आणि भारताची भूमिका :**

हिंदी महासागर शीत युद्ध काल खंडात अतिशय धोकादायक क्षेत्र बनले होते. महासत्तांच्या अण्वस्त्र सज्ज युद्ध नौकानी तणावाची स्थिति निर्माण झाली होती त्यामुळे आंतर्राष्ट्रीय राजकरणावर आणि भारताच्या संरक्षण सिद्धतेवरती फार मोठा परिणाम झालेला दिसून येत होता. म्हणून भारतासह अलिप्तवादी राष्ट्रांनी हिंदी महासागर शांतता क्षेत्र म्हणून घोषित करावे ही मागणी सतत लाऊन धरली. कारण या महासागराच्या तटवर्ती भागात ३६ राष्ट्रे आणि या महासागरपासून लाभ प्राप्त करणारे ११ राष्ट्रे यांची सुरक्षितता धोक्यात आली आहे असे भारताने वारंवार आंतरराष्ट्रीय समुदायांच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न चालवलेला होता. कारण ४७ राष्ट्रांपैकी बहुतेक राष्ट्रे ही अलिप्तवादी चळवळीशी निगडीत होती. कैरो आणि लुसाका अनुक्रमे १९६४ आणि १९७० येथे झालेल्या अलिप्त राष्ट्रच्या अधिवेशनात या भागातील सैनिकी हालचाली, अण्वस्त्र सज्ज युद्धनौका यामुळे तटवर्तीय राष्ट्रांनी चिंता व्यक्त करून हा भाग शांतता क्षेत्र म्हणून घोषित करावा अशी पुन्हा मागणी करण्यात आली. १८८३ च्या दिल्ली अलिप्त राष्ट्रांच्या सभेत महासत्ताक राष्ट्रांनी परस्पर समझोता करून निघून जावे आणि या क्षेत्रास शांतता क्षेत्र घोषित करावे अशी पुन्हा मागणी करण्यात आली. परंतु या प्रयत्नांना यश येत नाही हे दिसताच भारतानेही हिंदी महासागरत आपले प्रभाव क्षेत्र वाढवण्यास सुरुवात केली. याचाच भाग म्हणून १९८७ ला भारताने श्रीलंकेबरोबर एक करार करून हिन्दी महासागरात आपली उपस्थिती निर्माण करून अमेरिका आणि चीनचा वाढता प्रभाव नियंत्रित करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. शीतयुद्धोत्तर कालखंडात झालेल्या बदलामुळे हिंदी महासागरात अमेरिकेबरोबर भारताने काही सुरक्षाविषयक धोरणे भारताने राबवतांना १९९२ पासून अमेरिका आणि भारताने 'मलबार' या सांकेतिक नावाने नौदल कवायती सुरू ठेवल्या. जगातील सर्वात मोठी अणूउर्जेवर चालणारी विमानवाहु युद्धनौका 'निमित्झ' भारताच्या भेटीला आली. या युद्ध नौकेला औस्ट्रोलियाने प्रवेश नाकारला होता. एकूणच शीतयुद्धाच्याअंतिम क्षणी भारताने आपल्या संरक्षण सिद्धतेवर भर देऊन हिंदी महासागरात सत्तेचे संतुलन साधण्यावर भर दिल्याचे दिसून येते.

**आंतरराष्ट्रीय सहजीवनातून राष्ट्रीय हिताकडे :**

शीतयुद्धालीन भारताच्या परराष्ट्र धोरणाचे मुख्य सूत्र राहिले आहे . कारण सत्तेच्या आधारावर समस्येची सोडवणूक करण्यापेक्षा राजनयाच्या माध्यमातून समस्येची सोडवणूक होऊ शकते यावर भारतीय परराष्ट्र धोरणाचा दृढ विश्वास होता. त्यामुळे आपले शेजारचे राष्ट्र शत्रू राष्ट्र असते हा कौटिल्याचा विचार भारतीय परराष्ट्र धोरणाला पचणी पडला नाही. कारण भारताचे परराष्ट्र धोरण हे आंतरराष्ट्रीय हितातून राष्ट्रीय हिताकडे घेऊन

जाणारी एक विचार धारा आहे. भारताने कधीही आक्रमक भूमिका घेतली आणि उलट जागतिक शांततेला गालबोट लागू नये म्हणून १९५० ला तिबेट वर चीन चा कब्जा विनाअट मान्य केला. श्रीलंकेतील, बांग्लादेशातील निर्वासितांना समावून घेण्याची भूमिका असेल, भारत-पाकिस्तान, भारत-बांग्लादेश पाणी वाटप असेल किंवा हिंदी महासागरातील कच्छतिउ बेट किंवा बंगालच्या उपसागरातील न्यू मुर बेटाविषयी असणारा वाद, भारत-नेपाळ संबंध आणि १९५० चा भारत नेपाळ करार, गंडक, त्रिशूली, कोसी व महाकाली नद्यांचा पाणीवाटप प्रश्न या सर्व घटना क्रमाचा आढावा घेतला असता भारताने या राष्ट्रांबरोबर शांतता आणि मैत्री भंग होणार नाही याची वारंवार दखल घेतलेली दिसून येते . राष्ट्रीय हितासाठी आंतरराष्ट्रीय हितसंबधांना कधीही बाधा येऊ दिली नाही. १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धात भारतीय लष्करांनी जिंकलेली पाकिस्तानी भूमी विनाअट ताष्कंद कराराने परत करण्याचे, १९७१ च्या युद्धातील ९० हजार युद्धकैदी सिमला करारान्वये परत करण्याचे औदार्य हे फक्त भारताचीच विदेश नीती दाखवू शकते कारण भारतीय विदेश नीतीचे मुख्य सूत्र आहे आंतरराष्ट्रीय सहजीवनातून राष्ट्रीय हिताकडे.

शीतयुद्धकालीन भारताच्या परराष्ट्र धोरणाचा संक्षिप्त आढावा घेतला असता असे म्हणता येते की, भारताचे परराष्ट्र धोरण शांतता, सहकार्य या माध्यमातून सामाजिक आणि आर्थिक विकास साधण्याबरोबर राष्ट्र-राष्ट्रामधील तंटे सोडवण्यावर भर दिला. आशिया आणि आफ्रिका खंडातील गरीब राष्ट्रांना महासत्तांच्या काचाट्यातून वाचवणे आणि त्यांना एक सामूहिक व्यासपीठ निर्माण करून देऊन आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितेसाठी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या भूमिकेला समर्थन देण्याबरोबर राष्ट्राची आण्विक आणि सामरिक दृष्ट्या सशक्त बनण्याकडे संक्रमण याच कालखंडात झालेले दिसून येते.

### ४.३.२ शीतयुद्धोत्तर भारताचे परराष्ट्र धोरण :

१९९० च्या दशकात जागतिक राजकरणात अनेक मोठमोठे बदल झाले. शीतयुद्धाचे प्रतीक असणारी बर्लिन ची भिंत उद्‌ध्वस्त झाली, व्हिएतनाम चे एकीकरण आणि रशियाचे स्वतंत्र १५ राष्ट्रांमध्ये विभाजनामुळे रशियाचे जागतिक राजकारणातील कमकुवत होणारे स्थान त्यामुळे जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाची आलेली लाट यांचा परिणाम जसा जागतिक संबंधावर झालेला होता तसाच भारताच्या परराष्ट्र धोरणावर ही झालेला दिसून येतो. नेहरूंनी मांडलेली तत्वे या बदलत्या परिस्थितीमध्ये कालबाह्य झाली होती राजनयाच्या राजकारणापासून सत्तेच्या राजकरणाकडे, आणि लोकशाही समाजवादाकडून भांडवली आर्थिक विकासावर लक्ष केन्द्रित करणे भाग पडले. पाश्चात्य राष्ट्रांना विरोध करून चालणार नाही हे ही भारतीय नेतृत्वाने जाणले होते. कारण रशिया स्व:ता आर्थिक संकटाचा सामना करत होता. त्यामुळे भारताला रशियाकडून आर्थिक सहकार्य चालू राहील की नाही याबद्दल भारतीय नेतृत्व साशंक होते त्यामुळे या नव्या विश्व रचनेत अमेरिकेशी जुळवून घेण्याशिवाय आणि अमेरिकेबरोबर संबंध सुधारण्याशिवाय भारतीय नेतृत्वाला पर्याय नव्हता. कारण एका बाजूला चीनी विस्तारवाद आणि दुसऱ्या बाजूला जम्मूकाश्मीर मधील पाकिस्तान पुरस्कुत दहशतवाद शिवाय देशांतर्गत बिघडलेली आणि विस्कटलेली आर्थिक घडी बसवण्यासाठी समाजवादाची कास

सोडून जगतिकीकरण, उदारीकरण, आणि खाजगीकरण यांचा स्वीकार केला. कारण शीतयुद्धकालीन लष्करी संघटनांची जागा व्यापारी संघटनांनी घेतली होती त्यामुळे भारताला आपल्या आर्थिक समस्येवर मात करण्यासाठी आणि व्यापारी हितसंबंधांना मजबूत करणे गरजेचे होते. कारण शीतयुद्धोत्तर कालखंडात दक्षिण पूर्व आशियाई राष्ट्रांनी केलेली प्रगति नजरेआढ करून चालणार नव्हती. शीत युद्धोत्तर या नवीन आव्हांनाचा सामना करण्यासाठी पी. व्ही. नरसिंहराव यांनी २० डिसेंबर १९९१ रोजी संसदेपुढे दिलेल्या भाषणात त्यांनी सरकारच्या परराष्ट्र धोरणाची रूपरेषा मांडताना स्पष्ट केले की "Preventing any threat to India's Unity and territorial integrity, ensuring geopolitical security by creating a durable environment of stability and peace in our region, creating a framework conducive to the economic well-being of the people by encouraging a healthy external economic environment and trying to restore internationally the centrality and criticality of development in the evolution of the political and economic policies all over the world." (सदर मूळ उतारा व्ही. पी. दत्ता यांच्या इंडियाज फॉरेन पॉलिसी इन ए चेंजिंग वर्ल्ड या ग्रंथातील असून तो शैलेन्द्र देवळानकर यांच्या भारताचे परराष्ट्र धोरण या पुस्तकातील संदर्भ आहे (पान नं ८२, ८३)हे नमूद करताना नरसिंहराव यांनी भारताच्या बदलत्या परराष्ट्र धोरणाची रूपरेषा खालीलप्रमाणे मांडली.

१) भारताचे परराष्ट्र धोरण आर्थिक आणि व्यापारी स्वरूपाच्या हितसंबंधाचे रक्षण करून ते मजबूत करण्यावर भर देईल.

२) अमेरिकेसहित पाश्चमात्य राष्ट्रांबरोबर संबंध सुधारण्याचा सातत्यपूर्वक प्रयत्न करेल.

३) पाकिस्तान द्वारा काश्मीर मध्ये चालविला जाणाऱ्या दहशतवादा विरुद्ध जागतिक जनमत संघटित करणे.

४) संयुक्त राष्ट्राच्या लोकशाहीकरणावर भर देवून सुरक्षा परिषदेवर स्थायी सदस्यत्वासाठी प्रयत्न करणे

५) आसियान राष्ट्रांबरोबर आर्थिक सहकार्य वाढवण्यावर भर देणे त्यासाठी आर्थिक राजनय मजबूत करणे

६) भारतातील परकीय गुंतवणूक वाढवून बड्या राष्ट्रांकडून व्यापारी सवलती मिळवणे.

७) सार्क राष्ट्रांबरोबर संबंध अधिक मजबूत करणे.

८) बहुध्रुवीय विश्वरचनेच्या निर्मितीसाठी प्रयत्न करणे .

या सर्व बदलत्या परिस्थितीचा विचार करता **सी. राजमोहन यांनी आपल्या २००३ साली प्रकाशित झालेल्या 'The Shaping of India's New Foreign Policy'** या पुस्तकात शीतयुद्धोत्तर काळात भारतीय परराष्ट्र धोरणातील पाच महत्वपूर्ण बदल स्पष्ट केले आहेत

१) भारताच्या परराष्ट्र धोरणाने ठेवलेले समाजवादी धोरणाच्या स्वप्नाळू धोरणापासून आधुनिक भांडवलवादी समाजरचनेच्या धोरणाकडे स्व:ताला परावर्तीत करून घेतले.

२) परराष्ट्र धोरणामध्ये राजकीय हितसंबंधापेक्षा आर्थिक हितसंबंधांना प्राधान्य देण्यास सुरुवात केली आहे.

३) तिसऱ्या जगाचे सामूहिक हितसंबंध जोपासण्यापेक्षा व्यक्तीगत आर्थिक,राजकीय आणि सामरिक हितसंबंधाच्या रक्षणावर भर देण्यास सुरुवात केली.

४) पाश्चमात्य राष्ट्रांचा विरोध करणारे नेहरू धोरणाचा त्याग करावा लागला.

५) आदर्शवादापेक्षा वास्तववावादावर भर देऊन सामरिक आणि संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर होण्यावर भर द्यावा लागला आहे.

१९९१ पासून २०२१ पर्यन्त भारतीय परराष्ट्र धोरणात कशा प्रकारे स्थित्यंतरे आली हे आपणास खालील मुद्द्यांना अनुसरून पाहता येईल.

● **आर्थिक सहयोग संघटनांवर भर :**

केवळ भारतानेच नाही तर बहुसंख्य राष्ट्रांनी आपल्या व्यापारी आणि आर्थिक हितसंबंधांना महत्व द्यायला सुरुवात केली होती. याच दरम्यान विश्व व्यापारा संघटनेची स्थापना आणि विभागीय स्वरूपाचे आर्थिक आणि व्यापारी हितसंबध लक्षात घेऊन यूरोपियन महासंघाच्या धर्तीवर भारतानेही १९८० च्या दशकात स्थापन केलेल्या सार्क संघटनेला विधायक स्वरूप देऊन व्यापारी आणि आर्थिक हितसंबंध बळकट करण्यासाठी १९९३ ला ढाका येथे झालेल्या अधिवेशनात दक्षिण आशियाई राष्ट्र प्राधान्याशील व्यापार करार (SAPTA) करण्याचा निर्णय घेण्यात आला. हा करार म्हणजे दक्षिण आशियात विभागीय पातळीवर व्यापार उदारीकरणाचे धोरण भारताने स्वीकारले आणि ७ डिसेंबर १९९५ ला या कराराची अंमलबाजवणी सुरू करून परस्परांनी एकमेकांना Most Favoured Nation चा दर्जा, परस्परांनी व्यापार सवलती आणि जकात कर कपात सारखे धोरणे अवलंबली आणि त्यामधून दक्षिण आशियात मुक्त व्यापार क्षेत्र (SAFTA) निर्माण करण्याचे उद्धिष्टे ठेवण्यात आली. आपल्या शेजारील राष्ट्रांचे संबंध सुधारण्याला प्राधान्य दिले म्हणूनच भारताने १९९६ मध्ये एक धोरण ठरवत असताना असे ठरविले की भारताच्या शेजारी असणाऱ्या श्रीलंका, बांग्लादेश, भुतान मालदिव आणि नेपाळ या राष्ट्रांना विना परतावा मदत देण्याचे धोरण अवलंबले. आपल्या राजकीय संघर्षाचा परिणाम आर्थिक सहकार्यावर होऊ दिला नाही. उदा: भारताचे पाकिस्तान बरोबर अनेक प्रश्नांनावर मतभेद असले तरी आर्थिक संबंधात बाधा येऊ दिली नाही. हेच धोरण भारताचे चीन सोबतही राहिले आहे. म्हणूनच या दोन्ही राष्ट्रांना भारताने Most Favoured Nation चा दर्जा दिला आहे. तर इंद्रकुमार गुजराल यांनी पाकिस्तान बरोबर संबंधात सुधारणा व्हावी म्हणून केंद्र-बाह्य वर्तुळ सिंद्धांत मांडून वादग्रस्त काश्मीर मुद्दा सोडून भारत - पाक संबंध विकसित करता येतील अशा विचाराची मांडणी केली. याशिवाय भारताने जी -२० राष्ट्रांबरोबर आपले आर्थिक आणि व्यापारी संबंध मजबूत करण्यावर भर दिला. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधि आणि पर्यायाने अमेरिका आणि अन्य पाश्चमात्य राष्ट्रांच्या आर्थिक प्रभावाला आव्हान देण्यासाठी आणि आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी २००९ साली ब्राजील, रशिया, भारत आणि चीन यांनी BRIC बँकेची स्थापना करून आर्थिक हितसंबंधाना चालना दिली पुढे २०११ मध्ये या संघटनेत दक्षिण अफ्रिका सहभागी झाली.

● **लुक ईस्ट धोरण :**

१९९१ पंतप्रधान पी.व्ही नरसिंह राव यांनी भारताचे नवीन परराष्ट्र धोरण मांडत असताना या लुक ईस्ट धोरणाचा अवलंब केला. भारत आणि दक्षिण पूर्व आशिया खंडातील राष्ट्रांबरोबर आपले आर्थिक आणि सामाजिक हितसंबंधाचा विस्तार करून या क्षेत्रात चीनच्या वाढत्या प्रभावला कमी करून भारताला एक क्षेत्रीय ताकत म्हणून पुढे नेण्याच्या अतिशय व्यापक दृस्टिकोणातून या लुक ईस्ट धोरणाकडे पहिले जाते. खरे तर शीतयुद्धाच्या अस्ता नंतर निर्माण झालेल्या नवीन जागतिक व्यवस्थेला आणि क्षेत्रीय व्यवस्थेला संतुलित करून आर्थिक हितसंबद्ध सुरक्षित करणे,आसीयान राष्ट्रांबरोबर राजकीय संबंध सुधारणे, विज्ञान,तंत्रज्ञान,व्यापार, गुंतवणूक या क्षेत्रामध्ये सहकार्य वाढवणे, आसीयान राष्ट्रांबरोबर संरक्षण व्यवस्था मजबूत करणे हा या धोरणाचा मुख्य हेतु असल्याचे दिसून येते. १९६७ साली दक्षिण-पूर्व राष्ट्रांनी निर्माण केलेल्या असियान या संघटनेत भारताने चंचु प्रवेश करून या संघटनेचे संयुक्त व्यासपीठ असणाऱ्या असियान रिजनल फोरमचे सदस्यत्व मिळवले . १९९२ मध्ये भारताला असियान मध्ये विभागीय सहकाऱ्याचा दर्जा तर १९९५ ला भारताला पूर्ण सहकाऱ्याचा दर्जा देण्यात आला. अमेरिका आणि युरोपीय महासंघांनंतर असियान राष्ट्रांचा भारताबरोबरचा व्यापार तिसऱ्या क्रमांकावर येऊन पोहचला आहे. म्हणूनच भारत आज जपान-फिलिपिन्स कंबोडिया-दक्षिण कोरियाआणि व्हियतनाम यांची संयुक्त आघाडी निर्माण करून चीनी वर्चस्वाला आव्हान देण्यासाठी सज्ज झाला आहे.

● **जी- ४ ची निर्मिती :**

१९५५ मध्ये अमेरिकेने भारताला तैवानच्या जागेवर संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेचे कायम सदस्यत्व देऊ केले होते. परंतु तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी विचारधारेच्या आधारावर हे सदस्यत्व नाकारून ते सदस्यत्व चीनला देण्याचे समर्थन केले. आणि चीन सुरक्षा परिषदेचा कायम सदस्य झाला. परंतु त्यानंतर भारताला सुरक्षा परिषदेत कायम सदस्यत्व मिळवण्यासाठी फार मोठा संघर्ष करावा लागतो आहे. १९९४ ला भारताने सुरक्षा परिषदेवरील दावेदारी पुन्हा नव्याने मांडली. भारताने आपली लोकशाही, भारताची लोकसंख्या आणि युनो मधील योगदानाच्या आधारावर दावा सांगितला मात्र अमेरिका आणि चीन यांनी या दावेदारीला विरोध केला. भारताबरोबरच जर्मनी, जपान आणि ब्राझिल यांनी ही सुरक्षा परिषदेवर आपला दावा सांगितला. ही दावेदारी सांगणाऱ्या चार राष्ट्रांनी एकत्र येत सुरक्षा परिषदेचे लोकशाही कारण करण्यासाठी संयुक्तपणे प्रयत्न करण्यासाठी - G-4 नावाचा संघ स्थापन केला आणि २००५ साली युनो च्या आम सभेपूढे एक प्रस्ताव मांडला त्या प्रस्तावातील तरतुदी खालील प्रमाणे होत्या.

१) सुरक्षा परिषदेची सदस्य संख्या १५ वरुन २५ केली जावी.

२) सुरक्षा परिषदेमध्ये सहा कायम सदस्यांचा आणि चार हंगामी सदस्यांचा समावेश करावा.

३) नव्याने समाविष्ट झालेल्या कायम सदस्यांना पुढील पंधरा वर्ष नकाराधिकर राहणार नाही.

या जी-४ च्या माध्यमातून भारताने आपली सुरक्षा परिषेदेवरची दावेदारी मजबूत करण्यासाठी या मंचाचा

योग्य वापर करून घेतला आहे. त्यामुळेच अलीकडच्या काळात चीन सोडून सुरक्षा परिषदेतील चार कायम सदस्य राष्ट्रांचे मन वळीविण्याचा भारताच्या परराष्ट्र धोरणाने यशस्वी प्रयत्न केलेले दिसतो.

- **शीतयुद्धोत्तर कालीन अमेरिका संबंध :**

१९९० नंतर भारताने स्वीकारलेले जागतिकीकरणाचे, उदारीकरणाचे आणि खाजगीकरणाचे धोरण यामुळे शीतयुद्धोत्तर भारतात अनेक अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपन्यांनी गुंतवणुक करण्यास प्रारंभ केला. त्यामुळे भारत- अमेरिका आयात निर्यात यामध्ये वाढ झाली. त्यामुळे भारत-अमेरिका संबंध हे शीतयुद्धोत्तर कालखंडात सुधारलेले दिसून येतात. पाकिस्तानला अमेरिका एफ१६ विमानाचा पुरवठा करीत होता या दरम्यान भारत नाराज होऊ नये म्हणून भारतलाही अत्याधुनिक एफ१८ विमाने देण्याचे कबूल केले. अटल बिहारी वाजपेयी यांनी अमेरिकेला भेट देऊन तिथल्या संसदेसमोर हिंदीमध्ये भाषण करून आंतरराष्ट्रीय राज्यपुरस्कृत दहशतवादावर आपले म्हणणे पटवून दिले. १९९९ च्या कारगिल युद्धात अमेरिकेने पाकिस्तानला आक्रमक राष्ट्र ठरवून तात्काळ युद्धातून माघार घेण्यासाठी भाग पाडले. त्यासाठी राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांनी पाकिस्तानवर दबाव निर्माण केला . हे परिवर्तन भारत- अमेरिका धोरणात प्रथमच तयार झाले होते. १९९८ च्या भारताने केलेल्या अण्वस्त्र चाचण्यावर अमेरिकेने आक्षेप घेतला परंतु अमेरिकेने भारताच्या अण्वस्त्र कार्यक्रमाची मजबूरी ओळखली होती . कारण दक्षिण आशिया आणि हिंदी महासागरात चीनच्या विरोधात आघाडी उघडण्याचा अमेरिकेचा मानस लपून राहत नाही. कारण शीत युद्धाच्या समाप्तीनंतर पाकिस्तानचे उपयोगिता मूल्य कमी झाले होते. ११ सप्टेंबर २००१ नंतर ज्याप्रमाणे जागतिक राजकरणाचे संदर्भ बदलले तसे भारत-अमेरिका संबंधातील संदर्भ ही बदलले. दहशतवाद हा मुद्दा जागतिक राजकारणाच्या केंद्र स्थानी आला. अमेरिकेने तालिबान राजवट आणि ओसामा बिन लादेन यांच्या विरोधात अफगाणिस्तानमध्ये युद्ध पुकारले. या युद्धाच्या दरम्यानही अमेरिकेची पाकिस्तानला लष्करी मदत मिळत राहिली परंतु पाकिस्तानने त्याचा योग्य वापर केला नाही हे अमेरिकेच्या लक्षात आले. भारताचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी पी-५ नावाची नवी संकल्पना मांडून उभयतांचे संबंध मजबूत करण्याचा प्रयत्न केला . तरीही भारत-अमेरिकेमध्ये काही वादाचे मुद्दे होते की, जम्मू कश्मीर मध्ये मानवाधिकारचे उल्लंघन होते आहे हा अमेरिकेचा आरोप असेल, अण्वस्त्र तंत्रज्ञान काळ्या बाजारातून मिळवण्याची पाकिस्तानचे प्रयत्न आणि अमेरिकेचे त्याकडे होणारे दुर्लक्ष, इराकमध्ये शांति सेना पाठवण्याची अमेरिकेची विनंती भारताकडून नाकारली गेली, इराण मधील भारताच्या गॅस पाइप लाईनला अमेरिकेचा असणारा विरोध, २००४ मध्ये अमेरिकेकडून पाकिस्तानला दिला गेलेला Major Non - NATO Ally चा दर्जा हे मतभेदाचे मुद्दे असले तरी २००४ ते २००९ या कालखंडात डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली भारत अमेरिका संबंध विकसित करण्यावर अधिक भर देण्यात आला होता. २००५ मध्ये अमेरिकन विदेश मंत्री कोंडालिझा राइस भारताच्या भेटीवर आल्या आणि त्यांनी २१ व्या शतकात भारताला महासत्ता बनविण्याचे आश्वासन दिले. डॉ मनमोहनसिंह अमेरिका भेटी दरम्यान अणुऊर्जा क्षेत्रातील सहकार्य, दहशतवादाचा सामना, सुरक्षा परिषदेतील भारताच्या कायम सदस्यत्वाला समर्थन आणि व्यापार वृद्धी ही पण आश्वासने मिळाली आणि २००६ मध्ये आकारला आला भारत-अमेरिका नागरी अणु ऊर्जा करार. ज्या

अमेरिकेकडून १९७४ पासून अनुक्षेत्रातील बहिष्कार सहन करणारा भारत सीटीबीटी आणि एनपीटी वर सही न करता अमेरिकेबरोबर आण्विक करार करण्यासाठी सज्ज झाला होता हे एक नव्या आणि बलशाली भारताची जागतिक राजकारणातील आपले स्थान किती मजबूत झाले आहे हे दर्शवणारी ठरली, त्यानंतर जपान आणि ऑस्ट्रेलिया यांनीही भारताबरोबर नागरी अणु ऊर्जा करार केले. शिवाय अमेरिकेने भारताच्या आण्विक पुरवठादार राष्ट्रांच्या गटातील भारताच्या दावेदारीलाही मान्यता दिली आहे. म्हणजेच २००६ च्या नागरी अणु ऊर्जा कराराने भारत-अमेरिका संबंधाचे नवीन पर्व सुरू झाले असे म्हणता येईल. हा करार म्हणजे भारताच्या अण्वस्त्र सज्जतेला अमेरिकेकडून मिळालेली एकप्रकारची मान्यताच होती. या कराराने भारताच्या अणुभटट्यांचे नागरी आणि लष्करी अणु ऊर्जा प्रकल्पात विभागणी करून केवळ नागरी अणु शक्ति प्रकल्पच आंतरराष्ट्रीय निरीक्षणाखाली आणल्या गेल्या आणि भारताला आण्विक वीज निर्मिती साठी आंतरराष्ट्रीय दरवाजे खुले केले. त्यानंतर २०१४ मध्ये भारतात नरेंद्र मोदी आणि अमेरिकेत बराक ओबामा सत्तेवर आल्यानंतर ओबामानी भारताला दोन वेळा भेटी दिल्या तर मोदी यांनी ही अमेरिकेला भेट देऊन आर्थिक हित संबंधांना चालना देवून जागतिक पातळीवर पाकिस्तानला एकटे पाडण्यामध्ये महत्वपूर्ण भूमिका बजावली. कारण २०१२ मध्ये ज्या ओसामा बिन लादेनला अमेरिका अफगाणिस्तानात शोधण्यासाठी १० वर्षापासून प्रयत्न करीत होता तो ओसामा पाकिस्तानच्या एबोटाबाद या शहरात मारला गेला. त्यामुळे अमेरिकेचा पाकिस्तानवरचा उरला सुरळा विश्वास ही संपला होता. पंतप्रधान मोदी यांनी मेक इन इंडिया आणि स्मार्ट सिटी योजनेत ही अमेरिकेची मदत घेतल्याचे दिसून येते. डोनाल्ड ट्रंप यांनी ही फेब्रुवारी २०२० ला भारताला भेट दिली तेव्हा हाऊडी मोदी च्या माध्यमातून भारत अमेरिका संबंध मजबूत करण्याचा प्रयत्न झाला. एकंदरीत काही वादग्रस्त मुद्दे सोडले तर भारत-अमेरिका संबंधात सातत्यपूर्ण विकास झालेला दिसतो. २०१६ नंतर भारतची अमेरिकेबरोबरची संरक्षण भागीदारी सर्वाधिक स्वरूपाची होती म्हणूनच भारताने अमेरिकेला संरक्षण आणि सामारिक सहभागीदारचा दर्जा प्रधान करण्यात आला. आर्थिक स्तरावर ही २०१८ पर्यन्त १४२.१ बिलियन आमेरिकन डॉलर पर्यंत या उभय राष्ट्रांमध्ये व्यापार वृद्धी झालेली दिसून येते. जानेवारी २०२१ मध्ये अमेरिकेत सत्तेवर आलेले ज्यो बाइडेन हे ही या संबंधाना पुढे घेऊन जातील हीच भारत- अमेरिका संबंधाचे हितचिंतकांची अपेक्षा आहे. जगावरील आलेल्या कोरोना सारख्या महामारीचा दोन्ही राष्ट्रे मिळून यशस्वी मुकाबला करतील आणि चीनचे मनसुभे धुळीस मिळवतील.

**शीतयुद्धोत्तर कालीन रशिया संबंध :**

१९९१-९२ नंतर जागतिक व्यापारासाठी भारताची बाजारपेठ भांडवली राष्ट्रांबरोबरच ती सर्वांसाठी खुली झाली. दुसऱ्या बाजूला भारताने आपल्या संरक्षण विषयक धोरणात बदल करून रशिया वरील आपले संरक्षक सामग्री विषयी असणारे परावलंबीत्व कमी करायला सुरुवात केली आणि अमेरिका, फ्रान्स, स्वीडन, इस्राईल अशा अन्य राष्ट्रांकडून शस्त्र सामग्री खरेदी करायला सुरुवात केली असली तरी सोव्हियट संघाच्या पतनानंतर १९९३ ला भारत-रशिया यांच्यात मैत्री आणि सहकार्या च्या एका नवीन करारावर स्वाक्षऱ्या केल्या. तर १९९४ ला उभय राष्ट्रांनी द्विपक्षीय स्वरूपाचे लष्करी तंत्रज्ञान सहकार्य करार करण्यात आला आणि रशियाने भारताला

१५ अब्ज डॉलर ची मदत दिली तसेच आंतरराष्ट्रीय दहशतवादा सारख्या समस्येवर उपाय शोधण्यासाठी भारत-रशिया यांनी १९९४, १९९६, १९९९, आणि २००३ या कराराद्वारे प्रयत्न केलेले दिसून येतात, १९९६ ला याच धोरणाचा भाग म्हणून रशियाने शांघाय -५ ची निर्मिती करून भारताला या संघटनेचे सदस्यत्व प्राप्त व्हावे म्हणून प्रयत्न करताना दिसून येते. १९९८ मध्ये रशियाचे पंतप्रधान येगवेनी प्रिमाकाओ यांनी भारत,चीन,रशिया यांची त्रिराष्ट्र आघाडी निर्माण करावी अशी कल्पना मांडली परंतु ही कल्पना प्रत्यक्षात येवू शकली नाही . विषशेत: ब्लादमिर पुतीन यांच्या कालखंडात रशियाच्या रडारावरून दूर गेलेल्या भारताला रशिया बरोबर जोडण्याचा सातत्य पूर्ण प्रयत्न पुतीन यांनी केलेले आहेत. २००० पासून उभय राष्ट्रांच्या शिखर परिषदेच्या आयोजनाची पायाभरणी झाली त्याला २० वर्षात एकदाही खंड पडलेला नाही . या परिषदेत महत्वपूर्ण विषयावर चर्चा आणि निर्णय घेतले जातात. २००७ मध्ये पुतीन भारत भेटीवर आले असता पुतीन आणि पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या मध्ये उभय राष्ट्रांच्या संरक्षण आणि सामरिक संबंधाना नवीन आयाम देताना, विशेष करून आण्विक इंधन, अवकाश सुरक्षा, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात सहकार्य. संयुक्त संरक्षण उत्पादन प्रकल्प, आण्विक इंधन पुरवठादार राष्ट्रांसामोर भारताची बाजू मांडणे अशा विविध विषयावर करार करण्यात आले. रशियाने भारताला संरक्षण क्षेत्रात मजबूत होण्यासाठी सातत्याने सहाय्य केले आहे. जगात चर्चेचा विषय ठरलेले ब्राम्होस क्षेपणास्त्रचे तंत्र रशियानेच भारताला दिले आहे. भारत-रशिया यांच्या संयुक्त माध्यमातून हे क्षेपणास्त्र विकसित करण्यात आलेले आहे.२०१० मध्ये राष्ट्रपति दिमित्री मेदवेदेव यांनी मनमोहनसिंग यांची भेट घेऊन भारताला विशेष सामरिक सहभागीदारचा दर्जा बहाल करून लष्कर आणि लष्करी तंत्रज्ञान सहकार्य आयोग (IRIGC-MTC) गठित करण्यात आला. त्याच बरोबर उभय राष्ट्रांमध्ये व्यापार,आर्थिक,विज्ञान तंत्रज्ञान, सांस्कृतिक सहकार्य आयोग गठित करण्यात आला. सुरक्षा परिषदेतील कायम सदस्यत्वासाठी आणि काश्मीर प्रश्नावर भारताची सातत्याने पाठराखण केलेली दिसून येते. मे २०१४ मध्ये भारतामध्ये सत्तांतर झाले. आणि भारतीय जनता पक्षाचे नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर २३ डिसेंबर २०१५ मध्ये त्यांनी रशियाला भेट दिली ब्लादीमिर पुतीन आणि नरेंद्र मोदी उभय नेत्यांमध्ये अणूऊर्जा सहकार्य, संरक्षण, आण्विक पाणबुडी अशा विविध विषयावर चर्चा करून १६ करार करण्यात आले .रशिया कडून एस- ४०० क्षेपणास्त्र विकत घेण्याची प्रक्रिया सुरू केली. परंतु २०१४ नंतर पुन्हा भारताच्या परराष्ट्र धोरणात काही बदल घडऊन आणणाऱ्या घटना वेगात घडताना दिसतात. भारताचे परराष्ट्र धोरण अमेरिका धार्जिणे झालेले दिसते आहे. त्यामुळे भारत-रशिया संबंधात काही आव्हाने निर्माण झाली आहेत.

२०१५ पर्यंत भारत-रशिया यांनी २० बिलियन डॉलर्स व्यापार वृद्धीचे लक्ष ठेवले होते परंतु ते पूर्ण होऊ शकले नाही. भारत रशिया हे जुने मित्र राष्ट्रे असले तरी या दोन देशामधला व्यापार हा १० अब्ज डॉलरच्या आसपास राहिला आहे. त्यामध्ये ही ७०% व्यापार हा संरक्षण क्षेत्राशी निगडीत आहे. बाकी क्षेत्रात उभय राष्ट्रात फारसा व्यापार झाला नाही . याउलट २०१८ पर्यंत भारत अमेरिका व्यापार १४२.१ बिलियन डॉलर इतका राहिला आहे. २०१४ मध्ये अमेरिकेने रशियाला मागे टाकत भारताला सर्वाधिक शस्त्र पुरवठा करणाऱ्या देशाचा मान मिळवला. २०१६ मध्ये भारत अमेरिकेचा मुख्य संरक्षण सहभागीदार बनला. भारत अमेरिका चर्चा करण्यासाठी २०१८ मध्ये एका सामज्यस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. त्यामुळे रशियाने आपला मोर्चा चीन-

पाकिस्तान कडे वळविला कारण रशियाची ही भुराजकीय गरज निर्माण झालेली होती. म्हणून चीन ला सुखोई ३५, एस-४०० मिसाईल सारखी अत्याधुनिक हत्याराचा पुरवठा रशियाकडून झालेला आहे. पाकिस्तानलाही Mi-३५ हेलिकॉप्टर आणि JF-१७ Thunder विमानाची इंजिन यांचा पुरवठा शिवाय संयुक्त युद्ध अभ्यास तसेच चीनच्या वन रोड वन बेल्ट या प्रकल्पाला भारताने विरोध केलेला असला तरी रशिया या प्रकल्पाचा भाग झाला आहे. त्यामुळे रशिया चीन पाकिस्तान असा एक त्रिकोण होत असला तरी भारत आणि रशिया ही नैसर्गिक मित्र राष्ट्रे असल्यामुळे ती जास्त काळ एकमेकांपासुन दूर राहू शकणार नाहीत हे २०१९ च्या ब्लादीमिर पुतीन यांच्या भारत भेटीने पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. म्हणून भारताचे माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी म्हणतात की, ''भारत-रशिया संबंध ही गहन मैत्री आणि परस्पर आत्मविश्वासांपैकी एक आहे ज्याचा परिणाम क्षणिक राजकीय ट्रेंडवर होणार नाही. भारताच्या इतिहासातील कठीण क्षणी रशिया हा शक्तीचा आधारस्तंभ आहे. भारत या पाठिंब्याची नेहमीच बदली करेल. अणुऊर्जा आणि हायड्रोकार्बन या दोन्ही बाबतीत रशिया हा आमचा सर्वात महत्वाचा संरक्षण भागीदार आणि आमच्या उर्जा सुरक्षेसाठी एक महत्त्वाचा भागीदार आहे आणि राहील.'' म्हणूनच कोरोना सारख्या महामारीच्या संकटकालात रशियाने भारताला स्पुटनिक-व्ही कोरोना लस ची पहिली खेप मे २०२१ मध्ये पाठवून आपल्या मित्रत्वाचा परिचय करून दिला.

- **सीटीबीटी करार आणि बदलते अण्वस्त्र धोरण :**

१९९६ साली यूएन च्या आम सभेत सर्वसमावेशक अण्वस्त्र चाचणी बंदी करारावर पी-५ राष्ट्रांसाहित ६१ राष्ट्रांनी सह्या केल्या. मात्र भारताने यूएनच्या या प्रयत्नांना आक्षेप घेतला. भारताच्या दृष्टीकोणातून हा सीटीबीटी करार हा असमतोल तत्वावर आधारलेला करार आहे. पी-५ राष्ट्रांनी अण्वस्त्र धारण करायची आणि इतर राष्ट्रांनी त्यापासून दूर राहायचे हे धोरण भारताला मान्य नाही. पी-५ राष्ट्रांकडे असणारी अण्वस्त्र नष्ट करण्याचा एक कृतीशील कार्यक्रम तयार करावा असे भारताने सडेतोडपणे यूएन मध्ये आपली भूमिका मांडली. . शियाय हा करार व्यापक स्वरूपाचा नाही. कारण या करारात फक्त भूमीवरील आणि भूमिगत परीक्षणावर बंदी घातली होती. परंतु प्रयोग शाळेतील किंवा कम्प्युटर वरुण होणाऱ्या अणुचाचणीला किंवा संशोधनाला कोणतेही बंधन घालण्यात आले नव्हते . त्यामुळे भारताने या कराराला फक्त विरोधच केला नाही तर जागतिक समुदायला आव्हान दिले आणि भारताच्या अणू धोरणामध्ये आणि पर्यायाने आपल्या विदेश धोरणामध्ये बदल घडवून आणला. भारताच्या सुरक्षेसाठी आणि आत्मसंरक्षणासाठी भारताला एक जबाबदार अण्वस्त्रधारी राष्ट्र बनविणे या उद्धिष्टांसाठी ११ मे आणि १३ मे १९९८ या दिवशी पोखरण या ठिकाणी पाच अणुचाचण्या करून स्वत:ला अण्वस्त्रधारी राष्ट्र घोषित केले. हा भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये क्रांतिकारी बदल होता . आंतरराष्ट्रीय निर्बंधांना न जुमानता आपले भारताच्या कार्यक्रमाविषयी आणि भारताच्या भविष्यातील भूमिके विषयी भारताचे परराष्ट्र मंत्री जसवंतसिंह आणि अमेरिकेचे उपपरराष्ट्र मंत्री स्ट्रोब टालबोट यांच्यात चर्चा झाली. या चर्चेत अमेरिकेला भारताची अण्वस्त्र मजबूरी आणि भारताची भूमिका पटवून देवून भारताने १९९९ ला आपले नवीन अण्वस्त्र धोरण जाहीर केले.

१) भारत अणूशक्तीचा जास्तीत जास्त वापर हा विकास कार्यक्रमासाठी करेल.

२) संरक्षण क्षेत्र सुद्धा सामाजिक, आर्थिक, वैज्ञानिक क्षेत्रातील प्रगतीप्रमाणेच विकास कार्य क्रमाचा एक भाग आहे म्हणून भारत संरक्षणासाठी अणूशक्तीचा वापर करू शकणार आहे.

३) स्वसंरक्षणासाठी आवश्यक तेवढीच अण्वस्त्र सज्जता निर्माण करेल.

४) भारत अण्वस्त्रांचा प्रथम वापर करणार नाही. मात्र जर भारतावर अण्वस्त्र हल्ला झाला तर भारत प्रती उत्तरादाखल अण्वस्त्र हल्ला करेल.

५) भारत कोणत्याही राष्ट्रांना आपले अण्वस्त्र तंत्रज्ञान हस्तांतरित करणार नाही. एक जबाबदार अण्वस्त्रधारी राष्ट्र म्हणून आपली भूमिका पार पाडण्यासाठी वचनबद्ध असेल.

अशा प्रकारे नेहरू कालखंडात भारत अण्वस्त्र बनवणार नाही असे सातत्याने सांगणाऱ्या भारताला १९९८ ला भुराजकीय समस्येतून अण्वस्त्र निर्माण करावी लागली असली तरी भारत आपल्या सुरक्षेतेसाठी कोणतेही टोकाचे पाऊल टाकू शकतो हा महासत्तेला दिलेला एकप्रकारचा इशाराच होता असेच म्हणावे लागेल. हे भारताने महासत्तेच्या दिशेने टाकलेले पाऊल होते. अशा प्रकारे भारताच्या परराष्ट्र धोरणातील सर्वोच्च परिवर्तन होताना दिसते.

- **काश्मीर धोरणातील परिवर्तन आणि ३७० कलम रद्द :**

१९४७ पासून भारत, पाकिस्तानच्या विश्वास घातकी विदेश धोरणावर विश्वास ठेवत आला आणि शांततेचा मध्यम मार्ग काढण्याचा सातत्याने प्रयत्न करीत होता त्याचाच भाग म्हणून पंडित नेहरूंनी १९५३ ला काश्मीर मध्ये सार्वमत घेण्याची तयारी दाखवली. काश्मीर प्रश्न सोडवण्यासाठी यूएनने नेमलेला तीन सदस्यीय आयोग मान्य केला. १९६५ ला ताष्कद करार, शिमला करार, लाहोर बस सेवा, मार्च २००० मध्ये बिल क्लिंटन यांनी पाकिस्तानला काही सूचना दिल्या. २००१ पासून अमेरिका उभय राष्ट्रांमध्ये काश्मीर प्रश्नावरून वाद निर्माण होऊ नये यासाठी प्रयत्न करीत होती. शीतयुद्ध काळातील काश्मीर कडे बघण्याचा अमेरिकेचा दृष्टिकोण कमालीचा बदलला होता परंतु भारताने अमेरिकेची मध्यस्थी कधीही स्वीकारली नाही. २०१४ मध्ये भारतात सत्तांतर झाले आणि भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले आणि नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले. त्यांनी काश्मीर मुद्दा आंतरराष्ट्रीय मंचावर न सोडवता भारताच्या स्वता:च्या इच्छा शक्तीवर सोडवण्याचा संकल्प करून काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देणारे ३७० आणि ३५ए ही कलमे २०१९ मध्ये रद्द करून काश्मीरचा राज्याचा दर्जा काढून घेतला आणि काश्मीरचे रूपांतर दोन केंद्र शासित प्रदेशात करून हा प्रश्न कायमचा निकाली काढला. भारतच्या या कृतीवर पाकिस्तानने यूएन मध्ये हा मुद्दा उपस्थित केला परंतु पाकिस्तानच्या तक्रारीची नोंद सुद्धा यूएनने घेतली नाही. भारताच्या या कृतीला ना अमेरिकेने विरोध केला ना रशियाने विरोध केला. भारताचे हे धोरण जागतिक राजकारणातील भारताचे वाढलेले महत्व अधोरेखित करणारे आहे असेच म्हणावे लागेल.

- **चीनी वर्चस्वाला आव्हान :**

आशिया खंडातील वर्चस्वाच्या लढाईत भारत-चीन संघर्ष नवीन राहिलेला नाही. १९६२ च्या आक्रमणापासून

चीनी सैनिकी आक्रमणाला तोंड देण्यासाठी भारताने लष्करी सामर्थ्यावर भर देऊन चीनी वर्चस्वाला आव्हान देण्याचा यशस्वी प्रयत्न करत आहे. याचे पहिले पाऊल १९६७ मध्येच पडलेले दिसते. भारतीय लष्कराने नथूला आणि छोला खिंडीतील चीनी लष्कराचा सामना करून तेथून त्यांना हुसकावून लावले. त्यानंतर शीतयुद्धाच्या अंतिम क्षणी १९८७ मध्ये भारतीय लष्करांनी विवादीत सीमाभागात लष्करी ट्रेंनिग कॅम्प घेवून तिथे युद्ध सराव करून चीनला एक सूचक इशारच दिला होता. २०१३ मध्ये दौलत बेग ओल्डी येथे चीनने आपला लष्करी तळ उभारण्याचा प्रयत्न केला परंतु भारतानेही तेथून केवळ १००० फुट अंतरावर आपला लष्करी तळ उभा करून चीनला माघार घ्यायला भाग पाडले. २०१७ मध्ये भारत-चीन-भुतान यांच्या सरहद्दीला लागून असणाऱ्या डोकलाम पठरावरून भारत-चीन लष्कर आमने-सामने आले होते . या प्रदेशात रस्ते बांधण्याचा चीनचा मनसुभा भारतीय लष्कराने हाणून पाडले. आणि हा प्रदेश बफर झोन घोषित करावा ही भारताची मागणी मान्य करणे चीनला भाग पाडले आणि ऑगस्ट २०१७ मध्ये उभय देशांनी डोकलाम प्रदेश बफर झोन म्हणून सहमती दर्शवली व चीनने या प्रदेशातील रस्ते बांधकाम थांबविले. जून २०२० भारत-चीन लष्कर गलवान खोऱ्यात आमने-सामने झटापट झाली. यामध्ये २० भारतीय जवान शहीद झाले परंतु भारतीय जवानांनी चीनी दबावाला बळी न पडता गलवान खोऱ्यातून चीनला मागे हटण्यास भाग पाडले जागतिक राजकरणात ही चीनची फार मोठी नाचक्की होती आणि भारताच्या मजबूत आणि बुलंद इराद्याचे उदाहरण होते. सीमेवरील लढाईत भारत ही मागे राहिलेला नाही हे चीनी नेतृत्वानेही जाणले आहे म्हणून भारताच्या सुरक्षा व्यवस्थेला आव्हान देण्यासाठी चीन दक्षिण आशियाई राष्ट्रांना आपल्या पंजात ओढण्याचा प्रयत्न करीत असला तरी भारत ही दक्षिण आशियाई राष्ट्रांबरोबरच दक्षिण पूर्व आशियाई राष्ट्रनबरोबरही मैत्रीपूर्ण भागीदारी वाढवून आणि अमेरिके बरोबर सामरिक भागीदारी चीनी वर्चस्वला आव्हान निर्माण करीत आहे. दक्षिण चीन सागरातील बेकायदेशीर चीनी हक्क आणि हिंदी महासागर आणि प्रशांत महासागरातील चीनी वर्चस्व नियंत्रित करण्यासाठी भारत-अमेरिका-जपान-औस्ट्रेलिया यांच्या संयुक्त आघाडीने चीनला नियंत्रित करण्याचा मार्ग अवलंबला आहे. चीनी नेते माओ त्से तुंग म्हणत की, तिबेट हा चीनचा तळहात आहे तर नेपाळ, भुतान, सिक्किम आणि अरुणाचल प्रदेश ही त्याची बोटे आहेत. परंतु २००६ मध्ये सिक्किम मधील भारताचे सार्वभौमत्व चीनला मान्य करावे लागले. हे भारताच्या बदललेल्या आत्मसंरक्षित परराष्ट्र धोरणाने चीनी विस्तारवादी धोरणाला आव्हान निर्माण केले आहे.

= कोरोना ( कोव्हिड१९) डिप्लोमसी :

२०१९ च्या नोव्हेंबर मध्ये चीनच्या वुहान प्रांतामधून सुरू झालेल्या कोरोना महामारीच्या संकटाने बघता-बघता संपूर्ण जगाला आपल्या विळक्यात घेतले आणि संपूर्ण जग या महामारीचा मुकाबला करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. या प्रयत्नात भारताने अतिशय मोठ्या क्षमतेने आपले योगदान दिले आहे आणि इतर राष्ट्रांकडून ही भारताला मदत मिळत आहे. कोरोनाच्या पहिल्या लाटेत अतिशय मोठ्या प्रमाणात प्रभावित झालेल्या अमेरिकेला ५० बिलियन हायड्रोक्लोरोकिन गोळ्यांचा पुरवठा करून भारत अमेरिका संबंधाला एक मानवतावादी चेहरा देण्याचा प्रयत्न भारताकडून झाला . तर कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत भारताला मदतीची गरज असताना अमेरिकेचे राष्ट्रपति ज्यो बाइडेन यांनी भारताला ५० कोटी डॉलरचे अर्थ सहाय्य आणि वैद्यकीय

उपकरणाची मदत देऊन भारताचा एक नैसर्गिक मित्रराष्ट्र असा उल्लेख करताना त्यांनी स्पष्ट केली की भारताने अमेरिकेला संकट काळात केलेली मदत अमेरिका विसरू शकत नाही. (संदर्भ: द इकनॉमिक्स टाइम्स, ३०/४/२०२१) या लढ्यात रशिया ही भारताच्या खांद्याला खांदा लावून भारताला सर्वोपरी सहकार्य करीत आहे. रशियानेही भारताला स्फुटनिक- व्ही कोरोना लसीची पहिली खेप १ मे २०२१ रोजी भारतात पाठवून दिली आहे. येत्या काही महिन्यात आणखी काही खेपा भारतात येतील आणि त्यानंतर ही लस भारतात तयार होईल. भारतानेही जगातील ९५ देशात मेड इन इंडिया लसीचे ६६ बिलियन डोस निर्यात करून जागतिक संकटाचा सामना करण्याची आपली वचन बद्धता दाखवून दिली आहे. (संदर्भ: www.thehindu.com सुहासिनी हैदर यांचा व्हिडिओ दि. २३ एप्रिल २०२१) म्हणूनच कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत जगातील ४० राष्ट्रांनी भारताला मदत देऊ केली आहे. यामध्ये औस्ट्रेलयाने संकट काळात भारतासोबत असल्याची ग्वाही दिली आहे. परराष्ट्रमंत्री मॉरिस पायने औस्ट्रेलिया भारताला व्हेंटीलेटर आणि ऑक्सीजन कंसंट्रेटर्स ची पहिली खेप पाठवत असल्याचे घोषित करताना औस्ट्रेलियाचे पंतप्रधान स्कॉट मोरीसन म्हणाले की, भारताने कोरोना लसीच्या निर्यातीमध्ये दाखवलेल्या उदारतेला जगात जोड नाही. कोरोनाच्या या संकट काळात चीननेही भारताला मदतीचा हात देऊ केला आहे. भारताने या जागतिक संकटात दाखवलेले औदार्य आणि उदार दृष्टीकोणाचे वर्णन हे विश्वची माझे घर या उक्तीचा परिचय करून देणारे असले तरी दुसऱ्या लाटेत भारतामध्ये लसीचा आणि ऑक्सीजन चा निर्माण झालेला तुटवडा एक आत्मचिंतनाचा विषय ठरला आहे हेही नाकारता येणार नाही. (सदरची माहिती १६ मे २०२१ पर्यन्तची आहे).

- **अरब-इस्राइल धोरणातील परिवर्तन :**

१९४७ च्या युनो मध्ये मांडलेल्या द्विराष्ट्र ठरावाला जसा अरब राष्ट्रांनी विरोध केला त्याच पद्धतीने भारतानेही विरोध करून धर्मावर आधारित इस्राईल ला विरोध करून पॅलेस्टाईन ला पाठींबा दिला.महात्मा गांधींनीही यहुदी लोकांवर होणाऱ्या अन्यायाबद्दल सहानभूती व्यक्त केली असली तरी जसा इंग्रज लोकांचा इंग्लंड च्या भूमीवर आणि फ्रेंच्याचा फ्रेंच भूमीवर अधिकार आहे तसा अरबांचा अरब भूमीवर अधिकार आहे. मार्च १९२१ मध्ये महात्मा गांधींनी खिलाफत आंदोलांना दरम्यानही पॅलेस्टीन भूमीवर मुस्लिम राज्याचे समर्थन केले होते. पंडित नेहरूंनी ही पॅलेस्टाईन आणि यहुदी लोकांचे एकच राज्य निर्माण व्हावे अशी आशा व्यक्त केली होती. १९४९ मध्ये इस्राईल ला यूएन मध्ये प्रवेश देणाऱ्या प्रस्तावालाही भारताने विरोध केला होता. तरीही भारताने १९५० मध्ये इस्राईल ला मान्यता दिली परंतु राजनायिक संबंध प्रस्थापित केले नाहीत. त्याच्या दुसऱ्या बाजूला पॅलेसस्टाईन मध्ये निर्माण झालेल्या पॅलेस्टाईन लिब्रेशन आर्मीला मान्यता देणारे भारत पहिले गैरअरब राष्ट्र ठरले. शिवाय यासार अराफात यांना इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय शांतता पुरस्काराने सन्मानितही करण्यात आले. १९४८, १९६७, १९७२ या युद्धांमध्ये भारताने उघड पॅलेस्टीन आणि अरब राष्ट्रांचे समर्थन करून इस्राईलला आक्रमक राष्ट्र ठरविले. तरीसुद्धा इस्राईल राष्ट्राची धर्माच्या आधारावर निर्मितीला समर्थन देणारा भारतामध्ये एक मोठा वर्ग अस्तीत्वात होता, विशेषत: हिंदू राष्ट्रवाद मांडणारे तत्वचिंतक. १९५६ च्या स्वेज संकटात इजिप्त वरील इस्राईल हल्याची निंदा केली होती. १९७३ च्या इस्राईल विरुद्ध इजिप्त सिरिया

युद्धात ही भारतने युद्धाचे कारण इस्राइल आहे अशी भूमिका मांडली . एका बाजूला अरब राष्ट्रांना समर्थन देणारा भारत आणि दुसऱ्या बाजूला मुस्लिम राष्ट्र गटांच्या मंचावरून काश्मीर मुद्द्यावर पाकिस्तानचे समर्थन करणारी अरब राष्ट्रे यामुळे भारतीय परराष्ट्र धोरणामध्ये १९८५ च्या दशकामध्ये (राजीव गांधी द्वारा) पुनर्विलोकण व्हायला सुरुवात झाली. या कालखंडात एका बाजूला शीतयुद्धाचा शेवट झाल्यामुळे भारताचाही अरब राष्ट्रांच्या पारंपारिक विदेश धोरणात परिवर्तन आलेले दिसून येते. पॅलेस्टीन मुक्ति संग्राम आणि इस्राईल संबंध या दोन बाबी वेगवेगळ्या करून पाहण्याची दृष्टी भारतीय नेतृत्वाने स्वीकारली. त्यामुळे पी.व्ही. नरसिंहराव यांनी १९९२ मध्ये अमेरिका दौऱ्यावर जाण्याच्या पूर्व संध्येला इस्राईल बरोबर संबंध स्थापित करण्याची घोषणा केली. इस्राईल च्या स्थापनेपासून जवळ-जवळ ४५ वर्षांनी भारताने इस्राईल संबंधाचा एक नवा अध्याय सुरू केला. हा अध्याय अटल बिहारी वाजपेयी यांनी ही पुढे चालू ठेवले.त्यामुळे १९९८ मध्ये भारताने केलेल्या परमाणु परीक्षणाला इस्रायल ने विरोध तर केलाच नाही उलट पूर्वी पेक्षा जास्त क्षमतेने शस्त्र पुरवठा करून भारताची मदत केली. २००३ मध्ये इस्राईलचे पंतप्रधान एरियल शेरोन यांनी भारताला भेट देऊन उभय राष्ट्रांचे संबंध मजबूत केले. २०१४ नंतर अमेरिका रशिया पाठोपाठ इस्राईल भारताचा शस्त्र पुरवठादार राष्ट्र बनले आहे. म्हणूनच २०१४ च्या इस्राईल ने पॅलेस्टीन वर केलेल्या हल्ल्याची दखल भारतच्या विदेश नीतीने आणि नरेंद्र मोदींनीं घेतली नाही असा डाव्या पक्षांनी निषेध ही नोंदवला होता. परंतु जागतिक राजकरणाचे आयाम बदलत असताना इस्राईल धार्जिण्या अमेरिकेच्या विदेश नीतीचा भारत एक सहभागीदार झाल्याचे दिसून येते. याची सुरुवात २००३ सालीच तत्कालीन संरक्षण सल्लागार ब्रिजेश मिश्र यांनी दहशतवादाच्या विरोधात भारत-अमेरिका-इस्राईल सामरिक भागीदारीची संकल्पना मांडली होती. ही संकल्पना मांडण्याच्या पाठीमागे कारण होते, अल कायदा आणि तालिबान, हमास आणि पाकिस्तान स्थित असणाऱ्या दहशतवादी संघटना यांचा नायनाट करण्याबरोबर तिन्ही देशांच्या निर्माण झालेल्या भुराजकीय समस्यांचे समाधान करण्यासाठीही ही आघाडी झाल्याचे दिसून येते. त्याचाच भाग म्हणून शीतयुद्ध कालखंडातील भारताची अरब धार्जिणी आणि इस्राईल विरोधी नीतीच्या जागी अरब आणि इस्राईल बरोबर समतोल संबंध राखण्याची नीती भारताने स्वीकारली असली तरी सध्या सुरू असलेल्या ( मे २०२१) इस्राईल-पॅलेस्टीन संघर्षात भारताने पुन्हा पॅलेस्टीनची बाजू घेतली आहे. यूएन सुरक्षा परिषदेत पॅलेस्टीनच्या बाजूने मतदान करताना टी. एस. कृष्णमूर्ती म्हणाले की भारताला यूएन ने स्थापित केलेली स्थिति भारताला हवी आहे याचाच अर्थ इस्राईलने व्यापलेली अतिरिक्त भूमी इस्राईलने पॅलेस्टीनला परत करावी. भारत इस्राईल मैत्री असतांनाही भारताने पॅलेसस्टीन ची बाजू का घेतली असा प्रश्न जेव्हा पडतो तेव्हा त्याचे उत्तर भारताच्या भुराजकीय समस्येत सापडते. या संघर्षात पॅलेस्टीने बळकावलेल्या जमिनीचे भारताने समर्थन केले तर आंतरराष्ट्रीय मंचावर आणि आंतरराष्ट्रीय कोर्टात भारताला पाकव्याप्त कश्मीर, आक्साई चीन आणि तिबेटचा विरोध करण्यास अडचण निर्माण होईल. शिवाय चीनने कब्जा केलेल्या साऊथ चायना समुद्रावर ही चीनी कब्जा मान्य करण्याची मजबूरी निर्माण होऊ नये हा भारताचा फार मोठा दृष्टिकोण असल्याचा दिसून येतो. इराण ही भारताचा सर्वात मोठा पेट्रोलियम पदार्थ पुरवठादार देश होता मात्र २०१४ नंतर अमेरिकेच्या दबावापोटी भारताने इराण मधील ही आयात कमी केली त्याचा फटका इराण मधील चाबहार बंदरातील भारताच्या गुंतवणुकीला बसला आहे हे ही खरेच आहे.

### ४.४ सारांश :

भारतीय परराष्ट्र  धोरणचा अभ्यास करत असताना भारतीय धोरणातील परिस्थिति नुसार बदल घडून आलेले दिसुन येतात. सत्तेशिवाय शांतता ते सत्तेसहीत शांतता हा भारतीय परराष्ट्र धोरणातील बदल आपणास दिसून येतो. तसेच अण्वस्त्र जगासाठी घातक आहेत त्यामुळे ती नष्ट झाली पाहीजे. १९८० च्या दशकात अणुचा वापर शांततेसाठी झाला पाहीजे ते अण्वस्त्र सुरक्षेसाठी आवश्यक आहेत पण ती प्रथम वापरणार नाही. बनवण्याकडे असा प्रवास  झालेला दिसुन येतो. स्वातंत्र्यापासून पाकिस्तान केंद्रित धोरणात बदल होऊन १९९० नंतर भारताने एक विभागीय महासत्ता बनण्याकडे आपला कल वाढविलेला दिसून येतो. राजकीय हितसंबंधा बरोबर आर्थिक हितसंबधाना ही प्राधान्य दिलेले दिसून येते. १९६७ मध्ये निर्माण झालेल्या आसियान संघटनेकडे  शीतयुद्धाची एक कडी म्हणून पाहणारी भारताची विदेश नीतीने सुरूवातीला देऊ केलेले आसियान चे सदस्यत्व नाकारले परंतु १९९० नंतर ते मिळवण्याचा प्रयत्न चालविला. लुक ईस्ट हे नव्याने धोरण ठरवले आणि भारत आसियान रिजनल फोरम चा सदस्य होऊन या राष्ट्रांबरोबर व्यापारीक आणि आर्थिक संबंधां बरोबर राजकीय संबंधांना नव्याने परिभाषित करण्याचा यशस्वी प्रयत्न चालविला आहे. नंतर भारताने आपल्या परराष्ट्र धोरणाची सुसंगत मांडणी केली. भारताच्या  परराष्ट्र धोरणाचे प्रथमच सैद्धांतिकरन (थेअरारांझेशन ऑफ फॉरेन पॉलिसी) केले गेले. परराष्ट्राची सूत्रे विकसित केली गेली. त्याद्वारे शेजारील राष्ट्रांशी आणि इतर राष्ट्रांशी संबंध सुधारण्यावर पॉलिसी तयार केली गेली. आज भारताचे जगातील राष्ट्रांशी जे संबंध प्रस्थापित झाले आहे त्यात या पॉलिसीचा महत्त्वपूर्ण हिस्सा आहे. भारतातील सर्वच प्रधानमंत्र्यांनी परराष्ट्र धोरणावर अत्यंत बारकाईने काम करत त्याची अमलबजावणी करण्याकडे लक्ष दिलेले आहे. शीतयुद्ध कालखंडात हिंदी महासागर शांतता क्षेत्र घोषित करावे अशी मागणी करणारा भारत हिंदी महासागरत आपली भागीदारी वाढवण्यावर भर देताना दिसत आहे. त्यामुळेच औस्ट्रेलियाने प्रवेश नाकारलेल्या सर्वात मोठी आण्विक युद्ध नौका 'निमित्झला' चेन्नई बंदरात प्रवेश दिला हा भारताच्या परराष्ट्र धोरणात घडून आलेला फार मोठा बदल होता. दहशतवाद मुद्दा जागतिक स्तरावर घेऊन जाण्यात आणि दहशतवादाचा बीमोड करण्यासाठी जागतिक समुदयाकडून विषशता अमेरिकेकडून पाठींबा मिळवण्यास यश मिळवले. भारताची सुरक्षा परिषदेतील मजबूत दावेदारी, चीनकडून सिक्किम वरील भारताचे सार्वभौमत्व मान्य करणे या सर्व घटना भारताच्या बदललेल्या मजबूत परराष्ट्र धोरणाची  साक्ष देतात असे म्हणता येईल. भारताच्या परराष्ट्र धोरणात झालेला बदल हा कोणत्याही राष्ट्रांना धमकावण्यासाठी झाला नसून तो एक आत्मसंरक्षणासाठी केलेला आविष्कार आहे असे म्हणावे लागेल. चीनने पाकिस्तान चे ग्वादर बंदर, श्रीलंकेचे हंबनतोडा बंदर आणि बांग्लादेशातील चितगाव बंदरावर आपले लष्करी तळ उभारून भारताच्या सुरक्षेला धोका निर्माण केला असला तरी भारतही असियान राष्ट्रांच्या मदतीने आपल्या संरक्षण सिद्धतेच्या बळावर हे आव्हान मोडीत काढत आहे. शिवाय अमेरिकेलाही दक्षिण आशियातील चीनची मक्तेदारी मोडीत  काढण्यासाठी जशी जपानची मदत हवी आहे तशी ती भारताचीही हवी आहे  हे ओळखून भारताच्या विदेश नीतीने अमेरिकेबद्दलचे आपले धोरण बदललेले दिसून येते. तसेच शीतयुद्ध काळातील अरब राष्ट्रे धार्जिणी विदेश नीतीचा त्याग करून इस्राईल संबंध आणि पॅलेसस्टीन मुक्ति संग्राम या दोन्ही बाजू वेगवेगळ्या करून पाहण्याची दृष्टी निर्माण झाली. असली तरी सध्या सुरू असणाऱ्या (मे २०२१) इस्राईल

पॅलेस्टीन संघर्षात भारताने पुन्हा पॅलेस्टीन च्या बाजूने आपले मत मांडताना यूएन च्या ठरावानुसार जेरूसलेम च्या स्थितीचे बहालीकरण इस्राईलने करावे असे भारताचे यूएन राजदूत टी. एस. कृष्णमूर्ती यांनी स्पष्ट केले. याचे कारण भारत-पाकिस्तान आणि चीन च्या भुराजकीय समस्येत असल्याचे दिसून येते. कोरोना संकट काळात ही भारताने अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्राला आपल्या मदतीने प्रभावित केले आहे. जगातील ९५ राष्ट्रांना ६६ अब्ज कोरोना लसीची निर्यात करून कोरोनाच्या जागतिक लढ्यात भारतानेही दखलपात्र योगदान देऊन भारताला अभिप्रेत असणाऱ्या बहूध्रुवीय विश्वरचनेला बळ देण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न भारताच्या परराष्ट्र धोरणाने शीत युद्धोत्तर कालखंडात केलेला आहे असे म्हणता येईल.

## ४.५ पारिभाषिक शब्द आणि संकल्पना :

**१. शीतयुद्ध :** दुसऱ्या महायुद्धानंतर १९४५ ते १९९१ या कालखंडात सोव्हिएत संघ आणि अमेरिका या दोन गटात झालेला संघर्ष .

**२. परराष्ट्र धोरण :** राष्ट्रांराष्ट्रांचे एकमेकांबरोबर व्यवहार करण्याची पद्धती म्हणजे परराष्ट्र धोरण होय.

**३. अलिप्ततावाद :** स्वतंत्र भारताने दुसऱ्या महायुद्धानंतर जगामध्ये निर्माण झालेल्या गटबाजीच्या संघर्षात न पडता आपले स्वतंत्र विदेश धोरण ठरवून शांततामय सहजीवनचा मार्ग स्वीकारला त्यास अलिप्तततावाद म्हटले जाते.

**४. लुक ईस्ट :** १९९१ नंतर भारताच्या बदलत्या आर्थिक धोरणात दक्षिण पूर्व राष्ट्रांबरोबर मैत्रीपूर्ण संबंध ठेवून त्यांच्या धर्तीवर आर्थिक विकास साधण्याचे इंद्रकुमार गुजराल धोरण (पी. व्ही . नरसिंहराव).

**५. डोकलाम :** भारत-चीन-भुतान यांच्या सरद्दीवर असणारा हा प्रदेश २०१७ मध्ये इथे भारत आणि चीनी लष्करामध्ये संघर्ष झाला होता .

**६. गलवान खोरे :** अक्साई चीन आणि पूर्व लडाख यांच्या मध्ये असणारा हा प्रदेश सामरिक दृष्ट्या अतिशय महत्वाचा. गलवान नदीचा हा प्रदेश या प्रदेशावर कब्जा करण्याचा जून २०२० मध्ये प्रयत्न केला होता. त्यावेळी भारतीय लष्कराने विरोध करत चीनी लष्कराला तेथून हाकलून लावले या मोहिमेत २० भारतीय जवान शहीद झाले होते.

**७. एनपीटी करार :** १९६८ मध्ये अण्वस्त्र प्रसार बंदी करार करण्यात आला होता. (या कराराला भारताने विरोध केला.)

**८. सीटीबीटी करार :** १९९६ मध्ये यूएनच्या आमसभेत शस्त्र नियंत्रणासाठी सर्वसामावेशक अण्वस्त्र चाचणी बंदी करार करण्यात आला. ( या करारालाही भारताने विरोध केला)

## ४.६ स्वयं अध्ययन प्रश्न आणि उत्तरे :

१) शीतयुद्ध कालखंडात भारताचे परराष्ट्र धोरण कोणत्या स्वरूपाचे होते ?--- अलिप्ततावादी

२) पंचशील करार कोणत्या दोन राष्ट्रात घडून आला ? ---- भारत चीन

३) पंचशील करार कधी करण्यात आला ?---- १९५४

४) कोणता कालखंड शीतयुद्धाचा कालखंड म्हणून ओळखला जातो ---- १९४५-१९९१

५) भारत-रशिया मैत्री करार कधी झाला ?---- १९७१

६) युनो च्या सुरक्षा परिषदेत कायम सदस्यत्वाच्या सामूहिक मागणीसाठी कोणती संघटना स्थापन केली?---- जी-४

७) जी-४ मध्ये कोणत्या राष्ट्रांचा समावेश आहे ? --- भारत, ब्राझिल, जपान आणि जर्मनी

८) भारताने आपले नवीन अण्वस्त्र धोरण कधी जाहीर केले?--- १९९९

९) भारताने नवीन आर्थिक धोरण कधी स्वीकारले?---- १९९१

१०) भारताच्या नवीन आर्थिक धोरणाचा मसुदा कोणी मांडला ? --पी.व्ही नरसिंहराव

११) भारताचे अधिकृत परराष्ट्र धोरण नेहरूंनी कधी जाहीर केले ?--- ७ सप्टेंबर १९४६

१२) जागतिक शांततेसंदर्भात भारतीय संविधांनातील कोणत्या कलमात ऊहापोह केला आहे?---५१

१३) १९९६ मध्ये सुरक्षा परिषदेच्या हंगामी सदस्यत्वाच्या निवडीमध्ये भारताचा कोणी पराभव केला?--- जपान

१४) पोखरण - २ केव्हा करण्यात आले ? --- ११ आणि १३ मे १९९८

१५) पोखरण - २ चे घोषवाक्य काय होते ? --- बुद्ध हसला

१६) १९६० ते ७० च्या दशकात भारताचे परराष्ट्र धोरण कोणत्या राष्ट्राकडे झुकले होते ?---- रशिया

१७) ताष्कद करारात कोणत्या राष्ट्राने मध्यस्थी केली ?--- रशिया

१८) १९७० च्या दशकात भारत विरोधी कोणती आघाडी आकाराला आली होती? --- अमेरिका-चीन-पाकिस्तान

१९) भारताने श्रीलंकेत शांतिसेना केव्हा पाठवली होती? ---- १९८७

२०) १९९२ पासून भारत-अमेरिका यांनी हिंदी महासागरात कोणत्या सांकेतिक नावाने नौदल कवायती सुरू केल्या ?-मलबार

२१) 'ढहश डहरळिपस`ष खपवळर'ी छशु ॠेश्रशळसप झेश्रळलू' हा ग्रंथ कोणी लिहला?--- सी. राजमोहन

२२) भारत-पाकिस्तान संबंधाचा केंद्र-बाह्य वर्तुळ सिद्धांत कोणी मांडला ?--- इंद्रकुमार गुजराल

२३) ब्रिक्स बँकेची स्थापना कधी करण्यात आली ? --- २००९

२४) भारताने कोरोना उपचारासाठी अमेरिकेला कोणत्या गोळ्या पुरवल्या? --- हायड्रोक्लोरोकिन

२५) भारताने रशियाकडून कोणती कोरोना लस आयात केली ?----- स्पुटनिक व्ही

२६) अमेरिकेच्या कोणत्या सर्वात मोठ्या आण्विक युद्ध नौकेला भारताने चेन्नई बंदरात प्रवेश दिला ?--- निमित्झ

## ४.७ स्वाध्याय प्रश्न (थोडक्यात उत्तरे लिहा) :

१) शीतयुद्ध कालीन भारताचे परराष्ट्र धोरण स्पष्ट करा.

२) शीतयुद्धोत्तर भारताचे परराष्ट्र धोरण.

३) भारताचे नवीन आण्विक धोरण.

४) भारताचे कोरोना संबंधी जागतिक धोरण.

५) अलिप्ततावाद धोरण स्पष्ट करा.

६) भारत-अमेरिका नागरी अणु ऊर्जा करार.

७) नि:शस्त्रीकरण आणि भारताची भुमिका.

८) पंचशील धोरण आणि परिणाम स्पष्ट करा.

९) भारत-रशिया मैत्री करार.

१०) भारताच्या कश्मीर धोरणाचा थोडक्यात आढावा घ्या.

११) १९९१ नंतरचा भारताचा आर्थिक राजनय स्पष्ट करा.

## ४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


१) डॉ.वसंत रायपूरकर : आंतरराष्ट्रीय संबंध मंगेश प्रकाशन, नागपुर २००६

२) डॉ. शैलेन्द्र देवळाणकर : आंतरराष्ट्रीय संबंध- द्वितीय आवृती -२०१०, विद्या बुक पब्लिकेशन, औरंगाबाद.

३) डॉ. शैलेन्द्र देवळाणकर : भारतीय परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यंतरे- प्रथमावृती पुनर्मुद्रण - २०१० प्रतिमा प्रकाशन, पुणे.

४) डॉ. विजय खरे : जागतिक राजकरणात भारत-के सागर पब्लिकेशन, पुणे.

५) फादीया बी.एल : आंतरराष्ट्रीय राजनीति, साहित्य भवन प्रकाशन, आग्रा २००४.

६) वराडकर र. घ. : आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण, विद्या प्रकाशन .

७) Vidyadhar Mahajan : International Politics Science 1900 - Third Edition 1968- S. Chand & Co. Publication.

८) Suman Sharma : India & SAARC - Gnyan Publication House, New Delhi.

९) डॉ. अनुप कुमार गुप्ता : भारत की इजारइल नीती का बदलता स्वरूप-विश्व मामलो की भारतीय परिषदके सौजन्य से सप्रू हाऊस पेपर, नई दिल्ली.


❍❍❍